सी/६४
ई/326
इ-१७९
००१७९

# [illegible]नीतिल लोकशिक्षण.

पां. दा. गुणे.

# BOOKS OF THE DAY.

## ARYABHUSHAN PUBLICATIONS.

**Gokhale & Economic Reform :** By Prof. V. G. K
M. A., Fergusson College, Poona; Crown 16 M
250 pp., Cloth Bound, Price Rs. 2.

**Life of G. K. Gokhale :** By Hon. Mr. R. P. Para
Principal Fergusson College, Poona; with ei
illustrations and facsimile of Gokhale's hand-
(3rd Edition). Crown 16 M. O., pp. 88, Price

**Life of Prof. D. K. Karve :** By Hon. Mr. R. P. Pa
Fergusson College, Poona; with six fine illustr
Crown 16 M. O., pp. 72, Price Annas 4.

**The Writings and Speeches :** Of the late Ra
Ganesh Venkatesh Joshi; Demi 8 vo., pp.
Cloth Bound, Price Rs. 5.

**The Speeches and Writings :** Of Sir Narayan Gan
Chandavarkar; Demi 8 vo., pp. 680, Cloth Bo
Price Rs. 2-8-0.

**The Indian Administration :** By Prof. V. G. K
M. A., Fergusson College, Poona; Demi 8 vo.,
340, (2nd Edition), Price Rs. 1-10-0.

**The Congress Calendar 1916 :** Photos of Con
Presidents and General Secretaries, Price Anna

**The Congress Souvenir :** 29 Photos of the Presi
and General Secretaries, Price Annas 6.

**The [illegible] School Dictionary :** Mara
[illegible] By Mr. B. G. Vaze, B. A.; Demi
pp. [illegible] Bound, Price Rs. 1-8-0.

[illegible] N. [illegible] of the Manager, Aryabhushan
Poona [illegible] Manager [illegible] Vaibhav Press, Sandhurst
Bombay [illegible] important Book-sellers in Poona & Bo

# जर्मनींतील लोकशिक्षण.

ई/3286

लेखक

**पांडुरंग दामोदर गुणे**, एम्. ए., पी एच्. डी.,

प्रोफेसर ऑफ् संस्कृत, फर्गसन कॉलेज, पुणें,

"माझा युरोपचा प्रवास" या पुस्तकाचे कर्ते.

**पुणें येथें**

आर्यभूषण छापखान्यांत अनंत विनायक पटवर्धन

यांनीं छापून प्रसिद्ध केलें.

---

१९१६

---

किंमत १२ आणे.

# प्रस्तावना.

१९११ सालीं लाइपूझिक् येथें असतांना मार्च महिन्यांत सुट्टी मिळाली. ही सुट्टी सव्वा महिन्याचेवर असत नाहीं, त्यामुळें इतर लांब कोठें जायचें, तें एकदां जाऊन राजधानी तरी पाहून यावें असें वाटलें; व बर्लिन्‌ला गेलों. जोराच्या वाढीस लागलेल्या प्रचंड साम्राज्याची राजधानी ती ! तिनें कोणाचेही डोळे दिपतील. तिकडे जाण्यांत माझा दुहेरी हेतु होता. सहा महिन्यांच्या परिश्रमानें ज्या भाषेचें धांवतें ज्ञान संपादिलें, तिचें राजधानींतलें स्वरूप पहावें हा एक, व शिक्षणपद्धति प्रगतीविषयीं नाणावलेल्या या देशांत—विशेषतः आतां त्याच्या राजधानींत येऊनही आपण कोरडेंच परत जाणें बरें नव्हे, हा दुसरा. तेथील शिक्षणपद्धतीच्या निरीक्षणाचे मीं आधींच तीन मार्ग आंखून ठेवले होते. १ प्रत्यक्ष शाळा जाऊन पाहणें; २ शिक्षक, शाळांचे चालक अगर डिरेक्टर्, शिक्षणखात्यांतील माणसें व इतर शिक्षणविषयपटु माणसें यांबरोबर वारंवार चर्चा करून माहिती मिळविणें; व ३ शिक्षणविषयक वाङ्मय—पुस्तकें, मासिकें, रिपोर्ट वगैरे वाचणें. पैकीं शेवटलें घर बसल्या करणें शक्य होतें. पहिलीं दोन कशीं घडतील याविषयीं विवंचनेंत असतांनाच बर्लिन् येथील एका मोठ्या मुलींच्या शाळेचे डिरेक्टर मला भेटले; यांची माझी लाइपूझिक् येथें ओळख झालेली होती. मी आपला हेतु त्यांस कळवितांच त्यांनीं ' आपली शाळा पहावयास अवश्य या, पण माझी नेमणूक नवीच असल्यामुळें मी इन्स्पेक्टर साहेबांस विचारून ठेवतों,' असें म्हटलें. इन्स्पेक्टरचीही गांठ लवकरच माझ्या समक्षच झाली. त्यांनीं आमच्या बेतावर विरजण घातलें. ' परदेशीयांस परवानगीशिवाय शाळा पाहतां येत नाहींत. तेव्हां यांनीं बर्लिन येथील ब्रिटिश मंत्र्याचे मार्फत विचारणा करावी; म्हणजे ते जर्मन फॉरिन् ऑफिसूच्या द्वारा विद्यामंत्र्याला लिहितील व परवानगी आणवितील,' असा सदुपदेश केला. मी प्रथम ब्रिटिश कॉन्सल् यांचेकडे गेलों व माझा हेतु कळविला. त्यांनाही एका आजारी हिंदी विद्यार्थ्याचे बाबतींत मजसारख्याची मदत हवीच होती. तेव्हां मी इस्पितळांत जाऊन त्या विद्यार्थ्याची खबर घे-

ण्याच व त्यांनीं लिगेशनला लिहिण्याचें कबूल केलें; व परत ब्रिटिश मंत्र्याचे कचेरींत स्वतः जाऊन येण्यास सांगितलें. 'येथील अधिकारचक्र फार थिल्लर असतें, तेव्हां तुम्हांला तीन आठवड्यांचे आंत परवानगी मिळेलच अशी खात्री नाहीं ' असा जातां जातां त्यांनीं इषारा दिला.

ब्रिटिशमंत्र्याचे कचेरींत गेल्यावर मजजवळ सरकारी कागदपत्र, शाळा पाहण्याबद्दल शिफारशी वगैरे काय आहेत, म्हणून विचारणा झाली. ' पासपोर्ट वगैरे माझे कागद लाइप्झिक् युनिव्हर्सिटींत आहेत व इतर चिठ्ठीचपाटी मजजवळ कांहीं नाहीं, 'असा रोकडा जबाब मजकडून मिळाल्यावर, माझें नांव, गांव, हेतु वगैरे लिहून घेऊन मला रजा देण्यांत आली. झालें! एक आठवडा गेला, दोन गेले, माझी परत लाइप्झिक्‌ला जाण्याची वेळ आली. तिसऱ्या आठवड्यांत एकदांची परवानगी आली. ब्रिटिश कॉन्सलनीं ती मुद्दाम रोअर्पोस्ट् ( नलिका–पोष्ट ) चे द्वारा पाठविली. यावेळीं मला फक्त एकच शाळा पाहतां आली. पण पुनः येण्याचा मीं निश्चय केला. परत जातांना ब्रिटिश कॉन्सलकडून ड्रेसडेन् व म्यूनिच् येथील ब्रिटिशमंत्र्यांना शिफारसपत्रें घेऊन गेलों. कारण जर्मनींतील सर्व लहान लहान राज्येंसुद्धां सर्व तऱ्हेच्या अन्तर्व्यवस्थेंत स्वतंत्र असतात, साम्राज्यसरकारचा कांहीं बाबतींत त्यांवर मुळींच ताबा नसतो. म्हणून साक्सनी व बव्हेरिया या राज्यांतील शाळा पाहण्याची पूर्वतयारी अशा रीतीनें करून ठेवावी लागली.

म्यूनिच्, ड्रेसडेन् येथील ब्रिटिशमंत्र्यांनींही शिफारसपत्रें पाहून मला मदत करण्याचें आश्वासन दिलें, व तेथील शिक्षणखात्यांकडून मला परवानगी मिळवून दिली. याप्रमाणें प्रशिया, बव्हेरिया व साक्सनी येथील कोणतीही शाळा पाहण्याची मला मुभा मिळाली व मीं तिचा पूर्ण फायदा घेतला. या कामीं बर्लिन् येथील ब्रिटिश कॉन्सल मि. बॉइल यांची मदत मिळाली नसती तर मला कांहींही करतां आलें नसतें हें उघड आहे.

लाइप्झिक् येथील शाळा मला टर्म चालू असतांच पाहतां आल्या. शाळांचा वेळ सकाळीं ७ ते १२ पर्यंत असल्यामुळें लेक्चरें संभाळून हें काम करणें अवघड नव्हतें. लाइप्झिक् येथें २ लॅटिन् व २ रीअल् स्कूल्स, ५-६ मुलांमुलींच्या प्राथमिक शाळा, १ फोर्टबिल्डुंग् अगर कंटिन्यूएशन् स्कूल, २ धंदेशाळा, १ व्यापारी शिक्षणाचें कॉलेज व एक प्राथमिक

ई/326

शिक्षकांचें ट्रेनिंग कॉलेज इतक्या संस्था मीं प्रत्येकींत दोन दोन तीन तीन दिवस जाऊन पाहिल्या. याशिवाय एक मुलींची दुय्यम शाळा, व तीस जोडलेलें शिक्षकिणी तयार करण्याचें कॉलेज पाहिलें. इतर ठिकाणीं ज्यावेळीं युनिव्हर्सिटीस सुट्टी असून शाळांस नसेल अशा वेळीं मुद्दाम जाऊन शाळा पहाव्या लागल्या. त्याही वरील प्रकारच्याच होत. विशेषतः म्यूनिच् येथें अगदीं आजच्या घडीच्या सुधारणांनीं परिपूर्ण अशी ओबर्-रेआलशूल इं. अपर् रीअल् स्कूल पाहिली. तेथील टेक्निकल कॉलेजही पाहिलें. याशिवाय बर्लिन्, ड्रेसडेन् येथेंही निरनिराळ्या प्रकारच्या शाळा पाहिल्या. त्यांच्या इमारतींची रचना, वर्गांची रचना, शोभिवंत दिवाणखाना ( हा प्रत्येक शाळेला समारंभ वगैरे कांहीं करणें झालें असतां उपयोगी पडतो; त्यास 'औला' म्हणतात ), इत्यादि गोष्टी कितीही चांगल्या आवडणाऱ्या असल्या तरी तीं बाह्यांगें होत; व गरीब हिंदुस्थानाला जर कांहीं शिक्षणाचे बाबतींत जर्मनी अगर इतर युरोपीय देशांकडून घ्यावयाचें असेल तर त्या असल्या भपकेदार बाह्य गोष्टी खास नव्हत; म्हणून मी त्यांकडे विशेषसें बारकाईनें पहात नसें. तरी पण मासल्यादाखल कांहीं वर्गांचे, अगर स्कूल म्यूझियम्चे फोटो घेतां आले असते तर फार बरें झालें असतें, असें वाटल्यावांचून रहात नाहीं. स्वतः त्यावेळीं फोटो घेतां येत नव्हते; इतरांकडून करवून घेणें फार खर्चाचें होतें.

या शाळांतील त्या त्या वर्गांचे शिक्षक व शाळेचे डिरेक्टर यांशीं माझें थोडेंबहुत संभाषण अगर वादविवाद होत असे. इतर शिक्षणविषयपटु लोकांशीं बोलण्याची संधि मी बहुधा वायां जाऊं देत नसें. या संभाषणांमध्यें माझा कटाक्ष विशेषतः विद्यार्थ्यांच्या शारीरिक व नैतिक शिक्षणाविषयीं तिकडे काय काय व्यवस्था असते, ती कशी असते, तिचें फळ कितपत दिसतें वगैरे गोष्टींवर असे. कारण ज्या शिक्षणानें मुलांचें चारित्र्य उज्वल होतें, तेंच खरें शिक्षण होय अशी माझी समजूत आहे. बुद्धीच्या विकासाबरोबरच, शरीराचा व नीति अगर चारित्र्याचा विकास ज्यांत होईल तेंच सर्वांगसुंदर व राष्ट्रीय शिक्षण होय. याविषयीं तिकडे काय काय उपाय योजिले जातात, यासंबंधीं माहिती प्रसंगाप्रसंगानें पुढील ग्रंथांत आलीच आहे.

आपणांस माहिती होतें, पण आपल्या देशबांधवांस तिचा उपयोग कसा व्हावा? परदेशीं जाऊन शिक्षण संपादण्याचा सुयोग ज्यांस म्हणून आला आहे त्यांनीं आपलें शिक्षण संभाळून, पण डोळे उघडे ठेऊन जें कांहीं पाहिलें व अनुभविलें, त्यावर त्यांच्या देशबांधवांचा हक्क असतो. तेव्हां अशा सर्वांनीं ती माहिती लोकांस देण्याचा संकल्प केला तर देशाचा फारच फायदा होईल असें वाटतें. परिस्थितीनें अंध बनलेल्यांचे डोळे परदेशीं वास केल्यानें व प्रवासानें उघडतात व स्वतःच्या सर्वतोपरी हीन स्थितीचा हृदयांत प्रकाश पडतो. त्यांनीं आपल्या बंधुमंडळीस जागें करणें हें त्यांचें कर्तव्य आहे. हें कर्तव्य करणें मला सुलभ केल्याचें श्रेय माझे मित्र रा. रा. अनंत विनायक ऊर्फ वामनराव पटवर्धन, मेंबर सर्व्हंटस् ऑफ इंडिया सोसायटी पुणें, यांस सर्वस्वी आहे. कारण जर्मन शिक्षणपद्धतीविषयीं वारंवार ज्ञानप्रकाशांत लिहीत जा, अशीं त्यांचीं कळकळीचीं पत्रें आलीं नसतीं तर हें काम माझ्या हातून आतांच झालें असतें कीं नसतें, याची शंका आहे. १९११ अखेरपासून १९१२ अखेरपर्यंत प्राथमिक व दुय्यम शिक्षणावर ज्ञानप्रकाशांत 'जर्मनींतील लोकशिक्षण' या मथळ्याखालीं लेख आहेत, त्यांतच भर घालून ते पुरे केले, व त्यांस श्रेष्ठप्रतीचें शिक्षण, व्यावहारिक शिक्षण हे भाग लिहून जोडले. हें झाल्यानंतर 'आपलेकडे काय आहे व तें कसें सुधारेल,' याविषयीं स्वतःचे तुलनात्मक विचार देणें ओघानेंच आलें. म्हणून शेवटीं एक उपसंहार जोडला. गेल्या मार्चअखेर हें सर्व तयार होऊन पडलें होतें, तें छापण्याचें रा. पटवर्धन यांनीं अंगावर घेतल्यामुळें हें काम हातावेगळें झालें याबद्दल त्यांचे आभार मानणें जरूर आहे.

फर्गसन कॉलेज,<br>
७ सप्टेंबर, १९१६.

पां. दा. गुणे.

# अनुक्रमणिका.

## भाग १ ला [ १–२६ ]


पृष्ठ.

प्रकरण १ लें— प्राथमिक शिक्षण. इतिहास २–५; सक्तीचें तत्त्व ५–७. १—७

प्रकरण २ रें— प्राथमिक शिक्षणाच्या अडचणी. ... ... ७–११

प्रकरण ३ रें— वाढ व सुधारणा. ... ... ... ... ११–१६

प्रकरण ४ थें— शिक्षणपद्धति वगैरे. नीतिशिक्षण १८; हिल्फ्-सूशूल १८–१९; वाल्डूशूल २०; शिक्षकांचे पगार २०; खर्च २०–२२. १६–२२

प्रकरण ५ वें— फोर्ट्बिल्डुंग्शूल २२-२४; किंडरगार्टन् २४-२६ २२–२६


## भाग २ रा [ २७–४४ ]


प्रकरण १ लें— दुय्यमप्रतीचें शिक्षण. सर्वांगसुंदर शिक्षण ३०–३२; आजचा अभ्यासक्रम ३२–३३; फी, परीक्षा वगैरे ३३--३४; वेळापत्रकें ३४–३५. २७–३५

प्रकरण २ रें— रिअल् स्कूल्स. गिम्नासिउम् विरुद्ध रेआलीएन् ३६--३८; ओबर् रेआल्शूल ३८–३९; शिक्षणक्रम ३९; वेळापत्रकें ४०; आंकडे ४१–४२; विशिष्टीकरण ४२--४३; नवें धोरण ४३--४४. ३५--४४


## भाग ३ रा [ ४५–५८ ]


प्रकरण १ लें— स्त्रीशिक्षण. सुधारणा ४७--४८; शिक्षकिणींच्या शाळा ४८--४९; युनिव्हर्सिटीकडे ४९. ४५--४९

प्रकरण २ रें— तीन पायऱ्या. अभ्यासक्रम ५०--५२; युनिव्हर्सिटीकडे ५२--५३; वेळापत्रक ५३; स्त्रियांस धंदेशिक्षणाची आवश्यकता ५४-५५; धंदेशाळा ५५; आंकडे ५५–५६; लित्सेएन् ५६--५७; शिक्षकसंख्या व पगार ५७; कोएज्युकेशन–मुलांमुलींचें एकत्र शिक्षण ५८. ४९–५८


## भाग ४ था [ ५९–९४ ]


प्रकरण १ लें— उच्च प्रतीचें शिक्षण. स्थापना ५९--६१; शिक्षणक्रम ६१–६२; धर्मक्रांतीचा परिणाम ६२--६५; असंतोषाचीं बीजें ६५; नवीन जागृति ५९–७१

६६--६७; स्वातंत्र्य व पारतंत्र्य ६७--६८; चतुरंग-सुधारणा ६८--६९; आकाडेमीज् ६९; बर्लिन व नवें ध्येय ६९--७०; संख्या ७१.

**प्रकरण २ रें**— युनिव्हर्सिट्यांची अंतर्व्यवस्था. युनिव्हर्सिटी व सरकार यांचे संबंध ७२--७३; अंतर्व्यवस्था ७३--७४; अधिकार ७४--७५; शिक्षणस्वातंत्र्य ७५--७६; शिक्षणक्रम ७६--७७; परीक्षा ७८; सेमिनारचें महत्त्व ७८--७९; फी वगैरे ७९--८०. **७२--८०**

**प्रकरण ३ रें**— जर्मन विद्यार्थी. विद्यार्थी व शिक्षक ८२; कोअर्स् अथवा फरबिंडेगेन् ८२--८४; सुधारणा ८४--८५; नवीं मंडळें ८५--८६; वरिष्ठ प्रतीचें शिक्षण व स्त्रिया ८६--८७; आंकडे ८७--८९. **८०--८९**

**प्रकरण ४ थें**— शिक्षक. ... ... ... ... ... **८९--९४**

## भाग ५ वा [ ९५--११४ ]

**प्रकरण १ लें**— व्यावहारिक शिक्षण. ... ... ... **९५--९९**

**प्रकरण २ रें**— श्रेष्ठप्रतीचें व्यावहारिक शिक्षण. कांहीं हक्क १०४; फी वगैरे खर्च १०४--१०५; परीक्षेची फी १०५; व्यवस्था १०५; आंकडे १०५--१०६. **९९--१०६**

**प्रकरण ३ रें**— व्यापारी शिक्षणाचीं कॉलेजें. उद्देश १०७; सेनेट १०७--१०९; शिक्षणक्रम १०९--११०; परीक्षा ११०--१११. **१०६--१११**

**प्रकरण ४ थें**— आणखी कांहीं प्रकार. विशिष्टीकरण ११३--११४. **११२--११४**

## भाग ६ वा [ ११५--१५२ ]

**उपसंहार**— मातृभाषा ११६-१२०; प्राथमिक शिक्षण १२०--१२४; दुय्यम शिक्षण १२४--१२९; शिक्षकांस स्वातंत्र्य १२९--१३०; श्रेष्ठप्रतीचें शिक्षण १३१--१३२; विशिष्टीकरण १३३; शिक्षण देणारी युनिव्हर्सिटी १३४--१३५; पुणें येथें युनिव्हर्सिटी १३५; वसतिगृहें १३६; आणखी कॉलेजांची आवश्यकता १३७; युनिव्हर्सिटीची अंतर्व्यवस्था १३७--१३९; स्त्रीशिक्षण १३९--१५०; **११५-१५२**

# जर्मनींतील लोकशिक्षण.

## भाग १ ला.

आपल्या देशांत सध्यां खऱ्या लोकशिक्षणाविषयीं लोकमत जागृत होऊं लागलें आहे, आणि प्राथमिक शिक्षण सक्तीचें व सार्वत्रिक व्हावें अशाविषयीं लोकाग्रणी आपापल्यापरीनें खटपट करीत आहेत. त्यांच्या प्रयत्नास आज नाहीं तरी कालांतरानें यश येणार यांत शंका नाहीं. अशा जागृतीचे वेळीं शिक्षणविषयक प्रगतींत पुढें गेलेल्या देशांमध्यें प्रमुखत्वानें ज्याची गणना होते, त्या जर्मनराष्ट्रांतलें 'खरें लोकशिक्षण', त्याचा थोडा इतिहास, शिक्षणपद्धति व त्या शिक्षणाचा परिणाम याविषयींची माहिती महाराष्ट्रीयांस बोधप्रद होईल. संयुक्त जर्मनीमध्यें लोकशिक्षण सक्तीचें व मोफत आहे हें पुष्कळ लोकांस माहीतच असेल. जवळ जवळ सात कोटी लोकवस्तीच्या या राष्ट्रांत अक्षरशत्रु असा मनुष्य स्वप्नांतसुद्धां दिसत नाहीं, असें म्हटलें असतां अतिशयोक्ति होणार नाहीं. याचें कारण व्यवस्थित रीतीनें चालविलेल्या प्राथमिक शिक्षणाच्या शाळांचें जर्मनराष्ट्रांत सर्वत्र पसरलेलें जाळें, हें होय. मात्र हें सक्तीचें तत्त्व व त्याबरोबरच शाळांचें जाळें म्हणजे जर्मनी संयुक्त झाल्यानंतरची अलीकडल्या ३०।४० वर्षांतली एकाएकीं झालेली वाढ आहे असें मात्र समजतां कामा नये. आजची ही स्थिति म्हणजे किती एक शतकांची वाढ व अनेक बुद्धिमान् व कर्तृत्वशील पुरुषांच्या परिश्रमाचें फळ आहे.

# प्रकरण १ लें.

## प्राथमिक शिक्षण.

जर्मनींतील प्राथमिक शिक्षणाच्या शाळांस ' फोल्क्स् शूल ' असें म्हणतात. ( सोईसाठीं सर्व ठिकाणीं फोल्क्स् शूल हेंच नांव आम्हीं कायम ठेविलें आहे. ) या शाळांच्या इतिवृत्ताचे तीन भाग करितां येतात. पहिला आरंभ अथवा स्थापनेचा सन १६४८ पर्यंतचा काळ, दुसरा शाळाखातें धर्मसंस्थेकडून सरकारच्या ताब्यांत जाण्याचा व सक्तीचें तत्व अमलांत येण्याचा सन १६४८ ते १८०० पर्यंतचा काळ, व तिसरा ' फोल्क्स् शूल ' च्या वाढीचा व सुधारणेचा काळ अथवा १९ वें शतक व पुढें.

## इतिहास.

' फोल्क्स् शूल ' च्या स्थापनेचा काळ म्हणजे मार्टिन लूथरनें घडवून आणलेल्या धर्मक्रांतीचा काळ होय. त्यापूर्वीं शिक्षण—याला लोकशिक्षण हें नांवसुद्धां शोभत नाहीं—जें कांहीं होतें, तें धर्माधिकाऱ्याच्या ताब्यांत असे; व त्याचा हेतु लॅटिन, ग्रीक इत्यादि भाषा व आरिस्टॉट्लूचें न्यायशास्त्र शिकून प्रचलित धर्माचें युक्तिवादानें समर्थन करतां येणें हाच एक असे. परंतु लूथरनें, व त्याच्या मित्रांनीं १६ व्या शतकाच्या आरंभीं धर्मक्रांति घडवून आणल्यावर, ' ईशवाक्य ' साधारण लोकांसही समजून त्यांच्या मनावर त्याचा कायम ठसा रहावयास मातृभाषेच्या द्वारें शिक्षणाचा प्रसार केला पाहिजे, असें त्यांस वाटूं लागलें; व या हेतूच्या सिद्धीसाठीं लेख लिहून व निरनिराळ्या प्रांतांतील संस्थानिकांस भेटून त्यांनीं त्या वेळेच्या परिस्थितीस अनुरूप अशी लोकशिक्षणाची व्यवस्था करण्याचे प्रयत्न केले. सन १५२४ मध्यें जर्मनींतील सर्व शहरच्या अधिकाऱ्यांस व सभासदांस उद्देशून

लूथर यानें लिहिलेल्या पत्रांत दोन मुद्दे महत्वाचे आहेत. पहिला मुद्दा, 'ईशवाक्य' कायम रहावयाचें असेल तर जर्मनभाषेचा अभ्यास **सार्वत्रिक** सुरू केला पाहिजे हा होय; व दुसरा, चांगल्या शाळा स्थापण्याची व्यवस्था करणें व त्यांत लोकांचीं मुलें अवश्य शिकतील अशी दक्षता ठेवणें, हें शहरच्या व प्रांतोप्रांतींच्या अधिकाऱ्यांचें कर्तव्य आहे हा होय. लूथर व मेलेंक्थोनप्रभृति त्याच्या मित्रांच्या श्रमांचें बरेंच चीज झालें व नव्या सुधारलेल्या चर्चच्या ( धर्मसंस्था ) आश्रयाखालीं पुष्कळ शाळा सुरू झाल्या; त्यांत शिक्षण अर्थातच बहुतेक धार्मिक असे. जर्मनभाषा व तींतच लिहिलेला कॅटेचिझ्मुस् ( धर्मसंबंधीं प्रश्नोत्तरांचें पुस्तक ), पुढें लॅटिन ग्रीक वगैरे, असें एकातर्फीच शिक्षण तेव्हां सुद्धां मिळे. पण लूथर व त्याचे मित्र यांनीं त्यावेळीं केलेल्या परिश्रमाचें महत्त्व, सर्व लोकांस शिक्षण मिळावें ही नवीन कल्पना प्रचलित केली गेली व तिला विशिष्ट स्वरूप दिलें गेलें, या दृष्टीनेंच मुख्यतः आहे.

जर्मन लोकशिक्षणाच्या खऱ्या भाग्योदयाला सन १६४२ मध्यें प्रारंभ झाला. या शतकाचे आरंभीं राट्क, कोमेन्स्की यांसारख्या कुशाग्र बुद्धीच्या माणसांनीं 'खरें लोकशिक्षण' या विषयावर लेख लिहिले; व स्वतःही निरनिराळ्या ठिकाणीं शिक्षकाचें काम करून आपल्या पद्धति प्रत्यक्ष प्रमाणांनीं स्थापित केल्या. सन १६१२ सालीं लिहिलेल्या पुस्तकांत राट्क यानें शिक्षणाविषयीं तत्त्वभूत म्हणून कांहीं मुद्दे नमूद करून ठेविले होते, त्यांपैकीं कांहीं खालीं दिले आहेतः—

प्रथम प्रत्येक गोष्ट मातृभाषेंत, सर्व गोष्टी सृष्टिक्रमास अनुसरून, एका वेळीं एकच विषय, एकाचेंच पुष्कळ वेळ पुनरुच्चारण, धाकदडप घालून उपयोगी नाहीं, प्रथम कोणतीही सबंध वस्तु अगर गोष्ट, नंतर तिची अवयवरचना, ( उदाहरण, प्रथम वाचनादि व त्यावरून नियम, प्रथम वाक्यें मग त्यांतून व्याकरण ) सर्व प्रत्यक्ष प्रमाणाचे द्वारें ( शिक्षक सांगेल तें प्रमाण असेंच केवळ उपयोग नाहीं ), शिक्षणापासून

कोणीही पराङ्मुख राहतां कामा नये, निदान लिहिणें वाचणें तरी सर्वांस आलें पाहिजे इ०. असलेच, पण विशेष पद्धतशीर विचार कोमेन्स्की (कोमेनियस्)चे होते. परमेश्वरप्रतीति आबालवृद्धांस व्हावी हा कोमेन्स्कीचा मुख्य मुद्दा असे, व ज्याअर्थी बायबल व सृष्टि यांच्या द्वारां परमेश्वर प्रकट होतो, त्याअर्थी लोकांनीं वाचण्यास व सृष्टीचें अवलोकन करण्यास शिकलें पाहिजे, असें त्याचें म्हणणें असे. कोमेन्स्कीनें आपल्या एका मुख्य पुस्तकांत शिक्षणक्रमाचे तीन विभाग केले आहेत. पहिला 'शोलामाटरना' अथवा गृहशिक्षण. हें मुलांच्या वयाचीं सहा वर्षें घरींच आईबापांकडून मिळालें पाहिजे. बोलतां येणें व धार्मिक भावनांची जागृति, एवढेंच या वेळीं व्हावें. दुसरा भाग 'शोलाव्हरनाकुला'. वाचन, लेखन व व्याकरण यांच्या द्वारां मातृभाषेचें चांगलें ज्ञान, धर्म, अंकगणित, भूमिति, समाजाचें ज्ञान, भूगोल, इतिहास, गायन व कांहीं तरी हस्तकौशल्य इतकें या भागांत मुलाच्या वयाच्या पुढच्या ६ वर्षांत म्हणजे त्याच्या वयाच्या १२ वर्षांपर्यंत व्हावयास पाहिजे. याप्रमाणें प्राथमिक शिक्षण चांगलें झालें म्हणजे शहरांतील लॅटिन शाळांत व नंतर प्रांतांतील विश्वविद्यालयांत, याप्रमाणें शिक्षण क्रमवार व्हावें असें कोमेन्स्कीनें आपल्या पुस्तकांत प्रतिपादन केलें आहे. राट्क व कोमेन्स्की यांच्या व इतरांच्या लेखांचा परिणाम असा झाला कीं, कांहीं संस्थानिकांस त्यांचीं तत्त्वें पटून त्यांनीं कांहीं तज्ज्ञांस आपल्या पदरीं बाळगून शाळा स्थापण्याचा प्रयत्न केला.

ज्यास खरें 'फोल्क्सूशूल' म्हणतां येईल, अशा तऱ्हेच्या शाळेच्या स्थापनेविषयींच्या नियमांचा मसुदा सन १६१९ त प्रथम वायमार संस्थानांत पास झाला. त्याच्या आदल्याच वर्षी त्याच प्रकारच्या नियमांचा मसुदा हेसेन् कासेल् संस्थानांत तयार करण्यांत आला होता. या दोन्हींसही राट्क यानें प्रतिपादलेलीं तत्वें आधारभूत होतीं. वायमार येथील हा कायदा विशेषतः 'लांड् शूल' अथवा खेड्यापाड्यांच्या शाळांसाठीं

होता. म्हणून त्यामध्यें जर्मनभाषेस विशेष महत्त्व दिलें गेलें. या कायद्यामध्यें **सक्तीचें तत्त्व प्रथमतः स्वीकारलें गेलें** हा यांतील विशेष होय. याप्रमाणें लूथरसारख्या लोकाग्रणींनीं केलेले परिश्रम या संस्थानांत प्रथम फळास आले. ‘ दर गांवच्या शाळामास्तरांनीं व उपाध्यायांनीं तेथील सहा वर्षांपासून बारा वर्षांपर्यंतच्या वयाच्या सर्व मुलांचें टिपण ठेवावें व जे लोक आपलीं मुलें शाळेंत न पाठवितील त्यांची समजूत घालावी. प्रसंग पडल्यास त्यांना गांवच्या अधिकारी लोकांकडून आपलें कर्तव्य करण्यास भाग पाडावें, ’ अशा आशयाचें सक्तीसंबंधाचें कलम वर निर्दिष्ट केलेल्या कायद्यांत होतें. याच वेळीं ‘ तीस वर्षांचें युद्ध ’ म्हणून प्रसिद्ध असलेल्या युद्धास नुकताच आरंभ होऊन सर्व जर्मनींत पुढें २५ वर्षांवर धामधूम उडून राहिली होती, ही लक्ष्यांत ठेवण्यासारखी गोष्ट आहे.

## सक्तीचें तत्त्व.

सक्तीच्या तत्त्वाचा विशेष कडक अंमल प्रथमतः अगदीं लहान अशा गोटा संस्थानांत १६४२ सालीं चालू झाला. या संस्थानाचा अधिपति हर्त्सोग् अर्न्स्ट् हा फार धार्मिक व दयाळू असे. आपली प्रजा अज्ञानांत व त्यामुळें उद्भवणाऱ्या हालअपेष्टांत खितपत पडावी हें त्यास योग्य वाटलें नाहीं. शिवाय हर्त्सोग् अर्न्स्ट् हा स्वतः चांगला सुशिक्षित असल्यामुळें खऱ्या लोकशिक्षणाचें महत्व तो पूर्णपणें ओळखून होता. वर निर्दिष्ट केलेल्या तीस वर्षांच्या युद्धामध्यें सामान्य जनसमूहाची आपल्या संस्थानाविषयीं व राजांविषयीं जी उदासीन वृत्ति होती, तीसुद्धां थोड्याअधिक प्रमाणानें अज्ञानजन्य होती, हें इतर कांहीं संस्थानिकांप्रमाणें हर्त्सोग् अर्न्स्ट् यास कळून चुकलें होतें. अशा वेळीं राष्ट्रकच्या नव्या कल्पनांचा कट्टा अभिमानी असा एक विद्यासात्याचा मंत्री त्याला मिळून दुधांत साखर पडल्यासारखें झालें. १६४२ सालीं या मंत्र्याच्या मदतीनें त्यानें ‘ गोटाइशर शूल्मेट्रोडुस् ’ म्हणून प्रसिद्ध असलेला खलिता प्रसिद्ध केला.

'वयाला पांच वर्षें पुरीं झालेल्या प्रत्येक मुलानें शाळेंत गेलेंच पाहिजे, व जेवढें ज्ञान त्यास अवश्य हवें, तेवढें प्राप्त होईतोंपर्यंत शिकलें पाहिजे' असा यांतील मुख्य निर्बंध होता. या खलित्यांत शिक्षणाचे विषय, पद्धति व व्यवस्था इतकी व्यवस्थेशीर ठरविली गेली होती कीं, पुढें दीड शतक पावेतों प्राथमिक शिक्षणाची व्यवस्था सर्व ठिकाणीं या नमुन्याप्रमाणें चालू होती. जर्मनभाषा, धर्म, गणित, गाणें व प्रत्यहीं उपयोगांत येणाऱ्या अनेक वस्तूंचें व सृष्टीचें ज्ञान, इतक्या विषयांचा अंतर्भाव अभ्यासक्रमांत करण्यांत आला होता. स्वतःच्या गांवाचें चांगलें ज्ञान (हायमातकुंड) व त्यावरून पुढें भूगोल अशी रीति ठरविली होती. मुलगा गैरहजर असलेल्या दिवसांत, इतकेंच नव्हे, तर गैरहजिरीच्या तासागणिक एक ग्रोशेन् (एक आण्यापेक्षां थोडा अधिक) दंड त्यानें द्यावा असाही एक निर्बंध होता. सक्तीच्या शिक्षणासंबंधानें वर दिलेल्या आशयाचें आज्ञापत्र काढूनच केवळ हर्त्सोग् अर्न्स्ट् हा स्वस्थ बसला नाहीं; तर वाढणाऱ्या शाळांस इमारती, शिक्षक, योग्य पुस्तकें इत्यादि आवश्यक गोष्टींचा त्यानें चांगला पुरवठा केला व नियमाप्रमाणें संस्थानांत व्यवस्था अंमलांत येते किंवा नाहीं, हें पाहण्यासाठीं दोन इन्स्पेक्टर नेमले. त्यांस फिरण्यासाठीं घोडीं मिळत अगर त्यांचा खर्च मिळे. या सार्वजनिक शिक्षणासाठीं नव्या पद्धतीचे शिक्षक तयार व्हावे म्हणून त्यांसाठीं शाळा काढण्याचें त्याच्या मनांत फार होतें. तसें झालें असतें तर त्या सर्वांगसुंदर अशा झाल्या असत्या; पण त्याच्या या मनोदयास मूर्तस्वरूप येण्यापूर्वीं त्याची आयुष्यमर्यादा संपली ! शिक्षक तयार करण्याची खबरदारी घेण्याविषयीं आपल्या मृत्युसमयीं त्यानें आपल्या वारसांस आग्रहाची शिफारस करून ठेविली.

हर्त्सोग् अर्न्स्ट्चे शिक्षणविषयक प्रयत्न फुकट गेले नाहींत. त्याचें उदाहरण पाहून इतर संस्थानांतही सक्तीच्या शिक्षणाविषयीं कायदे करण्याचा उपक्रम झाला. ब्राऊन्श्वाईग् संस्थानांत १६४७ सालीं व व्यूर्टैंबर्ग्

संस्थानांत १६४९ सालीं सक्तीच्या शिक्षणाचे कायदे झाले. निडा व आल्सूफेलू या शहरांनीं अनुक्रमें १६६७ व १६७७ सालीं, तसेंच होम्बुर्ग् व दुसऱ्या कांहीं शहरांनींही या संस्थानाचा कित्ता गिरविला. याप्रमाणें लोकशिक्षण सक्तीचें करण्याचा उपक्रम १७ वे शतकाच्या मध्यंतरीं बऱ्याच छोटेखानी संस्थानांनीं व कांहीं शहरांनीं जर्मनींत केला. येथवर जर्मनींतील मोठीं संस्थानें अगर राज्यें तटस्थ होतीं ही लक्षांत ठेवण्यासारखी गोष्ट आहे. तरी पण, लोकशिक्षणाकडे त्यांचें दुर्लक्ष होतें असें मात्र नाहीं. उदाहरणार्थ, पूर्व प्रशियामध्यें १८ व्या शतकाच्या आरंभाचे सुमारास २००० नवीं 'फोक्स् शूलें' काढलीं गेलीं. पण सक्तीचें तत्व बरेंच उशीरां, म्हणजे १७१७ मध्यें स्वीकारलें गेलें. त्या वर्षी राजाच्या खलित्यामध्यें सक्तीच्या तत्त्वाचा निर्देश होऊन, त्यामुळें वाढलेल्या खर्चाची तजवीज त्या वेळच्या परिस्थितीला अनुसरून केली गेली. त्यानंतर वीस वर्षांनीं यासंबंधानें केलेल्या कायद्यांत शिक्षणाची व्यवस्था मुख्यतः गांवमंडळ अगर गांवपंचाइतीकडे (आपल्याकडे याला म्युनिसिपालिटी म्हणतां येईल) सोंपविली गेली. तरी सरकारी तिजोरींतून ५०००० डॉलर स्थळखर्च भागविण्यास व गरीब गांवपंचाइतींस मदत म्हणून त्यावेळीं दिले गेले.

---

# प्रकरण २ रें.

## प्राथमिक शिक्षणाच्या अडचणी.

वर सांगितल्याप्रमाणें प्राथमिक शिक्षणाच्या बाबतींत सक्तीचें तत्त्व सर्व जर्मनीभर अठराव्या शतकाच्या आरंभीं अमलांत आलें; पण प्रथम त्या कामीं अर्थातच अनेक अडचणी आल्या. सक्तीच्या तत्त्वासंबंधानें या देशांत कित्येक लोक ज्या प्रकारचे आक्षेप घेत आहेत, व त्या कामीं ज्या अडचणी आहेत असें सांगण्यांत येत आहे, तशाच प्रकारचे आक्षेप

जर्मनींतही एका काळीं घेण्यांत आले व तशाच स्वरूपाच्या अडचणी जर्मनींतही होत्या, ही लक्षांत ठेवण्यासारखी गोष्ट आहे. प्राथमिक शिक्षण हिंदुस्थानांत मोफत व सक्तीचें करण्यास साधारण पैशाची कमतरता व लायक शिक्षकांची टंचाई या अडचणी अधिकाऱ्यांकडून पुढें करण्यांत येतात. जर्मनींतही या अडचणी होत्याच. परंतु त्यांतून त्या राष्ट्रानें मार्ग काढला. १ जर्मनींत या कामीं पहिली अडचण पैशाची होती. 'तीस वर्षांच्या युद्धा'नें बहुतेक संस्थानें धुळीस मिळालीं होतीं, व एकंदर देशास दारिद्र्य आलें होतें. तरीही बहुतेक संस्थानिकांनीं व प्रशियासारख्या राज्याच्या कारभाराचीं सूत्रें हातांत वागविणारांनीं पैसा देण्यास कसूर केली नाहीं. शिक्षणानें शहाण्या झालेल्या माणसांनीं कामधंदे हुषारीनें करून राज्याचा फायदा करावा व शिपाईही शिक्षणाचे योगानें स्वामिभक्त, देशाभिमानी व चतुर व्हावे याकडे त्यांचें लक्ष्य होतें. २ दुसरी अडचण योग्य शिक्षकांची. पूर्वीं धर्माधिकारी शिक्षकांचें काम करीत; त्यांच्यांत अध्यापनाची परंपरा चालत असल्यामुळें त्याकामीं माणसेंही बरीं मिळत. परंतु सक्तीमुळें वाढलेल्या शाळांच्या संख्येस धर्माधिकारी वर्गांतून पुरेशा शिक्षकांचा पुरवठा होणें अर्थातच शक्य नव्हतें; म्हणून इतर धंदेवाल्या लोकांसही बरेच वेळां शिक्षकांचा व्यवसाय प्रथम करावा लागला. एकदां तर लढायांतून जायबंदी झालेल्या साक्षर शिपायांना खेड्यापाड्यांतून शिक्षक नेमावें, असें प्रशियाच्या राजानें १७८० चे सुमारास फर्माविलें होतें! त्या शतकाच्या आरंभीं शिक्षक तयार करण्याच्या कांहीं थोड्या शाळा निघाल्या होत्या; पण त्या शतकाच्या जवळ जवळ अखेरपर्यंतही त्यांची संख्या काम भागविण्यापुरती वाढली नव्हती. इ. स. १७०० चे सुमारास गोटा संस्थानांत तत्त्ववेत्ता आणि शिक्षणविषयपटु फ्रान्क यानें व त्याच्या शिष्यांनीं हाल, स्टेटिन्, कॉनिग्जबर्ग्, हाल्बरस्टाट्, वगैरे ठिकाणीं अशा प्रकारच्या लायक शिक्षक तयार करण्याच्या कांहीं शाळा काढल्या. परंतु त्यांची संख्या हाताच्या बोटांवर मोजतां येण्याइतकीच होती. त्या शाळांनीं लायक शिक्षकांचा जरूर तितका पुरवठा करण्याचें

काम भागण्यासारखें नव्हतें. ३ सक्तीच्या प्राथमिक शिक्षणाच्या कामीं जर्मनींत आलेली तिसरी अडचण म्हटली म्हणजे, आपलीं मुलें शाळेंत गुंतल्यामुळें शेतावरचे कामीं त्यांची बिलकुल मदत होत नाहीं या समजुतीनें प्रथम शेतकरी लोकांनीं केलेला अडथळा, ही होय. या वेळचा त्यांचा अडाणीपणा लक्षांत घेतला तर लोकहिताच्या या योजनेस त्यांनीं विरोध केला याचें आश्चर्य वाटणार नाहीं. निरक्षर व लहानपणापासून हातीं नांगर धरलेला कुणबी, व कांहीं वर्षें शिक्षण मिळून शारीरिक व मानसिक शक्तींचा विकास झालेला चतुर शेतकरी, यांतील अंतर पुढें अनुभवाअंतीं त्यांचें त्यांसच कळूं लागलें. ४ शिवाय, आपल्या कुळांस व त्यांच्या मुलांस शिक्षण मिळण्याच्याविरुद्ध सर्व मोठमोठे जमीनदार होते. कारण एक तर त्या शिक्षणाच्या खर्चाचा बराच बोजा त्यांजवर पडून त्यांच्या खिशाला चट्टा बसे; व दुसरें, ते असें म्हणत कीं, आमचीं कुळें जितकीं अशिक्षित व अजाण अशीं राहतील तितकें लाथा मारून ढोरांसारखें त्यांजकडून काम करून घ्यायला सोपें पडेल ! पण आश्चर्याची गोष्ट ही कीं, अठराव्या शतकाच्या दुसऱ्या अर्धांत अशा जमीनदार सरदारांपैकींच एकजण पुढें येऊन शेतकरी आणि इतर अज्ञान लोक यांच्या शिक्षणाचा पुरस्कर्ता झाला ! हा उदार मनाचा पुरुष फॉन् रोचाऊ हा होय. लोकांत शिक्षणाचा प्रसार करून त्यांच्यामधील अज्ञान नाहींसें करण्याकडे फॉन् रोचाऊ याचें लक्ष वेधण्याला एक विशेष कारण झालें. एकदां त्याच्या गांवांतील शेतावर एक भयंकर सांथ पसरली होती. ती सांथ नाहींशी करण्याचे कामीं लोकांचें अज्ञान, भुताखेतांवरील विश्वास, व त्यांच्या हाडींमासीं खिळलेल्या विचित्र कल्पना यांनीं त्याला फार अडथळे आले. तेव्हां शिक्षणाची उपेक्षा हेंच एक या गोष्टीचें व एकंदर राज्यांत पसरलेल्या दैन्यांचें बलवत्तर व प्रधान कारण आहे, असें त्यानें ताडलें व आपल्या लोकांस चांगल्या शिक्षकांकडून शिक्षण मिळावें यासाठीं त्यानें आमरण खटपट केली.

जर्मनींतील लोकशिक्षणाच्या इतिहासाचा हा भाग संपविण्यापूर्वी अठराव्या शतकाच्या आरंभीं शिक्षणविषयास आपलें तन, मन व धन अर्पण केलेल्या एका गृहस्थाविषयीं थोडक्यांत माहिती देणें जरूर आहे. त्याचें नांव फ्रान्क. हा हाल येथील युनिव्हर्सिटींत धर्म व तत्त्वज्ञान या विषयांचा प्रोफेसर असतां, लोकशिक्षणाविषयींचे उद्योग त्यानें सुरूं केले. १६९५ त प्रथम त्यानें गरीब मुलांसाठीं शाळा ('आर्मेन शूल') काढली. तींतील शिक्षणाची लवकरच ख्याती होऊन मध्यम स्थितींतील लोकांचीं मुलें त्या शाळेंत जाऊं लागलीं. तेव्हां त्यांसाठीं त्यानें नागरिकांची शाळा ('ब्युर्गर् शूल') जोडिली. नंतर लौकरच पोरक्या मुलांसाठीं शाळा ('वायजेन् हाऊस्') काढिली; व तिला जोडून शिक्षक तयार करण्याची व्यवस्था केली. यांतूनच पुढें ट्रेनिंग् कॉलेज् ('सेमिनारिउम्') निघालें. मध्यम स्थितींतल्या व मोठ्या घराण्यांतल्या मुलींसाठीं शाळा १७ व्या शतकाच्या शेवटीं अथवा अठराव्या शतकाच्या आरंभीं फ्रान्कनेंच काढली. वरिष्ठ स्त्रीशिक्षणाचा हा पद्धतशीर असा पहिलाच प्रयत्न होय. शेवटीं १७०७ मध्यें वरच्या प्रतीच्या शिक्षकांसाठीं एक शाळा त्यानें काढिली. फ्रान्कनें शिक्षणप्रसाराच्या कामीं किती परिश्रम केले याची कांहीं कल्पना वर दिलेल्या माहितीवरून येईल. या कामीं त्याला सहकारी व शिष्यही चांगले मिळाले; व त्यांनीं प्रशियाच्या राजाच्या मदतीनें १७३३ सालीं स्टेटिन् येथें व १७३५ सालीं माग्डेबुर्ग् येथें व इतर ठिकाणीं ट्रेनिंग् कॉलेजें स्थापन केलीं. आर्मेन् शूलें व वायजेन् हाऊस् हीं फ्रांकच्या मरणानंतर बरींच वाढलीं. फ्रांकच्या शिक्षणविषयक कल्पनांचा साक्सनी व ट्यूरिंगेन् या प्रांतांत लवकरच झपाट्यानें प्रसार झाला.

कॅथोलिक् जर्मनी—विशेषतः बव्हेरिया प्रांत—या कामीं जरा मागें राहिला होता. तरी शिक्षणास सक्तीच्या तत्त्वाची जोड, शाळाखातें चर्चच्या ( धर्मसंस्थेच्या ) अधिकारांतून काढून सरकारी नियंत्रणा-

खालीं घेण्याची तजवीज, शिक्षणांत सुधारणा करून आधुनिक भाषा व शास्त्रें यांस अभ्यासक्रमांत योग्य महत्त्व देण्याची योजना वगैरे गोष्टी बव्हेरियांतही १७५० ते १७७० सालांच्या दरम्यानच्या काळांत अंमलांत आल्या. विशेष एवढाच कीं, प्रशिया व इतर प्रॉटेस्टंट् जर्मनीप्रमाणें कॅथोलिक् जर्मनींत सर्व सुधारणा मुळापासून व क्रमाक्रमानें न होतां एकदम अमलांत आणल्या गेल्या.

---

# प्रकरण ३ रें.

## वाढ व सुधारणा.

जर्मनींत प्राथमिक शाळांच्या स्थापनेचा काळ व सक्तीचें तत्त्व अमलांत येण्याचा काळ, यांविषयींची माहिती वरीलप्रमाणें थोडक्यांत दिली. यानंतरच्या काळांत–१९ साव्या शतकांत–फोल्क्स् शूलची वाढ व सुधारणा झाली. एकोणिसाव्या शतकास प्रारंभ झाल्यावर सक्तीचें तत्त्व जर्मनींत सर्वमान्य होऊं लागून लोकशिक्षणाचीं मुळें खोल जाऊं लागलीं. सार्वत्रिक शिक्षणाच्या आवश्यकतेबद्दल या देशांतील समंजस लोकांत शंका न राहून शिक्षणाचा प्रसार चांगला झपाट्यानें होऊं लागला. परंतु नवीन शोध, वाढते व्यापारधंदे यांच्या योगानें शहरांस येत चाललेलें महत्व व त्यांचा विस्तार, व त्यामुळें वाढत चाललेल्या शारीरिक व मानसिक गरजा यांना अनुरूप अशी लोकशिक्षणाची पद्धति अंमलांत आली नव्हती; शिक्षकांची उणीव ही होतीच. या गोष्टींकडे शिक्षणविषयपटु लोकांचें आतां लक्ष्य लागलें. शिक्षणपद्धति व शिक्षणाचा उद्देशही व्यवस्थित रीतीनें ठरविण्याचा आतां प्रसंग येऊन ठेपला; व त्याला तोंड देऊन हे प्रश्न समाधानकारक रीतीनें सोडविण्यास ‘ पेस्टालोझी ’ हा स्विस् गृहस्थ पुढें सरसावला. प्राथमिक शिक्षणाचा उद्देश काय असावा, व तें कसें द्यावें या विषयावर पेस्टालोझी यानें लिहिलेल्या लेखांमुळें

त्याची फार ख्याति झाली. तेव्हां प्रशियाच्या शिक्षणखात्याच्या गुण-ग्राहक अधिकाऱ्यानें त्याजकडे बर्लिनहून ७।८ शिक्षक शिक्षणपद्धतीसंबंधाची माहिती मिळविण्यासाठीं पाठविले. शिक्षणाचा हेतु काय असावा व तो हेतु साध्य होण्यासाठीं शिक्षण कोणत्या रीतीनें द्यावें, यांविषयींचें तात्त्विक दृष्ट्या विवेचन करून पेस्टालोझी यानें नवीन कल्पना व दिशा लोकांपुढें मांडली. परंतु प्रत्यक्ष शिक्षक या नात्यानें त्यास यश आलें नाहीं. तथापि पेस्टालोझी यानें जीं तत्त्वें प्रतिपादन केलीं त्यांची उपयुक्तता व व्यवहार्यता लोकनिदर्शनास आणण्यास त्यास कर्तृत्ववान् शिष्य मिळाले, व त्यांनीं त्याचें काम शेवटास नेलें. शिक्षणाचा उद्देश काय असला पाहिजे, हें पेस्टालोझीनें आपल्या सर्व ग्रंथांत कंठरवानें वारंवार सांगितलें आहे. मनुष्यास बुद्धि आहे तशी इतर प्राण्यांस नाहीं; मनुष्याला ही जी विशेष देणगी मिळाली आहे तिचा मुख्य हेतु त्यानें स्वतःसिद्ध असावें हा आहे. हा स्वतःसिद्धपणा त्यास मिळवूं न देणें किंवा तो मिळविण्याचा तो प्रयत्न करीत असतां त्यास अडथळे आणणें म्हणजे त्यास आजन्म बाल्यावस्थेंतच ठेवणें होय. बौद्धिक व नैतिकदृष्ट्या स्वतःसिद्ध अशी व्यक्ति तयार करणें हें सर्व शिक्षणाचें एकच खरें कर्तव्य आहे. स्वतःसिद्धपणाचें शिक्षण नैसर्गिक शक्तींचा स्वतःसिद्ध उपयोग करण्याची संवय केल्यानें मिळतें. शिक्षकाचें काम फक्त या स्वभावतःच असलेल्या शक्ति जागृत करणें, त्यांस उत्तेजन देणें व त्यांना अनुरूप अशा उद्योगाची संधि आणून देणें, एवढेंच होय. म्हणजे शिक्षकाला फक्त मार्गदर्शकाचें काम करावयाचें असतें. निष्काळजी मुलाला धाकदपटशा दाखवून व अर्थाकडे लक्ष न देतां नुसती घोकंपट्टी त्याच्याकडून करून घेऊन त्याच्या डोक्यांत ज्ञान कोंबण्याच्या जुन्या रीतीनें खरें शिक्षण मिळणें शक्य नाहीं. नैसर्गिक व मानसिक शक्ति—अवलोकन, परिज्ञान, मनोव्यापार—यांचा विकास केवळ स्वैरव्यापारानें होत असतो, ज्ञान कोंबण्याच्या मार्गानें होत नाहीं. जन्मसिद्ध नैतिक शक्तींचेंही असेंच आहे. याहीसंबंधीं शिक्षकाचें काम, नैतिक बुद्धि व नैतिक इच्छा

यांची मुलांच्या अंतर्यामीं वाढ करवून त्यांस नीतिशिक्षण देणें आणि अशा रीतीनें चांगल्याकडे त्यांची प्रवृत्ति करणें हें आहे. केवळ ' सत्य सदा बोलावें ' यांसारखीं सूत्रें कानींकपाळीं ओरडून सांगितल्यानें किंवा एखादें ' मॉरल् क्लासबुक् ' नेमण्यानें इष्ट हेतु साध्य होण्यासारखा नाहीं. जन्मतःच प्रत्येक मनुष्याला कांहीं विशिष्ट मानसिक शक्तींची जोड मिळालेली असते. ग्रहण—धारण करण्याची शक्ति अथवा बुद्धि, सामान्यतः अभिरुचि व नैतिक शक्ति अगर सदसद्विवेक बुद्धि या तिहींच्या स्वाभाविक विकासाला मदत करणें म्हणजे शिक्षण देणें होय. या शक्तींना योग्य वळण लावण्याची जरूरी अगदीं बाळपणापासून—व विशेषतः तेव्हांच—फार आहे. त्यावेळीं नैसर्गिक शिक्षक—उत्तम शिक्षक—माता होय. तिचें अनुकरण मूल साहजिकच करूं लागतें, व त्याच्या शक्तीचा विकास प्रेमाच्या छायेखालीं होऊं लागतो. बाळपणाच्या शिक्षकाला अवश्य असें प्रेम आईजवळ असतें, पण इतर शिस्तीच्या गोष्टीही तिला ठाऊक असल्या पाहिजेत. एवढ्यासाठींच मुलींच्या श्रेष्ठ प्रतीच्या शिक्षणाची फार काळजीनें व्यवस्था लागावयास पाहिजे असें पेस्टोलोझी नेहमीं म्हणे; व या त्याच्या तत्त्वावर ' हॉअर मेडशेन् शूल ' मुलींसाठीं शाळाही लौकरच जिकडे तिकडे स्थापल्या गेल्या. मुलांचें शिक्षण आईच्या हातून घरींच होणें चांगलें. पण मुलाच्या वयाच्या कांहीं विशिष्ट मर्यादेच्या पुढें हें शक्य नाहीं व तसें करणें समाजाच्या एकंदर घटनेला व रहाटीलाही जुळणें शक्य नाहीं. म्हणून मूल शाळेंत हें गेलेंच पाहिजे. पण शाळा म्हणजे विस्तार पावलेलें लहानसें कुटुंबच व गृहशिक्षणाला मदत करणारी व त्याची वाढ करणारी संस्था असली पाहिजे. पण शाळा व कुटुंब यांत जमीनअस्मानाचें अंतर असल्याचें आढळून येतें. वयाच्या सहाव्या वर्षांत दाराचा उंबरा ओलांडून मूल शाळेंत गेलें म्हणजे आपण निराळ्या विचित्र जगांत पडलों असें त्यास वाटतें व त्या बदललेल्या परिस्थितीची मुलास संवय लागण्यांतच किती तरी वेळ जातो. या व्यवस्थेसंबंधानें पेस्टालोझीला अतिशय राग येत असे, व तींत सुधारणा

करण्यासाठीं त्यानें अतोनात मेहनत घेतली. किंडर गार्टन् पद्धति व किंडर गार्टन् शाळा हें त्याच्या विचारांचें व परिश्रमाचें फळ होय. ही पद्धति लवकरच लोकप्रिय झाली, व त्याच्या हयातींतच सर्व जर्मनीमध्यें तिचा प्रसार होऊं लागला. आज सर्व जगभर ती पद्धति पसरली आहे, व पसरत आहे.

सामान्य जनतेला शिक्षणाविषयींच्या अनास्थेच्या कर्दमांतून वर काढावें व तिला बौद्धिक व नैतिक स्वतःसिद्धपणाचें शिक्षण द्यावें हीं पेस्टालोझीचीं उदात्त तत्त्वें प्रशियन सरकारला तेव्हांच पटण्याला एक विशेष कारण झालें. नेपोलियनशीं प्रशियाच्या ज्या लढाया झाल्या त्यांत सामान्य जनतेची स्वतःच्या देशाविषयीं बेफिकिरी व आपल्या जातभाईविरुद्ध परचक्राला साहाय्य करण्याची प्रवृत्ति दिसून आली, तेव्हां प्रशियन मंत्र्यांचे डोळे उघडले व लोकशिक्षणाचें महत्त्व त्यांच्या लक्षांत आलें. तेव्हां उत्तम माणसांकरवीं खरें शिक्षण लोकांस देण्याचा निश्चय मंत्री 'फ्रायहर फॉन स्टाइन' यानें केला, व पेस्टालोझीकडून कांहीं हुषार लोक शिक्षण मिळवून त्यानें आणविले; आणि शिक्षकांसाठीं शाळा स्थापन करण्याचा त्यानें उपक्रम केला. नेपोलियनच्या स्वाऱ्यांमुळें जर्मनीवर आलेल्या संकटाच्या वेळीं प्रशियाचा राजा फ्रेडरिक्र विलयम् यानें येना येथील लढाईनंतर पुढें दिलेल्या आशयाचे महत्वाचे उद्गार काढले होते. " भौतिक सामर्थ्यांत जर्मनीचें जें जबर नुकसान झालें आहे तें तिनें बुद्धिसामर्थ्यानें भरून काढलें पाहिजे. यासाठीं माझी अशी इच्छा आहे कीं, लोकांमध्यें शिक्षणाचा प्रसार करणें व त्यास पूर्णता आणणें हीं दोन्हीं कामें साधण्यासाठीं शक्य तितके प्रयत्न व्हावे." वर निर्दिष्ट केलेल्या कामांत सक्तीच्या तत्वाकडे योग्य नजर पोंचून शिक्षणाचा फैलाव होत होता. शिक्षणास पूर्णता आणण्यासाठीं पेस्टालोझीचे शिष्य सर्व ठिकाणीं शिक्षकांच्या शाळा ( लेरर् सेमिनार् ) काढून प्रयत्न करूं लागले. बाह्य साधनें बेताचींच असूनही " आपलें कार्य पवित्र आहे, तरुण

पिढीला ज्ञान देणें, लोक शहाणे करून सोडणें हें महत्कार्य आहे " या दृढ विश्वासामुळें पुढाऱ्यांनीं अत्यंत मेहनत केली. सन १८४० च्या आंतच प्रशियामध्यें ट्रेनिंग् कॉलेजांची संख्या ४५ झाली. आज मित्तीस अशा कॉलेजांची संख्या एकट्या प्रशियांत २०० आहे.

या सगळ्याचा परिणाम काय झाला हें सांगावयाला पाहिजे असें नाहीं. सर्व देश सुशिक्षित होऊन, सुशिक्षणाचे जे फायदे मिळावयाचे त्यांचा उपभोग जर्मनी घेत आहे. रोजंदारीनें काम करणाऱ्या मजुराला व शेतांत राबणाऱ्या नांगऱ्याला देखील लिहिणें, वाचणें, बेतापुरते आंकडे मोडणें येत असतें. निदान स्वदेशाचा भूगोल व इतिहास, व सृष्टशास्त्रांतील ठळक ठळक तत्त्वें यांची त्यांस माहिती असते. त्यांची दृष्टि थोडी तरी विस्तृत व चौकस झालेली असते. सैन्यांत भरती करण्याचे वेळीं जर्मनीमध्यें दोन हजारांत केवळ दोनच निरक्षर सांपडावे, ही आम्हांस जितकी आश्चर्याची तितकी जर्मन लोकांस अभिमानाची गोष्ट आहे. चार कोटी लोकसंख्येच्या प्रशियाच्या राज्यांत १९११ सालीं प्राथमिक शाळांची संख्या ३९१०० होती. म्हणजे एक हजार माणशीं एक शाळा असें ठोकळ प्रमाण पडतें. क्षेत्रफळाचें प्रमाण ९ चौरस किलोमेटरास ( १$\frac{३}{५}$ कि. मि. १ मैल ) एक शाळा पडते. सत्तर लक्षांपेक्षां थोडी कमी किंवा जास्त लोकवस्ती असलेल्या बव्हेरिया प्रांतांत १९०७ सालीं शाळांची संख्या ७५७३ होती. म्हणजे ८८० माणशीं १ शाळा असें प्रमाण निघतें. १० चौरस किलोमेटरला १ शाळा असें क्षेत्राचें प्रमाण पडतें. असाच प्रकार इतर जर्मन संस्थानांत आढळून येतो. जर्मनींत देण्यांत येणाऱ्या शिक्षणाचा मगदूर, व्यवस्था व शिस्त किती उत्तम आहे याचें चांगलें प्रत्यंतर म्हटलें म्हणजे अमेरिका जपानसारख्या राष्ट्रांनीं जर्मन पद्धतीचा बारकाईनें अभ्यास करून ती उत्तम ठरल्यावर आपल्या देशांत चालू केली आहे हें होय. अमेरिका, जपान व युरोपांतील कांहीं राष्ट्रें यांतून विद्याव्यासंगी लोक या श्रेष्ठ पद्धतीचें तिच्या जन्मभूमींतच

ज्ञान करून घेण्यास अजूनही जातात व आपल्या देशबांधवांस त्याचा फायदा देतात.

---

# प्रकरण ४ थें.

## शिक्षणपद्धति वगैरे.

याप्रमाणें जर्मनींतील लोकशिक्षणाविषयीं सामान्य माहिती, त्याचा इतिहास व परिणाम याविषयीं दोन शब्द लिहिले; आतां त्या देशांतील शिक्षणपद्धतीची थोडी माहिती देऊं. बौद्धिक व नैतिक दृष्ट्या स्वतःसिद्ध व्यक्ति तयार करणें हाच एक शिक्षणाचा हेतु असल्याचें वर सांगितलेंच आहे. त्यासाठीं प्राथमिक शिक्षणाच्या शाळांतून आठ वर्षें शिक्षण दिलें जातें. या आठ वर्षांमध्यें धर्म, स्वभाषा, अंकगणित, भूमिति, इतिहास, भूगोल, सृष्टिज्ञान व लेखन, तसेंच ड्रॉइंग् व गायन या कला इतके विषय मुलाच्या वयाच्या व विषयाच्या महत्वाच्या मानानें कमी अधिक प्रमाणानें प्राथमिक शाळांत शिकविले जातात. पैकीं खालच्या दोन वर्गांत सहा व सात वर्षांचीं लहान मुलें असल्यामुळें त्यांस आठवड्यांतून १६ पासून १८ तासच किंडर गार्टन् पद्धतीनें शिक्षण दिलें जातें, व एका तासांत एकच व अमुकच विषय शिकवावा असा निर्बंध नसतो. मुलांना कंटाळवाणें न वाटतां खेळांतल्यासारखें त्यांनीं कांहीं शिकावें हा या दोन वर्षांत मुख्य उद्देश असतो. इतिहास, भूगोल, ड्रॉइंग्, इत्यादि विषय अर्थातच तिसऱ्या वर्षांत सुरू होतात. धर्मशिक्षणाला सर्व वर्गांतून आठवड्यांत साधारणतः ४ तास, स्वभाषा ६।७ तास, गणित वर्गाच्या मानानें ३ ते ५ तास, भूमिति फक्त वरच्या तीन वर्गांस २ तास, भूगोल व इतिहास मिळून ४ तास, सृष्टिज्ञान ३ तास, गाणें व व्यायाम प्रत्येकीं २ तास, ड्रॉइंग् वरच्या चारी वर्गांस ३।४ तास, अशी साधारणपणें आठवड्यांत विषयांची व तासांची वांटणी होते. एकंदरींत आठवड्यांत २४ ते ३० तास शिक्षण मिळतें. मुलींना भूमितीच्या ऐवजीं शिवणकाम शिक-

वितात. पहिल्या दोन वर्षांत वस्तुपाठ ( आनशाउंग्ज् उंटररिश्ट् ) म्हणजे नेहमींच्या सहवासांतल्या वस्तूंचें प्रत्यक्ष ज्ञान देणें यावर विशेष भर असतो. यासाठीं कधीं कधीं शिक्षक आपापले वर्ग घेऊन मुलांस फिरायला नेतात; व फुलें, झाडें, जनावरें अशा वस्तु प्रत्यक्ष दाखवून माहिती देतात. मुलांचा चौकसपणा व अवलोकनशक्ति वाढावी, त्यांनीं आपल्या इंद्रियांचा स्वतःसिद्धपणें उपयोग करण्यास शिकावें, इकडे प्रथम फार लक्ष असतें. वरच्या सहा वर्गांत कोणच्या विषयांपैकीं किती भाग मुलांकडून करून घेतला जातो हें लिहिण्याची जरूरी नाहीं. एवढें सांगितलें असतां पुरें होईल कीं, वयाच्या चौदाव्या वर्षाच्या अखेरीस प्राथमिक शाळांतून अभ्यासक्रम पुरा करून मुलें बाहेर पडतात, तेव्हां त्यांस आपली भाषा चांगली येत असते; गॉटे–शिलर–लेसिंग्सारख्या स्वदेशीय कवींचीं सोपीं काव्यें व इतर ग्रंथ वाचण्याची गोडी त्यांच्यांत उत्पन्न होते; त्रैराशिक, व्याज, हिस्सेरशी आदि व्यवहारांत लागणारें गणित; विशेषेंकरून स्वदेशाच्या व ठोकळ मानानें इतर देशांच्या राजकीय व व्यापारी भूगोलाची माहिती; स्वदेशाचा इतिहास व राज्यव्यवस्थेचें ठोकळ ज्ञान; नित्य व्यवहारांत लागणारी प्राणी, वनस्पति, यंत्र व रसायनशास्त्रांची सामान्य माहिती; ड्रॉइंग्मध्यें प्रकाश व छाया यांचें महत्त्व, फुलें, फळें, झाडें, व असलेच पदार्थ एकेकटे व समूहांत साधारण बरेच काढतां येणें; इत्यादि ज्ञान त्यांस मिळालेलें असतें.

मुलें शरीरानें सुदृढ व मनानें खंबीर व्हावीं यासाठीं त्यांस आठवड्यांतून दोन तास शारीरिक शिक्षण दिलें जातें. वारंवार मुलांच्या प्रकृति तपासून पाहण्यासाठीं 'शूलएर्त्स्' असतात. ते त्यांस काळजीनें तपासून त्यांस कांहीं आजार जडला असल्यास औषधें देतात. घरीं जडलेल्या संसर्गजन्य रोगांची इतरांस बाधा होऊं नये यासाठीं बिनऐपतीच्या गरीब रोगी मुलांस, त्यांच्यासाठींच असलेल्या धर्मार्थ दवाखान्यांत ताबडतोब रवाना केलें जातें. बक्षिसें वगैरे लावून शाळेंतील हजिरीला वाजवीपेक्षां फाजील महत्व देण्याचा जर्मनींत

प्रकार नसल्यामुळें, नुकतेंच जशी इतरत्र शाळाडॉक्टरांस या लालुचीच्या अनिष्ट परिणामाविषयीं–यामुळें चांगलीं मुलें हजिरी पूर्ण व्हावी या ओढीनें लहानसहान आजारांची हेळसांड करतात, व मग जास्त आजारास आपण बळी पडून दुसऱ्या मुलांसही त्याचा वांटा देतात–अशी ओरड करावी लागली, तसें जर्मनींत होण्याचें कारण नाहीं.

## नीतिशिक्षण.

जर्मनींत प्राथमिक शाळांतील मुलांच्या नीतिमत्तेकडेही लक्ष पुरविलें जातें; त्यासाठीं निराळे तास अगर निराळीं पुस्तकें नेमीत बसण्याचें कारण पडत नाहीं. कारण धर्माचें शिक्षण आवश्यक असल्यामुळें त्यांतच याचाही अंतर्भाव होतो. शिवाय आठवड्यांतून एक दिवस दुपारीं शिक्षक आपले वर्ग वनांत अगर जवळपासचीं पाहण्यासारखीं स्थळें, अगर खेडीं अशा ठिकाणीं नेतात. यास 'शूल्वांडरुंग्' म्हणतात. यांचा मुलांच्या वागणुकीवर फार चांगला परिणाम होतो. आणखी गरीब मुलांस मदतीसाठीं सर्व मुलांकडूनच 'मूझिकालिशर–आंबेड्' (संगीताची संध्याकाळ) वगैरे समारंभ करून परोपकार, सहकारिता वगैरेंचें मुलांस खेळत खेळत शिक्षण दिलें जातें.

## हिल्फ्सूशूल.

यांशिवाय जर्मनींतील प्राथमिक शिक्षणाच्या व्यवस्थेंत एक मोठा विशेष आहे. तो हा कीं, औषधोपचार न झाल्यामुळें अगर आईबापांच्या रोगीपणामुळें जीं मुलें साधारण वेडगळ, कमी मेंदूचीं व म्हणूनच इतर मुलांबरोबर वर्गांत चालण्यास असमर्थ अशीं असतात, त्यांच्यासाठीं वेगळया शाळा अलीकडे २५।३० वर्षांत स्थापन करण्यांत आल्या आहेत. यांस 'हिल्फ्सूशूल' म्हणतात. 'फोल्क्सशूल' मध्यें पहिल्या वर्षांतच

जीं मुलें आजारी व हलक्या मेंदूचीं आहेत असें उघडकीस येतें, त्यांस या 'हिल्फ्सूशूल' मध्यें घालतात व येथेंच त्यांचें आठ वर्षें शिक्षण होतें. शिकविण्याची व्यवस्था, विषय वगैरे 'फोल्क्सूशूल' सारखेंच असतें. मात्र शिकविण्याची पद्धति मुलांचा जडपणा लक्षांत घेऊन थोडीशी वेगळी व सावकाशीची असते. उदाहरणार्थ, अगदीं खालच्या वर्गांतल्या म्हणजे पहिल्या वर्षीं मुलांस दहापावेतोंच आंकडे शिकविले जातात व संख्येची अमूर्त कल्पना मेंदूंत भरावी म्हणून ती मूर्तस्वरूपांत प्रथम शिकविली जाते. शिक्षकाच्या बरोबरीनें बोटें मेजावर ठेवून तोंडानें मोठ्यानें एकेक आंकडा म्हणत क्रमानें तीं उचलण्यास लावतात व पुनः तसेंच उलट मोजीत बोटें ठेवण्यास लावतात. निरनिराळ्या रंगांचे चित्राचे शिपाई अगर घोडे एक एक, दोन दोन, तीन तीन, चार चार, पांच पांच असे जुळवून मुलांकडून मोजविण्यांत येतात. अशा रीतीनें स्पर्शाच्या द्वारां, वारंवार मोठ्यानें ऐकण्यानें, निरनिराळे पदार्थ डोळ्यांनीं पाहण्यानें, इत्यादि बाह्येंद्रियांच्या मदतीनें मेंदूंत चेतना उत्पन्न करून त्यावर एखाद्या गोष्टीचा परिणाम करण्याचा काळजीपूर्वक प्रयत्न केला जातो. शिक्षकांस हें काम कंटाळा आणणारें असलें, तरी त्याचे परिणाम मात्र आश्चर्यकारक होतात. इतकेंही करून ज्यांच्या मेंदूवर कांहींच परिणाम होत नाहीं, तीं मुलें गांवपंचायतीकडून वेड्याच्या इस्पितळासारख्या ठिकाणीं नाइलाजास्तव पाठविलीं जातात. लाइप्झीक् येथें अशी एक नमुनेदार शाळा आहे. हींत पांचशें मुलामुलींच्या शिक्षणाची उत्तम सोय केलेली आहे. पैकीं निम्म्याच्यावर मुलांची शाळेंतच फुकट जेवणाची सोय आहे. शरीरपोषणाच्या हयगयीमुळें कित्येकांचे मेंदू अशक्त होतात, ही गोष्ट लक्षांत घेऊन अशी व्यवस्था केलेली आहे. बऱ्याच मुलांस शुद्ध निरोगी दूध पिण्यास देतात. १९०६ सालीं एकट्या प्रशियामध्यें अशा तऱ्हेच्या 'हिल्फ्सूशूलेन्' दोनशेंच्यावर होत्या. पैकीं एकट्या बर्लिन शहरीं तीसांवर होत्या.

## वाल्डूशूल.

शरीरानें अशक्त असलेल्या शहरच्या मुलांसाठीं दूर वनामध्यें उघड्या हवेचीं ठिकाणें पाहून कोठें कोठें शाळा काढिल्या आहेत. त्यांस वाल्डूशूल म्हणतात. मुलांस उत्तम मोकळी हवा व शारीरिक श्रम यांच्या साहाय्यानें सदृढ होतां येऊन त्यांचें शिक्षणही व्हावें हा यांत हेतु असतो. शहरांत राहणाऱ्या गरीब लोकांच्या अशक्त मुलांच्या जाण्यायेण्याचा व राहण्याचा खर्च बऱ्याच अंशीं सरकार करतें.

फोल्कूसूशूलमध्यें वर्गांची संख्या वर्षांच्या संख्येला अनुसरूनच म्हणजे आठ सामान्यतः असते. पण खेड्यांपाड्यांनीं लोकवस्तीच्या व पैशाच्या मगदुराप्रमाणें वर्गांची संख्या तीनपर्यंत कमी असूं शकते. इमारती, सामान व इतर उपकरणें हीं अवश्य तेवढीं नियमानें ठरवून दिल्याप्रमाणें असतात. शिक्षकही त्या त्या विषयाचा विशेष अभ्यास केलेले ‘ लेररूसेमिनार्’ ( ट्रेनिंग् कॉलेज् ) मध्यें सहा वर्षें शिक्षण मिळालेले असतात. प्रशियामध्यें या सेमिनारांत तीनच वर्षें काढावीं लागतात.

## शिक्षकांचे पगार.

शिक्षकांस कायम होतांच सालीना २४०० मार्क्स ( घरभाड्यासाठीं सहाशें मार्क्स् धरून. एक मार्क = १२ आणे ) पगार मिळतो, व तो २७ वर्षांची नोकरी होईतों ४६०० मार्कूसपर्यंत चढतो. शाळेच्या डिरेक्टरास ( हेडमास्तर ) ४८०० मार्कूसपासून ६८०० मार्कूसपावेतों ( घरभाड्याचे ९०० मार्क्स् धरून ) पगार असतो. युरोपांतील खर्चाच्या मानानें पाहिलें असतां हे पगार बेताबाताचेच आहेत.

## खर्च.

हा सगळा खर्च कोण करतें ? फींतून तो चालतो म्हणावें, तर प्राथमिक शिक्षण मोफत आहे. कोठें कोठें शहरांतून नांवाला वर्षाची चार

मार्क् फी घेतात, व कांहीं कांहीं शहरांतून वरच्या वर्गांच्या मुलांसाठीं 'ब्यूर्गर् शूल' नांवाच्या प्राथमिक शिक्षणाच्या ज्या थोड्या शाळा आहेत, त्यांत मात्र ४० मार्कपावेतों सालीना फी घेतात. यावर अर्थात्च एकदशांशही खर्च भागत नाहीं. लाइपूझीक् शहरासारख्या फी घेणारीं ब्यूर्गरशूलें बरींचशीं असलेल्या शहरांतसुद्धां एकंदर खर्च ८२ लक्ष मार्कांवर जातो. उत्पन्न अवघें १८ लक्षही येत नाहीं. लाइपूझीक येथें बाकी लागणारी मोठी ६४ लक्षांची रक्कम शहर ( म्युनिसिपालिटी ) देतें. सर्व शहरांचें असेंच आहे. तीं बहुधा सरकारी मदतीवर नाहींत. पण खेड्यांचें तसें चालत नाहीं. अशा ठिकाणीं सरकार मोठी मदत देतें. कांहीं ठिकाणीं सगळाच खर्च चालवितें. एकंदरीनें सरकारच्या मदतीची सरासरी एकंदर खर्चाच्या एकतृतीयांशावर निघते. प्रशियामध्यें १९०६ सालीं शहरवर्ज्य प्राथमिक शाळांना १५ कोटी मार्क खर्च लागला. पैकीं सरकारी तिजोरींतून साडेपांच कोटींवर खर्च केले गेले. म्हणजे शेंकडा प्रमाण ३८ पडतें. तेंच शहरांतील प्राथमिक शाळांस लागलेल्या १६ कोटी मार्कांपैकीं १ कोटी ६० लक्ष एवढे काय ते सरकारानें खर्च केले. बव्हेरिया प्रांतांत १९०६ सालीं प्राथमिक शिक्षणास ( शहरें व खेडींसुद्धां ) लागलेल्या ५ कोटींला किंचित् कमी, ४ कोटी ८६ लक्ष मार्कांपैकीं सरकारकडून जवळ जवळ सव्वा कोटी (१ कोटी २३ लक्ष) दिले गेले. म्हणजे एकंदर खर्चांपैकीं शेंकडा २५·५ सरकारनें दिले.

सॅक्सनीचें लहानसें राज्य पहिल्यापासूनच लोकशिक्षणाच्या बाबतींत पुढें आहे. त्याचा परिणाम असा झाला आहे कीं, शिक्षणाची व त्याच्या खर्चाची जबाबदारी लोक आतां आनंदानें आपणांवर घेऊं लागले आहेत; हें १९०४ च्या आंकड्यांनीं तेव्हांच सिद्ध होतें. त्यासालीं ४२८५ प्राथमिक शाळांस लागलेल्या ४१ कोटी मार्कांपैकीं सरकारास फक्त ५ लक्षच खर्च करावे लागले. बाकी सर्व लोकांनीं ( म्युनिसिपालिट्यांनीं )खर्च

केले. लेरर् सेमिनार् ( ट्रेनिंग् कॉलेज् ) चा खर्च मात्र सर्वस्वी सरकार करितें. प्रशियांत या कामीं सरकारनें १९११ सालीं १ कोटी ४४ लक्ष मार्क् खर्च केले व सॅक्सनींत १९०४ सालीं सरकारनें १९॥ लक्ष मार्क् खर्च केले. याप्रमाणें या राज्यांनीं प्रथमतः **सर्व घस आपण सोसून** लोक शहाणे करून सोडल्यामुळें आतां त्यांस $\frac{1}{3}$ पेक्षां जास्त घस सोसावी लागत नाहीं. प्रशियांत दर विद्यार्थ्यामागें सालींना शिक्षणाचा खर्च खेड्यांत ४० व शहरांत ७१ मार्क येतो. सॅक्सनींत तोच ५० मार्क व बव्हेरिया प्रांतांत ५०.७ येतो.

---

# प्रकरण ५ वें.

## फोर्ट्बिल्डुंग् शूल.

प्राथमिक शिक्षणाविषयींची माहिती संपविण्यापूर्वी, या शिक्षणाची पूर्तता व्हावी ह्मणून काढलेल्या फोर्ट्बिल्डुंग् शूल ( कन्टिन्युएशन् स्कूल् ) विषयीं लिहिणें जरूर आहे. आपण यांस पूर्ततेच्या शाळा ह्मणूं. १४ व्या वर्षीं प्राथमिक शिक्षण संपवून मुलगा बाहेर पडून कांहींतरी पोटापाण्याच्या उद्योगांत लगेच शिरला, म्हणजे आठ वर्षें फोल्क्स् शूल-मध्यें मिळविलेल्या ज्ञानावर पाणी पडतें व कांहीं वर्षांनंतर त्यास शिक्षण मिळालें होतें कीं नव्हतें, याची भ्रांति पडण्याचा प्रसंग येतो. शिवाय, त्या वयांत कोणत्याही धंद्यांत शिरावयाला मुलगा अपात्र असतो हें निराळेंच. हें सर्व लक्षांत घेऊन, मुलगा एखाद्या धंदेवाल्यापाशीं अगर व्यापाऱ्याजवळ काम शिकावें म्हणून राहिला असतांही, त्याचें मागलें ज्ञान मलीन न होतां तें जतन होऊन त्यांत भर पडावी म्हणून, म्हणजे त्याच्या ज्ञानाची पूर्तता करण्यासाठीं या 'पूर्तता शाळां' ची कल्पना प्रसिद्ध शिक्षणविषयपटु व तत्त्ववेत्ता पेस्टालोझी यानें काढली. तिला

मूर्तस्वरूप सन १८१६ तच कुअर हेसेन् नांवाच्या छोट्याशा संस्थानांत मिळालें. पुढें वाढत्या शांततेच्या व शास्त्रीय ज्ञानाच्या काळांत जसजशी उद्योगधंद्यांची प्रगति होत गेली, तसतसें त्यांचें तात्त्विक दृष्टीनें शिक्षण देणें अगत्याचें आहे असें वाटूं लागलें; व तें देण्यास 'फोर्ट्बिल्डुंग् शूल' हें एक उत्तम साधन मिळालें. म्हणजे आतां या शाळांतून भाषादि विषय बेताचे व सुतार, लोहार, शिंपी, चांभार, भटारी इत्यादि हातकसबाचे छोटे धंदे करणारे; कारकून, हिशेब ठेवणारे, दुकानदार, छोटे व्यापारी इत्यादि, यांस अवश्य लागणारें ज्ञान आठवड्यांतून कांहीं दिवस दुपारचे वेळीं देण्यांत येऊं लागलें. या शिक्षणाची उपयुक्तता पाहून व्यापारी व धंदेवाले आपल्याजवळ कामशिकाऊ म्हणून राहिलेल्यांस, त्या शाळेंत कांहीं नियमित तास जाण्यास हौसेनें परवानगी देऊं लागले. व पुढें शिक्षणखात्यानें 'फोल्क्स् शूल' मधील अभ्यास संपविल्यावर पुढें चार वर्षें मुलांनीं 'फोर्ट्बिल्डुंग् शूल' मध्यें काढलींच पाहिजेत असा कायदा केला. सॅक्सनींत हा कायदा गेल्या शतकाच्या दुसऱ्या अर्धांतच अमलांत आला. प्रशिया मात्र या कामीं छोटेखानी संस्थानांच्या मागें होता. तेथेंही त्याचप्रमाणें आतां कायदा होऊन दोन वर्षांची सक्ती या शाळांसंबंधीं अमलांत आली आहे. शेतकी, धंदेवाले व व्यापारी यांनीं आपल्या तरुण आश्रितांस असें शिक्षण मिळण्याची सवड दिलीच पाहिजे असा जर्मन राइश्टाग् ( पार्लमेंट् ) चा कायदा आहे. या केवळ धंदेशिक्षणाच्याच शाळा होऊन न बसतां, सामान्य शिक्षणाच्या बरोबरच धंद्यांतील ठोकळ तत्त्वाचीही माहिती मिळावी इकडे विशेष लक्ष पुरविलें जातें. जर्मन्, ड्रॉइंग्, भूमिति व गणित हे विषय साधारणतः आवश्यक असतात. एकट्या सॅक्सनी संस्थानांत अशीं फोर्ट्बिल्डुंग् शूलें १८०० च्या वर आहेत. याप्रमाणें फोल्क्स्शूलमध्यें मुलाच्या ६ व्या वर्षापासून १४ व्या पर्यंत म्हणजे एकंदर आठ वर्षें व पुढें फोर्ट्बिल्डुंग् शूलमध्यें २ ते ४ वर्षें असें १२ वर्षें इकडील साधारण ऐपतवाल्यांच्या व गरीब मुलांस प्राथमिक शिक्षण मिळतें. नंतर त्यांस २ वर्षें सैन्यांत चाकरी करावी लागते. येणें-

प्रमाणें जर्मन प्राथमिक शाळा मुलांस भाषा, इतिहास, गणितादि विषयांचें चांगलें ज्ञान देऊन शिवाय एखाद्या धंद्याची ठोकळ माहिती देतात. यामुळें शाळेंतून बाहेर पडतांना मुलें बेताबाताचा संस्कार मिळून व्यवहाराला योग्य व जीवनकलहांत तयारीनें व हुषारीनें पडण्यास लायक अशीं सामान्यतः असतात.

## किंडर गार्टन्.

जर्मनींतील प्राथमिक शिक्षणाची कोणतीही हकीगत ' किंडर गार्टन् '-च्या माहितीवांचून अपुरी होईल. किंडर गार्टन् या शब्दांचा अर्थ मुलांचा बाग अगर बालोद्यान. ही कल्पना पेस्टालोझीनें काढली. पण तिला मूर्तस्वरूप पुढें फ्रॉबेल् यानें दिलें. मुलांस खेळत खेळत त्यांच्याच प्रवृत्तीनें व घरापेक्षां किंचित् सुद्धां भिन्नपणा न वाटतां ज्यांत शिक्षण मिळेल, अशा शाळांची स्थापना त्यानें केली. ही व्यवस्था अर्थात् तीनपासून सात-आठ वर्षांच्या अर्भकांसाठींच मुख्यतः होय. यांत खरोखर मुलापेक्षां शिक्षकांसच फार शिक्षण द्यावें लागतें. कारण ३ पासून ७ पर्यंत वयाच्या अर्भकांशीं वागणें, त्यांना वेळ कंटाळवाणा न वाटतां खेळांतूनच त्यांस अक्षरओळख, संख्या, थोडासा भूगोल हे विषय व टापटीप, सलोखा, पाळींव पशुपक्ष्यांच्या संवयी ओळखून त्यांशीं प्रेमळपणें वागणें इत्यादि गोष्टी शिकवणें अत्यंत अवघड काम आहे; व हें पेस्टालोझी-फ्रॉबेल्हौस्सारख्या संस्थांत शिक्षण घेतलेल्या शिक्षकिणीच करूं जाणत. नगर जिल्ह्यांतील एका प्राथमिक शाळेंत गेलों असतां माळा, गोट्या इत्यादि वस्तूंवरून संख्येचें ज्ञान बिगर इयत्तेचे मुलांस देत असतां, एका मास्तरचे काय हाल होत होते व या पद्धतीचा कसा विपर्यास चालला होता हें पाहून कींव आली; असो. या किंडर गार्टन् पद्धतीचे दोन मुद्दे लक्षांत ठेवण्यासारखे आहेत. पहिली प्रत्यक्ष वस्तूंवरून त्यांचें ज्ञान देणें; व दुसरी कान, डोळे, व हात या इन्द्रियांचे उपयोगानें व निरीक्षणानें ज्ञान संपादण्याची प्रवृत्ति करून देणें; या दोन्ही तत्त्वांवर

अर्भकांसाठीं ज्या शाळा असतात, त्यांतील वर्गांत व एखाद्या सामान्य कुटुंबाच्या रोजच्या राहण्याच्या खोलींत फारसा फरक नसतो. शाळा ही घराच्या नमुन्यावर असावी असें जें पेस्टालोझी व फ्रॉबेल् यांचें तत्त्व, त्याचेंच वरील फळ होय. कुंड्यांत घालून खिडकींत ठेवलेलीं झाडें, पिंजऱ्यांत घालून ठेवलेले कॅनरीसारखे पक्षी, मांजर, कुत्रें, नेहमींच्या संवयींतल्या देखाव्यांचीं भिंतीवर चित्रें, अशी या वर्गाची रचना असते. झाडांस पाणी घालणें, पक्ष्यास दाणे घालणें, आपली खोली आळीपाळीनें साफ करणें, सकाळच्या फराळाचे वेळीं टेबलावर चादर पसरून कपबशांची तयारी करणें, चिंध्यांचे घोडे व बाहुल्या करून तीं मोजणें, त्यांच्याशीं खेळणें, भिंतीवरील चित्रांवरून गोष्टी सांगणें, फळ्यावर चित्रें, अक्षरें काढणें व तीं वाचणें इत्यादि अनेक व्यापारांत मुलांच्या मनाचें रंजन होतें. या शाळांतील मास्तरिणी मुलांशीं इतक्या गोड वागतात कीं, मुलें त्यांस प्रेमानें ‘ टांट ’ अगर मावशी या नांवानें हाक मारतात. शाळेच्या भोंवतीं बाग असते, तींत ‘ टांट ’ बरोबर खणण्यांत, बीं पेरण्यांत, झाडांस पाणी घालण्यांत व फुलें, फळें आलीं असतील त्यांचें निरीक्षण करून आपला आनंद व्यक्त करण्यांत या अर्भकांचा वेळ जितका मजेंत, तितकाच उपयुक्त माहिती न कळत सहजगत्या मिळविण्यांत जात असतो. खेळासाठीं खालीं वाळू पसरलेला हॉल असतो, त्यांत हीं प्रथम आपल्या ‘ टांट ’ बरोबर सोपीं गाणीं म्हणत सभोंवतीं फिरतात, बागडतात; आंकडे मोजीत कवाईत करतात. आपली शाळा ही एक टांटबरोबर खेळाची व आनंदाची जागा आहे, असें प्रत्येक अर्भकास वाटत असतें. या शाळांत सकाळीं ८ अगर ९ पासून दुपारीं ४ वाजेपर्यंत या अर्भकांचा वेळ जातो. या वेळांत मनाला येईल तसें खेळत अगर कांहीं काम अगर करमणूक करीत हीं मुलें घरची आठवणसुद्धां काढीत नाहींत. मुलांना आवडेलसा पण ज्यांतून कांहीं शिक्षण हंसत खेळत अप्रत्यक्षपणें देतां येईल असा उद्योग पुरविण्यांत या टांट मोठ्या दक्ष असतात; आणि खेळ व करमणूक यांचे द्वारां प्रत्येक मुलाची बुद्धि

व शरीर हळुहळू वाढीस लावण्यास झटत असतात. अशा तऱ्हेच्या ‘ किंडर गार्टन् ’ शाळा जर्मनींत शहरोशहरीं वाटेल तितक्या आहेत.

‘ किंडर गार्टन् ’ पद्धतीच्या शिक्षकिणी तयार करण्याचें बिकट काम करण्यासाठीं बर्लिन् येथील ‘ पेस्टालोझी-फ्रॉबेल हौस् ’ सारख्या संस्था मोठमोठ्या शहरीं स्थापन केलेल्या आहेत. बर्लिन् येथील संस्था खुद्द फ्रॉबेलनें इ. स. १८६७ सालीं स्थापिली. आज या संस्थेच्या चालकाचें काम एक पोक्त व गंभीर वृत्तीची स्त्री चालवीत असून, तिनें ती संस्था भरभराटीस आणून सोडली आहे. हींत नेहमींच्या शिक्षकिणी वगळून सरासरी १५० तरुण स्त्रिया १९११ सालीं ‘किंडर गार्टन्’ पद्धति सप्रयोग शिकण्यासाठीं आलेल्या होत्या. त्या जर्मनी, फ्रान्स्, ग्रेटब्रिटन्, इटली, राशिया, युनायटेड् स्टेट्स् वगैरे निरनिराळ्या देशांतील होत्या; त्यांची जेवणाची सोय याच संस्थेंत केलेली आहे.

# भाग २ रा.

## प्रकरण १ लें.

### दुय्यम प्रतीचें शिक्षण.

जर्मनींतील दुय्यम प्रतीच्या शिक्षणाविषयीं विचार करतांना, त्याची उत्पत्ति व वाढ यासंबंधाच्या इतिहासाविषयींची माहिती विस्तारानें दिल्यास ती महाराष्ट्रीयांस फारशी बोधप्रद होणार नाहीं व त्या माहितीचा तितका उपयोगही नाहीं. म्हणून ती थोडक्यांत देण्याचा आमचा विचार आहे. ज्या काळाला युरोपांत 'मिट्ल् आल्टर' (इं. मिडल् एजेस्) 'मध्ययुग' म्हणतात, त्याकाळीं दुय्यम शिक्षणाची सर्व व्यवस्था मठाधिपतींच्या हातीं असे. प्रत्येक मठांत दुय्यम शिक्षणाच्या शाळा असून त्यांत अव्वलपासून अखेरपर्यंत लॅटिन व ग्रीक भाषा शिकविल्या जात; व त्या भाषांत ॲरिस्टाटलच्या न्यायशास्त्राप्रमाणें अगर तें शास्त्र त्यावेळीं ज्या रीतीनें समजलें जात असे, त्या रीतीनें पूर्वपक्ष व उत्तरपक्ष करून वादविवाद करणारे पंडित तयार करण्याकडे सारें लक्ष असे. यामुळें अगदीं आरंभापासूनच लॅटिन, व्याकरण व शब्द घोकणें, वाक्यें व कविता घोकणें वगैरे घोकंपट्टीवर अर्थातच भर असे. रूपावलि, समासचक्र, अमरकोश वगैरेची पोपटपंची मुलांस अगदीं लहानपणींच करण्यास लावण्याची जशी आपणांकडे पंडिती पद्धत होती, तशीच जर्मनींत मध्ययुगांत होती. पुढें धर्मक्रांति होऊन दुय्यम शिक्षण मठाधिपतींच्या हातांतून सुटलें व अगदीं हल्लींप्रमाणें संस्थानांच्या अगर लोकांच्या हातीं जरी सर्वस्वीं आलें नाहीं तरी त्यास बराच स्वतःसिद्धपणा आला. पूर्वींच्या मठांच्या ताब्यांतील लॅटिन शाळांचें 'गिम्नासिउम्' मध्यें रूपांतर झालें. सोळाव्या व

सतराव्या शतकांत या गिम्नासिउम्‌चें ध्येय, लॅटिन व ग्रीक भाषांमध्यें सिसरोसारखे वक्ते व ग्रंथकर्ते तयार करणें, हेंच एक प्राधान्यानें होतें. गिम्नासिउम्‌मधील अभ्यासक्रम दहा वर्षांचा असे. पहिल्या वर्षांत काय तें नाइलाजास्तव जर्मनभाषेचें व तिच्या द्वारां अन्य विषयांचें शिक्षण मिळत असे; पण पुढें पुढें सर्व व्यवहार लॅटिन भाषेच्या द्वारें चाले. हा प्रकार आमच्याइकडे इतका अंगवळणीं पडून गेला आहे कीं, इंग्रजीच्या ऐवजीं देशी भाषांच्याद्वारें शिक्षण देण्याचें कोणीं नांव काढलें तरी त्यांचें पित्त खवळतें अशीं कित्येक माणसें आपणांमध्यें आहेत. पहिल्याच वर्षी अर्धें वर्ष व्याकरण व शब्द शिकविण्यांत घालवून, बाकीचा वेळ 'सिसरोचीं पत्रें' हा लॅटिन ग्रंथ वाचण्यास घेतला जात असे; व तिसऱ्या वर्षापासूनच मुलांस लॅटिनमध्यें बोलण्यास लावीत असत. या गोष्टीवरूनच या मृतभाषेच्या सक्तीच्या शिक्षणांत मुलांचें किती रक्त आटत असेल याची कल्पना येईल. पांचव्या वर्षापासून लॅटिनच्या जोडीला ग्रीक येऊन बसे, व पुढचीं सहा वर्षें या दोन्ही भाषांचा जोडीनें अभ्यास मुलांकडून करून घेतला जाई. हें शिक्षण किती एकांगी होतें याची कल्पना सहज करतां येईल.

अठराव्या शतकांत ज्या राजकीय व सामाजिक उलाढाली झाल्या व नवे नवे शास्त्रीय शोध होऊं लागले, त्यांनीं या गिम्नासिउम्‌चें ध्येयही बदलत चाललें. नुसत्या लॅटिन–ग्रीकच्या अध्ययनानें एकांगी संस्कार मिळालेले व्यवहारशून्य, बदललेल्या परिस्थितीला कुचकामाचे असे पंडित राष्ट्रामध्यें भाराभर असून कांहीं उपयोग नाहीं अशी हळुहळू खात्री पटत चालली. गणित, नव्या जोमांत आलेलीं व दिवसेंदिवस विस्तार पावणारीं आधुनिक शास्त्रें व रोजच्या व्यवहाराला अत्यंत उपयोगी असे इतर विषय शिकविण्याची आवश्यकता भासूं लागली. या विषयांस 'रेआलीएन्–व्यवहारोपयोगी सर्व शास्त्रें' म्हणत. या रेआलीएन्‌चें शिक्षण देणारी अशी एक 'रेआल्शूल'—( यास आपण 'व्यवहारोपयोगी शाळा' असें अगदीं समर्पक नसलें तरी सोईचें नांव देऊं ) बर्लिन येथें

प्रथम १७४७ सालीं निघाली. याविषयीं विशेष पुढें लिहावयाचें आहेच. थोडक्यांत सांगावयाचें म्हणजे 'ध्येय बदललें पाहिजे' ही भावना जुन्या गिम्नासिउम्च्या कट्ट्या अभिमान्यांतही उत्पन्न झाली. शिवाय वरिष्ठ प्रतीच्या शिक्षणाची दिशाही दिवसेंदिवस बदलत चालली होती तिला अनुसरूनच दुय्यम शिक्षणाची व्यवस्था करणें प्राप्त झालें. विश्व-विद्यालयांत लॅटिन व ग्रीक भाषा आणि त्यांतून रूढ असलेलें न्याय व तत्वज्ञान यांबरोबरच स्वभाषा व इतर अर्वाचीन भाषा, त्यांतील वाङ्मय व तत्वज्ञान व मुख्यतः प्राणी-वनस्पती-रसायन इत्यादि आधुनिक शास्त्रें यांचें शिक्षण देण्याची व्यवस्था झपाट्यानें होत होती. 'गिम्नासिउम्' हा विश्वविद्यालयाचा पाया पूर्वीपासूनच समजला गेला असल्यामुळें दोहींत येऊं पाहणारी विसंगतता काढून टाकण्याचे प्रयत्न झाले. हें काम अर्थातच सर्व शतकभर तत्ववेत्ते, इतिहासज्ञ, शास्त्रज्ञ, कवि वगैरे निरनिराळ्या व्यक्तींकडून प्रत्यक्ष व अप्रत्यक्ष होत होतें. पण त्याला अखेरचें व निश्चित स्वरूप एका विद्वान् चतुरस्र माणसाकडून मिळावयाचें होतें. तो माणूस म्हणजे सर्वविद्यापारंगत, प्रसिद्ध बर्लिन युनिव्हर्सिटीचा संस्थापक विल्हेल्म् फॉन् हुम्बोल्ट्ट हा होय.

हुम्बोल्ट्ट हा जसा कुशाग्र बुद्धीचा पंडित तसाच मुत्सद्दीही होता. त्या वेळीं अंतर्गत दोषांमुळें व फ्रायहाइट्स् क्रीग (स्वतंत्रतेसाठीं युद्ध) म्हणून प्रसिद्ध असलेल्या नेपोलियनबरोबर झालेल्या अनेक लढायांनीं प्रशिया संस्थान अगदीं जेरीस येऊन रसातळास जाण्याची पाळी आली होती. तें सांवरण्याची ज्या माणसांनीं अनेक प्रकारें खटपट केली त्यां-पैकीं हुंबोल्ट्ट हा एक होता. लोकांनीं सुशिक्षण संपादून स्वतःसिद्धपणें संस्थानाची सेवा करण्यास उद्युक्त होणें ही गोष्ट संस्थान सांवरून धर-ण्यास फार महत्वाची आहे असें त्यानें जाणिलें व म्हणूनच जुनें सदोष एकांगीं शिक्षण—विशेषतः गिम्नासिउम्—सुधारण्याची त्यानें खटपट केली. पूर्वीप्रमाणें लॅटिन, ग्रीक या भाषांचें अध्ययन शाब्दिक, वरवरचें व म्हणूनच निर्जीव न होतां, रसिकपणें त्यांतील मर्म जाणण्याकडे प्रवृत्ति

व्हावी, भ्रमरवृत्तीनें त्यांतील श्रेष्ठ संस्कृति तेवढी शोधन घ्यावी असें त्यानें प्रतिपादून, नवी रीत घालून दिली व त्याच्याबरोबरच एकांगी-पणाचा दोष घालवून टाकण्यासाठीं आधुनिक भाषांमध्यें श्रेष्ठ व उच्च-प्रतीचें जें कांहीं असेल तेंही शिकविलें जावें अशी त्यानें तजवीज केली. पण त्यानें गिम्नासिउम्च्या सुधारणेंत नवी व महत्वाची केलेली गोष्ट म्हटली म्हणजे आधुनिक शास्त्रांचा अभ्यासक्रमांत अंतर्भाव ही होय. अशा रीतीनें गिम्नासिउम्मध्यें मिळणाऱ्या शिक्षणक्रमास सर्वांगसुंदरपणा यावा याविषयीं त्यानें व त्याच्या सहकारी मंडळींनीं फार खटपट केली. लॅटिन व ग्रीकमध्यें लिहिणारे, बोलणारे, वादविवाद करणारे पंडित तयार करणें हें ध्येय कायमचें मागें पडून त्याच्या जागीं ‘ सर्व बाजूंनीं सर्वांग-सुंदर शिक्षण देणें ’ या ध्येयाची स्थापना झाली.

## सर्वांगसुंदर शिक्षण.

‘ **आल्साइटिज बिल्डुंग्** ’ अथवा ‘ चतुरस्र संस्कृति ’ देण्याची खालीलप्रमाणें व्यवस्था झाली. पूर्वीप्रमाणेंच आतांही गिम्नासिउम्मध्यें दहा वर्षांचाच अभ्यासक्रम कायम करण्यांत आला. पण विषयांमध्यें मात्र फरक झाला. पूर्वीं मुख्य लॅटिन व जोडीला ग्रीक हेच काय ते विषय असत; आतां त्याऐवजीं लॅटिन, ग्रीक, जर्मन भाषा व गणित असे समान महत्वाचे चार विषय झाले. सर्व विषयांस अगदीं खालच्या वर्गापासून आरंभ होई. फक्त ग्रीक सातव्या वर्गापासून म्हणजे शाळेचीं शेवटलीं चारच वर्षें शिकविलें जाई. या दहा वर्गांत मिळून विषयवारीनें आठव-ड्यांतील तासांची संख्या साधारणपणें अशी असेः– लॅटिन ७६ (म्हणजे दर वर्गास आठवड्यांतून ७ ते ८ तास पडतात ), ग्रीक ५०, जर्मन-भाषा ४४, गणित विषय ६० तास. यांशिवाय इतिहास व भूगोल ३०, आधुनिक शास्त्रें २० व धर्म २०. प्रत्येक वर्गांत आठवड्यांत सरासरी ३० तास शिक्षण मिळे. अलीकडे झालेले तासांच्या संख्येसारखे किरकोळ फेरफार सोडले असतां गिम्नासिउम्मधील अभ्यासक्रम १९ व्या

शतकाच्या पहिल्या पंचविशींत जसा ठरविला गेला तसाच साधारणपणें आजही आहे. वर्षांची संख्या त्यावेळीं दहा कायम केली होती, ती आतां नऊ झाली आहे.

पूर्वीच्या लॅटिन शाळा लॅटिन वक्तृत्व व थोडेंसें ग्रीक शिकवीत असत; तर आतां नवी गिम्नासिउम् सर्व बाजूंचें शिक्षण देण्याचा बाणा बाळगूं लागली. ग्रीक, लॅटिन, व विशेषतः जर्मन यांनीं वाङ्मयात्मक संस्कृति मिळे; तर गणित, शास्त्रें व इतिहास यांनीं शास्त्रीय संस्कृतीची त्यांत भर पडूं लागली. पण त्यावेळचे शिक्षक जुन्या पद्धतीनें शिकलेले असल्यामुळें त्यांस गणित, शास्त्रें आदि विषय आगंतुक व अडथळा आणणारे असे वाटत व जुन्या भाषांनाच पूर्वी इतकें महत्व दिलें जाई. पद्धतींत मात्र फरक पडला तो वर दर्शविलाच आहे. इतर विषयांकडे बरेच तास जाऊं लागल्यामुळें, मुलांस घरीं स्वतंत्रपणें जुन्या भाषांचा जास्त अभ्यास करणें भाग पडूं लागलें; व त्यांतील वाङ्मयावर स्वतंत्र निबंध लिहितां येण्यांत अभिमान वाटूं लागून तिकडे त्यांचें लक्ष जास्त जाऊं लागलें. हुंबोल्ट्सारख्यांचा हेतु नसतांही या गिम्नासिउम् शाळा पुनः लॅटिन–ग्रीक शाळाच होऊन बसल्या. या बाबतींत चौकशी व सुधारणा करण्यासाठीं हल्लींच्या जर्मन बादशहानें १८९० सालीं कमिशन बसविलें होतें. पण त्यांतील माणसें जुन्याचीं कट्टीं अभिमानी असल्यामुळें लॅटिनचा एखादा तास कमी करून व्यायामासारख्या विषयास देण्यापलीकडे कांहीं निष्पन्न झालें नाहीं. इतकेंच नव्हे, तर त्यावेळीं ज्या 'रेआल्शूलेन' (लॅटिन–ग्रीक न शिकविणाऱ्या व्यवहारोपयोगी शाळा) भरभराटींत येत चालल्या होत्या, त्यांची योग्यता सरकारी रीतीनें गिम्नासिउम्बरोबरची ठरविण्याचेंही कमिशननें साफ नाकारलें! पण बादशहाच्या नेटानें, बदललेल्या परिस्थितीच्या अनुरोधानें १९००–१९०१ सालीं पुनः बसलेल्या कमिशननें या रेआल्शूलेन्ची योग्यता सर्वप्रकारें गिम्नासिउम्बरोबर आहे असें ठरविलें, व त्यांतून शिकलेल्या विद्यार्थ्यांस युनिव्हर्सिटींत प्रवेश करण्यास मुभा व सरकारी नोकऱ्यांसाठीं

होणाऱ्या परीक्षांस बसण्याची मोकळीक असावी व सैन्यामध्यें एक वर्षा-पेक्षां जास्त ' व्हॉलंटियर सर्व्हिस् ' त्यांस करावी लागूं नये अशा सवलती दिल्या.

## आजचा अभ्यासक्रम.

शेवटीं दोन्ही कमिशनच्या तडाक्यांतून तावून सुलाखून निघालेला गिम्नासिउम्‌चा अभ्यासक्रम आजमित्तीला खालीं दिल्याप्रमाणें आहे. हा अभ्यासक्रम पक्का नऊ वर्षांचा आहे. म्हणजे मुलांच्या वयाच्या ११ व्या वर्षी आरंभ होऊन १९ व्या वर्षाच्या अखेर तो पुरा होतो. गिम्नासि-उम्‌मध्यें शिकण्याची ज्यांची ऐपत व इच्छा आहे अशा मुलांस प्राथमिक शाळांत चारच वर्षें काढावीं लागतात. म्हणजे वयाच्या ६ व्या वर्षा-पासून १० व्या वर्षापर्यंत फोल्क्‌सूशूलमध्यें शिकून तीं गिम्नासिउम्‌मध्यें जातात. मुलांच्या वयाच्या मानानें आठवड्यांतून २६ पासून ३२ एक तास पावेतों शिक्षण मिळतें. धर्मशिक्षण २ तास, जर्मन भाषा ३, लॅटिन ८ ते ९, इतिहास-भूगोल ३, गणित ४ तास ( शेवटच्या २ वर्षांत नुसतें अंकगणित पुढें भूमिति व शेवटीं बीजगणित असा क्रम असतो ), सृष्टि-ज्ञान २ तास ( आधुनिक शास्त्रें; प्रथम सोपें वनस्पतिशास्त्र, मग प्राणि-शास्त्र, नंतर रसायन व यंत्र अशी साधारण पद्धति असते ), ड्रॉइंग् २ तास ( खालच्या दोन वर्गांस या विषयाच्याऐवजीं नुसतें शुद्धलेखन व साध्या रेघा वगैरे काढणें हें असतें ) व व्यायाम २ तास; हीं वर्गांस सारखींच असतात. ग्रीक भाषा ४ थ्या वर्षापासून सुरू होते, व तिला आठवड्यांतून सरसकट ६ तास मिळतात. हल्लींच्या गिम्नासिउम्-मध्यें फ्रेंच भाषा आवश्यक केली आहे. ती तिसऱ्या वर्षी सुरू होऊन तिला प्रथम ५ व पुढें ३ असे आठवड्यांतून तास मिळतात. ही कमिशननें केलेली नवी सुधारणा होय. याशिवाय इंग्लिश, इतालियन, हिब्रू या भाषा व वरच्या प्रतींचें ड्रॉइंग् आणि लघुलेखनकला हे विषय ऐच्छिक ठेविले आहेत. लॅटिन व ग्रीक या भाषांना दर वर्गांत आठवड्यांतून १५

तास, तर जर्मन व फ्रेंच या आधुनिक भाषांना ७ च तास मिळतात हें उघड झालें. यावरून गिम्नासिउम्‌मध्यें आजही जुन्या भाषांचें कसें वर्चस्व आहे हें सहज दिसून येईल. लॅटिन भाषेमध्यें मुलाकडून स्वतःच्या बुद्धीनें लिहिलेले निबंध लिहून घेण्याची चाल अजून मोडली नाहीं. ही जुन्या भाषांना पूर्वींप्रमाणेंच चिकटून राहण्याची जर्मन शाळांतील पंडितांची तऱ्हा लक्षांत ठेवण्यासारखी आहे.

## फी, परीक्षा वगैरे.

गिम्नासिउम्‌ची वर्षाची फी सरासरी ९० रुपये असते. ( बव्हेरिया प्रांतांत ती पुष्कळ कमी आहे. ) ती बहुतकरून दोन, क्वचित् तीन हप्त्यांनीं द्यावी लागते. तरी हुषार गरीब मुलांस स्कॉलर्शिपा, नादारी वगैरेची भरपूर मदत असल्यामुळें गिम्नासिउम्‌मधील शिक्षणाचा लाभ घेणें त्यास केवळ अशक्य होऊन बसत नाहीं. खालच्या वर्गांतून वरच्या वर्गांत जाण्यास परीक्षा असतात; तरी पण दर महिन्यांत मिळालेल्या शिक्षकाच्या शेऱ्यांवर व त्याच्या साधारण मतावर मुलाचें वरती जाणें बऱ्याच अंशीं अवलंबून असतें. नवव्या वर्षाच्या शेवटीं शाळेंतच परीक्षा होऊन दाखला मिळतो, व हा युनिव्हर्सिटींत प्रवेश होण्यास पुरा होतो. विश्वविद्यालयप्रवेशाशिवाय गिम्नासिउम्‌च्या विद्यार्थ्यांस दुसरा मोठा फायदा असा असतो कीं, गिम्नासिउम्‌मध्यें ७ वर्षें शिक्षण मिळाल्याचा दाखला असला म्हणजे, त्यांस सैन्यांत दोन वर्षांची सक्तीची चाकरी करावी न लागतां फक्त एकच वर्षाची खुषीची चाकरी करून काम भागतें. अशांस 'आइन्–येरिग्–फ्रायविलिग' (वन् ईयर व्हॉलंटीयर) म्हणतात. या दोन्ही कारणांमुळें व गिम्नासिउम्‌मध्यें शिक्षण मिळालेलें असलें म्हणजे सभ्य गृहस्थाचीं (' गेबिल्डेटर '=जन्ट्ल्मन् ) सर्व लक्षणें अंगीं बाणणें होय अशी समजूत पूर्वींपासून रूढ असल्यामुळें, गिम्नासिउम्‌कडेच साधारणतः सुखवस्तूंच्या मुलांचा ओढा असतो. यामुळें आधुनिक शास्त्रांच्या चलतीच्या काळांत व रेआल्‌शूलेन् अथवा व्यवहारो-

पयोगी शाळांची बरीच भरभराट होत असतांही, जर्मनींतील दुय्यम प्रतीच्या शिक्षणाच्या शाळांत गिम्नासिउम्‌चीच संख्या अझून जास्त आहे. प्रशियामध्यें अशा गिम्नासिउम् ३४१ असून त्यांत मुलांची संख्या १०३७०२ व शिक्षकांची संख्या ६५७१ आहे. त्यांतच ३१ प्रो-गिम्नासिउम् जमेस धरल्या पाहिजेत. त्यांत मुलांची संख्या ४०४५ असून शिक्षक २६५ आहेत. या प्रो–गिम्नासिउम् व गिम्नासिउम्‌मध्यें फरक एवढाच कीं, त्यांत वरचे तीन वर्ग असत नाहींत; अर्थातच त्यांतील मुलांस, ‘रायफ–त्सॉइज्‌निस्’ (अभ्यास पूर्ण झाल्याचा दाखला) व त्यावर अवलंबून असलेला विश्वविद्यालयप्रवेश मिळत नाहीं. शिक्षण मात्र दोहींकडे सारखेंच असतें. साक्सेन् संस्थानांत गिम्नासिउम् १९ आहेत. यांस जो २६½ लक्ष मार्कांच्यावर खर्च येतो त्यापैकीं १०½ लक्षांवर ह्मणजे एक तृतीयांशावर साक्सेन् संस्थान देतें.

**लाइपझिक् येथील ‘टोमास्’ गिम्नासिउम्‌चें वेळापत्रक १९११**

| वर्ग. | धर्म. | जर्मन. | लॅटिन. | ग्रीक. | फ्रेंच. | इतिहास. | भूगोल. | गणित. | फिजिक्स्. | केमिस्ट्री. | सुष्टाक्षरें. | एकूण. |
|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|
| १ | ३ | ४ | ९ | ० | ० | २ | १ | ३ | ० | ० | २ | २४ |
| २ | ३ | ३ | ९ | ० | ० | २ | २ | ४ | ० | ० | २ | २५ |
| ३ | २ | ३ | ८ | ० | ५ | २ | २ | १ | ० | ० | २ | २५ |
| ४ | २ | २ | ८ | ७ | ३ | २ | २ | ३ | ० | ० | २ | ३१ |
| ५ | २ | २ | ८ | ७ | २ | २ | २ | ४ | ० | ० | २ | ३१ |
| ६ | २ | २ | ८ | ७ | २ | २ | ० | ४ | २ | ० | ० | २९ |
| ७ | २ | ३ | ७ | ७ | २ | ३ | ० | ४ | २ | ० | ० | ३० |
| ८ | २ | ३ | ८ | ७ | ३ | ३ | ० | ४ | २ | ० | ० | ३१ |
| ९ | २ | ३ | ८ | ७ | २ | ३ | ० | ४ | २ | ० | ० | ३१ |
| | २० | २५ | ७३ | ४२ | १६ | २१ | ९ | ३१ | ८ | ० | १० | |

बर्लिन येथील मोम्सेन् गिम्नासिउम्‌चें वेळापत्रक १९११.

| वर्ग. | धर्म. | जर्मन. | गोष्टी सांगणें. | लॅटिन. | ग्रीक. | फ्रेंच. | इंग्लिश. | इतिहास. | भूगोल. | गणित. | मोजणें. | सृष्टशास्त्रें. | लिहिणें. | ड्रॉइंग्. | गाणें. | व्यायाम. | एकूण. | |
|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|
| १ | ३ | ३ | १ | ८ | ० | ० | ० | ० | २ | ० | ४ | २ | २ | ० | २ | ३ | ३० | |
| २ | २ | २ | १ | ८ | ० | ० | ० | ० | २ | ० | ४ | २ | २ | २ | २ | ३ | ३० | |
| ३ | २ | ३ | ० | ८ | ० | ४ | ० | २ | २ | २ | २ | २ | ० | २ | १ | ३ | ३३ | |
| ४ | २ | २ | ० | ८ | ६ | २ | ० | २ | १ | ३ | ० | २ | ० | २ | १ | ३ | ३४ | |
| ५ | २ | २ | ० | ८ | ६ | २ | ० | २ | १ | ३ | ० | २ | ० | २ | १ | ३ | ३४ | |
| ६ | २ | ३ | ० | ७ | ६ | ३ | ० | २ | १ | ४ | ० | २ | ० | (२) | १ | ३ | ३४ | (२) |
| ७ | २ | ३ | ० | ७ | ६ | ३ | (२) | ३ | ० | ४ | ० | २ | ० | (२) | १ | ३ | ३४ | (४) |
| ८ | २ | ३ | ० | ७ | ६ | ३ | (२) | ३ | ० | ४ | ० | २ | ० | (२) | १ | ३ | ३४ | (४) |
| ९ | २ | ३ | ० | ७ | ६ | ३ | (२) | ३ | ० | ४ | ० | २ | ० | (२) | १ | ३ | ३४ | (४) |
| ए. | १९ | २४ | २ | ६८ | ३६ | २० | (६) | १७ | ९ | २४ | १० | १८ | ४ | (८) | ११ | २७ | | |

# प्रकरण २ रें.

## रिअल् स्कूल्स्.

अठराव्या शतकाच्या मध्यांत जुन्या भाषांविरहित व नव्या भाषा आणि नवें शास्त्रीय विषयांचें (‘ रेआलीएन् ’चें) शिक्षण देणाऱ्या शाळांची आवश्यकता भासूं लागून १७४७ सालीं बर्लिन् येथें एका रेआल्शूल ( व्यवहारोपयोगी शाळे )ची स्थापना झाल्याचें वर लिहिलेंच आहे याचप्रमाणें हळुहळू इतर शहरांत अशा शाळा स्थापन होऊं लागल्या. पण त्या शतकांत यांची संख्या फारशी वाढली नाहीं. मात्र ही नवी दिशा दाखविण्याचें काम या थोड्या शाळांकडून त्या शतकांत झालें. एकोणिसाव्या शतकांत यांची संख्या झपाट्यानें वाढूं लागली. फ्रान्समधील राज्यक्रांतीनें मोठ्या नागरिकवर्गास मिळालेलें पूर्ण स्वातंत्र्य, त्या युद्धानंतर

मिळालेल्या शांततेंत शहरांची झालेली वाढ, उद्योगधंद्यांच्या अभिवृद्धी-मुळें भासूं लागलेली 'रेआलीएन्' (व्यवहारोपयोगी शिक्षणा)ची आवश्यकता व छोटेखानी शहरांतील कामचलाऊ लॅटिन शाळा व नव्या धर्तीच्या मोठ्या गिम्नासिउम् यांची हुंबोल्ट्प्रभृतींनीं घडवून आणलेली फारकत, हीं व्यवहारोपयोगी शाळांच्या वाढीचीं कांहीं कारणें होत. या छोटेखानी जुन्या लॅटिन शाळांनीं—यांतून पूर्वीं नागरिकांच्या मुलांस सहा वर्षें (मुलांच्या वयाच्या १० ते १६ वर्षांपर्यंत) शिक्षण मिळत असे—परिस्थिति ओळखून जुन्या भाषा शिकविण्याचें टाकून दिलें, फ्रेंच ही दुसरी भाषा नवी घेऊन आवश्यक केली, व रेआलीएन्च्या शिक्षणाला योग्य तें महत्व व भरपूर वेळ दिला. अशा रीतीनें हीं नवीं रेआल्शूलेन् जिकडे तिकडे चमकूं लागलीं व 'सर्व बाजूची संस्कृति' (आल्गेमायन बिल्डुंग्) देणाऱ्या याही शाळा आहेत असें लौकरच बऱ्याच लोकांस वाटूं लागलें. तेव्हां सरकारनेंही यांचें अस्तित्व १८३२ सालीं मान्य करून त्या-संबंधीं नियम केले. जर्मन, फ्रेंच, गणित, शास्त्रें, इतिहास, भूगोल या विष-यांत परीक्षा घेऊन दाखला देण्यास या शाळांस सरकारानें मान्यता दिली.

## गिम्नासिउम् विरुद्ध रेआलिएन्.

पण शाळाखातें गिम्नासिउम्च्या अभिमानी पंडितांकडे असल्यामुळें या शाळांचा ते द्वेष करीत. तरीही त्यांच्या उपयुक्ततेमुळें त्यांची भरभराटच होत चालली. तेव्हां विद्यामंत्र्यानें तडजोड करण्याच्या बुद्धीनें १८५९ सालीं या रेआल्शूलचे दोन वर्ग केले. एक ९ वर्षांच्या अभ्यासक्रमाचा व दुसरा पूर्वीसारखाच सहा वर्षांचा. ९ वर्षांच्या रेआल्शूलमध्यें पुनः लॅटिन आवश्यक करण्यांत येऊन त्यांस 'रेआल्गिम्नासिउम्' हें नांव मिळालें. गिम्नासिउम्पेक्षां अन्य रीतीनें म्हणजे विशेषेंकरून जर्मन, फ्रेंच व इंग्रजी, या नव्या भाषा व नवीन शास्त्रीय विषय यांच्या द्वारा, परंतु गिम्नासिउम्इतकेंच शिक्षण व सारखीच संस्कृति यांतही मिळते हें मान्य केलें गेलें. मध्यंतरीं अस्तित्वांत आलेल्या सर्व उच्च प्रतीच्या धंदे-

शिक्षणाच्या व कलाकौशल्याच्या विद्यालयांत ( होखशूल=कॉलेज ) प्रवेश होण्यास 'रेआल्गिम्नासिउम्' हें एकच द्वार ठेवलें गेलें. या पंक्तिप्रपंचास अर्थात् युनिव्हर्सिटींत व मंत्रिमंडळांत प्रमुखत्वानें असलेले गिम्नासिउम् पंडित सर्वस्वीं कारण होते. यापुढील ५० वर्षें, नव्याच्या अभिमानी लोकांनीं भांडून भांडून रेआल्गिम्नासिउम्ला योग्यतेच्या व हक्काच्या बाबतींत गिम्नासिउम्जवळ पोहोंचविण्यांत गेलीं. शेवटीं १८७० मध्यें रेआल्गिम्नासिउम्मध्यें शिक्षण मिळालेल्यांस युनिव्हर्सिटींत अंशतः म्हणजे फक्त तत्त्वज्ञानाच्या बाजूकडे व त्यांतही फक्त गणित व आधुनिक शास्त्रें या शाखेंत प्रवेश मिळाला. धर्म, कायदा व वैद्यक यांसंबंधाच्या शाखा त्यांस आणखी कांहीं वर्षें खुल्या झाल्या नाहींत. लॅटिन व ग्रीक या भाषा जाणणारांखेरीज इतरांनीं या धर्म–कायदा–वैद्यक बाजूंकडे पाहणें चुकीचें आहे असें गिम्नासिउम् पंडित प्रतिपादन करीत; व त्यांच्या वादांत थोडेंसें तथ्यही होतें. परंतु ज्याचें पोट दुखतें तो न सांगतां ओवा खाईल या न्यायानें ज्यांची जुन्या भाषांच्या पायांवर उभारलेले धर्म-कायदा आदि विषय शिकण्याची इच्छा असेल ते आपोआपच खाजगी रीतीनें तरी त्यांचें ज्ञान संपादन करतील; तेव्हां युनिव्हर्सिटीनें असा सक्त प्रतिबंध करण्यांत शहाणपणा नाहीं, असें नव्याचे अभिमानी प्रतिपादीत. या त्यांच्या प्रतिपादनास अखेर यश आलें व १९०१ सालीं रेआल्गिम्नासिउम्वाल्यांना सर्व शाखा खुल्या झाल्या हें वर दर्शविलेंच आहे.

या रेआल्गिम्नासिउम्मध्येंही अभ्यासक्रम नऊ वर्षांचा असतो हें वर सांगितलेंच आहे. यांत ग्रीक भाषेला मुळींच स्थळ नाहीं; लॅटिन अवश्य आहे, पण त्यास खालीं ६ व वरपावेतों फक्त ३ च तास मिळतात. त्याऐवजीं फ्रेंच भाषा व इंग्रजी भाषा या आवश्यक आहेत. आठवड्यांत तासांची विभागणी साधारणतः अशी होते:—धर्म २ तास, जर्मन भाषा ४ ते ३ तास, लॅटिन ६ ते ३ तास, फ्रेंच भाषा ४ तास, इंग्रजी २ तास, इतिहास—भूगोल ३ तास, अंकगणित, बीजगणित, भूमिति ४ ते ५ तास. आधुनिक शास्त्रें अगर सृष्टिज्ञान ३ तास व ड्रॉइंग् २ तास; मिळून

मुलांच्या वयाच्या मानानें आठवड्यांतून साधारणतः २६ पासून ३१ तास शिक्षण मिळतें.

## ओबर् रेआल्शूल.

१८५९ सालीं विद्यामंत्र्यानें जुन्या नव्या अभ्यासक्रमाचें संमिश्रण करून रेआल्गिम्नासिउम् अस्तित्वांत आणल्याचें सांगितलेंच आहे. पण ही तडजोड नव्याच्या अभिमानी शिक्षणपटु लोकांस आवडली नाहीं. आपल्या ६ वर्गांच्या रेआल्शूलच्या जोडीला त्याच पद्धतीची सर्व बाजूचें शिक्षण देणारी गिम्नासिउम्च्या तोडीची शाळा असावी व तिची योग्यताही अगदीं तशीच गणिली जावी याविषयीं त्यांनीं प्रयत्न चालविले. नव्या भाषा व नवीं शास्त्रें यांच्या योगानें अधिक जरी नाहीं तरी गिम्नासिउम्च्या तोडीचें शिक्षण व संस्कृति हीं मिळतात, हा त्यांचा मुद्दा होता; व म्हणूनच रेआल्गिम्नासिउम् हें त्यांस केवळ सोंग वाटे. या भांडणांत एक गिम्नासियाल् पंडितांचा व एक शिल्पशास्त्रज्ञ एंजिनियरादींचा असे दोन तट पडले. तेव्हां विद्यामंत्र्यानें या भांडणाचा निकाल लावण्यासाठीं सहा वर्गांच्या रेआल्शूललाच आणखी तीन वर्ग जोडून नऊ वर्गांचें गिम्नासिउम्च्या तोडीचें ओबर् रेआल्शूल अस्तित्वांत आणिलें. याप्रमाणें दुय्यम शिक्षणाच्या दोन वेगवेगळ्या दिशांच्या शाळा झाल्या; एक लॅटिन-ग्रीकचें जिच्यांत विशेष प्रस्थ आहे अशी गिम्नासिउम्शाळा व दुसरी त्या भाषांविरहित नवी भाषा व शास्त्रें यांच्या ९ वर्षांच्या अभ्यासक्रमाची ओबर् रेआल्शूल नांवाची नवीन शाळा. प्रथम प्रथम अर्थातच युनिव्हर्सिटीप्रवेश, सैन्यांत एकच वर्ष खुषीची चाकरी करण्याची सवलत वगैरे ओबर् रेआल्शूलला नव्हतीं. परंतु पुढें भांडतां भांडतां हीं सर्व रेआल्गिम्नासिउम्बरोबरच या शाळेलाही १९०१ सालीं मिळालीं. फक्त धर्मबाजू ( फॅकल्टी ऑफ थिऑलजी ) कडे ओबर् रेआल्शूलमध्यें तयार झालेल्या विद्यार्थ्यांना अझूनपावेतों सक्त मज्जाव आहे. पण ज्याप्रमाणें गिम्नासिउम् म्हणजे युनिव्हर्सिटीची पूर्व पायरी समजली जाते, त्याचप्रमाणें ओबर् रेआल्शूल ही नाना शिल्पकला व धंदे यांचें

शिक्षण देणाऱ्या विद्यालयांची पूर्व पायरी गाणिली जाते. हीं विद्यालयें म्हणजे टेश्निश होख्शूल (इं. टेक्निकल), हांडेल्स् होख्शूलेन् (कमर्शल कॉलेज) व टीअर्एर्त्स्लिश होख्शूलेन (व्हेटरिनरी) वगैरे होत.

## शिक्षणक्रम.

या ओबर् रेआल्शूलमध्येंही २६ पासून ३१–३२ तास आठवड्यांतून शिक्षण मिळतें. या शाळेच्या अभ्यासक्रमांत जुन्या भाषांस फांटा देण्यांत आला असून त्याऐवजीं फ्रेंच व इंग्रजी या भाषा घातल्या आहेत. गणित आणि शास्त्र यांस बरेचसे म्हणजे आठवड्यांतून ५।६ व ४ असे तास अनुक्रमें मिळतात. ड्राइंग् व शुद्धलेखन यांकडे जास्त लक्ष पुरविलें जातें. धर्म २ तास, जर्मन ४, फ्रेंच ६ ते ५, इंग्रजी ३, इतिहास-भूगोल ४ ते ३, अंकगणित १, बीजगणित व भूमिति ४ ते ५, नवीं शास्त्रें ४ ते ६, ड्राइंग् २ व शुद्धलेखन १ अशी तासांची विषयवार वांटणी वर्गाच्या मानानें होते. आधुनिक शास्त्रांचें शिक्षण प्रत्यक्ष प्रयोगाच्या द्वारा दिलें जातें, व कांहीं विवक्षित संख्येइतके प्रयोग मुलांच्या हातून करवून घेण्यांत येतात. त्यासाठीं यंत्रशास्त्राचीं व रसायनशास्त्राचीं मुख्य मुख्य उपकरणें प्रत्येक तऱ्हेचीं सहा सहा तरी दर ओबर् रेआल्शूलमध्यें असावीं असा नियम आहे. खालच्या वर्गांतून प्रथम प्राणिशास्त्र व वनस्पतिशास्त्र यांचीं मूलतत्त्वें, मग वरच्या वर्गांतून यंत्रशास्त्र व पुढें त्याच्या जोडीला रसायनशास्त्र असा शास्त्रीय शिक्षणाचा क्रम असतो. आपल्याकडे १९११ पावेतों इंटर्मीजिएट्मध्यें जेवढें यंत्रशास्त्राचें ज्ञान मिळत असे तेवढें तिकडे शाळेंतच मिळतें. रसायनशास्त्राचेंही याप्रमाणेंच आहे. उदाहरणार्थ नवव्या म्हणजे वरच्या वर्गांत 'प्रकाश व विद्युत्' यांचे प्रयोग आणि ऑर्गॅनिक केमिस्ट्री वगैरे शिकविलें जातें. यामुळेंच ओबर् रेआल्शूलमध्यें फी गिम्नासिउम्च्या जवळ जवळ दुप्पट म्हणजे १५० रुपये सालीना पडते. फ्रेंच व इंग्रजी शिकविण्यासाठीं शक्य तेथें त्या देशचे शिक्षक असतात. नाहीं तर फ्रेंच व इंग्रजी या भाषा शिकविणारा जर्मन शिक्षक फ्रान्स व इंग्लंड देशांत एक दोन वर्षें राहून शिकून आलेला असतो.

## म्यूनिच् येथील रेआल् गिम्नासिउम्चें वेळापत्रक १९११.

| वर्ग. | धर्म. | जर्मन. | लॅटिन. | फ्रेंच. | इंग्लिश. | मोजणें. | गणित. | वनस्पतिशास्त्र. | प्राणिशास्त्र. | यन्त्रशास्त्र. | रसायनशास्त्र. | इतिहास. | भूगोल. | ड्रॉइंग. | तालिम. | एकूण. |
|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|
| १ | २ | २ | ७ | ४ | ० | ३ | ० | २ | ० | ० | ० | २ | २ | ३ | २ | २९ |
| २ | २ | २ | ७ | ४ | ० | ० | ४ | ० | २ | ० | ० | २ | २ | ३ | २ | ३० |
| ३ | २ | २ | ६ | ३ | ४ | ० | ६ | ० | ० | ० | ० | २ | • | ४ | २ | ३१ |
| ४ | २ | २ | ६ | ३ | ३ | ० | ६ | ० | ० | २ | ० | ३ | ० | ४ | २ | ३३ |
| ५ | २ | ३ | ५ | ३ | ३ | ० | ५† | ० | ० | २ | २ | ३ | ० | ३ | २ | ३३ |
| ६ | २ | ४ | ५ | ३ | ३ | ० | ५‡ | ० | ० | २ | ३ | २ | ० | २ | २ | *३३ |
| | १२ | १५ | ३६ | २० | १३ | ३ | २६ | २ | २ | ६ | ५ | १४ | ४ | १९ | १२ | |

† ट्रिग्नॉमेट्री. ‡ ग्रॅफिकल जि. ऑ. * ग्रॅफिकल जि. ऑ.

## म्यूनिच् येथील ओबर् रेआल्शूलचें वेळापत्रक १९१०।११.

| वर्ग. | धर्म. | जर्मन. | फ्रेंच. | इंग्लिश. | मोजणें. | गणित. | भूगोल. | इतिहास. | सृष्टशास्त्र. | फिजिक्स. | केमिस्ट्री. | ड्रॉइंग. | लेखन. | व्यायाम. | एकूण तास. |
|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|
| १ | २ | ५ | ६ | ० | ४ | ० | २ | ० | २ | ० | ० | ३ | २ | २ | २८ |
| २ | २ | ५ | ६ | ० | ४ | ० | २ | ० | २ | ० | ० | ४ | १ | २ | २८ |
| ३ | २ | ४ | ५ | ० | ३ | २ | २ | २ | २ | ० | ० | ४ | ० | २ | २८ |
| ४ | २ | ४ | ३ | ० | १ | ४ | २ | २ | २ | ३ | ० | ४ | ० | २ | २९ |
| ५ | २ | ३ | ३ | ५ | ० | ५ | १ | २ | १ | ३ | २ | २ | ० | २ | ३१ |
| ६ | २ | ३ | ३ | ५ | ० | ५ | १ | २ | १ | ३ | २ | २ | ० | २ | ३१ |
| ७ | २ | ३ | ४ | ५ | ० | ५ | १ | २ | १ | ३ | ३ | २ | ० | २ | ३१ |
| ८ | २ | ३ | ४ | ३ | ० | ५ | १ | २ | १ | ३ | ३ | २ | ० | २ | ३१ |
| ९ | २ | ३ | ३ | ३ | ० | ५ | ० | ३ | १ | ३ | ३ | २ | ० | २ | ३१ |
| | १८ | ३३ | ३७ | १९ | १२ | ३१ | १२ | १५ | १३ | १८ | १३ | २५ | ३ | १८ | |

## आंकडे.

प्रशियामध्यें ओबर् रेआल्शूलेन् ९९ आहेत. त्यांत ४०६४४ विद्यार्थी शिकतात. सहाच वर्ग असलेलीं रेआल्शूलें मात्र १७१ असून त्यांत ३२२४९ मुलें आहेत. या शाळांत सहा वर्षें शिक्षण मिळालें म्हणजे तीं मुलें आपापल्या निश्चित धंद्याला अनुसरून त्या त्या धंदेशाळांत ( फाखूशूल-शाखाशाळा ) तीन वर्षें शिकतात व व्यापारी पेशा अंगिकारितात, किंवा वाण्याचा वगैरे धंदा करतात. म्हणजे हीं सहाच वर्गांचीं रेआल्शूलेन् ह्या अशा छोटेखानी धंदेवाल्यांसाठीं शाळा होत. रेआल् गिम्नासिएन् प्रशियामध्यें १६२ असून त्यांत ४८१६० मुलें आहेत. त्याच प्रकारच्या पण सहाच वर्ग असलेल्या रेआल्-प्रो-गिम्नासिएन् ४१ असून त्यांत ३९०३ विद्यार्थी आहेत. प्रशियांत गिम्नासिएन्ची संख्या ३४१ असून त्यांत १०६७०२ विद्यार्थी आहेत. रेआल् गिम्नासिएन्चें दुटप्पी स्वरूप लक्षांत घेऊन त्या बाजूस ठेवल्या तरी, गिम्नासिएन् व रेआलशूलेन् यांच्या संख्येचें व त्यांतील विद्यार्थ्यांच्या संख्येचें प्रमाण प्रशियांत खालीं दिल्याप्रमाणें पडतें:—

गिमना. प्रो. गिमना. ओबर् रेआल्, रेआल्

३४१ + ३१ : ९९ + १७१ = ३७२ : २७०

विद्यार्थी १०३७०२ + ४०१५ : ८०६४२ + ३२२४८ = १०७७१७ : ११२८९०

यावरून प्रशियामध्यें गिम्नासिउम्च्या शिक्षणाला अजून कसा मान आहे हें दिसून येईल. कानींकपाळीं व्याकरणाची खटखट, उठल्याबसल्या लॅटिन व ग्रीकचा मागें लकडा, असा प्रकार गिम्नासिउम्मध्यें असल्यामुळें शारीरिक शिक्षणाकडे व खेळांकडे लक्ष कमी असतें. असें आहे तरी, गिम्नासिउम्मध्यें शिक्षण मिळालेलें असलें म्हणजे सभ्य गृहस्थाचीं ( गेबिल्डेटर् इं. जंटल्मन् ) सर्व लक्षणें आंगीं बाणणें होय, अशी समजूत असल्यामुळें गेबिल्डेटर्चा शिक्का मारून घेण्यासाठीं गिम्नासिउम्कडेच

पुष्कळांचा ओढा असतो यांत नवल नाहीं. इतर संस्थानांत मात्र ही स्थिति बदलत चालली आहे. बव्हेरियामध्यें 'गिम्नासिउम्' ४५ आहेत, तर 'रेआल्शूलेन्' ५९ आहेत. यांत ३२ प्रो-गिम्नासिउम् जमेस धरल्या तर प्रमाण फिरून प्रशियासारखेंच पडतें. साक्सनींत गिम्नासिएन् १९ व रेआल्शूलेन् १३ आहेत. ओबर् रे० शूल ५ व रेआल्शूल ४ आहेत.

१९१० सालीं प्रशियामध्यें दुय्यम शिक्षणाच्या ज्या निरनिराळ्या प्रकारच्या ७१४ शाळा होत्या, त्यांस एकंदर खर्च ८ कोटी ६४ लक्ष आला; पैकीं ठराविक ग्रँट व प्रसंगोपात मदत म्हणून संस्थानानें १ कोटी ९४ मार्क दिले. शिवाय संस्थानाच्या खर्चानें चालणाऱ्या २४७ शाळांस जो २ कोटी ७३ लक्ष मार्क खर्च आला त्यापैकीं निवळ १ कोटी ५० लक्ष सरकारास करावा लागला. म्हणजे दुय्यम शिक्षणावर संस्थानानें एकंदर ३ कोटी ४ लक्ष मार्क (=२ कोट ५८ लक्ष रुपये) इतका खर्च केला.

## विशिष्टीकरण.

जर्मनींतील दुय्यम शिक्षणाची माहिती संपवितांना एक गोष्ट प्रमुखत्वानें सांगणें अवश्य आहे. ती ही कीं, जर्मनीमध्यें शिक्षणाच्या बाबतींत अतिशय कमालीचें ('specialization') विशिष्टीकरण झालेलें आहे. असा कोणताही धंदा, कला, अगर विद्या नाहीं कीं जिला जर्मनींत वेगळी शाळा व निराळा अभ्यासक्रम नाहीं! इतकेंच नव्हे, तर एकाच धंद्यांतलि निरनिराळ्या भागासाठीं निरनिराळीं 'शूलें' आहेत; यांस फाख्शूलेन अगर शाखाशाळा म्हणतात. उदाहरणार्थ, रेल्वे सर्व्हिस्साठीं फायरमन (कोळसे भरणारा), फिटर, ड्रायव्हर, एंजिन साफ करणारा, मोडतोड सांधणारा वगैरे प्रत्येक माणूस त्या त्या विषयांच्या शाळांतून शिकलेला असतो. यामुळें आपापल्या धंद्यांत तरबेज, बारीकसारीक गोष्टींसुद्धां समजणारीं माणसें जर्मनींत जितक्या प्रमाणांत आढळतात, तशीं दुसरीकडे सांपडणें कठिण; व म्हणूनच सतरा धंदे करणारा माणूस जर्मनींत आढळत नाहीं, व असला तर त्याला कोठेंही थारा मिळत नाहीं. प्रत्येक मुलाच्या

शिक्षणाची दिशा, व त्याचा भावी आयुष्यक्रम जर्मनींत वेळींच ठरून गेलेला असतो. दोषावांचून कोणतीही गोष्ट नाहीं; त्याप्रमाणें या पद्धतींतही दोष असणारच. उदाहरणार्थ, अमुक अमुक धंदा अगर कला आपल्या आंवाक्यांतील नाहीं असें उशिरां कळून आलें कीं त्या माणसाला 'धरीन तर डसेल, सोडीन तर पळून जाईल' असें होऊन सर्व जन्मभर त्रांस होतो. या विशिष्टीकरणाचें एक उदाहरण दिलें असतां स्पष्ट कल्पना येईल. लाइपूझीक् या शहरीं युनिव्हर्सिटी व नेहमींच्या तीन प्रकारच्या शाळांशिवाय एक व्यापारी विद्यालय, एक संगीतशाळा, सुतार, बुकबाईंडिंग, प्रिंटर इत्यादिकांच्या धंद्याच्या शिक्षणाच्या शाळा, कारकुनांसाठीं अनेक शाळा, व्यापारी शाळा, स्वयंपाक्यांची शाळा, यंत्रें चालविणारांसाठीं शाळा अशा नानाप्रकारच्या धंद्यांसाठीं शाळा आहेत.

## नवें धोरण.

शेवटीं गिम्नासिउम् व रेआल्शूलेन् यांविषयीं हल्लींच्या शिक्षणविषयपटु लोकांच्या मताचा वारा कसा वाहत आहे हें पाहूं. अगदीं अलीकडे म्हणजे १९ व्या शतकाच्या अखेरीपर्यंत या विषयासंबंधानें तज्ज्ञ लोकांचें मत कसें होतें हें वर दर्शविलेंच आहे. हल्लीं मात्र हें मत बदलत चाललें आहे. जुन्या भाषांच्या अध्ययनानें जितका संस्कार मनावर घडतो तितकाच संस्कार, गॉटे, शिलर, लेसिंग्, हुम्बोल्ट्, कान्ट्, फिश्टे इत्यादींच्या ग्रंथांच्या अध्ययनानेंही घडतो हें आतां लॅटिन–ग्रीक पिढ्यान्‌पिढ्या हाडींमासीं खिळलेले पंडितही प्रांजलपणें कबूल करूं लागले आहेत. १९ व्या शतकांत ही गोष्ट नवी व अनुभवून पाहण्याच्या मार्गांत होती, म्हणून कोणत्याही इतर नव्या गोष्टीप्रमाणें तिला अनंत अडथळे आले. पण आतां अनुभवाच्या भट्टींतून ही गोष्ट तावून सुलाखून निघाली आहे. यामुळें नव्या भाषा व नवीं शास्त्रें यांचें अध्ययन वाढत जाणार. दिवसेंदिवस गिम्नासिउम्‌ची गरज कमी भासून नव्या धर्तीच्या शाळांची संख्या वाढत जाणार हें जन्मांधालाही सहज दिसेल. कारण अगदीं

उघड आहे; धर्म, जुनें तत्त्वज्ञान, कायदा (लॅटिन-ग्रीकवर बऱ्याच अंशीं अवलंबून असणारे विषय) यांचा अभ्यास करणाऱ्या विद्यार्थ्यांची संख्या दिवसेंदिवस कमी जरी झाली नाहीं, तरी ती वाढणें खास शक्य नाहीं. उलटपक्षीं कलाकौशल्य शिकणारे, एंजिनियर, आधुनिक शास्त्रज्ञ, वैद्य व नव्या वाङ्मयाचा अभ्यास करणारे यांची संख्या मात्र दिवसें-दिवस वाढत जाणार. कारण हल्लींच्या भौतिक शास्त्रीय युगांत यांची अत्यंत जरूरी आहे. यामुळें नव्या धर्तीच्याच शाळा वाढत राहणार हें उघड आहे; व जसजशी यांची संख्या वाढत जाईल तसतशी जुन्या धर्तीच्या लॅटिन-ग्रीक शाळांची संख्या कमी होत जाईल, व शेवटीं धर्मज्ञ, तत्त्वज्ञ व कायदेपंडित यांस अवश्य तितकीच संख्या या शाळांची राहील. ही गोष्ट अर्थात् एका दिवसांत अगर चुटकीसरशी होणार नाहीं. तिला दिवसगत लागेल; पण कालांतरानें अशी स्थिति यावी असें शिक्षण-विषयपटु लोकांचें धोरण व मत आहे.

# भाग ३ रा.

## प्रकरण १ लें.

### स्त्रीशिक्षण.

सर्व मनुष्यजातीला व विशेषतः विद्याचारसंपन्न राष्ट्रांना शिक्षणाइतका महत्त्वाचा प्रश्न दुसरा कोणताही नसेल. मनुष्याच्या बौद्धिक व नैतिक वाढीचें शिक्षण हेंच एक जीवन आहे अशी जाणीव दोन अडीच शतकांपूर्वीं सुधारलेल्या युरोपियन राष्ट्रांत उत्पन्न झाली. तिच्या अनुरोधानें त्यांनीं आपल्यापरीनें प्रयत्न केले, व हा प्रश्न त्यांनीं बऱ्याच समाधानकारक रीतीनें सोडविला असें म्हणण्यास हरकत नाहीं. पण अगदीं प्रथम या प्रश्नाचा विचार करतांना, युरोपियन राष्ट्रांनीं अर्ध्याच मनुष्यजातीचा विचार केला असें म्हणावें लागतें. कारण लोकशिक्षण व त्याच्या पद्धति—विशेषतः दुय्यम प्रतीच्या शिक्षणाची पद्धति—या विषयांसंबंधीं तज्ज्ञ लोकांमध्यें रणें माजून राहिलीं असतां, स्त्रियांस लेखन, वाचन व गायन यांच्या पलीकडे कांहीं शिक्षणाची आवश्यकता आहे असें कोणासही वाटत नव्हतें. स्त्री पुरुषासारखीच स्वतंत्र, स्वतःसिद्ध व्यक्ति आहे ही कल्पनाच युरोपांतसुद्धां अगदीं अलीकडची आहे; मग स्त्रियांचा स्वतःसिद्ध स्वाभाविक विकास करणाऱ्या शिक्षणाचें नांव कशाला! रूसोसारखा तत्त्ववेत्ता व 'शिक्षण म्हणजे नैसर्गिक शक्तींचा विकास' या आधुनिक शिक्षणाच्या सर्वसंमत तत्त्वाचा कट्टा पुरस्कर्ताही आपल्या शिक्षणविषयक कादंबरींत स्त्रिया केवळ पुरुषांच्या सुखासाठीं आहेत म्हणून त्यांच्या शिक्षणाची वाट लावतो! त्याचे इतर देशांतील अनुयायीही असें प्रतिपादितात कीं, स्त्रियांना जें शिक्षण

द्यावयाचें तें एवढ्यासाठींच, कीं, त्यांनीं पुरुषांची व आपली करमणूक करण्यांत प्रवीण व्हावें, पुरुषांस व त्यांस सुख होईल अशाच गुणांचा विकास त्यांच्या आंगीं व्हावा, व शारीरिक सामर्थ्यापेक्षां त्यांचें अंगसौष्ठव विशेष वाढावें. सबंध १८ वें शतक व १९ व्याच्या कांहीं भागांत याच कल्पनांचें प्राबल्य होतें व त्याअन्वयें स्त्रियांस लेखन, वाचन, फ्रेंच भाषा, कशिद्याचें काम, नर्तन, गायन व वरच्या प्रतीच्या समाजांत चतुराईनें वागण्याचें वळण एवढ्याचेंच शिक्षण मिळत असे. या प्रकाराविरुद्ध लोकांस जागृत करण्याचा प्रयत्न करणारा कोणी एखादा महात्मा क्वचित् प्रसंगीं निपजला तर प्रचंड क्षारसमुद्रांत अमृततुल्य मेघोदकाच्या तुषाराप्रमाणें तो गडप होऊन जाई! एकोणिसाव्या शतकाच्या आरंभीं प्रसिद्ध शिक्षणविषयपटु पेस्टालोझी यानें स्त्रीशिक्षणाच्या या स्वरूपाच्या विरुद्ध आपली लेखणी उचलली. तोंपर्यंत स्त्रीशिक्षणाची युरोपांतही अशी शोचनीय स्थिति होती. जर्मन तत्त्ववेत्ता फ्रान्क यानें १८ व्या शतकाच्या आरंभीं काढलेली 'मुलींसाठीं दुय्यम स्त्रीशिक्षणाची शाळा' पांच वर्षांतच बंद पडावी, याचें बीज वर सांगितलेल्या स्त्रीशिक्षणाविषयींच्या सार्वत्रिक पसरलेल्या कोत्या कल्पनांतच आहे.

इतिहासाची पुनरावृत्ति होत असते असें म्हणतात. त्याची सत्यता शिक्षणविषयासंबंधीं बिकट प्रश्नांशीं—इतक्या उशीरा कां होईना पण—तोंड देणाऱ्या हिंदुस्थानाकडे पाहिलें असतां दिसून येते. लिहिणें, वाचणें यापलीकडे स्त्रीशिक्षणाच्या कार्यक्षेत्रासंबंधानें देशांतील सुशिक्षितांच्याही कल्पनेची मजल फारशी पुढें गेलेली नाहीं; व ती तरी सबंध वाळवंटांत एका वाळूच्या कणाइतकेंच साडेएकतीस कोटींशीं प्रमाण असलेल्या मूठभर सुशिक्षितांची !

युरोपांत मात्र वर निर्दिष्ट केलेल्या प्रकारच्या स्थितींत लौकरच क्रांति घडून आली. स्त्रीशिक्षणाची वरील कल्पना फार कोती आहे असें विद्वानांनीं प्रतिपादिलें, व विचारी लोकांस त्याची सत्यता पटूं लागली. शिवाय

सक्तीच्या व मोफत सार्वत्रिक शिक्षणाचा चांगला प्रसार होऊन तें देण्याच्या पद्धतीविषयीं ऊहापोह होऊं लागले व पुढील शिक्षणाचा पाया घरींच जिव्हाळ्याच्या माणसाकडून काळजीपूर्वक व्यवस्थित बसविला पाहिजे व त्यासाठीं मानसिक, नैतिक व शारीरिक शक्तींचा विकास करणारें शिक्षण स्त्रियांस मिळणें अवश्य आहे, असें तज्ज्ञ लोक जोरानें प्रतिपादन करूं लागले. राष्ट्रांचीं राष्ट्रें पायाखालीं चिरडणाऱ्या नेपोलियन बादशहास राज्याची भरभराट होण्यास उपाय कोणता म्हणून कोणीं एकदां विचारिलें असतां, ‘ सुमाता तयार करणें ’ असें त्यानें चटकन् उत्तर दिलें. नेपोलियनच्या या शब्दांत त्या वेळच्या विद्वानांच्या डोक्यांत घोळत असलेल्या स्त्रीशिक्षणाविषयींच्या विचारांचें सार अत्युत्कृष्ट रीतीनें सांठवलें आहे. उत्तम माता तयार करण्याचा उद्देश साध्य व्हावयास पाहिजे असेल तर स्त्रीशिक्षणासंबंधाचें आकुंचित ध्येय बदलल्याखेरीज गत्यंतर नाहीं, असें पेस्टालोझीनें आपल्या ग्रंथांत प्रतिपादिलें व त्याच्या शिष्यांनीं सर्व जर्मनीभर या मताचा प्रसार केला.

## सुधारणा.

यानंतर पुढें स्त्रीशिक्षणाच्या उदयकालाला जर्मनींत आरंभ झाला असें म्हणण्यास हरकत नाहीं. स्त्रियांच्या शिक्षणासाठीं ‘ हॉअर मेडशेन् शूल ’ ( मुलींच्या दुय्यम शिक्षणाच्या शाळा ) स्थापन झाल्या व त्या शाळांत मुलींच्या वयाच्या सहाव्या वर्षापासून १६ वें वर्ष संपेपावेतों १० वर्षें मधल्या व वरच्या स्थितींतील मुलींस शिक्षण मिळूं लागलें. कशिदा, गाणें यांतच पूर्वीं बराच वेळ जात असे. त्यांस आतां आठवड्यांतून नियमित तास मिळून जर्मन भाषेला जास्त वेळ मिळूं लागला. इंग्लिश भाषा अभ्यासक्रमांत नवीन आली व इतिहासाचा मुलींच्या अभ्यासक्रमांत प्रथमच प्रवेश होऊन त्याला विशेष महत्व देण्यांत येऊं लागलें. १८२० सालापर्यंत जर्मनींत अशा प्रकारच्या २२ शाळा स्थापन झाल्या, व पुढील २० वर्षांत आणखी ३४ स्थापिल्या गेल्या. सन १८६० पर्यंत या शाळांची संख्या १०३ वर गेली.

हा कालपावेतों सरकारनें या शाळांची घटना ठरविण्यांत, किंवा त्यांच्या अंतर्व्यवस्थेंत कोणत्याही प्रकारें अंग ठेविलें नाहीं, अगर त्यांस काडीइतकी मदत केली नाहीं. **खाजगी प्रयत्नांवर व संघशक्तीवरच** हें काम उत्साहानें चाललें होतें. अशा खाजगी प्रयत्नांत, खाजगी शाळांत, त्यांच्या अभ्यासक्रमांत, व व्यवस्थेंत वगैरे एकरूपता असावी म्हणून १८७२ सालीं मुलींच्या शाळांच्या चालकांची एक मोठी परिषद् भरली व या गोष्टींचा चांगला खल होऊन त्यांस निश्चित स्वरूप देण्यांत आलें.

ज्या मुलींच्या शाळांत ७ किंवा त्यापेक्षां अधिक वर्ग असून दोन परकीय भाषा आवश्यक म्हणून शिकविल्या जात त्या सर्वांचा हॉअर मेड्शेन् शूलमध्यें अंतर्भाव करण्यांत आला. निरनिराळ्या कार्यकारी मंडळ्या स्थापिल्या गेल्या, व १० वर्षांचा अभ्यासक्रम, व्यवस्थेची पद्धति, त्या शाळांतील शिक्षकांची योग्यता मुलांच्या शाळांतील शिक्षकांच्या बरोबरीची मानणें, वगैरे गोष्टी स्पष्टपणें ठरविल्या गेल्या. शाळांची स्थापना करण्याचें काम सरकारनें करावें अशी शिफारस करण्यांत आली. या शिफारशींकडे बाडेन्, साक्सनी वगैरे छोटेखानी संस्थानांनीं प्रथम लक्ष पुरविलें, व शेवटीं प्रशियानें १८८४ सालीं आज्ञापत्र काढून या शाळांचें अस्तित्व, योग्यता व व्यवस्था मान्य केली आणि सामान्य देख-रेख ठेवून कांहीं मदत करण्याचें कबूल केलें. याप्रमाणें या शाळांची स्थापना होऊन त्यांची बरीच भरभराट होण्यास व त्यांस कांहींसें निश्चित स्वरूप येऊन त्यांची मान्यता होण्याला जवळ जवळ १०० वर्षें लागलीं. त्यांचें सध्यांचें स्वरूप कसें आहे तें पुढें पाहूं.

## शिक्षकिणींच्या शाळा.

या शाळांसच जोडून शिक्षकिणी तयार करण्यासाठीं सेमिनार् स्थापण्यांत आल्या. त्यांचा अभ्यासक्रम प्रथम ३ वर्षांचा असे, तो हल्लीं चार वर्षांचा झाला आहे. त्यांत भाषा, इतिहास, गणित वगैरे विषय असून बालमानसशास्त्र ( जर्मन किन्डरप्सिशोलोगी = इंग्रजी सायकॉलजी ऑफ्

चाइल्ड् ) व शिक्षणशास्त्र ( पेडागोजी ) हे विषय ठेवण्यांत आले आहेत.
या सेमिनारमधून तयार झालेल्या शिक्षकिणींना ओबरलेररिन् पावेतों बढती मिळण्याचा मार्ग मोकळा आहे, तथापि त्या जागा बहुतकरून युनिव्हर्सिटीचें शिक्षण मिळालेल्या शिक्षकिणींना देण्यांत येतात.

## युनिव्हर्सिटीकडे.

ज्या ' हेॉअर मेड्शेन् शूल'ला अशी सेमिनार जोडलेली नसते, त्यांत पुढें युनिव्हर्सिटीशिक्षण घेऊं इच्छिणाऱ्या मुलींसाठीं 'स्टूडिएन् आन्स्टाल्ट्' नांवाचे वर्ग असतात. या निराळ्या व्यवस्थेचें कारण, मेड्शेन् शूल युनिव्हर्सिटीची पूर्वपायरी नसून **अगदीं स्वतःसिद्ध शिक्षण देणारी संस्था** समजली गेली आहे. या संस्थेचें ध्येय मुलींस पुरेशी सामान्य संस्कृति ( आल्गेमायन बिल्डुंग् ) मिळावी हें असून त्या ध्येयाला अनुसरून अभ्यासक्रम ठरविला गेला आहे. अर्थातच त्यांत लॅटिन व ग्रीकला जागा मिळण्याचें कारण नसून, गिम्नासिएन्सारख्या जुन्या कल्पनांवर वाढत गेलेल्या मुलांच्या शाळांप्रमाणें केवळ पूर्वपरंपरेला धरून कायम ठेवण्यांत आलेले निरुपयोगी विषयही अर्थात् वगळले गेले आहेत. ह्या मेड्शेन् शूलमध्यें १० वर्षें शिकून शाळेंतील शेवटची परीक्षा दिली कीं, मुलींस पूर्णत्वाचा दाखला ( रायफ त्सॉइज्निस ) मिळतो. ज्यांस युनिव्हर्सिटींत पुढें शिक्षण मिळवावयाचें असतें, त्यांस वरील स्टूडिएन् आन्स्टाल्ट्मध्यें आणखी ३ वर्षें काढावीं लागतात; शिवाय आधींचीं दोन वर्षेंही यांच्या अभ्यासक्रमांत योग्य तेवढा फरक झालेला असतो.

---

# प्रकरण २ रें.

## तीन पायऱ्या.

दहा वर्षांमध्यें सामान्य संस्कार देणाऱ्या या शाळांचे तीन भाग अगर पायऱ्या समजल्या जातात. शेवटची पायरी म्हणजे शेवटचे तीन वर्ग, —मुलींच्या वयाच्या सहाव्या वर्षाच्या अखेरपासून ९ व्या वर्षाचे अखेर

पर्यंत, मधली पायरी म्हणजे वरचे तीन वर्ग, व वरची पायरी म्हणजे पहिले चार वर्ग. पहिल्या पायरींत ' फोल्क्स् शूल ' ( प्राथमिक शाळा ) च्या धर्तीवर शिक्षण दिलें जातें. सृष्टिज्ञान, इतिहासादि विषय मधल्या पायरींत सुरू होऊन, फ्रेंच व इंग्लिश या परकी भाषा वरच्या पायरीस दोन वर्षांच्या अंतरानें सुरू होतात. जर्मन भाषा, धर्म व इतिहास यांस ध्येयाला अनुसरून विशेष महत्व दिलें जातें. जर्मन भाषा ही त्या शिक्षणाचें केंद्रस्थान होय असें म्हणण्यास हरकत नाहीं. मधल्या व वरच्या पायऱ्यांत वरिष्ठ प्रतीचें शिक्षण मिळतें. धर्मशिक्षणाचा शीलावर फार चांगला परिणाम होतो म्हणून त्या विषयासंबंधानें विशेष काळजी घेतली जाते; व बहुतकरून सकाळचे पहिले तास त्या विषयास दिले जातात. तिसऱ्या वर्षापासून भूगोल, चौथ्यांत सृष्टिज्ञान व पांचव्यांत इतिहास सुरू होतो. तिसऱ्या वर्षीं हस्तकौशल्याचें काम व पांचव्या वर्षीं अक्षराचे जागीं ड्रॉइंग् सुरू होतें. प्रथम शारीरिक व्यायाम व गाणें जोडीनें व पुढें वेगवेगळीं, अशीं पहिल्यापासून अखेरपर्यंत असतात. फ्रेंच भाषा चौथ्या वर्षापासून व इंग्रजी वरच्या पायरींत सुरू हाऊन त्यांस जर्मन भाषेच्या बरोबरीनें तास मिळतात.

## अभ्यासक्रम.

याप्रमाणें तीन आधुनिक भाषा, नवीं शास्त्रें, इतिहास व गायन यांच्या प्रमाणशीर शिक्षणानें ग्रहणशक्तीचा, धारणाशक्तीचा, बुद्धीचा, नैतिक शक्तीचा व अभिरुचीचा सर्वांगसुंदर विकास व्हावा अशी ' हॉअर मेड्-शेन् शूल ' शाळांतील अभ्यासक्रमाची रचना केली आहे. नेमलेल्या वेळांत एका विषयाचा अमुक भाग झालाच पाहिजे, या शाळाधिकाऱ्यांच्या मजुरी न्यायाला कायमचा फांटा मिळून, विद्यार्थिनींच्या मनांत विषय ठसवून, त्याचें ज्ञान त्यांना करून देण्याकडे विशेष लक्ष देण्यांत येऊं लागलें. धर्म, जर्मन भाषा व इतिहास हे विषय शिकविण्याच्या पद्धतींत विशेष रीतीनें फरक झाला. बायबलावर अंधश्रद्धा ठेवण्याची प्रवृत्ति उत्पन्न करण्याच्या ऐवजीं त्यांतील धार्मिक व नैतिक श्रेष्ठ तत्त्वें मनावर बिंबविण्याची प्रशंसनीय पद्धति पाडली गेली. भाषेच्या वरील प्रतीच्या शिक्ष-

णांत पूर्वीं वाङ्मयाच्या इतिहासावर मुख्य भर असे, आतां कवि व ग्रंथकार यांचीं काव्यें व ग्रंथ शिकविण्यांत जास्त लक्ष देण्यांत येऊन त्याद्वारें भाषेचा इतिहास गौणपणें शिकविण्यांत येऊं लागला. लिहितां-वाचतां, भाषणें करतां यावीं म्हणूनच केवळ नव्हे तर व्यवहारांत भाषेचा उपयोग व्हावा व तिच्या द्वारां परिस्थितीचें चांगलें ज्ञान व्हावें, म्हणून भाषेचें शिक्षण जास्त महत्वाचें समजलें गेलें. इतिहासांतील तारखा व जन्म शक, राजांच्या वंशावळी, मृत्यूचे सन यांच्या घनपाठाची वैदिकी धर्तीची पद्धति मागें पडून, ठळक ऐतिहासिक गोष्टींतील पूर्वापार संबंध व त्यांचा कार्यकारणभाव वगैरे विद्यार्थिनींना समजेल अशा रीतीनें तो विषय शिकविला जाऊं लागला. गायन, ड्रॉइंग व इतर विषय यांच्या मदतीनें अभिरुचीला वळण लावून तिची योग्य दिशेनें जोपासना होऊं लागली. उचित शारीरिक व्यायामानें आरोग्य व अंगसौष्ठव यांची मनाच्या विकासाला जोड मिळूं लागली. अशा रीतीनें मध्यम व वरिष्ठ वर्गांतील मुलींना प्रौढ झाल्यावर गृहिणी या नात्यानें आपलीं कर्तव्यें चांगल्या रीतीनें पार पाडतां येण्यास जे गुण अवश्य आहेत, ते गुण त्यांच्या अंगीं बाणण्याजोगें शिक्षण त्यांस प्राप्त व्हावें म्हणून शिक्षण-विषयपटु विद्वानांनीं देशकालाला अनुरूप असा अभ्यासक्रम आपल्या समजुतीप्रमाणें ठरविला. गृहाचा अलंकार, पुरुषाच्या सुखाचें व करमणुकीचें साधन, एवढ्यापुरतीच मध्ययुगांत व नंतरही दोन तीन शतकें स्त्रीशब्दाची व्याप्ति असे; ती आतां पार नाहींशी होऊन पुरुषांप्रमाणेंच स्वतःसिद्ध व्यक्तित्व स्त्रियांच्याही ठिकाणीं आहे, असें पूर्णपणें स्थापित झालें; व त्यांचा सर्व बाजूंनीं सर्व शक्तींचा सर्वांगसुंदर विकास व्हावा यासाठीं पुरुष व स्त्रियाही झटूं लागल्या. त्या त्यांच्या श्रमांचें फळ जर्मनींतील सध्यांचें हॉअर मेड्शेन् शूल हें होय.

या मेड्शेन् शाळांतून मुलींच्या वयाच्या मानानें आठवड्यांतून १४ पासून ३२ तासपर्यंत शिक्षण देण्यांत येतें. तासांची विषयवार वांटणी साधारणपणें अशी होतेः—धर्म २ तास, जर्मन भाषा खालच्या वर्गांत ८-९

तास, व नंतर ५-४ तास, भूगोल २ तास, गणित ३-४ तास, ड्रॉइंग २ तास, कशिद्याचें काम २ तास, गाणें २ तास व व्यायाम २ तास. चौथ्या वर्षापासून सृष्टिज्ञान ४ तास, व फ्रेंच भाषा ४-६ तास, व पांचव्या वर्षापासून इतिहास २ तास, व सातव्यांत व पुढें इंग्रजी भाषा ४ तास शिकविली जाते. यावरून वरच्या पायरींत तिन्ही भाषांना सारखेच म्हणजे प्रत्येकीं चार चार तास मिळतात हें उघड झालें. शिवाय ज्यांची इच्छा असेल त्यांस अधिक शिवणकाम व लघुलेखनकला हीं २-२ तास शिकविलीं जातात.

## युनिव्हर्सिटीकडे.

स्टूडिएन् आन्स्टाल्ट् (युनिव्हर्सिटीची पूर्वपायरी) मध्यें मेड्शेन्शूलच्या चार वर्गांप्रमाणेंच विषय व तास साधारणतः असतात. फरक एवढाच कीं, इंग्रजी भाषेला १ तास कमी मिळून तो इतिहासास दिला जातो; गणितास ५ तास दिले जातात व कशिद्यास फांटा मिळतो. ३ तास लॅटिन या मुलींस ऐच्छिक आहे. ठोकळ मानानें म्हणावयाचें म्हणजे ओबर्रेआल्शूल इतका अभ्यास या आन्स्टाल्ट्मधील मुलींचा होतो व पूर्णत्वाचा दाखला मिळाला म्हणजे युनिव्हर्सिटीचें द्वार त्यांस खुलें होतें. हिंदुस्थानांत स्त्रियांना जसा वेदाचा अधिकार नाहीं असें मानण्यांत येतें, तद्वतच जर्मनींत इ. १८९२ सालापर्यंत युनिव्हर्सिटीच्या पवित्र मंदिरांत पाय टाकण्याचा अधिकार स्त्रियांस नव्हता, हें लक्षांत ठेवण्यासारखें आहे. त्यासालीं प्रथम छोटेखानी बाडेन् संस्थानानें स्त्रियांस युनिव्हर्सिटींत मुक्तद्वार प्रवेश मिळावा असें केलें व मागून चार सहा वर्षांनीं प्रशियानें लाजून त्याचें अनुकरण केलें. तरीही स्त्रियांस आपल्या लेक्चरास येण्याचा मज्जाव करणारे कांहीं मर्दानी बाण्याचे प्रोफेसर बर्लिन् युनिव्हर्सिटीला अझून भूषवीत आहेत !

यावरून स्टूडिएन् आन्स्टाल्ट्, ओबर्रेआल्शूलच्या व मेड्शेन् शूल रेआल्शूलच्या बरोबरीच्या आहेत हें दिसून येईल; व दरबारी खलित्यांत त्यांची योग्यता तशीच लेखिली आहे. तरी या मेड्शेन् शाळा रेआल्शूलच्या धर्तीवर स्थापल्या गेल्या असें म्हणणें चुकीचें होईल. मेड्शेन् शूल ही अगदीं स्वतंत्र वाढ आहे. तींतील अभ्यासक्रम स्त्रियांच्या नैसर्गिक

प्रवृत्तीला व वाढीला पोषक होईल अशाच रीतीनें ठरविला आहे. दोहों-तील भेद दाखविण्यासाठीं एकदोन गोष्टींचा उल्लेख केला असतां पुरें होईल. मेड्शेन्शूलमध्यें जर्मनभाषा व इतिहास–भूगोल यांस जास्त तास असून त्यांवरच विशेष भर असतो, तर रेआल्शूलमध्यें गणितासारख्या केवळ बौद्धिक विषयाला जास्त तास मिळतात. शिवाय मुलीचा गणितासारख्या एखाद्या विषयाकडे कल नसेल तर त्याबद्दल फार जिकीर न पडतां भाषेसारख्या दुसऱ्या विषयांत तिनें प्रावीण्य दाखवून भरपाई केलेली चालते. लॅटिन व ग्रीक या विषयांना अभ्यासक्रमांत फांटा, नव्या भाषा व नवीं शास्त्रें ह्यांवर विशेष भर, हे मुख्य मुद्दे मात्र रेआल्शूल व मेड्शेनशूल ह्या दोहोंतही सारखेच आहेत. मेड्शेनशूलमध्यें फी रेआल्-शूलच्या जवळजवळ सारखी म्हणजे ९० पासून १२० रुपये सालीना पडते. स्टूडिएन् आनूस्टाल्ट्मध्यें मात्र फी बरीच जास्त म्हणजे १२० वर पडते.

## शार्लोटेन्बुर्ग् येथील मुलींच्या शाळेचें वेळापत्रक

| वर्ग. | धर्म. | जर्मन. | फ्रेंच. | इंग्लिश. | इतिहास. | भूगोल. | गणित. | सृष्टिशास्त्र. | लेखन. | ड्राइंग. | विणकाम | गायन. | व्यायाम. | एकूण तास. |
|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|
| १ | ३ | १० | ० | ० | ० | ० | ३ | ० | ० | ० | ० | १ | १ | १८ |
| २ | ३ | १० | ० | ० | ० | ० | ३ | ० | ० | ० | ० | १ | १ | १८ |
| ३ | ३ | ९ | ० | ० | ० | ० | ३ | ० | ३ | ० | २ | १ | १ | २२ |
| ४ | ३ | ६ | ६ | ० | ० | २ | ३ | २ | १ | २ | २ | २ | २ | ३१ |
| ५ | ३ | ५ | ५ | ० | २ | २ | ३ | २ | १ | २ | २ | २ | २ | ३१ |
| ६ | ३ | ५ | ५ | ० | २ | २ | ३ | २ | १ | २ | २ | २ | २ | ३१ |
| ७ | २ | ४ | ४ | ४ | २ | २ | ३ | ३ | ० | २ | २ | २ | ३ | ३३ |
| ८ | २ | ४ | ४ | ४ | २ | २ | ३ | ३ | ० | २ | २ | २ | ३ | ३३ |
| ९ | २ | ४ | ४ | ४ | २ | २ | ३ | ३ | ० | २ | २ | २ | ३ | ३३ |
| १० | २ | ४ | ४ | ४ | ३ | २ | ३ | २ | ० | २ | २ | २ | ३ | ३३ |
| | २६ | ६१ | ३२ | १६ | १३ | १४ | ३० | १७ | ६ | १४ | १६ | १७ | २१ | |

## स्त्रियांस धंदेशिक्षणाची आवश्यकता.

यांशिवाय स्त्रीशिक्षणाची आणखी एक दिशा जर्मनींत दिसून येते. हिंदुस्थानांत आज तर ती अस्तित्वांत नाहींच; पण पुढेंही ती दिसून येईल कीं नाहीं याची शंका आहे. ती दिशा म्हणजे स्त्रियांस योग्य अशा धंद्यांचें शिक्षण देणें ही होय. स्त्री झटली म्हणजे तिनें लग्न केलेंच पाहिजे, असा युरोपांत कायदा अगर धार्मिक, सामाजिक निर्बंधही नाहीं. शिवाय विशेषतः जर्मनीमध्यें पुरूषांपेक्षां स्त्रियांची संख्या सुमारें ९ लाखांनीं जास्त आहे! तिसरें कारण असें कीं, कांहीं आर्थिक व सामाजिक कारणांमुळें स्त्रियांची लग्नमर्यादाही भलतीकडे वाढली आहे. २६।२८ वर्षें पर्यंत लग्न न झालेल्या स्त्रिया तिकडे पुष्कळच आहेत. त्याच आर्थिक व इतर अडचणींमुळें, एवढ्या मोठेपणीं देखील लग्न होईलच अशी शाश्वती नसते. तेव्हां ९ लाखांना नवरे मिळणें अशक्य म्हणून, व इतर पुष्कळांना पैशाच्या व दुसऱ्या कित्येक अडचणींमुळें, तर कांहींना अशा तऱ्हेनें आपणांस जखडून घेऊन आपलें स्वातंत्र्य गमावणें आवडत नाहीं, ह्मणून, १८ पासून ३० वर्षांच्या अविवाहित स्त्रियांची संख्या जर्मनींत फारच मोठी आहे. त्याच आर्थिक व सामाजिक अडचणींमुळें मध्यमस्थितींतल्या व बऱ्याच वरच्या स्थितींतल्या लोकांसही कुटुंबवत्सलतेमुळें अशा मुलींचें इतकीं अधिक वर्षें संगोपन करणें जीवावर येतें. त्यांस कोठें तरी दुकानांत कारकुनीचा, विक्री करण्याचा, पोष्ट, तार व टेलिफोन या ऑफिसांत कारकुनीचा, किंवा वरिष्ठ प्रतीच्या दायांचा वगैरे कोणता ना कोणता तरी धंदा करणें भाग पडतें. जर्मनींत १९०७ च्या खानेसुमारींत कारकुनी, मास्तरकी, दुकानावर विक्री करणें इत्यादि धंद्यांत ४० लाखांवर स्त्रिया आहेत असें दिसून आलें! या धंद्यांत त्यांस व्यवस्थेनें व योग्य पूर्व तयारीनें पडतां यावें, म्हणून त्या त्या धंद्यांचें ज्ञान अवश्य लागतें. दुकानदारी, कारकुनी वगैरे धंद्यांत तर त्यांस पुरुषांशीं बरोबरी व चढाओढ करणें भाग असल्यामुळें वर निर्दिष्ट केलेल्या पेशांचें शिक्षण त्यांस अत्यंत

जरूर आहे. तें तसें त्यांस मिळावें म्हणून श्रेष्ठ प्रतीच्या धंद्यांच्या शाळा काढल्या आहेत. त्यांस 'शूल फयूर् फ्रावेन् बेरूफ' स्त्रियांच्या कामधंदे-शिक्षणाच्या शाळा असें म्हणतात. रेआल्शूलमध्यें शिकलेल्या मुलांसाठीं जशा कमर्शल्, टेक्निकल्, मेडिकल् शाळा, तशाच हॉअर मेड्शेन्शूलमध्यें निदान कांहीं वर्षें तरी काढून कामधंदा करावयास लागणाऱ्या मुलींसाठीं या शाळा होत.

## धंदेशाळा.

या धंदेशिक्षणाच्या शाळांमध्यें धंद्यांच्या सामान्य माहितीचा, व्यापारी शिक्षणाचा, किंडर् गार्टन् शिक्षकिणींचा व दायांचा, आणि हस्तकौशल्याचे छोटेखानी धंदे शिकवून त्यांतीलच शिक्षाकिणी तयार करण्याचा असे चार भाग साधारणपणें असतात. कोणत्या भागाचें शिक्षण घ्यावयाचें हें मुलीच्या इच्छेवर व आवडीवर असतें. प्रत्येक भागाचा अभ्यासक्रम दोनपासून तीन वर्षेंपर्यंत असतो. पहिल्या वर्षास व्यवसायास लागणारें सामान्य ज्ञान, पुढें विषयाचें प्रत्यक्ष व विशिष्ट ज्ञान दिलें जातें. जर्मन् व फ्रेंच् इंग्लिशसारखी दुसरी एक भाषा, पत्रव्यवहार व लघुलेखन हे विषय सर्व भागांस आवश्यक असतात. आठवड्यांत शिक्षण विषयांच्या व वर्गांच्या मानानें २४ पासून ३० तासपर्यंत असून फी ४०।४५ रु. पडते.

## आंकडे.

स्त्रीशिक्षणाच्या शाळांविषयीं सबंध जर्मनीचे आंकडे काढीत बसणें त्रासाचें आहे; म्हणून येथें फक्त प्रशियाचे आंकडे दिले आहेत. प्रशियाचें राज्य सबंध जर्मनीच्या दोनतृतीयांशाइतकें असल्यामुळें, त्यासंबंधीं आंकड्यांवरून बाकीच्या $\frac{1}{3}$ ची कल्पना करतां येईल. अशा बहुतेक महत्त्वाच्या बाबतींत प्रशिया नमुनेदार समजला जातो. विद्यामंत्र्याच्या १९११ सालच्या रिपोर्टाप्रमाणें प्रशिया संस्थानांत एकंदर ४२८ 'हॉअर मेड्शेन शूलेन्' आहेत. यांतील विद्यार्थिनींची संख्या सरासरी १ लक्ष ५०

हजार आहे. या सर्व शाळा म्युनिसिपालिट्यांच्या आहेत. सरकारची कांहीं मदत यांना असते, व त्यांवर थोडी सरकारी देखरेखही असते. याशिवाय खासगी प्रयत्नानें चाललेल्या शाळांची संख्या बरीच मोठी म्हणजे २२२ होती. त्यांतील विद्यार्थिनींचें मान मात्र म्युनिसिपल शाळांइतकें नांहीं.त्यांची संख्या सुमारें ४० हजार असेल नसेल. या विसंगत प्रमाणाचें कारण तेव्हांच लक्षांत येण्याजोगें आहे. मेड्शेन्शूलें अस्तित्वांत आलीं तेव्हां केवळ खाजगी व्यक्तींच्या अगर मंडळांच्या प्रयत्नांवर अवलंबून असत. त्यांची भरभराटही त्याच स्थितींत झाली. तेव्हां ज्या ज्या खासगी शाळा होत्या त्या तशाच राहून यांत म्युनिसिपल शाळांची भर पडली. मुलींचें प्रमाण खाजगी शाळांत कमी पडूं लागण्याचीं कारणें, म्युनिसिपल शाळांची जास्त चांगली व्यवस्था, त्यांस पैशाची अनुकूलता, व चांगल्या शिकून तयार झालेल्या शिक्षक–शिक्षाकिणींचा पुरवठा हीं होत. शिक्षकिणींच्या लेरेरिनेन् सेमिनार प्रशियांत ८ आहेत. यांतून तयार झालेल्या शिक्षाकिणींना ओबर्लेरेरिन् ( वरिष्ठ प्रतीची शिक्षकीण ) या पदवीला चढतां येतें; तरी पण तें स्थान बहुतकरून युनिव्हर्सिटीचें शिक्षण मिळालेल्यांच्या वांट्यास जातें. परंतु सेमिनार्मधून तयार झालेली असो, अथवा युनिव्हर्सिटीच्या मांडवाखालून गेलेली असो, मुलींच्या शाळेच्या डिरेक्टरच्या पायरीला निदान आज तरी स्त्रीला बहुतकरून चढतां येत नाहीं. डिरेक्टर बहुतकरून पुरुष असतो इतकेंच नव्हे, तर असिस्टंट डिरेक्टरही पुरुषच असावा लागतो. शिक्षक-मंडळांतही पुरुषांची संख्या निदान जवळ जवळ स्त्रियांच्या संख्येइतकी असते, पण उलट मुलांच्या शाळेंत मात्र एकही स्त्रीशिक्षक नसतो.

## लित्सेएन्.

याशिवाय प्रशिया संस्थानांत ‘ लित्सेएन् ’ नांवाच्या मुलींच्या शाळांची संख्या १५८ आहे. यांमध्यें व मेड्शेन्शूल यांत विशेषसा कांहीं फरक दिसत नाहीं. दोहींकडे शिक्षण, फी, नादारींचें शेंकडा १० प्रमाण–वगैरे सर्व सारखेंच असतें. फक्त या लित्सेएन्मध्यें शेवटची ‘पूर्णतेची परीक्षा’

नसते. वर्गांत विद्यार्थिनींची संख्या दोहोंतही ४० च्या वर कधींही असत नाहीं.

लेरेरिनेन् सेमिनार संस्थानच्या ७९ व खाजगी ५१ मिळून १३० आहेत. यांस जोडून एक यूबुंग्ज् शूल ( इं. प्राक्टिसिंग् स्कूल् ) असावें असा नियम आहे. स्टूडिएन् आनस्टाल्ट् सरकारी ३५ व खाजगी ३ आहेत. तिन्ही प्रकारच्या शाळांची एकंदर संख्या ८०६ आहे. इतर संस्थानांत व प्रशियांत मिळून स्टूडिएन् आल्ट्स्टाल्ची संख्या ८६ असून यांत शिकणाऱ्या विद्यार्थिनींची संख्या १९१० सालीं सुमारें ४९०० होती.

## शिक्षकसंख्या व पगार.

हॉअर मेडशेन् शूल व स्टूडिएन् आन्स्टाल्ट् मिळून प्रशियांतील म्युनिसिपल ( अथवा निमसरकारी ) शाळांत सुमारें १८०० शिक्षक व २६०० शिक्षकिणी आहेत. खाजगी शाळांत शिक्षकिणींची संख्या याहून अधिक असते. १९१० सालीं ती ४६५४ होती. खाजगी शाळांत डिरेक्टरचें काम तितकी पात्रता असलेल्या स्त्रीला मिळूं शकतें. प्रशियांतील खाजगी शाळांत डिरेक्टरच्या जागेवरील पुरुष व स्त्रिया यांचें प्रमाण ९१ स ९ असें असतें, असें एका तज्ज्ञानें काढलें आहे. शिक्षकिणीस पगार तिच्या दर्जाप्रमाणें १६५० पासून ३००० व २००० पासून ४२०० मार्क सालीना मिळतो. डिरेक्टरिणींना जास्त म्हणजे ७००० मार्कपर्यंत असतो.

प्रशियांतील फ्रावेन् शूलांची संख्या ८५ आहे. यांत ५० संस्थानचीं व ३५ खाजगी आहेत. या शाळांत वर सांगितलेल्या कामधंद्यांशिवाय अनाथसेवा ( आर्मेन् फ्लेग ) नांवाच्या संस्थेच्या चालकाचें व मदतनिसाचें काम, गिरण्या, घरें वगैरे तपासण्याचें व पोलिस् इन्स्पेक्शनचें काम, मुलांच्या आरोग्यगृहांवरील देखरेख इत्यादि करण्यास लागणारें ज्ञान दिलें जातें.

## कोएज्युकेशन-मुलामुलींचें एकत्र शिक्षण.

एकाच शाळेंत एकाच वर्गांत मुलांमुलींस बसविण्याची पद्धति जर्मनींत नाहीं. बाळपणीं म्हणजे प्राथमिक शिक्षण मिळण्याच्या वयांत मिश्र शिक्षण पाहिजे तर द्यावें; पण निसर्गानें केलेल्या भेदाची भावना दोहींपक्षीं होऊं लागते, अशा वयांत मुलांमुलींस एकाच वर्गांत शिक्षण देणें योग्य नाहीं असें जर्मन शिक्षणविषयपटु लोकांचें आज मत आहे. इंग्लंडसारख्या देशांतील मिश्र शिक्षणाचे प्रयत्न पाहून त्यासंबंधानें अनुकूल मत व्यक्त करणारे लोक जर्मनींत विरळाच आढळतात. प्राथमिक शाळांत मुलां-बरोबर मुलीही घेतात; पण त्यांचे वर्ग वेगवेगळे असतात.

# भाग ४ था.

## प्रकरण १ लें.

### उच्च प्रतीचें शिक्षण.

आतांपर्यंत जर्मनींतील प्राथमिक व दुय्यम शिक्षणाविषयीं माहिती दिली. आतां यापुढें जर्मनींत उच्च प्रतीच्या विश्वविद्यालयांतील शिक्षणाविषयीं माहिती देऊं. सध्यां आपल्या देशांत नवीन विश्वविद्यालयें स्थापन होण्याचा काळ आला आहे. डाक्का येथें नवीन युनिव्हर्सिटी स्थापन करण्याचें सरकारनें ठरविलें आहे. मुसलमानी युनिव्हर्सिटी लौकरच स्थापन होईल असा रंग दिसत होता व हिंदु युनिव्हर्सिटीसाठीं वर्गणी गोळा करण्याचें काम होऊन तिचे कायदेकानू ठरले व कोणशिला देखील बसली. आपल्या पुण्यासही युनिव्हर्सिटीची जरूर आहे, असे उडत उडत सरकारी व खाजगीही उद्गार निघत आहेत. अशा वेळीं जर्मनींतील युनिव्हर्सिट्यांचें त्रोटक पूर्ववृत्त व अंतर्व्यवस्था, शिक्षणक्रम, व विद्यार्थी व शिक्षक यांविषयीं विस्तारानें माहिती दिली असतां ती महाराष्ट्रीयांस बोधप्रद होईल असा आम्हांस भरंवसा आहे.

### स्थापना.

जर्मनीमध्यें युनिव्हर्सिट्यांच्या स्थापनेचा काळ म्हटला म्हणजे इसवी सनाचें १४ वें शतक व १५ व्या शतकाचा आरंभ होय. फ्रान्स, इताली, स्पेन व इंग्लंड या देशांमध्यें याच्याही पूर्वीं युनिव्हर्सिट्या स्थापन झाल्या होत्या. त्यांच्याच—विशेषत: पॅरिस युनिव्हर्सिटीच्या—नमुन्यावर जर्मनींत विश्वविद्यालयांची स्थापना झाली. जुन्या जर्मन राष्ट्रांत पहिली युनिव्हर्सिटी सन १३३९ सालीं प्राग् शहरीं ( हें शहर हल्लीं ऑस्ट्रियाकडे

आहे ) निघाली. नंतर सन १४३५ मध्यें हायड्लबर्ग् येथें निघाली. प्राग् युनिव्हर्सिटींत लौकरच जर्मन् व बोहिमियन् असे तट पडून लढा सुरू झाला. त्याचा परिणाम असा झाला कीं, तेथील जर्मन प्रोफेसर व विद्यार्थी उठून लाइपझिग्ला गेले व तेथें त्यांनीं १४०९ त नवी युनिव्हर्सिटी स्थापन केली. याशिवाय कॉलून्, एरफूर्ट्, रोस्टॉक् वगैरे ठिकाणीं ८–१० संस्था याच सुमारास स्थापन झाल्या. या सर्व पहिल्यापासूनच शिक्षक व शिष्यवर्गाच्या स्वतंत्र संस्था मानल्या जाऊन त्यांस धर्मगुरूंकडून व राजांकडून विशिष्ट हक्क मिळत गेले. हे हक्क मुख्यतः तीन प्रकारचे असत. ( १ ) पहिला हक्क शिकविणें, परीक्षा घेणें व बाकालौरिउस् ( इंग्रजी—बॅचलर ) मॅजिस्टर व डॉक्टर या पदव्या देणें यासंबंधाचा होय. धर्मपीठ म्हणजे चौदा विद्या व चौसष्ट कलांचें माहेरघर अशी त्या वेळीं कल्पना रूढ असल्यामुळें हा हक्क पोप व त्याचे ठिकठिकाणचे प्रतिनिधि जे आर्च्‌बिशप् यांचेकडून मिळे. ( २ ) दुसरा हक्क स्वतःचे संघटक नियम करण्यासंबंधाचा. या हक्कांमुळें या संस्थांस स्वसत्ताकत्त्व प्राप्त झालें. ( ३ ) या युनिव्हर्सिट्यांस मिळालेला आणखी एक हक्क म्हटला म्हणजे स्वतःचे घटकावयव जे शिक्षक व शिष्य त्यांमधील न्यायनिवाडे स्वतःच करण्याविषयींचा अधिकार. या अधिकारामुळें शिक्षक व विद्यार्थी यांशीं राज्यांतील न्यायसंस्थांचा बिलकुल संबंध राहिला नाहीं, व त्यांवर न्यायसंस्थांचा यत्किंचित्‌ही अधिकार चालत नसे. याखेरीज कोणत्याही प्रकारच्या करभारापासून मुक्तता व आणखी कांहीं हक्क राज्यकर्त्यांकडून मिळालेले होते. हे हक्क नीट बजावतां यावे म्हणून या युनिव्हर्सिट्यांच्या अंतर्व्यवस्थेसाठीं दोन प्रकारचीं मंडळें असत. पैकीं शिकविणें, परीक्षा घेणें वगैरेसाठीं शिक्षकवर्गाच्या विषयवारीप्रमाणें ‘ फाकुल्टेट् ’ अगर शाखा केलेल्या असत. मध्ययुगांत या शाखा चार असत. ( १ ) धर्म. ( २ ) कायदा. ( ३ ) वैद्यक. ( ४ ) इतर सर्व विद्यांची ‘ फाकुल्टास् आर्टिउम्. ’ प्रत्येक शाखेच्या अग्रस्थानीं एक एक डेकान् ( इंग्रजी डीन् ) असे. या शाखांचे

मुख्य अधिकार म्हटले म्हणजे विषयांची विभागणी व व्यवस्था, वादविवाद करविणें ( आपल्या काशींतील पद्धतींप्रमाणें ज्याची परीक्षा घेणें असेल त्याच्यापुढें एक विषय मांडून निरानिराळ्या शंका उपस्थित करीत, व त्यांचें खंडन त्यास शास्त्रोक्त पद्धतीप्रमाणें करावें लागे ), परीक्षा घेणें व पदवीदान हे सामान्यतः असत. दुसऱ्या दोन हक्कांच्या बजावणीसाठीं युनिव्हर्सिटींतील शिक्षक व विद्यार्थिमंडळाची देशवार विभागणी करून (नात्सयोन्) प्रत्येकावर 'प्रोकुराटोर' नांवाचा अध्यक्ष नेमीत. या सर्वांवर रेक्टर नांवाचा सर्व युनिव्हर्सिटीचा अध्यक्ष निवडला जात असे. सर्व तऱ्हेचे न्यायनिवाडे, अंतस्थ कारभार हें अधिकारीमंडळ करी. ही व्यवस्था मूळ पॅरिस युनिव्हासटीची; तेथें सर्व देशचे विद्यार्थी जमत असल्यामुळें अशी विभागणी सहाजिकच क्रमप्राप्त होती. पण जर्मन युनिव्हर्सिट्यांत तिचें फारसें महत्त्व नसल्यानें ती हळुहळू मागें पडत चालली.

## शिक्षणक्रम.

सर्व विषयांत शिक्षण धर्मगुरूंनीं ठरविलेलें, ठरविलेल्या पुस्तकांचें व ठरविलेल्या पद्धतीचें असे. धर्म असो, कायदा असो, अगर इतिहासादि इतर विषय असोत; त्यांचें शिक्षण परंपरागत पद्धतीस अनुसरून देण्यांत येत असे. यामुळें त्यांत विषयाचा नवीनपणा, रीतीचा नवीनपणा, चिकित्सक बुद्धि वगैरेंचा अभाव असे. बायबल् व त्यावरील पोप महर्षींच्या जुन्या टीका म्हणजे तर ईश्वरवाक्यच ! कायद्यांतही श्रुतिवचनें व जस्टीनियन्चें कोड् यापलीकडे कांहीं शिकवण्यालायक असें नव्हतेंच ! वैद्यकामध्येंही त्यावेळीं हिपोक्राटेस् हा युरोपांत वाग्भटाची पदवी पावला होता; व तत्वज्ञानासंबंधीं तर 'आरिस्टॉटलोच्छिष्टं जगत्सर्वं' असें होऊन बसलें होतें ! असें असल्यामुळें अध्यापकाचें काम मूळ ग्रंथावर माल्लिनाथी करणें व त्यांतील विषयांचा समारोप करणें एवढेंच द्विविध असे. अर्थात् विद्यार्थ्यांस शिक्षण म्हटलें म्हणजे गुरुजींच्या वाक्यांचें श्रवण, मनन, निदिध्यासन करणें व वादविवादाचे वेळीं त्यांचें पुनरुच्चारण करणें या

पलीकडे कांहीं नसे. जटापाठ, घनपाठ वगैरे सारखाच सारा प्रकार! माजिस्टर (इं. मास्टर्) ची पदवी मिळविली म्हणजे युनिव्हर्सिटींत शिकविण्याचा हक्क विद्यार्थ्यांस मिळे. परंतु शिक्षण होऊनही नोकरीची हमी नसल्यानें 'डिसूप्युटेशन्'–वादविवाद–करून पोट भरण्यापलीकडे या सुशिक्षितांस गत्यंतर नसे. म्हणून या युनिव्हर्सिटीकडून त्या युनिव्हर्सिटीकडे भटकत फिरणाऱ्या विद्यार्थ्यांचा मध्ययुगांत भारी सुळसुळाट असे. कांहींजण गाणीं, पोवाडे करून गांवोगांव भिका मागत फिरत. यामुळें या वेळच्या विद्यार्थ्यांची नीतिमत्ता फारच मलीन झाली होती. लॅटिन भाषेचें बरेंच शिक्षण व लॅटिनद्वारां इतर विषयांचें शिक्षण मिळालेल्या या पंडितांपैकीं सर्वांसच उपाध्याय वगैरेंची जागा कोठून मिळणार? तेव्हां त्यांपैकीं बहुतेकांस वरील वारकरी पंथच स्वीकारावा लागे. त्या वेळच्या फिरत्या विद्यार्थ्यांनीं केलेलीं व त्यांच्याच आयुष्यक्रमाचें कधीं हृदयद्रावक तर कधीं हास्यास्पद वर्णन करणारीं लहानसहान गाणीं अजून विद्यार्थ्यांच्या तोंडीं आहेत. गोल्डस्मिथ् कवीनें डॉ. प्रिमरोजच्या वडील मुलाच्या इतालींतील प्रवासाचें जें वर्णन केलें आहे, तें अगदीं या नमुन्यावर आहे हें इंग्रजी वाङ्मयाच्या भोक्त्यांच्या तेव्हांच लक्षांत येईल. असो.

## धर्मक्रांतीचा परिणाम.

रफर्मेशन् (धर्मक्रांति) च्या काळापावेतों, म्हणजे सोळाव्या शतकाच्या आरंभापर्यंत युनिव्हर्सिटीच्या या कार्यक्रमांत फारसा फरक झाला नाहीं. पण लूथरनें धर्मक्रांति घडवून आणिली, तेव्हां या संस्थांत बऱ्याच घडामोडी झाल्या. दोन धर्मपंथ एकाच देशांत आतां सुरू झाल्यामुळें त्या पंथानें नव्या युनिव्हार्सिट्या स्थापिल्या. ज्या संस्थानांत धर्मक्रांति विशेष रीतीनें घडून आली, तेथें नव्या पंथाचें शिक्षण देण्याची आवश्यकता भासूं लागून नवीन युनिव्हर्सिट्यांची स्थापना झाली. जुन्या देवस्थानास उत्पन्नाच्या ज्या मोठमोठ्या बाबी असत त्या आतां मोकळ्या

होऊन, तो पैसा नव्या नव्या संस्थांकडे खर्च करतां येऊं लागला. अशा संस्थांपैकींच येना ( स्थापना १५५८ ), मारबुर्ग् ( १५२७ ) वगैरे युनिव्हर्सिट्या होत. पण रेफर्मेशन व या नवीन संस्था स्थापन होण्याचा काळ यांमधील २५ वर्षें युनिव्हर्सिटीशिक्षण दैन्यावस्थेला आलें होतें. याचें कारण धर्मक्रांतीमुळें उत्पन्न झालेला अविश्वास होय. प्रत्यक्ष बायबल व त्यांतील तत्वें यांकडे लोकांचें लक्ष वळवून लूथरनें धर्मोपाध्यायांची कावेबाज मखलाशी उघडकीस आणली. तेव्हां युनिव्हर्सिट्यांतील धर्मशिक्षण केवळ उपाध्यायी थाटाचें व खोडसाळ आहे असें लक्षांत येऊन लोक त्याचा तिटकारा करूं लागले. याचप्रमाणें ॲरिस्टॉटलच्या तत्वज्ञानाची व सृष्टशास्त्राची स्थिति झाली. धर्मक्रांतीचा पुरस्कर्ता लूथरच पॅरिस येथील धर्मशिक्षणाच्या शाखेला 'सैतानाचें मंडळ' (सैन्य) असें म्हणे. तेव्हां त्याच्या अनुयायांनीं तिचा व तिच्या धर्तीवर चाललेल्या सर्व संस्थांचा तिटकारा करावा यांत नवल नाहीं. पुढें पुढें तर इतक्या थरावर गोष्ट गेली कीं, उत्तम शिक्षकांनासुद्धां ५।६ विद्यार्थी मिळण्याची मारामार पडूं लागली ! हायड्लबर्ग येथें शिक्षकांच्या संख्येपेक्षांही विद्यार्थ्यांची संख्या कमी झाली ! पण क्रियेच्या मागून प्रतिक्रिया ठेवलेलीच, या न्यायानें लोकांचे डोळे उघडले व जुन्यास शिव्या देण्यांतच वेळ व शक्ति खर्च करीत न बसतां त्यांनीं नवीन संस्था स्थापण्याचा उद्योग आरंभिला. त्याचेंच फळ मारबुर्ग्, येना व कॉनिग्ज्बर्ग् येथील युनिव्हर्सिट्या होत. प्रत्येक संस्थानांतच नव्हे, तर कित्येक मोठ्या शहरांनादेखील आपली युनिव्हर्सिटी असावी व आपली तरुण पिढी आपल्या विश्वविद्यालयांतच सुशिक्षित व्हावी असें वाटूं लागलें होतें. याचा परिणाम असा झाला कीं, १६ व १७ व्या शतकांत युनिव्हर्सिट्यांचें जणूं पीकच आलें. या गोष्टीचा दुसरा परिणाम असा झाला कीं, युनिव्हर्सिट्यांचें सर्वराष्ट्रीय महत्व जाऊन त्यांस स्थानिकपणा प्राप्त झाला व भटकणारें विद्यार्थिमंडळ ही संस्था बहुतेक नामशेष झाली.

बाकी अंतर्व्यवस्था, नैसर्गिक व मिळविलेले हक्क, ते बजावण्यासाठीं रेक्टर् वगैरे अधिकारी मंडळ व चार फाकुल्टेट्र् ( शाखा ) वगैरे गोष्टी पूर्वीप्रमाणेंच कायम राहिल्या. पूर्वीं आर्ट्स् फॅकल्टी इतर तिहींचा पाया समजला जात असे; तसेंच आतांही राहिलें. पदव्या वगैरेंतसुद्धां फरक झाला नाहीं. त्या वेळेचा इतिहास, त्या वेळचा कायदा वगैरे विषय शिकविण्यांत येऊं लागले. धर्मशाखेंत बायबलाचें शिक्षण परंपरेवर अवलंबून न राहतां त्याचा शब्दार्थ, तत्त्वार्थ वगैरे सांगण्याची प्रवृत्ति पडली. विशेष फरक चौथ्या ह्मणजे आर्ट्स् फॅकल्टीमध्यें झाला. तो असा:—पूर्वीं सर्व भिस्त ॲरिस्टॉटलवर असे. त्याच्या जोडीला आतां जुन्या वाङ्मयाचा प्रत्यक्ष अभ्यास (ॲरिस्टॉटलूच्या ओंजळीनें नव्हे !) येऊन बसला. इतिहास प्रामुख्यानें पुढें आला. गणित व सृष्टशास्त्रें यांनाही हळुहळू महत्त्व मिळूं लागलें. हे सर्व विषय शिकविण्यांत शास्त्रीय पद्धतीचा हळुहळूं अवलंब होऊं लागला. पूर्वीं या आर्ट्स् फॅकल्टींतील विषय वाटेल तो माजिस्टर ( इं. मास्टर ) शिकवीत असे. इतकेंच नव्हे, तर एकच माजिस्टर आळीपाळीनें व्याकरण, काव्य, अलंकार, न्याय, तत्त्वज्ञानादि विषय शिकवी. परंतु आतां विषयांची निवड होऊं लागून एकानें एकच विषय घेऊन अखेरपर्यंत शिकविण्याची पद्धति हळुहळू पडूं लागली. विषय निवडणें व लेक्चरें ऐकणें हल्लींप्रमाणें विद्यार्थ्यांच्या खुषीवर अवलंबून नव्हतें, तर थेट शाळेच्या नमुन्यावर आंखलेल्या कार्यक्रमाप्रमाणें त्याला चालावें लागे. उदाहरणार्थ, १५५८ सालीं लाईप्झिक् येथील अभ्यासक्रम असा होता:—पहिला सेमेस्टर अगर टर्म—ग्रीक व लॅटिन, व्याकरण, न्याय व काव्य; दुसरा सेमेस्टर:—व्याकरण व न्याय पुढें चालू, शिवाय वक्तृत्वशास्त्र; तिसरा सेमेस्टर:—काव्यालंकार व वक्तृत्व पुढें चालू, शिवाय गणित व पदार्थविज्ञानशास्त्राचीं मूलतत्वें. या तीन सेमेस्टरांच्या शेवटीं बाकालौरिउस् ( इं.—बॅचलर ) ची परीक्षा. यानंतर दोन वर्षें माजिस्टर् परीक्षेचा अभ्यास करावा लागे. या वर्षांत जुन्या ग्रीक व लॅटिन ग्रंथकारांविषयीं व्याख्यानें ऐकून ॲरिस्टॉटलचें ‘ ऑरगॅनान ’ मूळांत

वाचावें लागे. शिवाय पहिल्या वर्षीं पदार्थविज्ञान व ॲरिस्टॉटलचें नीतिशास्त्र व दुसऱ्यांत गणित शिकावें लागे. या व्याख्यानांच्या जोडीला 'यूबुंग्' (इं.=प्रॅक्टिस) असत. यांमध्यें विद्यार्थ्यांकडून प्रत्यक्ष भाषांतरें, निबंध वगैरे लिहून घेणें, प्रोफेसरांनीं वाचून म्हणून अगर बोलून दाखवून त्यांचें विद्यार्थ्यांनीं अनुकरण करणें वगैरे गोष्टी होत असत. यावरून सहज लक्षांत येईल कीं, जुन्या लॅटिन ग्रीक ग्रंथकारांप्रमाणें लिहितां व बोलतां यावें, आणि त्यांच्या ग्रंथांवर मल्लिनाथी करण्यांत हातखंडा असावा यापलीकडे अजूनही शिक्षणाचें ध्येय गेलें नव्हतें. हल्लींचें शिक्षणाचें ध्येय जें **विषयाचें ऐतिहासिक ज्ञान देऊन शास्त्रीय चिकित्सेची ओळख करून देणें**, तें यावयाला अजून दोन शतकें अवकाश होता.

## असंतोषाचीं बीजें.

याप्रमाणें धर्मक्रांतीनंतर युनिव्हर्सिट्यांस थोडें नावीन्य आलें, तरी सुद्धां त्यांची जुन्याला चिकटून राहण्याची प्रवृत्ति, शिकविण्याच्या पद्धतींत गतानुगतिकपणा, कालानुरोधानें उत्पन्न झालेले नवे विषय—नव्या परिस्थिति यांस न जुमानणें, इत्यादि प्रकारांमुळें त्यांवरील लोकांची श्रद्धा उडत चालली. शिवाय शिक्षकांचा एक दुर्भेद्य कंपू होऊन बसल्यामुळेंही संस्थानिकादि बड्या लोकांस त्यांचें वैषम्य वाटून, त्यांनीं 'रिटर् आकाडेमी' नांवाच्या नव्या संस्था आपल्या तरुण मुलांच्या दरबारी शिक्षणासाठीं काढल्या व धर्मसंबंधीं वादांत न पडलेले—युनिव्हर्सिट्यांसंबंधीं उदासीन झालेले—विद्वान् लोक नव्या 'आकाडेमी डर विझेनशाफ्टेन्'सारख्या संस्था काढून ज्ञानप्रसार करूं लागले. उदाहरणार्थ, स्पिनोझासारख्या तत्त्ववेत्त्यानें १६७३ त हायड्लबर्ग् येथें प्रोफेसर होण्याचें नाकारलें. गणिती व तत्त्ववेत्ता लाइब्नित्स् यानेंही एका युनिव्हर्सिटींतील प्रोफेसर पदवी सोडून देऊन १७०० सालीं बर्लिन शहरीं एक आकाडेमी डर् विझेन्शाफ्टेन् काढली. ही युनिव्हर्सिट्यांची दुःस्थिति १७ व्या शतकाच्या शेवटपर्यंत टिकली.

## नवी जागृति.

१८ व्या शतकाच्या आरंभीं ही स्थिति बदलूं लागली व त्या शतकाच्या शेवटीं जर्मन युनिव्हर्सिट्या पुन्हां जागृत झाल्यासारख्या होऊन श्रेष्ठपदाला पावल्या व लोकांच्या पूर्ण आदरास पात्र झाल्या. याचें श्रेय भाषाभिज्ञ टोमासिउस् व तत्त्ववेत्ता फ्राक यांस, त्यांनीं स्थापलेल्या हाल व गॉटिंगेन्सारख्या युनिव्हर्सिट्यांस आहे. जुन्या जर्मनींतच नव्हे, तर सर्व युरोपभर युनिव्हर्सिट्यांस जें नवें जीवन व नवा जोम आला त्याचें उत्पत्तिस्थान हाल येथील १७७४ त स्थापलेली युनिव्हर्सिटी होय. ह्याचीं कारणें मुख्यतः दोन आहेत. पहिलें बेकन्, लॉक्, डेकार्ट, स्पिनोझा, इत्यादींचें नवें–स्वतंत्र–तत्त्वज्ञान व नुकतींच जन्मास आलेलीं आधुनिक शास्त्रें यांस त्या युनिव्हर्सिटीनें आपल्या अभ्यासक्रमांत प्रमुख स्थान दिलें हें होय. दुसरें–हाल येथील युनिव्हर्सिटी विचारस्वातंत्र्य व शिक्षणस्वातंत्र्य या नव्या तत्त्वावर स्थापली गेली. परंपरागत आलेलीं तत्त्वें पूर्वपरंपरेप्रमाणें शिकविणें ही ज्ञानाच्या व शास्त्रीय शोधांच्या पायांतली जबदरस्त शृंखला या नव्या युनिव्हर्सिटीनें जन्मतःच तोडून टाकली. यामुळें **युनिव्हर्सिटी ही वाढत्या शास्त्रीय ज्ञानाचें माहेरघर, सत्यशोधाची पुरस्कर्ती व बौद्धिक विषयांत पुढारीण होऊन बसली.** शिवाय आतांपावेतों सर्व शिक्षण लॅटिन भाषेच्या द्वारें दिलें जात असे, तें टोमासिउस्च्या अश्रांत परिश्रमांनीं जर्मन भाषेंत देण्यास सुरुवात झाली. सर्वच विषय नव्या पद्धतीनें शिकविले जाऊं लागले. तरी विशेष फरक ‘धर्म’ या विषयांत झाला. फ्रान्क यानें ‘पीएटीसमूस्’ ( इं. = Pietism ) अथवा भागवत धर्म नांवाचा नवा धर्मपंथ काढला व त्याचें शिक्षण युनिव्हर्सिटींत सुरू केलें. तें लोकप्रिय होऊन अतोनात विद्यार्थी त्यास जमूं लागले. तत्त्वज्ञानाच्या शाखेला फ्रान्कच्याच नेतृत्वाखालीं इतर तीन शाखांइतकेंच आतां महत्त्व येऊन ती धर्म, कायदा व वैद्यक यांच्या बरोबरीची गणली गेली. गॉटिंगेन ( हानोव्हर प्रांतांत ) येथेंही १७३७ त

हालच्या धर्तीवर युनिव्हर्सिटी स्थापन झाली. हाल येथें जसें धर्मशास्त्राले तसें गॉटिंगेन येथें कायदा व गणितशास्त्र यांना फार महत्व आलें. विशेषतः प्रसिद्ध शिक्षकांच्या नेतृत्वाखालीं चाललेल्या 'सेमिनार्' ना गॉटिंगेन् येथें उत्तम स्वरूप येऊन त्या नमुनेदार बनल्या. ज्या संस्थेंत, अभ्यासांत पुढें सरसावलेले विद्यार्थी प्रोफेसरांच्या मार्गदर्शकत्वाखालीं, पण स्वतःच्या अकलेनें आपापल्या विषयांत मेहनतीनें व शोधक बुद्धीनें काम करावयाला शिकतात, त्या संस्थेस 'सेमिनार्' असें म्हणतात. यांचे नव्या विद्यार्थ्यांसाठीं व विषयांत जास्त प्रगति झालेल्या विद्यार्थ्यांसाठीं असे दोन भाग असतात. ज्ञानार्जनाच्या कामीं स्वतःच्या पायावर उभें राहण्यास व शोधकबुद्धीचा विकास होण्यास युनिव्हर्सिटींतील नेहमींच्या व्याख्यानांपेक्षां या सेमिनारचाच जास्त उपयोग होतो असें दिसून येऊन, इतर युनिव्हर्सिट्यांतही त्या गॉटिंगेन् युनिव्हर्सिटीच्या धर्तीवर सुधारण्यांत अगर नवीन स्थापन करण्यांत आल्या. शिवाय गॉटिंगेन् येथें 'जुन्या विद्या'–पुराणकाळचा अभ्यास नव्यानें उदयास आला. या बाबतींत वादविवादांत गढून गेलेलें जुन्या युनिव्हर्सिट्यांचें पंडिती ध्येय जाऊन जुनी संस्कृति, जुना इतिहास, काव्यें, यांचा शोधकबुद्धीनें व रसिकपणानें अभ्यास होऊं लागला. या प्रवृत्तीला 'नॉय् हुमानिस्मुस् (इं. = न्यू ह्यूमॅनिझम् ) म्हणतात. या दोन्ही (व एर्लँगेन ' स्थापना १७४३) संस्था संस्थानिकांच्या उत्तेजनानें व खर्चानें अस्तित्वांत आल्यामुळें, त्या जरी एंका दृष्टीनें परतंत्र झाल्या, तरी जुन्या युनिव्हर्सिट्यांस असलेले सर्व हक्क यांस होते.

## स्वातंत्र्य व पारतंत्र्य.

शिवाय विचारस्वातंत्र्याचा व शिक्षणस्वातंत्र्याचा सर्वांत महत्वाचा हक्क त्यांनीं नवा संपादन केला होता. त्यांचें पारतंत्र्य पैशापुरतें असे. **सर्व खर्च संस्थान** चालवी. तेव्हां निदान वरवरच्या देखरेखीचा व हरप्रसंगीं सल्लामसलतीचा हक्क संस्थानास असावा हें

अगदीं योग्य होतें. शिक्षकांस पगार भरपूर मिळूं लागल्यामुळें विरक्त पंडितांच्या स्थितींतून ते निघून व्यवहारांत मानमान्यतेनें वागूं लागले; व केवळ सामाजिक बाबतींतच नव्हे तर राजकीय बाबतींतही ते आपलीं मतें स्वतंत्रपणें प्रतिपादीत. दरबारींही त्यांचा मान चांगला राहून होफ्राट्, गेहाइम्राट् वगैरे पदव्या त्यांस मिळूं लागल्या. संस्थानांतील विशिष्ट तऱ्हेचे ते अधिकारी समजले जाऊन, देवस्थानें, सरकारी कचेऱ्या, शाळा वगैरेंत नोकरी करूं इच्छिणाऱ्यांची परीक्षा-' स्टाट्स् एक्झामेन् ' घेण्याचें काम त्यांचेकडे सोंपविलें गेलें.

## चतुरंग सुधारणा.

१८ व्या शतकाच्या शेवटीं सर्व जर्मन युनिव्हर्सिट्यांमध्यें अंतर्व्यवस्था, अभ्यासक्रम वगैरे बाबतींत हाल, गॉटिंगेन् यांच्या धर्तीवर क्रांति घडून आली. ही क्रांति प्रॉटेस्टंट संस्थांपुरतीच नसून कॅथॉलिक संस्थाही तींत सामील झाल्या. या क्रांतीचें ठळक स्वरूप मुख्यतः खालील चार मुद्यांनीं स्पष्ट दिसून येईलः ( १ ) सर्व शास्त्रांमध्यें नवें तत्त्वज्ञान व नवें शास्त्र यांचा शिक्षणाच्या कामीं पूर्ण पगडा बसला. हें विशेषतः चौथ्या म्हणजे फाकुल्टास् आर्टिउम्मध्यें घडून आलें व त्यामुळेंच तिला हल्लींचें महत्व व बाकीच्या तिन्हींशीं सारखेपणा येऊन, तिचें नांवही ' फिलोसोफिश फाकुल्टेट् ' अगर तत्त्वज्ञानाची शाखा असें बदललें गेलें. ( २ ) विचार, शास्त्रीय चिकित्सा व शिक्षण यांमध्यें शिक्षकांस पूर्ण स्वातंत्र्य असलें पाहिजे, हें तत्त्व सर्वस्वीं मान्य केलें जाऊन अमलांतही आलें. सर्व संस्थानांनीं व राजांनीं हें स्वातंत्र्य पूर्णपणें मान्य कलं. ( ३ ) शिक्षण-पद्धति समूळ नवी झाली. नेमलेल्या क्रमिक पुस्तकांचा अर्थ तेवढा सांगत बसण्याऐवजीं पद्धतशीर शास्त्रीय व्याख्यानें देण्यांत येऊं लागलीं. पूर्वीप्रमाणें पूर्वपक्ष—उत्तरपक्षासह वादविवाद करविणें मागें पडून त्याच्या जागीं सेमिनारची स्थापना झाली. विद्यार्थ्यास स्वतःसिद्धपणें शास्त्रीय-रीत्या काम करतां यावें, स्वतंत्र रीतीनें शोध करण्याची त्याचे अंगीं

पात्रता यावी, हा या सेमिनारद्वारें युनिव्हर्सिटीशिक्षणाचा मुख्य हेतु होऊन बसला. मातृभाषेच्या द्वारें शिक्षण देण्याचा उपक्रम झाला. (४) लॅटिन, ग्रीक भाषांमध्यें बोलण्यालिहिण्याचें पांडित्य यावें ही जी आजपर्यंतची निरुपयोगी हांव तिजवर पाणी पडलें. आणि पुराणकाळाचें मर्म समजावें व संस्कृति मिळावी या हेतूनें लॅटिन व ग्रीक ग्रंथांचा अभ्यास होऊं लागला.

## आकाडेमीज्.

आकाडेमी डर् विझेन्शाफ्टेन् नांवाच्या संस्था १७ व्या शतकाच्या शेवटीं व नंतरही अस्तित्वांत आल्याचें वर लिहिलेंच आहे. बहुधा प्रत्येक युनिव्हर्सिटीला अशी संस्था जोडलेली असून बरेचसे शिक्षक तिचे सभासद असतात. विद्वान् लोकांकडून शास्त्रीय शोध व्हावा, एवढाच या संस्थांचा हेतु असतो; शिकविणें हें त्यांचें कर्तव्य नव्हे. पण इंग्लंड, फ्रान्स या देशांत अशा आकाडेमींना जें महत्व आलें आहे तें जर्मनी देशांत नाहीं. याचें कारण खुद्द युनिव्हर्सिट्याच शिक्षण व शोध हीं दोन्हींही कर्तव्यें म्हणून करीत असतात. इतर देशांतील युनिव्हर्सिट्या फक्त शिक्षण देतात.

## बर्लिन् व नवें ध्येय.

जर्मन युनिव्हर्सिट्यांच्या इतिहासांत ‘ बर्लिन् ’ युनिव्हर्सिटीची सन १८१० त स्थापना हा एक नवा व महत्वाचा प्रसंग होय. या युनिव्हर्सिटीच्या स्थापनेचें सर्व श्रेय प्रसिद्ध मंत्री, तत्त्ववेत्ता व भाषाकोविद फॉन् हुंबोल्ट् या एकट्या थोर पुरुषासच आहे. नेपोलियनाशीं झगडण्याचा, प्रशियन राज्य बुडतें कीं रहातें अशा जीवितसंशयाचा व भयंकर विपत्तीचा तो काळ असूनही हुंबोल्ट्नें हें धाडस केलें, व त्यास धनिक लोकांनीं बिलकुल मागेंपुढें न पाहतां पैशाची भरपूर मदत करून ही अवाढव्य संस्था नांवारूपास आणली. या युनिव्हर्सिटीस प्रथमपासूनच

नांवाजलेलीं विद्वान् माणसें शिक्षक व सर्व तऱ्हेच्या साधनांची जोड मिळाली व त्या युनिव्हर्सिटीला धनिक लोकांनीं चांगलें द्रव्यसाहाय्य दिलें, ही गोष्ट जर्मन राष्ट्रास भूषणावह आहे. शारीरिक बळाची नेपोलियननें कितीही पायमल्ली केली, तरी मानसिक सामर्थ्य जर्मन लोकांत अशा काळींही कसें जागृत होतें याची ही गोष्ट उत्तम साक्ष पटविते. चांगलीं, उत्साही, स्वार्थत्यागी माणसें गांवोगांव फिरून हिंदु युनिव्हर्सिटी–फंडासाठीं वर्गणी जमवीत असतांही आजपावेतों पुरी रक्कम जेथें वसूल होत नाहीं, त्या हिंदुस्थानच्या लोकांनीं तर ही गोष्ट सतत कित्त्याप्रमाणें डोळ्यांसमोर बाळगण्यासारखी आहे. हाल, गॉटिंगेन् या युनिव्हर्सिट्यांनीं जीं नवीं तत्त्वें घालून दिलीं तीं तर बर्लिन् युनिव्हर्सिटीच्या मुळाशीं प्रामुख्यानें होतींच; पण त्या दोहींत व या युनिव्हर्सिटींत मुख्य फरक हा होता कीं, ‘ शिक्षणासाठीं युनिव्हर्सिटी ’ ही आतांपावेतोंची कल्पना बर्लिननें बाजूला ठेविली व ‘ युनिव्हर्सिटी ही स्वतंत्र शास्त्रीय शोधाचें कार्यालय आहे ’ हें नवें तत्त्व नवी युनिव्हर्सिटी उभारतांना आधारभूत धरिलें.

यामुळेंच कोणत्याही विषयांत शास्त्रीय शोधाच्या कामांत नांवाजलेलीं माणसें या संस्थेंत प्रथमपासून नेमलीं जात. फिश्टे, श्लायर्माखर् हे तत्त्ववेत्ते, तुलनात्मक व्युत्पत्तिशास्त्राचा जनक बॉप्, जर्मन भाषाकोविद बंधुद्वय ग्रिम्, निबूर्, रांक, मोम्सेन् हे प्रसिद्ध इतिहासज्ञ, यंत्रशास्त्रवेत्ता हेल्मोल्स् इत्यादि लोक बर्लिन् येथें शिक्षक होते एवढें सांगितलें असतां पुरें आहे. नांवाजलेलीं शोधक माणसें चोहोंकडून आपल्या येथें जमवावयाचा हा नियम बर्लिन् येथें अद्यापि अव्याहत चालू आहे. बार्लिनच्या नमुन्यावर ब्रेसूलाऊ ( १८११ ), बॉन् ( १८१८ ), म्युन्स्टर् ( १८१८ ), म्युनिच् ( १८१६ ) या युनिव्हर्सिट्या उभारल्या गेल्या. याच सुमारास कांहीं जुन्या बंद होऊन बाकीच्यांनीं बर्लिन्च्या धर्तीवर शक्य तितक्या सुधारणा केल्या.

## संख्या.

आजमितीला जर्मनींत २१ युनिव्हर्सिट्या आहेत. पैकीं नांवाजलेल्या कांहींचीं नांवें:—**बर्लिन्**-सर्व विषयांसाठीं-विशेषतः आधुनिक सृष्टशास्त्रांसाठीं प्रसिद्ध. **बॉन**—वनस्पतिशास्त्र. **गेटिंगेन्**—गणित व यंत्रशास्त्र. **म्यूनिच्**-विशेषतः वैद्यक. **लाइपझिक्**—भाषा, तत्त्वज्ञान व इतिहास. **ट्यूबिंगेन्**—कृषिकर्मविद्या ( ॲग्रिकल्चर ). **हायड्ल्बर्ग्**—स्थळ रमणीय म्हणून प्रसिद्ध व भाषा शिकण्यासाठीं हिंदी व इंग्लिश विद्यार्थी येथें बरेच असतात. बाकीच्यांत उत्तम शिक्षण, उत्तम उपकरणें वगैरे सर्व कांहीं इतरांप्रमाणेंच आहे; पण कोणत्याना कोणत्या कारणास्तव त्या इतक्या महशूर नाहींत, इतकेंच काय तें. याशिवाय फ्रांक्फुर्ट् येथें युनिव्हर्सिटी काढण्याचें ठरलें होतें व ती १९१४ सालीं स्थापन व्हायची, इतक्यांत महायुद्ध सुरू झालें. हंबूर्ग् येथेंही एक युनिव्हर्सिटी निघणार आहे. कलोनियल् इन्स्टिटट्यूट् नांवाची संस्था १९०७ पासून येथें अस्तित्वांत आहे. या संस्थेंत जर्मन वसाहतींत जाणाऱ्या जर्मन अधिकारी, व्यापारी व इतर सर्व लोकांस त्या त्या वसाहतींविषयीं भाषा, इतिहास, भूगोल, व्यापारी व राजनीतीचें शिक्षण दिलें जातें. दर सालीं २० जर्मन अधिकारी सरकाराकडून या इन्स्टिटट्यूट्मध्यें शिकण्यासाठीं पाठविले जातात. शिवाय एका धनिक व्यापाऱ्यानें ' लेक्चर हॉल ' बांधून विद्वान् माणसांकडून वर्षांतून कांहीं महिने लेक्चरें देण्याची तजवीज करविली आहे. या दोन्हीही संस्था युनिव्हर्सिटींत सामील होणार आहेत. नुकतीच ड्रेसडेन् येथें युनिव्हर्सिटी काढण्याची चळवळ निघाली होती, पण ती तूर्त जिरल्यासारखीच दिसते व पुढेंही त्यापासून कांहीं निष्पन्न होईलसें दिसत नाहीं. याप्रमाणें जर्मन युनिव्हर्सिट्यांचा थोडक्यांत इतिहास आहे. आतां त्यांची हल्लींची अंतर्व्यवस्था कशी आहे तें पाहूं.

# प्रकरण २ रें.

## युनिव्हर्सिट्यांची अंतर्व्यवस्था.

अठराव्या शतकापासून जर्मन युनिव्हर्सिट्या सरकारी संस्था बनल्या, या गोष्टीचा निर्देश वरील भागांत केलाच आहे. ज्याअर्थी सरकार युनिव्हर्सिट्यांचा **सर्व खर्च** चालवितें, व त्या स्थापण्याचेंही बऱ्याच अंशीं आपल्या अंगावर घेतें, त्याअर्थी त्यांवर देखरेख ठेवण्याचा हक्क सरकारनें आपलेकडे राखून ठेवावा हें अगदीं साहाजिक आहे. 'शाळा व युनिर्सिट्या या सरकारी संस्था असून त्यांचा उद्देश तरुण पिढीला उपयुक्त ज्ञान व शास्त्रीय शिक्षण देणें हा होय,' असें जर्मनींतील सर्वसाधारण कायदेकानूमध्यें स्पष्टपणें नमूद करून ठेविलें आहे.

## युनिव्हर्सिटी व सरकार यांचे संबंध.

वरिष्ठ शिक्षणाच्या देखरेखीचा अधिकार सुद्धां शिक्षणखात्याच्या मंत्र्याकडेच ( कुल्टुस् उण्ड् उन्टर्रिश्ट्स् मिनिस्टेरिउम् ) सोंपाविलेला असून, तो बजावण्याच्या सोईसाठीं त्याच्या हाताखालीं कुराटोर् ( इं. क्युरेटर् ) अथवा कान्सलर् ( इं. चान्सेलर् ) नांवाचा अधिकारी दर युनिव्हर्सिटीच्या ठिकाणीं असतो. सरकारचा प्रतिनिधि या नात्यानें युनिव्हर्सिटीच्या सेनेटच्या सभांस तो हजर असतो, सरकारच्या हितसंबंधाचें रक्षण व्हावें म्हणून काळजी घेत असतो. परंतु सरकार व युनिव्हर्सिटी यांचे हितसंबंध एकच असल्यामुळें लढा पडण्याची वेळ बहुधा येत नाहीं. इतकेंच नव्हे, तर युनिव्हर्सिट्यांची अंतर्व्यवस्था व शिक्षणाचे बाबतींत त्यांस असलेलें पूर्ण स्वातंत्र्य या बाबतींत जर्मनसरकार बिलकुल हात घालीत नाहीं, ही आमच्या इकडल्या सरकारनें व लोकांनीं लक्ष्यांत ठेवण्याजोगी गोष्ट आहे. कदाचित् या गोष्टीकडे दुर्लक्ष्य झाल्यामुळेंच सुमारें तीन वर्षांखालीं मुंबई युनिव्हर्सिटीच्या कॉन्व्होकेशनचे वेळीं

कर्झनसाहेबांच्या सुधारणांनीं (?) जखडलेल्या आमच्या युनिव्हर्सिट्या व वस्तुतः स्वतंत्र जर्मन युनिव्हर्सिट्या यांमध्यें त्या वेळच्या चॅन्सेलर साहेबांनीं तुलना करण्याचें धाष्टर्य केलें ! या देशांतील युनिव्हर्सिट्यांची जर्मन युनिव्हर्सिट्यांशीं तुलना करतांना दुसऱ्या ज्या गोष्टीचें विस्मरण होतें ती ही कीं, जर्मनींत युनिव्हर्सिटीचा (म्हणजेच वरिष्ठ प्रतीच्या शिक्षण-संस्थांचा—जर्मन युनिव्हर्सिट्या शिक्षण देणाऱ्या संस्था आहेत, केवळ परीक्षा घेणाऱ्या नाहींत हें केव्हांही विसरून चालायचें नाहीं.) **सर्व कच्चा खर्च सरकारकडून भागविला जातो.** उदाहरणार्थ, बर्लिन् युनिव्हर्सिटीसाठीं सरकारला दरसाल ४५ लक्ष मार्क खर्च करावा लागतो. लाइप्झिक् युनिव्हर्सिटीचा सालीना ३० लक्ष खर्च सरकारच भागवितें. असें असूनही या युनिव्हर्सिट्यांच्या अंतर्व्यवस्थेंत सरकार उगाच ढवळाढवळ करीत नाहीं. इतकेंच नव्हे तर ज्यांचा पगार सरकारी तिजोरींतून खर्ची पडतो अशा प्रोफेसरीच्या जागाही सेनेटच्या पसंतीनेंच भरल्या जातात.

## अंतर्व्यवस्था.

युनिव्हर्सिटीच्या अंतर्व्यवस्थेसाठीं सेनाट् (इं. सेनेट) नांवाची मुख्य सभा असते. सेनेटच्या सभासदांची संख्या बहुतकरून १८ च्यावर असत नाहीं. सर्व ऑर्डिनरी प्रोफेसरांनीं आपणांपैकीं निवडून दिलेले सभासद, चारी (कांहीं ठिकाणीं ५) फॅकल्टीचे डेकान् (इं. डीन्), एक युनिव्हर्सिटी रिश्टर् (इं. रेजिस्ट्रार), एक प्रोरेक्टर् व एक रेक्टर् (इं. चॅन्सेलर्) यांचा समावेश सेनेटमध्यें होतो; व या सभेचा रेक्टर् हा अध्यक्ष असतो. सेनेट ही बहुधा वर्षाआड व डेकान् प्रोरेक्टर् व रेक्टर् हे दरवर्षीं निवडण्यांत येतात. दर वर्षीं निराळ्या फॅकल्टींतून रेक्टर् निवडला जातो. तथापि फिलॉसफीची फॅकल्टी फार मोठी असल्यामुळें तींतून वर्षाआड रेक्टर् निवडतात. युनिव्हर्सिटींत नवे विद्यार्थी रिश्ट्रर्च्या संमतीनें घेणें (यास 'इम्माट्रिकुलात्इयोन' म्हणतात), त्यांच्यामध्यें शिस्त राखून

गैरवर्तनास शासन करणें, कायदकानू अगर इतर कारभारासाठीं सेनेटच्या बैठकीचे वेळीं अध्यक्षाचें काम करणें, हीं मुख्यतः रेक्टर्चीं कामें होत. प्रोरेक्टर् हा रेक्टर्ला मदत करण्यासाठीं व त्याच्या गैरहजिरींत काम पाहण्यासाठीं नेमलेला असतो. युनिव्हर्सिटी–रिश्टूरचें काम आपलेकडील रेजिस्ट्रारसारखेंच साधारणपणें असतें. डेकान् हे आपापल्या फॅकल्टीचे अध्यक्ष होत. दर सेमेस्टर् ( इं. टर्म ) मध्यें व्याख्यानांचा क्रम व वेळ ठरविणें, प्रिव्हाट्डोत्सेंट् नेमणें ( युनिव्हर्सिटीच्या ज्या पदवीधरांस व्याख्यानें देण्याचा बिनपगारी अधिकार दिला जातो त्यांचें नांव), विद्यार्थ्यांस शिष्यवृत्ति वगैरे देणें, विशेषतः प्रोफेसराची जागा रिकामी झाली असतां सरकारास लायक माणसाच्या नेमणुकीसाठीं नांवें सुचविणें, सरकारी ( डिपार्टमेंटल् ) व युनिव्हर्सिटीच्या परीक्षांसाठीं ‘ प्रयूफुंग्ज् कमिश्योन् ’ ( इं. बोर्ड् ऑफ एक्झामिनर्स् ) नेमणें, पदव्या देणें वगैरे मुख्य कामें त्या त्या फॅकल्टीकडे असतात. फॅकल्टीचा अध्यक्ष जो डेकान् त्यास मदत म्हणून परीक्षा वगैरे संबंधीं काम पाहणारा ‘ प्रोकान्सेलार ’ नांवाचा फॅकल्टीनें निवडलेला अधिकारी असतो. याप्रमाणें सेनेट व फॅकल्टी मिळून युनिव्हर्सिटीची सर्व अंतर्व्यवस्था पाहतात.

## अधिकार.

जर्मनींतील त्या त्या संस्थानांतील कायदेकौन्सिलांत सेनेटचा एक प्रतिनिधि असतो. आपल्या घटकावयवासंबंधीं न्यायनिवाडा करण्याचा अधिकार जर्मनींत सेनेटला फार प्राचीनकाळापासून आहे, हें पूर्वीं सांगितलेंच आहे. तो अधिकार आजही साधारण त्याच स्वरूपांत कायम आहे. कोणत्याही तऱ्हेच गैरवर्तन, शिस्तीचा भंग, कर्ज करणें वगैरे अपराधाबद्दल विद्यार्थ्यांस युनिव्हर्सिटींतून घालवून देण्याचा, रु. २० पर्यंत दंड अगर दोन आठवडेपर्यंत कैदेची शिक्षा देण्याचा सेनेटला अधिकार आहे. एतदर्थ हायड्ल्बर्ग्, लाइप्झिक् इत्यादि ठिकाणचे तुरुंग आहेत, ते पाहून परस्थांस कौतुक वाटल्यावांचून राहत नाहीं.

बहुतेक युनिव्हर्सिट्यांत अगदीं पुरातनकाळप्रमाणें सध्यांही चार फॅकल्टीज् असतात; त्या (१) धर्म, (२) कायदा, (३) वैद्यक, (४) फिलॉसफी या होत. शेवटच्या तत्त्वज्ञानाच्या शाखेंत भाषा, इतिहास, तत्त्वज्ञान, गणित, यंत्र–रसायन–प्राणि–वनस्पति इत्यादि आधुनिक शास्त्रें या सर्वांचा अंतर्भाव होतो. शास्त्रादि विषयांस जसजसें जास्त महत्व येऊं लागलें तसतसा युनिव्हर्सिटी शिक्षणांत त्यांचा अंतर्भाव करावा लागला व त्यांसाठीं नवी फॅकल्टी न बनवितां 'तत्त्वज्ञानाच्या' शाखेंत त्यांचा समावेश करण्याची वहिवाट पडली. स्टाट्स्विझेनशाफ्ट् (राजनीतिशास्त्र) हा विषयही नवा आहे. त्याचा समावेश कायद्याच्या फॅकल्टींत होण्यासारखा आहे व तो तसा बहुतेक ठिकाणीं झालाही आहे. परंतु त्यासाठीं निराळया फॅकल्टीज् असलेल्या म्यूनिच् व ट्यूबिंगेन् या दोन युनिव्हर्सिट्या आहेतच. कांहीं ठिकाणीं भाषा, इतिहास, तत्त्वज्ञानादि–ज्यांस बौद्धिक शास्त्रें म्हणतात त्यांची 'फिलोसोफिश फाकुल्टेट्' असून, गणित–यंत्र–रसायन–प्राणि–वनस्पति आदि ज्यांस सृष्टिशास्त्रें म्हणतात त्यांसाठीं वेगळी 'नाटूर्विझेन्शाफ्ट्लिश फाकुल्टेट्' असते. फ्रायबुर्ग्, हायडूल्बर्ग्, स्ट्रास्बुर्ग्, ट्यूबिंगेन् या ठिकाणीं प्रॉटेस्टंट धर्मशाखा व कॅथॉलिक धर्मशाखा अशा दोन निराळया फॅकल्टीज् केलेल्या आहेत. म्यून्स्टर् येथील छोट्या युनिव्हर्सिटींत वैद्यकशाखा नाहीं; म्हणजे तेथें तीनच फॅकल्टीज् आहेत. नव्या निघूं पाहणाऱ्या फ्रांकफुर्ट् व हाम्बुर्ग् युनिव्हर्सिट्यांतही धर्मविरहित बाकीच्या तीनच शाखा असावयाच्या आहेत.

या शाखांतून सर्व विषयांचें शिक्षण विद्यार्थ्यांस देण्यांत येतें. शेतकीचें शिक्षण सुद्धां लाइप्झिक्सारख्या युनिव्हर्सिट्यांतूनच देण्यांत येतें. तथापि बऱ्याच ठिकाणीं या विषयासाठीं निराळीं 'होख्शूलेन्' (कॉलेजें) अगर आकाडेमीज् आहेत.

## शिक्षणस्वातंत्र्य.

ज्याप्रमाणें शिकवण्यासंबंधानें प्रोफेसरांस कोणताही निर्बंध नाहीं, अमुकच विषय व अमुक पुस्तकें शिकविलीं पाहिजेत असा नियम

नाहीं, ज्यानें त्यानें आपापला विषय आपणांस वाटेल त्या तऱ्हेनें व वाटेल तितका शिकवावा, त्याचप्रमाणें विद्यार्थ्यांसही शिकण्याचे कामीं पूर्ण स्वातंत्र्य असतें. विद्यार्थ्यानें आपल्या खुषीनें वाटतील ते तीन विषय निवडून त्यांवरील लेक्चरें ऐकावीं. तीं सुद्धां सर्व टर्मभर ऐकलींच पाहिजेत, नाहीं तर टर्म जाते अशांतलाही प्रकार नाहीं. लेक्चररच्या कागदावर विद्यार्थ्याचें नांव असून, त्यानें लेक्चरांची योग्य फी भरलेली असली म्हणजे झालें; तेवढेंच युनिव्हर्सिटीला पुरें होतें! तिचा या बाबतींत जास्त ताबा विद्यार्थ्यांवर असत नाहीं. शिक्षक व विद्यार्थी यांच्या या उभयपक्षी स्वातंत्र्याला '**आकाडेमिश फ्रायूहाइट्**' म्हणतात; व त्याबद्दल जर्मन विद्यार्थ्यांस फार अभिमान वाटतो. अशा कोणत्याही निर्बंधाच्या अभावामुळें रीतसर पदवी घेण्याला जेथें सहा सेमेस्टर अगर टर्म्स् लागावयाच्या, तेथें सामान्य विद्यार्थ्याला डॉक्टर् ही पदवी घेण्याला बहुधा दहा अकरापर्यंत सेमेस्टर् लागतात. गिमूनासिउम् आदि शाळांतून नऊ वर्षें कडक शिस्तीच्या व लॅटिन-ग्रीकच्या त्रासांत काढून युनिव्हर्सिटीचें खुलें वारें लागलें, म्हणजे अर्थातच विद्यार्थ्यास आपण मोकळे झालों असें वाटतें; व पहिले २।३ सेमेस्टर तो तारुण्यांतील सुखाचा आस्वाद घेण्यांत घालवितो. या वयांत शिक्षणावर कोणच्याही तऱ्हेचा निर्बंध नसल्यानें त्याची हेळसांड होत असेल,—नव्हे, जर्मनींतील वरिष्ठ प्रतीचें शिक्षण म्हणजे विद्यार्थ्यांच्या उनाडकीचे दिवस—असें वाटण्याचा संभव आहे. परंतु जर्मनींतील वरिष्ठ शिक्षणाची रचनाच अशी आहे कीं, पदवी घेऊं इच्छिणारानें स्वतः चांगले परिश्रम घेतल्यावांचून भागत नाहीं.

## शिक्षणक्रम.

युनिव्हर्सिटीमध्यें शिक्षण दोन तऱ्हेनें देण्यांत येतें. (१) प्रोफेसरांचीं शास्त्रीय पद्धतीचीं व्याख्यानें पहिल्या दोन तीन सेमेस्टरांत नाहीं तरी, पुढें तरी विद्यार्थ्यांस ऐकावींच लागतात. पण त्यांत नुस्ती पुस्तकी

माहिती नसून, विषय कसा शिकावा वगैरे तात्त्विक शास्त्रीय सूचनांचाच समावेश अधिक असतो. टोपलीभर माहिती देणे हें लेक्चरच्या गुणाचें माप नसून, विषयाची शास्त्रीय दिशा दाखविणें व उपयुक्त सूचना देऊन विद्यार्थ्यांस स्वतःसिद्धपणें विषय आकलन करण्यासाठीं योग्य मार्ग दाखवून उत्तेजन देणें हा व्याख्यानांचा मुख्य हेतु असतो. पदवीला कोणते तरी आवडीचे पण एकमेकाशीं जुळणारे तीनच विषय घ्यायचे असतात; त्यांवर प्रत्येकीं चार अगर पांच लेक्चरें सामान्य विद्यार्थी आठवड्यांतून ऐकतो. (२) व्याख्यानांत मिळालेल्या तात्त्विक सूचनांच्या धोरणानें विद्यार्थ्यांस स्वतःसिद्धपणें काम करतां यावें एवढ्यासाठीं प्रत्येक विषयाचीं इन्स्टिट्यूट्स् असतात. त्यांत त्या त्या विषयाला लागणारीं संपूर्ण पुस्तकें व इतर साधनें असून प्रत्येक विद्यार्थ्यास शांतपणें अभ्यास करण्यास जागा असते. या इन्स्टिट्यूटमध्यें आठवड्यांतून दोन तास त्या त्या विषयावर युबुंग् अगर सेमिनार विषयाच्या प्रोफेसराच्या नेतृत्वासाठीं भरत असते. विषयाच्या महत्त्वाच्या व प्रोफेसरच्या प्रसिद्धीच्या मानानें या सेमिनार्—यूबुंग्—प्रवचनांमध्यें विद्यार्थ्यांची संख्या असते. उदाहरणार्थ, प्रसिद्ध तत्त्ववेत्ता ‘ वुंट ’ याचीं लाइप्झिक् येथील प्रवचनें म्हणजे ७५।१०० विद्यार्थ्यांची लेक्चर रूमच आहे असा भास होतो. परंतु जितके विद्यार्थी कमी तितका प्रत्येक विद्यार्थ्याकडे लक्ष देण्यास प्रोफेसरास अधिक वेळ मिळतो, व अर्थात काम चांगलें होतें. या सेमिनारमध्यें पाळीपाळीनें प्रत्येक विद्यार्थी आपल्या विषयांतील एखाद्या भागापैकीं प्रोफेसरानें नेमिलेल्या भागावर सांगोपाग माहिती गोळा करून निबंध लिहितो, व तो यूबुंग्च्या दिवशीं आपला प्रोफेसर व आठदहा अगर जास्त जोडीचे विद्यार्थी यांजसमोर वाचून दाखवितो. त्यावर मग उभयपक्षीं टीका होते. शेवटीं चुका दाखवून देऊन, कशा तऱ्हेनें सुधारणा करतां येईल हें सुचवून प्रोफेसर समारोप करितो. यंत्रादि आधुनिक शास्त्रांसाठीं भरपूर साधनांच्या प्रयोगशाला असतात. तेथें प्रत्यहीं डेमॉन्स्ट्रेटरच्या देखरेखीखालीं विद्यार्थ्यांस शास्त्रीय प्रयोग करावे लागतात.

## परीक्षा.

परीक्षेसाठीं विद्यार्थ्यांस आपल्या आवडीचे तीन विषय निवडतां येतात. यांपैकीं एक तत्त्वज्ञान (इं. फिलॉसफी) असलें पाहिजे असा बर्लिन युनिव्हर्सिटीचा निर्बंध आहे. या तिहींपैकीं एक विषय मुख्य म्हणून घ्यावा लागतो, व त्यांतील एखाद्या चांगल्या व नव्या मुद्यावर पद्धतशीर व फार परिश्रमाचा निबंध लिहून युनिव्हर्सिटीकडे परीक्षणासाठीं सादर करावा लागतो. दोन प्रोफेसरांनीं तो तपासून, त्यांतील परिश्रम, गोळा केलेली माहिती परिपूर्ण व बिनचूक, विचारसरणी न्याययुक्त व एकंदर काम पद्धतशीर चिकित्साबुद्धीनें केलेलें आहे व म्हणून हा निबंध युनिव्हर्सिटीनें स्वीकारण्यास योग्य आहे, असें त्या दोघांनीं एकमतानें कळवावें लागतें. नंतर तिन्ही विषयांत तोंडी परीक्षेसाठीं आव्हान होतें. ही प्रत्येक विषयांत एक एक तास होते. मुख्य विषय विद्यार्थ्यांस परिपूर्ण कळला आहे व बाकीचे दोन उपविषय त्याला बरे अवगत आहेत असें ठरलें म्हणजे तो विद्यार्थी उत्तीर्ण झाला असें समजायचें. यानंतर डॉक्टर ऑफ फिलॉसफी, अगर थिऑसफी अगर मेडिसिन् अथवा ज्यूरिस्प्रूडन्स् अशी मुख्य विषयाच्या अनुरोधानें पदवी मिळते. सर्व परीक्षांत विद्यार्थ्यानें **शास्त्रीय पद्धतीनें स्वतःसिद्धपणें लिहिलेला निबंध** हाच मुख्य गणला जातो; तोंडी परीक्षा त्यामानानें गौण मानल्या जातात.

## सेमिनारचें महत्त्व.

विद्यार्थ्यांचा सर्व महत्त्वाचा अभ्यास होण्यास व शास्त्रीय रीतीनें स्वतः स्वतंत्रपणें काम करण्याचा हव्यास वाढण्यास, युनिव्हर्सिटींतील लेक्चरपेक्षां सेमिनार् याच जास्त महत्त्वाच्या असतात. कारण तेथें विद्यार्थ्यांस ऐतिहासिक व चिकित्सक पद्धतीचें व्यावहारिक शिक्षण मिळतें. 'कित्येक नवे शोध, कित्येक नवे विचार जर्मन युनिव्हर्सिट्यांतील सेमिनारमध्यें जन्म पावले आहेत' या एका जर्मन प्रोफेसराच्या उक्तींत अतिश-

योक्तीचा भाग मुळींच नाहीं. यासाठींच या सेमिनारमधील यूबुंग अगर प्रवचनांवर युनिव्हर्सिट्यांची फार भिस्त असते. सध्यां विद्यार्थ्यांच्या दिवसेंदिवस वाढत जाणाऱ्या संख्येमुळें ( १९१३ सालीं बर्लिन युनिव्हर्सिटीच्या पटावर बाराहजारांवर नांवें होतीं ! ) हें सेमिनारचें काम प्रोफेसरांच्या आटोक्याबाहेर वाढत आहे. त्याला आळा घालण्यासाठीं इन्स्टिट्यूटसूची संख्या वाढवून, प्रोफेसरांच्या मदतीस लेक्चरर्स, आसिस्टंट्स वगैरे देण्याची व्यवस्था हळूंहळूं होत आहे. उदाहरणार्थ, लाइप्झिक् युनिव्हर्सिटींत तत्त्वज्ञानाच्या शाखेंत ( फिलोसोफिश फाकुल्टेट् ) इतिहास व भाषा या विषयांच्या इन्स्टिट्यूट्मध्यें हल्लींच कितीतरी ' आसिस्टेंट् ' व ' लेक्टोर ' असून आणखी जास्त घेण्यांत येत आहेत.

## फी वगैरे.

युनिव्हर्सिटीची प्रवेश फी २१ मार्क असते. नऊ वर्षें दुय्यम शाळांत काढून तेथील परीक्षा उतरल्याचा दाखला असला कीं प्रवेश मिळतो. परदेशीयांस आपलें पूर्व शिक्षणही त्याच तोडीचें आहे असें सिद्ध करावें लागतें. इकडील इंटर पास झालेल्यास तिकडे ' माट्रिकेल् ' अगर युनिव्हर्सिटी प्रवेशाचा दाखला मिळेलसें वाटतें. प्रवेश झाल्यावर, आठवड्यांत एका विषयावरील लेक्चराचे जितके तास असतील त्याच्या चौपट अगर पांचपट फी सेमेस्टरला द्यावी लागते; उ०—चार चार तासाचीं चार विषयांवर लेक्चरें ऐकलीं तर सेमेस्टरची फी ६४ मार्क होते. परीक्षेची फी २४० पा. ३५० मार्क असते. शिवाय पसंत झालेल्या निबंधाच्या २०० छापील प्रती युनिव्हर्सिटीस सादर कराव्या लागतात. त्या केल्या म्हणजे डॉक्टर ऑफ फिलॉसफी अथवा थिऑसफी किंवा ज्यूरिसप्रूडन्स् अगर मेडिसिन् अशा पदवीचा छापील डिप्लोमा मिळतो; त्या प्रसंगीं रेक्टरशीं शेवटचें हस्तांदोलन होतें. परीक्षेचा निश्चित असा कोणताच काळ नाहीं. आपली तयारी झाली म्हणजे ' प्रोकान्तसेलार् ' ला कळवून निबंध सादर करावा म्हणजे झालें.

बहुतकरून महिन्याच्या आंत तोंडी परीक्षांस आव्हान होतें. त्या संपल्या-बरोबर त्यांत उत्तीर्ण झाल्या न झाल्याचें प्रोकान्त्सेलार तेव्हांच सांगतो.

वरील दोन तीन प्रकारच्या फीशिवाय आणखी कांहीं किरकोळ फी द्यावी लागते. आपापल्या विषयाच्या इन्स्टिट्यूट्ची सालीना ३ मार्क, युनिव्हर्सिटी लायब्ररीची अर्धा मार्क, क्रांकेन्कास ( आजारीपणांत औषधें व शुश्रूषा यांबद्दल ) सालीना २ मार्क अशी सर्व मिळूनही ६ मार्कच्या-वर जात नाहीं. दोन वर्षांनंतर पुनः त्याच युनिव्हर्सिटींत रहावयाचें असल्यास पुनः प्रवेश व मात्रिकेल् वगैरे मिळवायची असते, मात्र त्या-बद्दल नवी प्रवेश फी दहा मार्कच पडते. दुसऱ्या युनिव्हर्सिटींत गेल्यास भरपूर फी पडते. वाटेल त्या सेमेस्टरला एका युनिव्हर्सिटींतून दुसरींत जाण्याची मुभा आहे; व तिचा फायदा बहुतेक जर्मन विद्यार्थी घेतात. दोन तीन युनिव्हर्सिट्यांचें तरी पाणी प्यालेला नाहीं असा जर्मन विद्यार्थी विरळा !

---

# प्रकरण ३ रें.

## जर्मन विद्यार्थी.

हा विषय जितका मनोरंजक तितकाच अवघडही आहे. याचें कारण, याचे इतके प्रकार आहेत कीं, एकाचें वर्णन करणें एकदेशीय व सर्व तऱ्हांचें चित्र रेखाटूं पाहणें अशक्य आहे. जर्मन विद्यार्थी आपल्या वयाच्या १९ व्या वर्षानंतर युनिव्हर्सिटीचें शिक्षण घेण्यास आरंभ करतो. अभ्यास काय करावयाचा, विषय कोणते घ्यावयाचे, कोणकोणत्या प्रोफेसरांचीं लेक्चरें ऐकावयाचीं वगैरे बाबतींत त्यास परिपूर्ण स्वातंत्र्य आहे हें पूर्वी सांगितलेंच आहे. या स्वातंत्र्याचा साधारणपणें दुरुपयोग होत नाहीं असेंच म्हटलें पाहिजे. आतां युनिव्हर्सिटी प्रवेशानंतरचे

पहिले २।३ सेमेस्टर (इं. टर्म्) उनाडकींत घालविले जातात, हा दोष खरें पाहिलें असतां आधींच्या ९ वर्षांच्या शिक्षणाकडे आहे; या काळांत जुन्या भाषांच्या फाजील अभ्यासांत विद्यार्थ्यांचा इतका वेळ जातो व एवढें रक्त आटलें जातें कीं, त्यांतून सुटतांच पिंजऱ्यांतून सुटलेल्या पांखराप्रमाणें आपल्या स्वतंत्रतेचा पूर्ण उपभोग घेण्याची इच्छा त्यांस साहाजिकच उत्पन्न होते. नऊ वर्षांच्या कडक शिस्तींतून निभावल्यावर आतां आपण गेबिल्डेटर् (इं. जंटूलमन्) झालों या भावनेनें प्रेरित होऊन ते उपाहारगृहें, नाटकगृहें, तरुण मुलींबरोबर रानावनांतून उनाडणें इत्यादि सुखांत गर्क होऊन जातात. ही गोष्ट बाजूला ठेविली तर जर्मन विद्यार्थी साधारणपणें मेहेनती, शीलवान्, मनमिळाऊ असा असतो. अपवाद हे कोठें झालें तरी असायचेच. उच्छृंखलपणा तर राहोच, पण सामान्यतः खेळाडू म्हणून नांवाजलेल्या इंग्रजी विद्यार्थ्यांच्या चेहेऱ्यावर असलेली हुषारी, चापल्य व ताठेबाजपणा हीं जर्मन विद्यार्थ्यांत दिसून येत नाहींत. लेक्चरें संपलीं, इन्स्टिटूट्मधील काम आटपलें म्हणजे खेळापेक्षां एखाद्या कुजट हवेच्या कॉफीगृहांत बीयर्चा ग्लास् पुढें घेऊन तासाचे तास गुंगल्यासारखें बसणें त्यांस आवडतें. खेळांपैकीं टेनिस्, क्रिकेट्, फुटबॉलसारख्या हवेंतील मर्दानी खेळांपेक्षां तालमींतील हौद्यांत जोरजोडच्या, डंबेल्स्, बार्, ट्रॅपीझ् इत्यादि जवानी खेळच त्यांस आवडतात. तरी अलीकडे युनिव्हर्सिटीचे स्पोर्टक्लब्, रूडर् फराईन् ( इं. बोटिंगक्लब् ) वगैरे क्लब् बरेच निघाले असल्यामुळें उघड्या हवेंतील खेळांची जर्मन विद्यार्थ्यांत हळूहळू आवड उत्पन्न होत चालली आहे. विशेषतः बोटिंग्ची आवड त्यांस फार आहे. याशिवाय फूटबॉल लोकप्रिय अथवा विद्यार्थिप्रिय होत आहे. गोल्फ, हॉकी ( हिंवाळ्यांत आईस्-हॉकी ) वगैरे खेळ सुद्धां विद्यार्थ्यांस आवडूं लागले आहेत. ‘ईस्तर’ सारख्या मोठ्या सुट्या जर्मन विद्यार्थी अलीकडे प्रवासांत-लहानमोठ्या सहली करण्यांत-घालवूं लागले आहेत. तरी वाटेंत कोठें ‘बीयर्-गृह’ लागलें कीं सहल पुष्कळ वेळां तेथेंच संपते !

## विद्यार्थी व शिक्षक.

बहुतेक युनिव्हर्सिट्यांत कांहीं प्रोफेसर आपल्या सेमिनार्मधील विद्यार्थ्यांस बरोबर घेऊन कांहींतरी ऐतिहासिक अगर इतर महत्त्वाचीं स्थळें पाहण्यास ईस्टरसारख्या सुटींत जातात. या वेळीं विद्यार्थी व प्रोफेसर एकमेकांशीं फार खुल्या दिलानें वागतात; एकमेकांची थट्टामस्करी करतात. साधारणपणें जर्मन विद्यार्थ्यांचें आपल्या प्रोफेसराशीं अदबीचें वर्तन असतें. गुरु म्हणजे बृहस्पति व तो काय सांगेल तें ब्रह्मवाक्य, अशी बुद्धीच्या नेभळेपणाची निदर्शक समजूत मात्र त्यांची नसते. उलट विद्यार्थी म्हणजे निवळ पोरें म्हणून प्रोफेसरही त्यांस तुच्छ लेखीत नाहींत. विद्यार्थ्यांना प्रोफेसरांचा अवास्तव बाऊ वाटत नाहीं, अगर शिक्षकही विद्यार्थ्यांशीं ताठपणें वागत नाहींत.

## कोअर्स् अथवा फरबिंडुंगेन्.

अर्थात् कोअर्, बुर्शेनशाफ्ट् इत्यादि नांवांच्या विद्यार्थिमंडळांत नसलेल्या जर्मन विद्यार्थ्यांसच वरील वर्णन लागू पडतें, व हल्लीं अशांचीच संख्या दिवसेंदिवस जास्त होत आहे. आजमितीला दर युनिव्हर्सिटींत 'कोअर्, बुर्शेनशाफ्ट्, लान्ड्स्मानशाफ्ट्' नांवाचीं अनेक विद्यार्थिमंडळें अस्तित्वांत आहेत. मध्ययुगांत जरी 'लान्ड्स्मानशाफ्ट्' (एका देशाच्या अगर प्रांताच्या विद्यार्थ्यांचीं मंडळें) अस्तित्वांत होत्या, तरी असलीं मंडळें विशेषतः १९ व्या शतकाच्या आरंभीं अस्तित्वांत आलीं. हीं मंडळें स्थापन करणारांचा हेतु उदात्त होता. उदाहरणार्थ, सुशिक्षण व धर्म यांचा देशांत प्रसार करणें हें बुर्शेनशाफ्ट्चें ध्येय होतें. १८७० च्या सुमारास देशाभिमान पसरविण्यासाठीं म्हणून कांहीं मंडळें निघालीं. तें कसेंही असलें तरी वीस वर्षांखालीं व आजमितीसही यांची स्थिति मात्र निराळीच होती व आहे. प्रत्येक मंडळास पट्टा, टोपी, निशाण हीं निरनिराळीं व वेगवेगळ्या रंगाचीं असतात. पुष्कळशी बीयर् एका दमांत

पितां येणें व द्वंद्वयुद्ध करण्यांत तयार असणें हीं ' फरबिंडुंग् ' (मंडळ)-च्या सभासदाचे आंगीं मुख्य लक्षणें असावीं लागतात. अशा मंडळांतील सभासदांचा दिवस सामान्यतः खालीलप्रमाणें जातोः—सकाळीं ९।१० वाजल्यावर उठणें, फराळ झाल्यावर पट्टयाचे हात वगैरे खेळणें (इं. फेन्सिंग्), नंतर गांवांतल्या मुख्य रस्त्यांतून एकदां फेरफटका करून येणें, एखाद्या विशिष्ट पिठ्यांत बीयर् पीत बसणें; दुपारीं पुनः दांडपट्टा, कोठें द्वंद्वयुद्धाचें आव्हान झाल्यास तें खेळणें व रात्रीं लावणी-वजा विद्यार्थ्यांचीं गाणीं गात बीयर् पीत बसणें, इत्यादि. या मंडळांतील विद्यार्थ्यांस आपल्या बीयर् पिण्याच्या सामर्थ्याबद्दल धन्यता वाटते व द्वंद्वयुद्धामध्यें चेहऱ्यावर झालेल्या जखमांचें (अशा वेळीं इतर अंग संरक्षित असतें) त्यांस भूषण वाटतें. या मंडळांत श्रीमुखावर व डोक्यावर पट्टयाचे वार लागून विद्रूप न झालेला विद्यार्थी सांपडणें विरळा! जर्मन मुलीही अशा विद्यार्थ्यांस सहज भाळतात. वेळोवेळीं पुष्कळ मंडळें एकत्र जमून त्यांचें कोमेर्स्—बीयर् पिण्याचा अड्डा—भरत असतें. अशा वेळीं प्रोफेसर व इतर मित्रमंडळी यांसही निमंत्रणें येतात. त्या वेळचें मुख्य काम म्हणजे गाणीं गात, बीयर् पीत आनंद करणें हें होय. हें कोमेर्स् संध्याकाळीं भरून पहांटे मोडतें! दोन परस्परविरोधी अगर परस्पराशीं मित्रत्वानें असलेल्याही मंडळांमध्यें द्वंद्वयुद्ध होतें, त्यास ' मेन्सूअर् ' म्हणतात. बहुतकरून हें ' फुक्स् '—नवाच झालेला सभासद—यास खेळावें लागतें; व आपण शूर आहोंत असें दाखवून आपल्या मंडळाचा व आपला लौकिक त्यास स्थापित करावयाचा असतो. दोन्ही बाजूंकडील वीर जखमी होऊन रक्तबंबाळ होईतों पट्याचे हात चालूच असतात! जखमा बांधावयाला जवळ डॉक्टर असतोच. ' कोमेर्स् व मेन्सूअर् 'चें वर्णन एखाद्या मंडळांतील विद्यार्थ्याच्या तोंडून ऐकावें! ऐकणारास शाहारे येतात, पण सांगणारा बढाईनें वर्णनाच्या भरांत येत

असतो ! युनिव्हर्सिटींत दर वर्षी नवा रेक्टर् कामाचा जाहीर चार्ज् घेतो त्या, अगर इतर समारंभाचे वेळीं जेव्हां सर्व मंडळांतील प्रमुख वीर आपलीं निशाणें घेऊन व रंगीबेरंगी पोषाक करून युनिव्हर्सिटीचे दिवाण-खान्यांत जमतात, तेव्हां या मृतप्राय झालेल्या मध्ययुगी भपक्याचें प्रदर्शन पाहून आश्चर्य वाटतें व बहुतेक गोष्टींत जगाच्या आघाडीस जाऊं पाहणाऱ्या या राष्ट्रांत हें मध्ययुगी खूळ अझून जिवंत असावें याबद्दल हंसूं आल्यावांचून रहात नाहीं.

## सुधारणा.

परंतु जर्मनींतील लोकांसही हें खूळ नाहींसें व्हावें असें दिवसेंदिवस वाटूं लागलें आहे यांत शंका नाहीं. यासाठीं आज कित्येक वर्षें गाणारांचीं मंडळें, मल्लांचीं मंडळें, वक्तृत्वादि इतर विषयांचा व्यासंग करणारीं अगर अभ्यासी मंडळें स्थापन झालीं आहेत. विशेषतः १२ वर्षांपूर्वी वरील ‘ कोअर् ’ वगैरेंत नसलेल्या विद्यार्थ्यांचें ‘ फ्राय स्टुडेंटेन्शाफ्ट ’ नांवाचें मंडळ ठिकठिकाणीं स्थापन झालें. याचा उद्देश विद्यार्थिवर्गांत सुधारणा करण्याचा असून, त्याचा मुख्य कटाक्ष जुनीं बीयर् पिणारीं व द्वंद्वयुद्ध करणारीं मंडळें नाहींशीं व्हावीं या गोष्टीवर आहे. युनिव्हर्सिटीचा विद्यार्थ्यांवर ताबा किती थोडा असतो हें वर सांगितलेंच आहे. यायोगें त्यांची व्यक्तिस्वातंत्र्याची कल्पना जरी बळावत गेली असली, तरी या स्वातंत्र्याच्या नांवाखालीं वाटेल तसे अतिरेक होतात. विद्यार्थ्यांची वागणूक उत्तम नागरिकाला शोभेल अशीच या पद्धतींत निपजेल असें कोणालाही निश्चयानें सांगतां येणार नाहीं. विद्यार्थ्यांच्या खासगी वर्तणुकीवर जरी प्रत्यक्ष ताबा नाहीं तरी निदान चांगली देखरेख ठेवणेंही सध्यांच्या व्यवस्थेंत अशक्य आहे. हा जर्मनींतील विश्वविद्यालयांच्या शिक्षणांत दोष आहे व विचारी प्रोफेसरांच्या मनांत तो सारखा घोळत असून, तो नाहींसा करण्याचे उपाय सुचविण्यांत ते गुंतले आहेत. उदाहरणार्थ, लाइप्झिक् युनिव्हर्सिटीच्या एका प्रसिद्ध रेक्टरनें, गांवाच्या

बाहेर युनिव्हर्सिटीची जागा आहे तेथें विद्यार्थ्यांस राहण्यासाठीं वसतिगृहें व त्यांच्यामागें शुद्ध हवेंत टेनिस्, गोल्फ्, हॉकी वगैरे मर्दानी खेळाच्या जागा तयार कराव्या, अशी विस्तृत योजना काढली आहे. या वसतिगृहावर अर्थात् तेथेंच राहणाऱ्या प्रोफेसराची देखरेख असणार आहे. परंतु या कामीं पैशाच्या अडचणीपेक्षांही जुन्या परिस्थितीस चटावलेले लोक व विशेषतः विद्यार्थी आपलें स्वातंत्र्य अशा तऱ्हेनें गमावण्यास तयार नाहींत ही फार मोठी अडचण आहे.

## नवीं मंडळें.

जर्मनींतील युनिव्हर्सिट्यांत निरनिराळ्या प्रांताच्या विद्यार्थ्यांची सरमिसळ असते. त्याशिवाय परदेशाचे विद्यार्थी बर्लिन्, लाइप्झिक्, म्यूनिचसारख्या नाणावलेल्या युनिव्हर्सिट्यांत बरेच असतात. १९१२ अखेर परदेशीय विद्यार्थ्यांची संख्या साडेचार हजारांवर होती. ते व जर्मन विद्यार्थी यांच्यामध्यें सलोखा वाढावा व याद्वारें इंग्लंड, अमेरिका, जपान, रशिया इत्यादि राष्ट्रांचें हृद्गत व आकांक्षा कळून एकमेकांविषयींचे गैरसमज दूर व्हावे, एतदर्थ १९१०।११ च्या सुमारास कांहीं अमेरिकन विद्यार्थ्यांच्या प्रेरणेनें व कांहीं प्रोफेसरांच्या प्रोत्साहनानें ‘ इंटर्नात्स्योनालर स्टुडेंटेन् फराइन्–राष्ट्राराष्ट्रांमधील विद्यार्थ्यांचें मंडळ ’ बर्लिन येथें प्रथम स्थापण्यांत आलें. त्याचा उद्देश अर्थात उदात्त व सर्वांस पटण्याजोगा असल्यामुळें या मंडळाची भरभराट होऊं लागली व इतर युनिव्हर्सिट्यांनींही त्याचें अनुकरण करून अशीं मंडळें स्थापिलीं. आपला मुख्य उद्देश म्हणजे परस्परांत सलोखा वाढवणें यासाठीं, १ निरनिराळ्या राष्ट्रांच्या परिस्थितीवर तज्ज्ञांचीं व त्यांतील विद्यार्थ्यांचीं व्याख्यानें, २ सर्वांचा मिळून संगीत–नाच–नाटकें वगैरेसारख्या करमणुकीचा उद्योग, ३ प्रोफेसर व निरनिराळ्या राष्ट्रांचे विद्यार्थी मिळून ऐतिहासिक व इतर महत्त्वाचीं स्थळें पहाण्यास जाणें व ४ सहल, वनभोजन इत्यादि सलोख्याचे प्रकार–इत्यादि साधनांचें अवलंबन हीं मंडळें करतात. केव्हांही कोणत्याही

राष्ट्राच्या विद्यार्थ्यांस एकटें वाटूं नये, आपणांशीं सहानुभूति दाखविणारीं माणसें परदेशांतही आहेत ही भावना त्यांचेठिकाणीं उत्पन्न व्हावी, एतदर्थ सर्वांची खटपट असते. असो. या संघांनीं दोन अडीच वर्षांत बरेंच काम केलें; व प्रस्तुत युद्ध झालें नसतें तर युरोपांतील प्रमुख राष्ट्रांत जी चुरस वाढत जाऊन युद्धांत भडकली, ती हळूंहळू कमी करून तिचेठिकाणीं बंधुत्वाच्या स्पर्धेची स्थापना होण्याला हीं मंडळें अंशतः तरी कारणीभूत झालीं असतीं असें म्हणण्यास हरकत नाहीं. पण भविष्यकाळच्या गर्भांत कांहीं निराळाच विद्युत्संचार आंतल्याआंत वाढत असून जगाचे डोळे आंधळे करून टाकण्याची जणूं वाट पहात होता! त्यापुढें या मंडळांचा टिकाव कसा लागावा?

## वरिष्ठ प्रतीचें शिक्षण व स्त्रिया.

जर्मन युनिव्हर्सिट्यांत अलीकडे स्त्रियाही शिकूं लागल्या आहेत. १८९२ पर्यंत मुलींस प्रवेशपरीक्षेस बसण्याची मोकळीक नसे. पण त्या सालीं हायड्ल्बर्ग् व आणखी दोन ठिकाणीं तशी परवानगी स्त्रियांस प्रथम मिळाली. १८९६ त बर्लिन् येथें स्त्रियांस मुक्तद्वार झालें. तेंच लाइप्झिक्ला होण्यास आणखी दहा वर्षें लागलीं. १९०० सालीं प्रथम हायड्लबर्ग् येथें एका मुलीस डॉक्टरच्या परीक्षेस बसण्याची परवानगी मिळाली. आजमितीस सर्व युनिव्हर्सिट्यांत विद्यार्थिनी अभ्यास करीत आहेत. पदवीधर स्त्रियाही जर्मनींत कांहीं आहेत.

नुकतेंच दोन वर्षांपूर्वीं लाइप्झिक् येथें स्त्रियांसाठीं एक स्वतंत्र कॉलेज निघालें आहे. युनिव्हर्सिटीशीं कोणत्याही तऱ्हेनें स्पर्धा करण्याचा या संस्थेचा हेतु नसून, जे विषय स्त्रियांस युनिव्हर्सिटींत शिकतां येणें अशक्य आहे त्यांसाठीं हें कॉलेज विशेषतः आहे असें म्हणण्यास हरकत नाहीं. उदाहरणार्थ, अज्ञान मुलांचें पोषण, संवर्धन व शिक्षण, रोग्यांची शुश्रूषा इत्यादि सुशिक्षित स्त्रियांस अत्यंत अवश्य असे विषय या कॉलेजांत शिकविले जातात. तरी पण इतर विषय मुळींच शिकवित नाहींत असें

नाहीं. या कॉलेजांत इतिहास–तत्त्वज्ञान यांचा एक, सृष्टशास्त्रांचा एक, पेडागॉजी अगर शिक्षणशास्त्राचा एक, समाजशास्त्र–न्यायशास्त्राचा एक असे चार विभाग ( ग्रूप्स् ) करून त्यांमधील निरनिराळ्या विषयांचें शिक्षण दिलें जातें. यासाठीं नामांकित माणसांची योजना केलेली आहे. इन्स्टिट्यूट्, सेमिनार्, यूबुंग् वगैरे सर्व व्यवस्था युनिव्हर्सिट्यांसारखी आहे. मेड्शेन् शूलमधील शिक्षण संपल्याचा दाखला मिळालेल्या, अगर शिक्षकिणींच्या शाळेंत असल्याचा दाखला मिळालेल्या विवाहित अगर अविवाहित कोणत्याही स्त्रियांस या कॉलेजमध्यें प्रवेश मिळतो. लग्न होऊन संसारांत पडलेल्या स्त्रियांचीच संख्या या कॉलेजमध्यें जास्त असते. १९१३ च्या उन्हाळ्यांत या कॉलेजांत ८७३ अशा विवाहित स्त्रिया असून अविवाहित विद्यार्थिनी ३५२ होत्या.

## आंकडे.

जर्मनींतील शिक्षक व विद्यार्थी यांतील प्रमाणासंबंधाचे अगदीं अलीकडील आंकडे खालीं दिले आहेत. हे १९१२ अखेरचे नक्की आंकडे आहेत.

| युनिव्हर्सिटी. | शिक्षक. (सर्व तऱ्हेचे) | विद्यार्थी. | प्रमाण. |
|---|---|---|---|
| १ मर्व युनिव्हर्सिट्या मिळून. ... ... | ३६७९ | ५८८४४ पैकीं स्त्रिया ३२१३ | १:१६ |
| २ बर्लिन्. ... ... | ५१५ | ९९०६ ,, ,, ९०४ | १:१९ |
| ३ बॉन्. ... ... | १९१ | ४१७९ ,, ,, २८९ | १:२१ |
| ४ लाइप्झिक्. ... | २६३ | ५३५१ ,, ,, १२९ | १:२० |
| ५ म्यूनिच्. ... | २७७ | ६७५९ ,, ,, २६२ | १:२४ |
| ६ रोस्टोक् (एकविसां-पैकीं सर्वांत लहान.) | ६७ | ८८१ ,, ,, ९ | १:१३ |

या ५८८४४ विद्यार्थ्यांपैकीं ५३६३१ खुद्द जर्मनींतले असून युरोपखंडांतील इतर देशांतले ४६४८ ( पैकीं २८४० रशियन, ९०० ऑस्ट्रोहंगेरियन्, व १४५ ब्रिटिश ) होते. इतर खंडांतील विद्यार्थी जर्मन युनिव्हर्सिट्यांतून हमेष येतात. १९१२ अखेर सर्व युनिव्हर्सिट्या मिळून ३३८ अमेरिकन, १८४ एशियाटिक, २२ आफ्रिकन् व १ ऑस्ट्रेलियन् असे होते. बर्लिन् युनिव्हर्सिटींत परदेशांतील विद्यार्थी सर्वांत जास्त म्हणजे १६०५ होते.

वरील आंकड्यांवरून पाहिलें असतां एका युनिव्हर्सिटीला शोभतील इतके विद्यार्थी एकट्या पुण्यांत आजमितीस आहेत. सात कोटि लोकवस्तीला जर्मनींत आजच २१ युनिव्हर्सिट्या आहेत. त्यांत आणखी तिहींची भर लवकरच पडणार होती, पण ती प्रस्तुत महायुद्धामुळें मागें पडली. त्या मानानें पाहिलें असतां आपल्या मुंबई इलाख्यांतच आणखी पांच युनिव्हर्सिट्या निघाल्या पाहिजेत. सिंध हैदराबादेस एक, अहमदाबादेस दुसरी, मुंबईची जुनी तिसरी, पुणें येथें नव्या धर्तीची व नव्या जोमाची चौथी, व दक्षिणमहाराष्ट्रासाठीं बेळगांव अगर धारवाड येथें पांचवी अशा ठिकठिकाणीं उत्तम प्रतीचें शिक्षण देणाऱ्या युनिव्हर्सिट्या आपल्याकडे निघतील तो सुदिन ! पुण्यास हल्लींच दोन आर्ट्स कॉलेजें—तिसरें नुकतेंच स्थापन झालें आहे—एक एंजिनियरिंग व एक ॲग्रिकल्चरचें अशीं पूर्ण कॉलेजें आहेत. सासून् हॉस्पिटलचें मेडिकल् स्कूल् आहे तें वाढवून त्याचें स्वतंत्र मेडिकल् कॉलेज करणें अगदीं अव्यवहार्य आहे असें नाहीं. ही तयारी आधींच आहे. लॉ कॉलेज काढावें लागेल; म्हणजे हल्लींच्या युनिव्हर्सिटीसारखी युनिव्हर्सिटी पुण्यास निघेल. या गोष्टीला द्रव्य विपुल पाहिजे. जेथें कांहीं पूर्वतयारी नसतांना उत्तरेकडील भरतपुत्रांनीं टोलेजंग हिंदु युनिव्हर्सिटी अगदीं व्यवहार्य स्वरूपांत आणली, तेथें इतकी पूर्वतयारी असल्यावर महाराष्ट्रीयांनीं

मनांत आणल्यास द्रव्यादि साधनें मिळून युनिव्हर्सिटी निघणें शक्य होणार नाहीं काय ?

---

# प्रकरण ४ थें.

## शिक्षक.

जर्मन युनिव्हर्सिटींत तीन प्रकारचे शिक्षक असतातः—ऑर्डिनरी प्रोफेसर, एक्स्ट्रा—ऑर्डिनरी प्रोफेसर व प्रिव्हाट्र डोत्सेंट्र (प्रायव्हेट् ट्यूटर्). युनिव्हर्सिटींत शिक्षक होऊं इच्छिणारा अर्थात कोणत्या तरी फॅकल्टीचा 'डॉक्टर' असला पाहिजे. त्यानंतर त्यानें आपल्या विषयांतील कांहीं अपरिचित अगर अशोधित भागावर स्वतंत्र पद्धतीचा ग्रन्थ लिहून तो आपल्या फॅकल्टीस सादर करावा लागतो. त्या फॅकल्टींतील मुख्य प्रोफेसर तो बारकाईनें तपासतात. त्यांच्या पसंतीस तो उतरला—व तसें होणें त्यांत खरे खरे गुण असतील तरच शक्य असतें—म्हणजे त्याच्या कर्त्यास 'कलोक्विउम्' अगर संभाषणासाठीं बोलावतात. हें कलोक्विउम् म्हणजे त्याची एक प्रकारची तोंडी परीक्षाच होय. या संभाषणावरून त्या गृहस्थाच्या वाचनाची, आपल्या विषयाशीं परिचयाची व चिकित्सक बुद्धीची परीक्षकांस खात्री पटली म्हणजे मग त्यास फॅकल्टीकडून लेक्चरें देण्याची परवानगी मिळते. पहिलें लेक्चर फारच वरच्या दर्जाचें व परिश्रमपूर्ण असावें लागतें, कारण तें ऐकण्यास फॅकल्टीचे प्रमुख प्रोफेसर येत असतात. अशास 'आइन्ट्रिट्स् फोरलेसुंग्' (इं. फर्स्ट् अगर मेडन् लेक्चर) म्हणतात. अशी परवानगी मिळालेल्या माणसांस प्रिव्हाट्र डोत्सेंट्र म्हणतात. त्याला लेक्चरची फी फारशी मिळत नाहीं, व लेक्चरेंही आपल्या विषयांतील

मुख्य प्रोफेसरांनीं देऊन उरलेल्या विषयांवर त्यांच्याच परवानगीनें द्यावीं लागतात. ज्यूनियर विद्यार्थ्यांचीं प्रवचनेंही भरवतां येतात. पण हें सर्व काम पोट बांधून करावें लागतें. याबद्दल युनिव्हर्सिटीकडून अगर मुलांकडून कांहींही मिळत नाहीं. पुढील पायरीला लागेपर्यंत पदरमोड करून खावी लागते. इतक्या अवधींत एखादी श्रीमंत मुलगी पटकावयाला सांपडली, तर लग्न करून टाकलें कीं दद्दात मिटते. युनिव्हर्सिटी प्रोफेसरांस फार वरच्या दर्जाचा मान मिळतो, त्यामुळें पुढें मागें 'फ्राउ प्रोफेसर–प्रोफेसरीण बाई' म्हणवून घेण्यासाठीं पुष्कळ मुली असे होतकरू प्रिव्हाट् डोत्सेन्ट् हुडकीत असतात व त्यांशीं आनंदानें लग्न करतात.

प्रिव्हाट् डोत्सेंट्च्या वरची पायरी एक्स्ट्राऑर्डिनरी प्रोफेसर ही होय. प्रिव्हाट् डोत्सेंट् असतांना चिकित्सक ऐतिहासिक दृष्टीनें बरेच ग्रंथ, लेख वगैरे लिहून आपली योग्यता स्थापित केल्यावर जशी संधि येईल त्याप्रमाणें त्यास एक्स्ट्राऑर्डिनरी प्रोफेसर नेमण्यांत येतें व अमुक विषय अगर त्याचा भाग शिकवावा अशी सेनेट्कडून परवानगी मिळते. पण इतकी वेळ येईतोंवर ५।७ वर्षें तरी वाट पहावी लागते. २३ पासून २५ व्या वर्षापर्यंत डॉक्टर होण्याची, व पुढें चार पांच वर्षें परिश्रम करून ३० व्या वर्षापर्यंत प्रिव्हाट् डोत्सेंट होण्याची पाळी येते असें साधारणपणें धरलें, तर एक्स्ट्राऑर्डिनरी ( ज. औसर् ओर्डेन्ट्लिशर् ) प्रोफेसर होईतों ३८ होण्याची पाळी येते व कधीं कधीं जन्मभर एक्स्ट्राऑर्डिनरीच रहावें लागतें. या एक्स्ट्रा–ऑर्डिनरी प्रोफेसरांस वर्षाचे कांठीं २६०० पासून ४८०० मार्कपर्यंत पगार मिळतो. म्हणजे पैशाच्या दृष्टीनें यांची व दुय्यम शाळांतील शिक्षकांची स्थिति सारखीच असते असें म्हणण्यास हरकत नाहीं. यांस आपल्या लेक्चरांची फी आकारतां येते व ती त्यांची त्यांसच मिळते.

यानंतर पुढची पायरी प्रोफेसराची. यांस ओर्डेन्ट्लिशर् ( ऑर्डिनरी ) म्हणतात. शिक्षण व शास्त्रीय शोध यांविषयीं कीर्ति मिळवावी तरच

एखाद्या युनिव्हर्सिटींत जागा रिकामी झाली असतां बोलावणें येतें. एकवीसपैकीं कोठल्याही युनिव्हर्सिटीचा शिक्षक दुसरीकडे कोठेंही बोलावलेला चालतो; नव्हे अशी साधरण पद्धतच पडली आहे असें म्हणण्यास हरकत नाहीं. मात्र तो मनुष्य नांवाजलेला व फॅकल्टीचे माहितींतला असला पाहिजे. अशा नेमणुका अर्थात् सेनेटच्या पसंतीनें पण विद्यामंत्र्याच्या अधिकारांत केल्या जातात. कारण प्रोफेसर हे वरिष्ठ दर्जाचे सरकारी नोकर आहेत. त्यांस पगार सुरुवातीस ४८०० मार्क असतो. तो दर चार वर्षांनीं ४०० मार्कप्रमाणें सालीना ७२०० मार्कपर्यंत वाढत जातो. फारच नांवाजलेल्या माणसाचा पगार सालीना ९२०० मार्कपर्यंत वाढविण्याचा अधिकार विद्यामंत्र्यास आहे. यापुढें मात्र राजाची परवानगी लागते. याशिवाय घरभाड्याचे नगद १३०० मार्क सालाचे मिळतात. हे प्रोफेसर बहुतकरून आमरण जुंपल्याप्रमाणें शिकविण्याचें व लिहिण्याचें काम करतात. प्रसिद्ध तत्त्ववेत्ता व मानसशास्त्रपटु प्रो. वुण्ट् हा ऐशी वर्षांवर वयाचा असूनही प्रस्तुत युद्धाच्या आरंभापर्यंत सारखा शिकवीत होता. ‘ मीं जर काम सोडलें तर उद्यां पटकन् मरून जाईन ’ असें तो म्हणे व तें अक्षरशः खरें आहे. ‘ उत्तम शिक्षक ’ यापेक्षां ‘ उत्तम संशोधक ’ म्हणवून घेणेंच या प्रोफेसरांस जास्त भूषणावह वाटतें; व प्रोफेसर नेमतांना युनिव्हर्सिटीचीही तीच दृष्टि असते.

तीन हजारपावेतों सगळी फी यांची यांसच मिळते. त्यावर उत्पन्न वाढल्यास त्यापैकीं शेंकडा कांहीं तरी प्रमाण सरकारास द्यावें लागतें. नांवाजलेल्या कांहीं प्रोफेसरांस सहासहाशेंपर्यंत विद्यार्थी मिळतात. दर विद्यार्थ्याकडून सेमेस्टरास २४ मार्क ( आठवड्यांतील सहा लेक्चरांची फी ) मिळतात असें धरलें तर दोन टर्मस् मिळून २४००० मार्क केवळ फीचें उत्पन्न होतें. पण हें ब्रह्मपद प्रथम १०।१२ अगर कधीं कधीं वीसही वर्षे लोखंडाचे चणे खावे तेव्हांच मिळूं शकतें !

त्यांतले त्यांत इतिहास, फिलॉसफी, इंग्लिश वगैरेच्या प्रोफेसरांस असें घाऊक मिळण्याचा विशेष संभव असतो. उलट अवेस्ता, पाली अगर चिनी भाषांच्या प्रोफेसरांस फीचें उत्पन्न पांचपन्नास मार्कांच्यावर होत नाहीं! याशिवाय दर विद्यार्थ्याची परीक्षेची फी २४० पासून ३५० मार्कपर्यंत येते, ती तीन परीक्षकांत वांटली जाते. डिप्लोमा छापण्याचा खर्च वेगळा ज्याचा त्याच्याकडून घेतला जातो, त्यामुळें तो सुद्धां या फींतून कमी होत नाहीं.

हे प्रोफेसर 'आकाडेमी डर् विझेन्शाफ्टेन्' (पृ. ६९ पहा) चेही सभासद असतात; व त्यांच्या विद्यमानें यांचा लेखनव्यवसाय अखंड चालूं असतो. शिवाय आपापल्या विषयावरील संशोधनाचे निबंध छापण्यासाठीं मासिकें, त्रैमासिकें वगैरे हेच चालवितात. एखादा तरुण प्रोफेसर अगर प्रिव्हाट् डोत्सेंट् अशा मासिकांचा प्रकाशक नेमलेला असतो. हें काम मात्र बिन पैशाचें—उलट बहुतेक प्रसंगीं पदराला खार लावणारें असें असतें, तरी ज्ञानाच्या प्रसाराला व शोधाला साधनीभूत असल्यामुळें मोठ्या उत्साहानें तें होत असतें.

सरकारी नोकर म्हणून निराळें वेतन वगैरेची अपेक्षा न धरतां करावें लागणारें असें आणखी एक काम यांच्याकडे असतें. तें 'स्टाट्स् एक्झामेन्' (इं. डिपार्टमेंटल्) परीक्षेचें काम होय. डॉक्टर् ही पदवी कोणत्याही प्रकारची नोकरी संपादण्याचा हक्क प्राप्त करून देणारी आहे, असें समजतां कामा नये. युनिव्हर्सिटीची सर्वांत श्रेष्ठ पदवी ती आहे यामुळें तिला मोठा मान आहे व शिक्षकाच्या धंद्याला तिची आवश्यकता असते इतकेंच कायतें. बाकी प्रत्येक तऱ्हेच्या नोकरीला अगर सरकारी वगैरे कामाला डिपार्टमेंटल् परीक्षा दिल्यावांचून भागत नाहीं. शिक्षकांस (दुय्यम) सुद्धां ती असते. ती घेण्यासाठीं विद्यामंत्र्यांकडून 'प्र्यूफुंग्ज् कमिश्योन्—परीक्षक मंडळ' नेमलें जातें. त्यांत निरनिराळ्या विषयांचे

प्रोफेसर व एखादा दुय्यमशाळेचा डिरेक्टर् असतो. या कमिश्योन्चें काम सारखें वर्षभर चालत असतें.

या तिन्ही वर्गांचे शिक्षकांशिवाय त्यांचे मदतीला 'लेक्टोर्' (इं. लेक्चरर्स्) व 'असिस्टेंट्' असतात. या दोघांसही युनिव्हर्सिटी व इन्स्टि-ट्यूट्कडून थोडाबहुत पगार मिळतो. लेक्टोर् साधारणतः परकी भाषांसाठीं त्या त्या देशांतील माणसें नेमलीं जातात; व तीं त्या भाषेच्या मुख्य जर्मन् प्रोफेसराला मदत करितात. असिस्टंट्स हे जर्मन व इतरही असूं शकतात. अगदीं नव्या विद्यार्थ्यांसाठीं सोपीं प्रवचनें भरवणें यांच्याकडे असतें.

आपल्या नित्यव्यवसायाशिवाय युनिव्हर्सिटीचा वेळ (सकाळीं ८ पासून सायंकाळीं ७ पर्यंत निरनिराळ्या विषयांवर लेक्चरें सारखीं चालूच असतात) खेरीज करून इतर म्हणजे रात्रींच्या वेळीं तासभर साधारण लोकांसाठीं आपल्या विषयावर लेक्चरें देण्याचें कामही कांहीं प्रोफेसर मोहबतीखातर करतात. हे 'पॉप्युलर् कोर्सेस्' फारच उपयोगाचे असून लोक त्यांचा चांगला फायदा घेतात.

जर्मन युनिव्हर्सिटींत प्रोफेसर होणें किती कष्टाचें व म्हणूनच किती सन्मानाचें आहे हें यावरून दिसून येईलच. जर्मनींत विद्वत्तेला किती मान आहे हें एका उदाहरणावरून चांगलें लक्षांत येईल. बर्लिन् युनिव्ह-र्सिटींतील जर्मन भाषेचे प्रसिद्ध प्रो. एरिश् श्मिट् १९१३ त अकस्मात् वारले, तेव्हां बडेबडे ऑफिसर व जर्मन बादशहा त्यांच्या स्मशानयात्रेस गेले होते. दरबारी जेवण अगर इतर समारंभ झाला असतां प्रोफेसरांस बऱ्याच वरच्या प्रतीचें स्थान असतें.

हे प्रोफेसर म्हणजे सरस्वतीचे पुत्रच होत. यांस आठवड्यांत शिकवि-ण्याचें फक्त सहा व प्रवचनाचें दीड तास इतकेंच काम असतें; बाकीचा

वेळ हे आपल्या घरीं संशोधनांत सारखे गुंतलेले असतात. नाटकें, मेजवान्या, पार्ट्या वगैरे सामाजिक समारंभ यांस फारसे नको असतात. आपल्या कामांत व्यत्यय न येतां विद्यार्थ्यांस व इतर कोणास भेटतां यावें म्हणून हे आठवड्यांत एक भेटीचा तास ठेवतात, त्यास ‘ स्प्रेश्-स्टुंड ’ म्हणतात. विद्यार्थ्यांशीं हे फार मनमिळाऊपणें सलोख्यानें वागतात व त्यांस हरतऱ्हेची मदत करण्यास तयार असतात.

# भाग ५ वा.

## प्रकरण १ लें.

### व्यावहारिक शिक्षण.

गेल्या शतकांत जे नवे नवे शोध लागले व भौतिक शास्त्रांची प्रगति झाली, त्यांनीं सर्व युरोपियन लोकांचा जीवनक्रम अगदीं बदलून टाकला असें म्हटल्यास हरकत नाहीं. थिल्लर व कष्टाचें मनुष्यबळ कमी होत जाऊन, शीघ्र कामें करणारें व सोपें असें यंत्रबळ त्याचे जागीं येऊं लागलें. त्यामुळें जुने धंदे नाहींसे होऊन नवे अस्तित्वांत येत चालले. केवळ हस्तकौशल्यावर पूर्वी भिस्त असे; आतां तें किंचित् बाजूला पडून त्याऐवजीं यंत्र चालविण्याचें सामर्थ्य असणें अपरिहार्य झालें. श्रमविभागाचें तत्त्व अंगीकारल्यावांचून गति नाहींशी झाली. नित्यव्यवहार एकांगी व सुलभ असे, तो भानगडीचा व कठीण होऊं लागला. लहान प्रमाणावर चालून पूर्वी भरभराटीस आलेले धंदे मंदावूं लागून मोठ्या प्रमाणावर गोष्टी केल्याशिवाय चालेनासें झालें. दळणवळण वाढून एका बाजूनें व्यवहार, व्यापार सुलभ झाला, तर दुसऱ्या बाजूनें चढाओढीचें तत्त्व त्यांत शिरल्यामुळें, जो जात्या हुषार व आपल्या व्यवहारांत वाकबगार तोच पुढें येऊं लागला. केवळ सामान्य संस्कृति देणारें शिक्षण मिळाल्यानें पूर्वी गरज भागे, ती आतां तशी भागेनाशी झाली; व म्हणून भौतिकशास्त्रांच्या शोधांनीं व वाढीनें पाश्चात्य राष्ट्रांच्या राहाटींत ज्या ज्या बाबींची भर टाकली, अथवा पूर्वी अस्तित्वांत असलेल्या ज्या ज्या बाबतींत सुधारणा घडवून आणिली त्या त्यांमध्यें पडणारांस तद्विषयक ज्ञान पूर्वी संपादणें आवश्यक

वाटूं लागलें. हेंच पश्चिमेकडील व्यावहारिक शिक्षणाचें मुख्य—म्हणजे उत्पादक कारण होय.

'रेआलीएन्' अगर नित्यव्यवहारांतील बाबतींना शिक्षणक्रमांत जागा मिळाली पाहिजे; त्याशिवाय आमच्या शिक्षणाची व व्यवहाराची फाटाफूट होऊन शिक्षण फोल होईल' अशी हाकाटी जर्मनींत १८ व्या शतकाच्या शेवटापासूनच सुरू झाल्याचें वर प्रसंगानुसार आलेंच आहे. हुम्बोल्ट् प्रभृति राष्ट्रभक्तांनीं यासंबंधीं कसकसे प्रयत्न केले हेंही वर दर्शविलेंच आहे.

'फोर्ट्बिल्डुंग्जूशूलेन्' अगर इं. कंटिन्यूएशन् स्कूल्स् म्हणजे व्यावहारिक शिक्षणाच्या प्राथमिक शाळाच होत असें वर (प्राथमिक शिक्षणाच्या शेवटीं) म्हटलें आहे तें अक्षरशः खरें आहे. गरीबगुरिबांच्या मुलांमुलींस आठ वर्षें प्राथमिक शिक्षण मिळाल्याबरोबर पोटासाठीं कांहीं धंदा करावाच लागतो. पूर्वीं मध्ययुगांत अगर द्वापारीं यासंबंधीं फारशी तयारी लागत नसे; पण या खडतर कलियुगांत तसें राहिलें नाहीं. म्हणून अशा मुलांमुलींस कोठें तरी कामशिकाऊ म्हणून रहावेंच लागतें. तूर्तच्या चतकोर भाकरीला राजी होऊन पुढच्या सबंध भाकरीची ते तरतूद करीत असतात. याच वेळीं त्यांच्या त्यांच्या धंद्याला उपयोगी असें शिक्षण त्यांस दिलें जातें. याची दिशा पूर्वीं (प्राथमिक शिक्षणाचे भागाचे शेवटीं शेवटीं पा. २२) कळविलीच आहे. हें शिक्षण फार वेळ घेणारें व कष्टाचें असतें अशांतला मुळींच भाग नाहीं. आठवड्यांतून ४।५ च तास व तेंही पोटापाण्याचा धंदा करून फावलया वेळीं! यामुळें शेतकरी व मजूर लोक प्राथमिक शिक्षणाच्याविरुद्ध जशी प्रथम प्रथम तक्रार करीत तशी त्यांस याविरुद्ध करण्याचें कारण उरलें नाहीं. उलट ज्या धंद्यांत आपल्या मुलांनीं पडावें असें त्यांस वाटतें अगर त्यांच्या मुलांची इच्छा असते, त्यांचेंच शिक्षण मिळाल्यामुळें तीं अधिक वाकबगार व कार्यक्षम होतात व त्या मानानें अधिक वेतन मिळविण्याची

त्यांचे अंगीं धमक येते, असें त्यांस कळून चुकलें आहे. तेव्हां त्यांचे-कडून अडथळा न येतां, उलट अशा शिक्षणास त्यांची सहानुभूति मिळाल्यास नवल नाहीं. धंदे व भांडवलवाल्या मालकवर्गासही आपलीं माणसें जास्त कार्यक्षम होणें नको होतें अशांतला थोडाच भाग आहे ? यामुळें दोहींपक्षीं असलें शिक्षण सक्तीचें व्हावें याविषयीं एकमताचा उल्हासच होता. म्हणूनच ठिकाणाच्या मानानें दोन पासून चार वर्षेपर्यंत हें शिक्षण कायद्याअन्वयें सक्तीचें झालें, तेव्हां त्या सक्तीविरुद्ध कोणीं चकारशब्दसुद्धां काढला नाहीं, हा पूर्वीं मिळालेल्या सक्तीच्या प्राथमिक शिक्षणाचा प्रभाव हें कां आतां कोणाला सांगायला हवें ?

शेतकरी मजूर वगैरे अगदीं शेवटल्या वर्गाची ही गोष्ट झाली. पण यापेक्षां जरा वरच्या दर्जाचा पण साधारणपणें गरीबच असा एक मोठा वर्ग राहतो. यूरोपांत 'मधला वर्ग' ज्यास म्हणतात त्यांत दोन दर्जे पाडले, तर त्यांतला निकृष्ट असा जो भाग त्याविषयीं आतां विचार करावयाचा आहे. या वर्गास आपलीं मुलें प्राथमिकपेक्षां जरा जास्त शिकून तयार व्हावीं असें वाटतें व तसें करणें परवडतेंही. बऱ्याच वरच्या प्रकारची सामान्य संस्कृति, कीं, जी मिळालेला मनुष्य 'गेबिल्डेटर्' ( इं. 'जंटलमन्' ) मध्यें मोडतो, ती संस्कृति व तशाच प्रकारचे जवळ जवळ शिक्षणसंस्कार आपल्याही मुलांस मिळावे असें त्यांस वाटत असतें. यासाठीं लागणारा थोडाबहुत पैसाही त्यांजवळ असतो. अशांचेसाठीं सहाच वर्षे ( १० ते १६ वयापर्यंत ) शिक्षण देणाऱ्या 'प्रोगिमनासिएन्, रेआल्प्रोगिमनासिएन् व रेआल्शूलेन् वगैरे शाळा जर्मनींत बऱ्याच असल्याचें पूर्वीं सांगितलेंच आहे. या शाळांतून शिकून तयार झालेल्या मुलांस पुढें आपापल्या पसंतीच्या धंद्याच्या व्यावहारिक शाळांत जातां येतें. या शाळांस व्यावहारिक शिक्षणाच्या दुय्यम प्रतीच्या शाळा असें म्हणण्यास हरकत नाहीं.

या व्यावहारिक शाळांचें सामान्य स्वरूप सांगणें फार कठिण आहे. कारण जितके धंदे. जितके व्यापार, तितक्या गाणिक शाळा जर्मनींत

आहेत. फिटर् वगैरेंच्या वरच्या दर्जाचीं यंत्रांचीं कामें करणाऱ्या लोकांसाठीं टेक्निकल्स्कूल्स्, ड्रॉइंग्–पेंटिंग्–फोटाग्रफी वगैरे धंदे करणारांस आर्टस्कूल्स्,सुतार-लोहार-साळी-शिंपी-चांभार-कासार-आतार-दारू करणारे-खाणींतून धातूंचें काम करणारे-केमिस्टस्,ड्रगिस्ट्स् अपॉथेकरीज़,इलेक्ट्रिकल् कामें करणारे इ.इ. हरहुन्नरी लोकांसाठीं गेवेर्बशूलेन्, बांधकाम-मोजकाम वगैरे करणारांसाठीं स्कूल्स् ऑफ आर्किटेक्चर वगैरे हजार तऱ्हेच्या धंद्यांच्या दुय्यम शिक्षणाच्या शाळा जर्मनींत आहेत. अशांपैकीं कांहींस ‘ इंडुस्ट्री-शूलेन्, म्हणतात. याशिवाय व्यापारांत पडणाऱ्या वाणी-उदमी–दलाल-दिवाणजी, कारकूनआदि लोकांसाठीं व्यापारी शाळा–हाण्डेल्स्शूलेन् आहेत. यांपैकीं कांहीं सरकारी व कांहीं खाजगी स्वरूपाच्या असतात. व्यापारी शाळा बहुतेक म्युनिसिपल अगर खाजगी स्वरूपाच्या असतात.

या शाळांतून तज्ज्ञ लोकांकडून कसोशीनें तात्त्विक व व्यावहारिक शिक्षण मिळाल्यावर जो तो आपापल्या धंद्यांत अगर व्यापारांत पडण्यास वाकबगार असा तयार होतो. त्यामुळें व्यापारधंद्यांमध्यें सध्यां चालू असलेल्या बिकट चढाओढींत सुद्धां यांना टिकाव धरतां येतो. येथें जें शिक्षण दिलें जातें त्याचे सर्वसाधारण, धंद्याविषयीं तात्त्विक व धंद्यांविषयीं प्रत्यक्ष व्यावहारिक असे तीन भाग केले जातात. ‘सर्वसाधारण ’ शिक्षणामध्यें पुनः जर्मन भाषा व इतिहास हीं असतातच; पण विशेष कटाक्ष पत्रव्यवहार, हस्ताक्षर, लघु व यंत्रलेखनकला अशा विषयांवर असतो. दुसऱ्या भागांत धंद्याचा इतिहास, त्याबद्दल सामान्य माहिती, आंकडे व तो सुधारण्यासंबंधानें विचार इत्यादींचा समावेश होतो. तिसऱ्या म्हणजे व्यावहारिक भागांत त्या त्या धंद्याचें प्रत्यक्ष शिक्षण मिळतें. यामुळें हें शिक्षण ज्यानें मिळविलें आहे त्यास आपला धंदा तर व्यवस्थितपणें व हुषारीनें करतां येतोच, पण त्याविषयीं सर्व सांगोपांग माहिती त्यास असते. इतकेंच नव्हे तर आपल्या धंद्याला इतर देशांतील त्याच पण पुढें गेलेल्या धंद्याशीं चढाओढ करावयाची असतां आपण व्यक्तिशः व आपल्या धंदा–मंडळानें एकजुटीनें काय काय करावें व करतां

येणें शक्य आहे, इत्यादि माहिती अशा शाळांतून प्रामुख्यानें मिळालेली असते. बहुतेक धंद्यांस ड्रॉइंग अवश्य आहे; व्यापारी शिक्षणास लघु-यंत्र-लेखनकला, जमाखर्च व विशेषतः इंग्लिश, फ्रेंच या परकी भाषा आवश्यक आहेत.

यासंबंधीं एकाच शहरांत निरनिराळ्या शाळा कशा असतात याचें एकच उदाहरण देतों. लाइप्झिक् शहरीं एक भली मोठी 'कॉनिग्लिश गेवेर्बशूल' अगर सरकारी धंदेशिक्षणाची शाळा आहे. हींत एंजिनड्राय-व्हर्, फिटर्, सुतार, चितारी, तांबट व धातूंचें कांतीव काम करणारे, व लांकडावर चित्रें कातणारे इत्यादि हुन्नरी लोक तयार होतात. याशिवाय व्यापारी शिक्षण, मुद्रण, पुस्तकें बांधणें, विकणें इत्यादि व इतर धंदे यासाठीं निरनिराळ्या ३० शाळा या एकट्या शहरीं आहेत. यावरून दुय्यमप्रतीच्या व्यावहारिक शिक्षणाच्या वाढीची कल्पना सहज करतां येईल.

---

# प्रकरण २ रें.

## श्रेष्ठप्रतीचें व्यावहारिक शिक्षण.

याचेही नानातऱ्हेचे धंदे अगर हुन्नरें यांचें व व्यापारी पद्धतीचें शिक्षण असे दोन स्वाभाविक भाग पडलेले आहेत; व त्यांस अनुरूप अशीं दोन तऱ्हेचीं कॉलेजें जर्मनींत अस्तित्वांत आहेत. १ धंदेशिक्ष-णाचीं अगर 'टेश्निश होखूशूलेन्–इं. टेक्निकल कॉलेजेस्' व २ व्यापारी शिक्षणाचीं अगर 'हान्डेल्स् होखूशूलेन्–इं. कमर्शल् कॉलेजेस्.'

धंदेशिक्षणाचें कॉलेज स्थापणें म्हणजे केवढें बिकट काम आहे याची प्रथम कल्पना सुद्धां करवत नाहीं. कारण त्यांत इतक्या धंद्यांचा समावेश होतो कीं, त्या सगळ्यांबद्दल माहिती व ती देतांना लागणारीं

उपकरणें, शास्त्रीय प्रयोगांचें सामान इ. इ. अनंत गोष्टी एखादें समर्थ राष्ट्रच करूं जाणें; व अशीं कॉलेजें स्थापणें खाजगी प्रयत्न कितीही नेटाचे झाले तरी कष्टसाध्यच होय. सरकारी मदत नसेल तर त्यांतील कितीएक गोष्टी केवळ अशक्यच होऊन बसतील.

वरिष्ठप्रतीच्या धंदेशिक्षणाची जर्मनींतील चळवळ अगदीं अलीकडची म्हणजे गेल्या शतकाच्या उत्तरार्धीतली होय असें म्हणण्यास हरकत नाहीं. कारण ज्या शास्त्रीय शोधांवर व तज्जन्य व्यावहारिक सुधारणांवर या शिक्षणाची सगळी भिस्त, त्यांस मुळीं १८ व्या शतकांत फारसें चांगलें स्वरूप आलेलें नव्हतें; व शिवाय यांची वाढ धंद्यांच्या उदय--वाढीवर असल्यामुळें, जसजसे ते उत्पन्न होऊन वाढले तसतशी यांची आवश्यकता भासूं लागली. आणखी अशा शिक्षणाच्या कॉलेजांस युनिव्हर्सिट्यांच्याच छायेखालीं वाढतां येणें शक्य नव्हतें. कारण जें ज्या धंद्याचें केन्द्रस्थान तेथेंच त्याच्या शिक्षणाची सोय होणें अपरिहार्य होतें. यामुळें जर्मनींत धंदेशिक्षणाचीं जीं ८।१० कॉलेजें आहेत तीं बहुतेक युनिव्हर्सिट्या असलेल्या शहरीं नाहींत. अशीं फक्त दोनच बर्लिन् व म्यूनिच् येथें आहेत.

या कॉलेजांत साधारणतः सहा बाजूंचें अगर दिशांचें शिक्षण मिळतें. त्या अशाः— १ सर्वसाधारण, २ एंजिनियरिंग्, ३ आर्किटेक्चर्, ४ मेकॅनिकल एंजिनियरिंग्, ५ केमिकल् व ६ शेतकी. या निरनिराळया शाखांत तीनपासून चार वर्षेंपर्यंत शिक्षण घ्यावें लागतें.

पैकीं पहिली शाखा साधारणतः शिक्षकांसाठीं आहे. नऊ वर्षांचें शिक्षण देणाऱ्या तिन्ही प्रकारच्या ( गिम्नासिउम्, रेआल्गिम्नासिउम्, ओबर्रेआल्शूल ) शाळांत आधुनिक शास्त्रें व कला वगैरे हे विषय शिकवूं इच्छिणारांनीं टेक्निकल् कॉलेजच्या या शाखेंत चार वर्षें शिक्षण घेऊन परीक्षा द्यावी लागते. वरच्या प्रतीचें गणित व यन्त्रशास्त्र ( इं. फिजिक्स ), रसायनशास्त्र, सृष्टिशास्त्रें, जर्मन भाषा, इतिहास व

भूगोल, नव्या भाषा, ड्राइंग् व मॉडेलिंग्, व व्यापारी शिक्षण इतक्या उपशाखा या पहिलीमध्यें आहेत. यांपैकीं कोणतीही घेऊन तिच्या मगदुराप्रमाणें १ पासून ४ वर्षें अभ्यास केला व त्यांत प्रवीणता दाखविली म्हणजे त्या त्या विषयांत शिक्षण देण्याच्या योग्यतेविषयीं दाखला मिळतो. या शाखेंतच अबकारी व कस्टम्स् खात्यांत वरच्या दर्जाचें काम करणारांस शिक्षण मिळतें. आठवड्यांतून लेक्चरें व प्रॅक्टिकल (प्रयोगद्वारा शिक्षण) मिळून २१ पासून २७ तास शिक्षण मिळतें.

एंजिनियर्स्च्या दुसऱ्या शाखेंत तीनपासून चारपर्यंत वर्षें शिकावें लागतें. योग्य विषयांची चार वर्षांवर वांटणी केलेली असून, त्यांत दोन्ही प्रकारचें (लेक्चर्स् व प्रॅक्टिकल्) शिक्षण आठवड्यांतून ३० पासून ३२–३४ तास घ्यावें लागतें. पैकीं प्रॅक्टिकलला दर वर्षी चढते तास असतात; शेवटल्या वर्षीं त्यांची संख्या १७ पर्यंत जाते. या एंजिनियर्स्मध्यें बरेच प्रकार असतात, त्या मानानें सामान्य विषय खेरीज करून बाकीचे बदलत जातात.

तिसरी बाजू आर्किटेक्टस्–इमारतींचे प्लान करून त्या बांधणारांची, यांस तीन वर्षें शिक्षण घ्यावें लागतें. आठवड्यांत तासांची संख्या वरप्रमाणेंच असते. आपल्या विषयांत व्यवस्थितपणें उत्तीर्ण झाल्यावर जसा एंजिनियरांस तसाच यांसही डिप्लोमा मिळतो. त्यांच्या परीक्षेचे नियमित विषय असतात. त्यांत हायर् मॅथेमॅटिक्स्, ग्रफिकल जिऑमेट्री, टेक्निकल् मेकॅनिक्स्, फिजिक्स् व केमिस्ट्री, कन्स्ट्रक्शन्, जुन्या वास्तुकलेची माहिती, आलंकारिक ड्रॉइंग हे विषय अवश्य शिकावे लागतात. इतर ऐच्छिक विषयही घेतां येतात.

मेकॅनिकल् एंजिनियर्स यांसही चार वर्षें शिक्षण घ्यावें लागतें. गणित, भूमिति, फिजिक्स् यांशिवाय यंत्रांची रचना, त्यांतील प्रत्येक अवयवाचा उपयोग, तीं मोडतां जोडतां येणें इत्यादि व इतर योग्य ते विषय यांस असतात. आठवड्यांतील तासांची संख्या इतर शाखांप्रमाणें इतही

३० ते ३२।३४ इतकी असते. याशिवाय टेक्स्टाइल, वॉटरपावर हौसेस्, एंजिनें करणें, रेल्वे वगैरे बांधणें, इलेक्ट्रोटेक्निक् इत्यादि विषय ऐच्छिक घेतां येतात. या शाखेंत इलेक्ट्रो-एंजिनियरिंग् ही पोटशाखा आहे. तींत वरीलप्रमाणें सामान्य व इलेक्ट्रो–टेक्नालजीसारखे विशिष्ट विषय शिकावे लागतात.

पांचवी रसायनज्ञांची शाखा. ईंत ऑरगॅनिक व इन-ऑरगॅनिक आणि अनालिटिकल् केमिस्ट्री, मिनरॉलजी, क्रिस्टालोग्राफी, बॉटनी वगैरे वगैरें विषय असतात. शिक्षणाचे तासही वरप्रमाणेंच. शिक्षण चार वर्षांचें.

शेवटली शाखा कृषिविद्येची. ईंत फिजिक्स, केमिस्ट्री व एकॉनमी हे सामान्य विषय असून, प्राणि व वनस्पतिशास्त्राचें सांगोपांग अध्ययन व्हावें लागतें. हें साधारण पहिल्या वर्षी होतें. दुसऱ्या वर्षापासून खरोखरीच्या कृषिविद्येला आरंभ होतो. प्रथम भूस्तरविद्या, नंतर जमिनीची माहिती, क्लिमॅटॉलजी, वनस्पतींचें पोषण, झाडें व धान्यें पेरणें, वाढवणें इ. त्यांचे रोग व त्याविरुद्ध इलाज, जनावरांचे आजार वगैरे, शेतीच्या अवजारांची माहिती इत्यादि विषय दुसऱ्या वर्षी होतात. तिसऱ्या वर्षी झाडें व जनावरें यांची पैदास व आरोग्य, शेतकऱ्यांस अवश्य असें गणित, जमाखर्च यांचें ज्ञान व ॲग्रिकल्चरल टेक्नालजी इत्यादि विषय शेवटल्या वर्षी असतात. कोऑपरेशन–पतपेढ्या वगैरेंची माहिती विद्यार्थ्यांनीं घ्यावी अशी व्यवस्था केलेली असते. आठवड्यांतून तासांची संख्या २० ते २५ असते.

याप्रमाणें इष्ट बाजूकडचें शिक्षण संपल्यावर परीक्षा होते; व तींत उत्तीर्ण झाल्यावर डिप्लोम् ( इं. डिप्लोमा ) दाखला मिळतो. डिप्लोम्-एंजिनियर ही पदवीही अशा उत्तीर्ण झालेल्यांस लावतां येते. पण या शेवटल्या परीक्षेच्या आधीं दर सेमेस्टर अगर टर्मच्या शेवटीं ' सेमेस्ट्राल् प्र्यूफुंगेन् ' नांवाच्या परीक्षा घेतल्या जातात. मात्र या आवश्यक नसतात. ज्यांना स्कॉलरशिपा मिळवावयाच्या असतात, अगर ज्यांस आपण

अमुक इतकीं लेक्चरें ऐकलीं असा दाखला हवा असतो त्यांस मात्र या परीक्षांस बसावेंच लागतें. शिक्षकांसाठीं परीक्षा शेवटीं असते; तींत ते उत्तीर्ण झाल्यास त्यांस डॉक्टर ही पदवी मिळते. याशिवाय आणखी एक परीक्षा अबकारी व कस्टम्स् खात्यांत जाऊं इच्छिणारासाठीं असते.

हें शिक्षण संपादून वरील परीक्षांस बसण्याची इच्छा ज्यांस असेल त्यांनीं टेक्निकल् कॉलेजचे विद्यार्थी असावें लागतें. केवळ श्रावकांस ( हॅारर–ज्यांस रीतसर विद्यार्थी होतां येत नाहीं, पण लेक्चरें वगैरे थोडी फी देऊन ऐकायला मिळतात असे ) या परीक्षा देतां येत नाहींत. विद्यार्थी होण्यास खालील गोष्टी लागतात:—

१ चांगल्या वर्तणुकीचा दाखला.

२ योग्य पूर्वशिक्षण मिळाल्याचा दाखला. नऊ वर्षें शिक्षण देणाऱ्या गिम्नासिउम्, रेआलगिम्नासिउम् व ओबररेआल्शूल यांचें, अगर एखाद्या टेक्निकल् स्कूलचें संपूर्ण शिक्षण मिळालेलें असलें म्हणजेच फक्त टेक्निकल् कॉलेजमध्यें प्रवेश मिळतो. परदेशीयांनीं आपलें शिक्षण वरील योग्यतेचें म्हणजे आपापल्या देशांतील युनिव्हर्सिटी–प्रवेशापुरतें झालें असल्याचा व आपण अमुक राष्ट्राचे आहों असा दाखला द्यावा लागतो.

३ योग्य वय ( २१ वर्षांपासून पुढें ) नसल्यास बापाच्या अगर पालकाच्या परवानगीचा दाखला.

याप्रमाणें दाखले कॉलेजांत रुजू करून ते योग्य आहेत अशी खात्री पटविली, म्हणजे रेक्टरशीं हस्तांदोलन होऊन ‘मािट्रकेल’ अगर विद्यार्थिपणाचा दाखला मिळतो, त्याबरोबरच आपलें नांव गांव असलेलें एक कार्ड मिळतें. यास ‘लेजिटिमात्स्योन्स्’ कार्ट म्हणतात. हें असलें म्हणजे कॉलेजच्या घटकावयवाचे सर्व हक्क बजावतां येतात. हा सर्व विधि युनिव्हर्सिटीसारखाच असतो. कॉलेज अगर युनिव्हर्सिटी उघडल्यापासून एक महिन्याच्या आंत हा सर्व विधि उरकून घ्यावा लागतो.

परदेशीयांची ठराविक संख्याच तेवढी घ्यायची हा बहुतेक सर्व टेक्निकल् कॉलेजांचा नियम आहे. दर सेमेस्टरच्या शेवटीं सध्यां कोणत्या परदेशांतील किती विद्यार्थी पटावर आहेत व पुढल्या सेमेस्टरला किती घ्यायचे आहेत याविषयीं नोटिस् कॉलेज् बोर्डवर आगाऊच लागते. एखाद्या सेमेस्टरला ठराविक संख्या भरून शेवटीं त्यांतून कोणी कमी झालें नाहीं, तर पुढल्या सेमेस्टरमध्यें नवीन परदेशीय विद्यार्थी घेत नाहींत. युनिव्हर्सिट्यांत मात्र सुदैवानें असला पंक्तिप्रपंच होत नाहीं.

## कांहीं हक्क.

विद्यार्थ्यांस दर टर्मला १ पासून ३ मार्क भरले म्हणजे आजारीपणांत उत्तम डॉक्टरकडून फुकट औषध, व अवघड दुखण्यांत सरकारी दवाखान्यांत फुकट जागा व शुश्रूषा हे हक्क असतात. हे युनिव्हर्सिटी व टेक्निकल कॉलेज यांतील विद्यार्थ्यांस सारखेच असतात. शिवाय दर सेमेस्टरला अर्धा मार्क् (सहा आणे) भरला म्हणजे विमा उतरला जातो, व कांहीं अपघात अगर मरण मध्येंच म्हणजे विद्यार्थीपणांतच प्राप्त झालें, तर ५००० पासून १०००० मार्क पर्यंत पैसे मिळूं शकतात, याशिवाय नाटकाच्या तिकिटाचे अर्ध्याच्याही खालीं, जवळ जवळ पाव दर, म्यूझियम् वगैरेंत अगदीं थोडे पैसे एकदां देऊन वाटेल तेव्हां प्रवेश वगैरे अनेक सवलती सर्व तऱ्हेच्या वरिष्ठ शिक्षणाच्या विद्यालयांतील विद्यार्थ्यांस असतात.

## फी वगैरे खर्च.

कॉलेजची प्रवेश फी २० मार्क, परस्थांस ४० मार्क—उशीर केल्यास अनुक्रमें ३० व ६० मार्क–असते. ही बहुतेक दोन वर्षांपुरतीच असते. पुनः त्याच कॉलेजांत रहावयाचें असल्यास परत अनुक्रमें १० व २० मार्क् द्यावे लागतात. शिवाय परदेशीयांस दर सेमेस्टरला परदेशस्थ म्हणूनच ५० मार्क अधिक फी पडते. याशिवाय ज्या ज्या प्रोफे-

सरांचीं लेक्चरें ऐकावयाचीं असतील त्यांस फी द्यावी लागते. साधारण सर्व लेक्चरें व सेमिनार्, ड्रॉइंग् व गणित यांच्या यूबुंगेन् (प्रवचनें) यांस आठवड्यांतील दर तासास ४ मार्कप्रमाणें सेमेस्टरची फी असते. उ० एका विषयाचीं ४ लेक्चरें आठवड्यांत ऐकलीं तर सर्व सेमेस्टरची त्या विषयाची फी १६ मार्क् ( १२ रु. ) होते. केमिस्ट्री व इतर विषयांच्या प्रयोगासाठीं दर तासाला ८ मार्क् व ज्या विषयाचे प्रयोग आठवड्यांतून ४ तासांवर असतील त्यांस सर्व सेमेस्टरबद्दल एकंदर २६ मार्क फी असते. ग्यास् वगैरेंबद्दल आठवड्यांतल्या तासागणिक १ मार्क् द्यावा लागतो.

## परीक्षेची फी.

डिप्लोम्परीक्षेसाठीं जर्मन विद्यार्थ्यांस ४० व इतरांस ८० मार्क् फी द्यावी लागते. डॉक्टर् डिग्रीच्या परीक्षेसाठीं युनिव्हर्सिटीप्रमाणेंच २४० मार्क् ( १८० रु. ) द्यावे लागतात.

## व्यवस्था.

याप्रमाणें विद्यार्थी घेण्याचें, शिकविण्याचें व परीक्षेचें आणि इतर कालेजसंबंधीं काम पाहण्यासाठीं एक सेनेट असते. एक रेक्टर् व सहा शाखांचे सहा प्रतिनिधी इतकेच तिचे सभासद असतात. निरनिराळीं कामें करण्यासाठीं ही सेनेट निरानिराळ्या कमिट्या नेमते. या सेनेटवर विद्याखात्याच्या मंत्र्याचा आधिकार असतो. प्रोफेसरांनीं शिफारस केलेला माणूस राजाकडून ३ वर्षें रेक्टर् नेमला जातो. दर खेपेचा जुना रेक्टर् नव्या रेक्टर्ला प्रो–रेक्टर या नात्यानें मदत करतो. शाखांचे प्रतिनिधि प्रोफेसरांनीं निवडून दिलेले असतात. सेनेट्ही अशी लहान संस्था असल्यामुळें कामें बिनबोभाट व लवकर उरकतात.

## आंकडे.

अशा तऱ्हेचीं टेक्निकल् कॉलेजेस् जर्मनींत बरींच आहेत. पैकीं म्यूनिच् येथें एक आहे. त्यांत ऑर्डिनरी व एक्स्ट्राऑर्डिनरी प्रोफेसर्, लेक्चरर्

व डेमॉनस्ट्रेटर्स् मिळून शिक्षकांची संख्या शंभरास थोडीशीच उणी म्हणजे त्र्याण्णव ९३ आहे. साक्सनींत ड्रेसडेन् येथें एक कॉलेज आहे व एक बाडेन् प्रांतांत आहे. खुद्द प्राशियांत अशीं कॉलेजें पांच आहेत. १ बर्लिन्, २ हानोव्हर्, ३ आखेन् ( इं. एलाशापेल् ), ४ डांझिक्, व ५ ब्रेस्लाउ. या पांची मिळून १९११ सालीं विद्यार्थ्यांची संख्या ७१९८ व श्रावकांची ( हॉरर् ) ६३८ होती. पैकीं एकट्या बर्लिन् येथें (खरें म्हटलें असतां शार्लोटेन्बुर्ग् येथें ) ही संख्या ३०५२ व २५३ अशी होती. या सर्व कॉलेजांमिळून फक्त ७७२ विद्यार्थी परदेशचे होते. एकंदर जर्मनींतल्या या कॉलेजांतील विद्यार्थ्यांची संख्या दहा हजारांवर भरेल. यावरून वरिष्ठ प्रकारच्या धंदेशिक्षणाची तिकडे किती आवश्यकता भासते व त्याविषयीं कसकसे प्रयत्न केले जातात हें सहज कळण्याजोगें आहे.

---

# प्रकरण ३ रें.

## व्यापारी शिक्षणाचीं कॉलेजें.

या शिक्षणाची आवश्यकता, धंद्यांची वाढ होऊन परदेशांशीं व्यापार करण्यासारखी जेव्हां जर्मनीला स्थिति आली, तेव्हांच भासूं लागली. ही चळवळ वीसपंचवीस वर्षांपलीकडची नाहीं. देशांतल्या देशांत व्यापार करण्यास जें ज्ञान, जी माहिती व जें कौशल्य लागतें तें बेताबाताच्या व्यापारी शाळांतून व स्वानुभवानें मिळवितां येतें. पण व्यापारी बाबतींत परराष्ट्रांशीं टक्कर मारण्याचा प्रसंग येतो, तेव्हां तसल्या तुटपुंज्या शिक्षणावर व केवळ स्वानुभवावर अवलंबून राहून भागत नाहीं. कारण ठेंच खाऊन अनुभव घेण्यांत आपण गुंतावें व शहाणें होऊं लागावें, तों लोक आधींच आपल्या पुढें गेलेले आपणांस दिसण्याची पाळी येते. जगाच्या व्यापारी चढाओढींत आपण पडायचें व शक्य असल्यास तींत अग्रस्थान

मिळवायचें हें जर्मनीनें एकदां कायमचें ठरवून टाकल्यावर मग प्रश्न काय तो मार्गाचा उरला. ते मार्ग दोनच होत. पैकीं देशी धंद्यांस उत्तेजन देऊन त्यांची वाढ करवणें व त्यांस परदेशीय धंद्यांशीं टक्कर देण्यास समर्थ करून सोडणें हा एक. त्याविषयीं जर्मनीनें काय केलें याची माहिती गेल्या प्रकरणांत दिली. दुसरा मार्ग आपला परदेशाशीं व्यापार वाढवून, त्याच्या रीति सुधारणें व या सुधारलेल्या रीतींनीं इतरांचा पाडाव करून त्यांचा व्यापार काबीज करणें हा होय. यासाठीं जर्मनींत व्यापारी कॉलेजें स्थापलीं गेलीं. हीं मोजकींच म्हणजे सर्व जर्मनींत पांच चारच आहेत.

हीं सर्व कॉलेजें, स्थलपरत्वें किरकोळ फेरफार आहेत ते वगळले असतां, साधारण एकाच नमुन्याचीं आहेत असें म्हणण्यास हरकत नाहीं. सर्वांत शिक्षण एकाच उद्देशानें, सारख्याच तऱ्हेवर व सारख्याच परिणामाचें दिलें जातें. यामुळें लाइप्झिक् येथील प्रसिद्ध ' व्यापारी कॉलेज ' नमुन्यादाखल धरून त्याची विस्तृत माहिती दिली असतां जास्त बरें होईल असें वाटतें, म्हणून त्याची माहिती खालीं दिली आहे.

## उद्देश.

व्यापारांत पडूं इच्छिणाऱ्या ( व्यापारांत बॅंकिंग्, इन्शुरन्स् वगैरेंचाहीं समावेश होतो ) होतकरू तरुणांस व्यापारी व सामान्य शिक्षण परिपूर्ण देणें, व दुय्यम व्यापारी शिक्षणाच्या शाळांसाठीं तात्त्विक व प्रयोगद्वारां शिक्षण देऊन योग्य शिक्षक तयार करणें, असा जोड उद्देश या कॉलेजचा असून, तो साध्य करण्यासाठीं युनिव्हर्सिटी, सरकार व हाण्डेल्स् कामर्–इं. चेम्बर ऑफ कॉमर्स् ( व्यापारीमंडळ ) यांनीं आपल्या वतीनें एक व्यवस्थापक मंडळ अगर सभा स्थापन केली आहे.

## सेनेट.

हें मंडळ अगर सेनेट विद्यामंत्र्याच्या आधीन असून, त्याचे अकरा सभासद आहेत. १ सरकारचा प्रतिनिधि, १ म्युनिसिपालिटीचा प्रतिनिधि,

३ हाण्डेल्स् कामरचे सभासद, ३ युनिव्हर्सिटी सेनेटनें आपल्या प्रोफेसरांपैकीं निवडलेले प्रोफेसर व्यापारी कॉलेजांतील टेक्निकल विषय शिकविणारीं दोन माणसें व एक डिरेक्टर्. या सेनेटचा अध्यक्ष व उपाध्यक्ष दर दोन वर्षांनीं निवडले जातात. त्यांनीं कॉलेजची सर्व तऱ्हेची देखरेख करावयाची असते. पण अन्तर्व्यवस्था पाहण्याचें काम डिरेक्टरकडे सोंपिलेलें असतें. त्यानेंच प्रोफेसरांच्या मदतीनें वेळापत्रकें, अभ्यासक्रम वगैरे ठरवायचें असतें. तिजोरी, पुस्तकालय, प्रवेशपरीक्षा वगैरे वेगवेगळ्या खात्यांसाठीं सेनेटनें नेमलेलीं वेगवेगळीं मंडळें असतात.

या कॉलेजांत चारप्रकारच्या लोकांस प्रवेश मिळतो. १ नऊ वर्षें शिक्षण देणाऱ्या शाळांपैकीं कोणतींत तरी पुरें शिक्षण मिळविलेलें आहे अशांस, २ दुय्यम व्यापारी शाळांत संपूर्ण शिक्षण घेतलेल्या विद्यार्थ्यांस ( अशा दुय्यम व्यापारी शाळा कीं ज्यांच्या सर्वांत वरचा क्लास नऊ वर्षें शिक्षण देणाऱ्या शाळांच्या वरच्या क्लासाच्या बरोबर असतो ), ३ लेरर्-सेमिनारमध्यें शिक्षण पुरें झालें असल्याबद्दल ज्यांस दाखला मिळाला आहे अशा शिक्षकांस व ४ ज्यांस एक वर्ष व्हॉलंटीयर् सर्व्हिसचा हक्क मिळालेला असून त्यांनीं ३।४ वर्षें एखाद्या चांगल्या दुकानीं काढून व्यापारी माहिती बरी असल्याबद्दल दाखला मिळविलेला असेल अशा व्यापाऱ्यांस. परदेशीयांसही या कॉलेजांत मुक्तद्वार प्रवेश आहे हें आश्चर्य आहे ! मात्र वर सांगितल्याप्रमाणें त्यांचें पूर्वशिक्षण झालें असलें पाहिजे.

हें पूर्वशिक्षण, चांगल्या वर्तणुकीचा व परदेशस्थ असल्यास तेथील सरकारचा दाखला वगैरे कॉलेजमध्यें हजर केल्यावर ' माट्रिकेल् ' अथवा त्या कॉलेजचा विद्यार्थी असल्याचा दाखला मिळतो. त्यासाठीं जर्मन विद्यार्थ्यांस २० मार्क ( १५ रु. ) व परदेशीयांस १०० मार्क ( ७५ रु. ) फी पडते. अशी माट्रिकेल मिळालेल्या विद्यार्थ्यांस युनिव्हर्सिटींतील लेक्चरेंसुद्धां फी देऊन ऐकतां येतात, व तेथील सेमिनार-मध्यें काम करतां येतें. ज्यांस वरीलप्रमाणें शिक्षणाचे दाखले देतां येत

नाहींत, त्यांस इच्छा असल्यास ४ ते १० मार्क नुस्ते देऊन हॉरर्-श्रावक होतां येतें. यांजवर मात्र सेनेटचा ताबा असत नाहीं. फक्त 'मात्रिकेल' मिळालेल्या विद्यार्थ्यांवर मात्र तिची हुकमत चालते. गैरवर्तनाबद्दल वगैरे शिक्षा–५० मार्कपर्यंत दंड, अटक, घालवून देण्याची धमकी, प्रत्यक्ष घालवून देणें इत्यादि प्रकारच्या–सेनेटला देतां येतात. आपल्या खुषीनें कॉलेज सोडल्यास, अगर तीन वर्षांनीं आपोआपच, किंवा कांहीं अपराधास्तव सेनेटनें मात्रिकेल काढून घेतल्यास कॉलेजचें विद्यार्थीपण व त्याजबरोबर प्राप्त होणारे हक्क व जबाबदाऱ्या संपतात. अशा वेळीं मॉट्रिकेल, कॉलेजच्या इतर चिठ्याचपाट्या, लायब्ररीतील पुस्तकें वापरण्याविषयीं परवानगी वगैरे सर्व परत करावीं लागतात.

## शिक्षणक्रम.

या कॉलेजांत शिकविल्या जाणाऱ्या विषयांचे ग्रूप अगर भाग केलेले आहेत. ते असेः—

१ अर्थशास्त्र. यांत १ सामान्य (तात्त्विक) अर्थशास्त्र व अर्थशास्त्राचा इतिहास, २ विशिष्ट अथवा व्यावहारिक अर्थशास्त्र, ३ फिनॅन्स्, ४ औद्योगिक इतिहास (विशेषतः व्यापाराचा इ०), ५ सामाजिक राजनीति (विशेषतः कामकऱ्यांचा प्रश्न) यांचा समावेश होतो. पैकीं पहिलें प्रत्येक नव्या विद्यार्थ्यांस पहिल्याच सेमेस्टर अगर टर्ममध्यें ऐकावें लागतें. दुसरें विशिष्ट अथवा व्यावहारिक अर्थशास्त्र हें व्यापारी शिक्षणास अत्यंत महत्वाचा गणलें जातें. त्यांत नाणें, पतपेढ्या, व्यापारी व दळणवळणासंबंधी कायदा आणि कलोनियल् राजनीति हे विषय फार व्यवस्थेनें व नेहमींनेहमीं शिकविले जातात.

२ कायदा. १ सामान्य कायदा अगर कायद्यांत प्रवेश, २ व्यापारी कायदा, देवघेवीचा कायदा, समुद्राविषयीं कायदा इत्यादि, ३ इन्टरनॅशनल् कायदा (कॉन्सलेट वगैरेत नोकरी धरून परदेशीं जाणारांसाठीं),

४ कांकुर्सरेश्ट् अगर बँकरप्ट्सी अगर दिवाळें याविषयीं कायदा, ५ ऑब्लिगेशन्स्, ६ कॉपीराइट, ७ धंद्यांविषयीं कायदा, ८ इन्शुरन्स् कायदा.

३ भूगोल. सामान्य भूगोल, फिजिकल् जिऑग्रफी (भूपृष्ठशास्त्र), आंथ्रोपोजिऑग्रफी, राजकीय व व्यापारी भूगोल. त्यांतच एथ्नॉलजी, सोसीऑलजी व आंथ्रोपॉलजी हीं गणलीं जातात.

४ व्यापारी विषय. पत्रव्यवहार, अकौंटिंग्, व्यापारी गणित, जमाखर्च, मेकॅनिकल टेक्नालजी ऑफ टेक्स्टाइल, केमिकल टेक्नालजी.

५ व्यापारी शिक्षकांस आवश्यक लागणारें मानसशास्त्र, तत्त्वज्ञान, व शिक्षणशास्त्र यांचें ज्ञान.

६ सामान्य संस्कृति देणारें शिक्षण. इतिहास, वाङ्मय, कलांचा इतिहास, नव्या भाषा, व सृष्टशास्त्रें. यांवर युनिव्हर्सिटींत व्याख्यानें होतात तीं ऐकण्याची विद्यार्थ्यांस शिफारस केली जाते.

## परीक्षा.

याप्रमाणें कमींत कमी पांच सेमेस्टर् शिक्षण घेऊन झालें म्हणजे परीक्षेस बसतां येतें. त्याबद्दल अर्ज 'प्र्यूफुंग्ज् कमिश्योन्' परीक्षकमंडळाकडे करावा लागतो. अर्जासोबत जर्मन विद्यार्थ्यांस ६० व इतरांस १०० मार्क परीक्षेच्या फीदाखल भरावे लागतात. ज्या कॉलेजच्या परीक्षेस बसायचें त्यांत पांचांपैकीं निदान तीन टर्म्स् घालविलेल्या असाव्या लागतात; व अर्थशास्त्र, चलनी नाणीं वगैरेचें शास्त्र, व्यापारी–देवघेवीचा कायदा, व्यापारी भूगोल, व्यापारी इतिहास; आणि नाणीं–पतपेढ्या, व्यापारी नीति, अर्थशास्त्राचा इतिहास, विमा, वसाहतींची व्यवस्था व आंकडेशास्त्र यांपैकीं निदान दोन–या विषयांचीं व्याख्यानें ऐकल्याचा दाखला द्यावा लागतो. त्याबरोबर व्यापारी हिशेब, राजकीय गणित, जमाखर्च, व्यापारी पत्रव्यवहार इत्यादींचें प्रत्यक्षप्रयोगसिद्ध ज्ञान असावें लागतें. परीक्षा लेखी व तोंडीं असते. लेखी परीक्षेला एक तात्त्विक व

एक प्रायोगिक असे दोन विषय घेऊन त्यांवर प्रत्येकीं चार तासांच्या आंत निबंध लिहून द्यावा लागतो. तोंडीं परीक्षा वरील सर्व विषयांची द्यावी लागते. त्या सर्वांना मिळून साडेतीन तासांपेक्षां जास्त वेळ मिळत नाहीं. ज्यांनीं फ्रेंच व इंग्रजी भाषांचा अभ्यास पूर्वींच शाळेंत करून दाखला मिळविलेला नसेल, त्यांस या भाषांची परीक्षा प्रथम द्यावी लागते व मग वरील विषयांची परीक्षा होते.

शिवाय शिक्षकाचें काम करणारांसाठीं निराळी परीक्षा असते. ही देणारांनीं आपली प्राथमिक शिक्षकांची 'डिपार्टमेंटल्' परीक्षा झाली आहे, अगर आपण कोणत्या तरी प्रकारच्या दुय्यम शाळेंत नऊ वर्षें शिक्षण संपादिलेलें आहे, असा दाखला हजर करावा लागतो. याशिवाय पांच वर्षें प्रत्यक्ष व्यापारांत पडलेल्या माणसांसही पांच सेमेस्टर शिक्षण झाल्या-वर या परीक्षेस बसतां येतें.

लाइपझिक् येथील कॉलेजाशिवाय अशीं व्यापारी कॉलेजें जर्मनींत काय तीं दोनचारच आहेत. लाइप्झिक् येथील कॉलेजांत १९११ च्या उन्हाळ्यांत २४६ जर्मन व २६० इतर देशचे विद्यार्थी होते. यावरून या कॉलेजाचें महत्त्व परदेशींही कसें वाढलें आहे हें लक्षांत येईल. शिक्ष-कांची संख्या तीस एक आहे. म्हणजे यांतही १७ विद्यार्थ्यांस १ शिक्षक असें प्रमाण पडतें; हें प्रमाण युनिव्हर्सिटीसारखें आहे, हें प्रकरण ४ यांतील शेवटल्या आंकड्यांवरून सहज लक्षांत येण्यासारखें आहे. खर्च सरकार, शहर व हाण्डेल्स् कामर मिळून करतात; त्याविषयीं आंकडे उपलब्ध झाले नाहींत.

---

# प्रकरण ४ थें.

## आणखी कांहीं प्रकार.

या दोन प्रकारांशिवाय जर्मनींत व्यावहारिक शिक्षणाचे आणखी कांहीं किरकोळ प्रकार आहेत. त्यांतील कांहींचा कांहीं ठिकाणीं युनिव्हर्सिटींत अन्तर्भाव होतो. उदाहरणार्थ, ट्यूबिंगेन् लाइप्झिक्सारख्या युनिव्हर्सिटयांतच कृषिविद्येचें शिक्षण होतें. कांहीं ठिकाणीं टेक्निकल् कॉलेजमध्यें शिक्षणाची ही एक बाजू असते; तर कांहीं ठिकाणीं या विषयासाठीं निराळींच स्वतःसिद्ध अशीं कॉलेजें असतात. बर्लिन् येथें एक ' लाण्डविर्ट्शाफ्टालिश होख्शूल–इं अॅग्रिकल्चरल् कॉलेज आहे. यांतही प्रवेशाचे वगैरे नियम सर्व टेक्निकल् कॉलेजप्रमाणेंच आहेत. परीक्षेस चारच सेमेस्टर पुरतात. परीक्षेची फी १२० मार्क पडते. या शाळेंत १९०१ सालीं विद्यार्थ्यांची संख्या १०७८ होती. खर्च ५ लक्ष मार्क लागला त्यांपैकीं ४ लक्ष मार्क सरकारी तिजोरींतून खर्च झालें. या कॉलेजांत शिक्षणाचे तीन भाग केले आहेत. पैकीं १ ला कृषि व तत्संबंधी शास्त्रें, २ टेक्निकल् व ३ तत्संबंधी व्यवहार.

२ प्राणिवैद्यकाचेंही एक कॉलेज् बर्लिन् येथें वेगळें आहे. सर्व गोष्टी इतर कॉलेजप्रमाणें यांतही आहेत. फी १०० मार्क व अभ्यास ७ सेमेस्टरचा लागतो. विद्यार्थी फक्त ३०१ च आहेत, पण त्यांसाठीं ५ लक्ष मार्क खर्च येतो, पैकीं अर्धा सरकार देतें.

३ बेर्ग् आकाडेमी–इं. माइनिंग अॅकॅडेमी. यांत माइनिंग इन्डस्ट्रीज् अथवा खनिजांविषयीं सर्व धंद्यांचें शिक्षण मिळतें; भट्या लावून धातू शुद्ध करणें, क्षारांविषयीं वगैरे माहिती मिळते. तीनपासून चार सेमेस्टर् शिक्षण मिळविलें म्हणजे डिग्रीच्या परीक्षेला बसतां येतें. यांत १९११

सालीं २५० विद्यार्थी होते. वर्षाचा जवळजवळ ७ लक्ष मार्क खर्च बहुतेक सरकारनें केला.

४ फोर्स्ट आकाडेमी–इं. फॉरेस्ट अकॅडमी, अथवा आपण ज्यास जंगल-खातें ह्मणतों त्याला आवश्यक व तद्विषयक सर्व ज्ञान येथें मिळतें. ट्यूबिंगेन् येथेंही युनिव्हर्सिटीचीच एक शाखा आहे. आपलेकडे फॉरेस्ट ऑफिसर होऊन येणारे सर्व गोरे लोक एखादें वर्ष तरी तेथें माहिती घेण्यांत घालवितात. बर्लिन् येथें हें कॉलेज स्वतंत्र आहे. येथें दर आठवड्यास २० तास असें सहा सेमेस्टरपर्यंत शिक्षण घ्यावें लागतें. परीक्षेची फी ७५ मार्क पडते. यांत १९११ सालीं अवघे ५६ विद्यार्थी होते. वर्षाचा खर्च १॥ लक्ष मार्क झाला. पैकीं १ लक्ष ३० हजार सरकारनें दिला.

याशिवाय संगीताच्या अकॅडमीज़् आहेत त्या निराळ्याच.

## विशिष्टीकरण.

या सगळ्यांचा हेतु त्या त्या विशिष्ट धंद्याचें अगर व्यापाराचें सांगोपांग व अगदीं आजकालच्या घडीपर्यंत आणून ठेवलेलें असें ज्ञान व्याख्यान व प्रयोगद्वारां मिळावें, हा असल्यामुळें जगाच्या व्यापारी व औद्योगिक चढाओढींत पडण्याला ज्ञानानें, अनुभवानें व परिपूर्ण माहितीनें युक्त अशीं माणसें निपजतात यांत शंका नाहीं. सरासरी पंचवीस वर्षांचे अवधींत जर्मनीनें इंग्लंडशीं स्पर्धा करून जगाचे व्यापारांत दुसरें स्थान मिळविलें याचें बीज याच गोष्टींत आहे. सर्वज्ञ माणसें जगाचा व्यवहार भान-गडीचा नव्हता तेव्हां निपजणें शक्य होतें. पण तो व्यवहार जेव्हां विस्तार पावला, त्याच्या अनंत शाखांचें प्रचंड जाळें जसजसें जगभर पसरूं लागलें, तसतसें सर्वज्ञ माणसास जगांत स्थान नाहींसें होऊं लागलें. ज्ञानाची अगर व्यवहाराची एखादी लहानशीच शाखा इतकी पालेदार झाली कीं, तिचें एकटीचें आकलनसुद्धां एका माण-साच्या आटोक्याबाहेरचें होत चाललें. अशा वेळीं एका व्यक्तीनें या प्रचंड जाळ्याचा एकच धागा काळजीपूर्वक व परिश्रमानें

उकलीत बसण्याशिवाय दुसरें गत्यंतर राहिलें नाहीं. ज्यांनीं आजच्या जगाची ही परिस्थिति योग्य तऱ्हेनें अजमावली ते योग्य वेळींच जागे झाले. त्यांनीं अगदीं सूक्ष्म तऱ्हेचा श्रमविभाग व विशिष्टीकरण यांचा अवलंब केला. अशा जाग्या झालेल्या राष्ट्रांपैकीं जर्मनी एक आहे. कोणतीही गोष्ट अंगावर घेतली म्हणजे तिची सांगोपांग परिपूर्ति करायची या आपल्या बीदाला अनुसरून जर्मनीनें हें विशिष्टीकरणाचें तत्त्व अगदीं शिखराला पोंचविलें. त्यामुळें ज्ञानाच्या व व्यवहाराच्या प्रत्येक शाखेगणित शाळा व कॉलेज आज जर्मनींत पहायला सांपडतात; यांत अतिशयोक्ति किमपिसुद्धां नाहीं. विशिष्टीकरणाच्या तत्त्वाचा असा बोलबाला झालेला पाहून कोणीही परस्थ आश्चर्यानें थक्क झाल्याखेरीज राहत नाहीं.

# भाग ६ वा.

## उपसंहार.

याप्रमाणें जर्मनींतील लोकशिक्षणाच्या निरनिराळ्या अंगांची यथामति माहिती दिली. निरनिराळ्या परिस्थितींत शिक्षणाची वाढ दोहींकडे झाल्यामुळें जर्मनी व हिंदुस्थान यांची तुलनाच करतां येत नाहीं. तिकडे शिक्षण व्यवस्थितपणें रुजविलेलें व योग्य तऱ्हेनें अंतर्मुख व बहिर्मुख वाढीस लावलेलें असें आहे. आपणांकडे शिक्षणरूपीं हें रोपटें अपरिचित परिस्थितींत नव्यानेंच आणून लावल्याप्रमाणें सहजगत्या वाढावें तसें वाढत नाहीं. त्याची हळू हळूं एकजिनसी वाढ होत नाहीं. जसजशी वेळ येईल तसतसें तें सांधलें जात आहे. कांहीं तरी एका धोरणाला अनुसरून त्याची वाढ झालेली नाहीं व आजही होत नाहीं. त्याच्या निरनिराळ्या शाखांत नीटसा मेळ नाहीं. उदाहरणार्थ, प्राथमिक व दुय्यम शिक्षण यांमध्यें एकमेकाशीं मुळींच मेळ नाहीं. पहिल्या चार वर्षांत जे विषय होतात त्यांपैकीं कांहीं पुढील सात वर्षांत पुनः इंग्रजीचे द्वारां केले जातात. दुय्यम शिक्षणाचाही पुढील शिक्षणाशीं मेळ घातलेला नाहीं. मागें काय ज्ञान संपादिलें व पुढें अभ्यासक्रम त्याच पायावर कसा उभारला गेला पाहिजे या गोष्टीकडे लक्ष्य नाहीं. मॅट्रिकपर्यंत संस्कृत किती होतें व व्हावें व तें जमेस धरून पुढील तीन चार वर्षांत काय काय पुस्तकें नेमावीं, या बाबतीचा विचार होतोसा दिसत नाहीं; इतिहासाचेंही असेंच होतें. हिंदुस्थानचा इतिहास सात इयत्तांत सनावळी व घराणीं, लढाया यांची माहिती यांच्या पलीकडे जात नाहीं; व पुढें कॉलेजांत एका वर्षाची उडी मारून मारुतीप्रमाणें तो इंटरमीजिएट्चे क्लासांत एकदम उभा राहतो. सृष्टशास्त्रांना

दुय्यम अभ्यासक्रमांत शिष्टसंमत स्थान म्हणावें तसें मिळालेलें नाहीं. शिवाय दुय्यम शिक्षणरूपी पाया फारच अव्यस्थित व कच्चा भरला गेला असल्यामुळें वरील इमारतही डळमळीत होते. आयुष्याचीं पहिलीं कोंवळीं ११।१२ वर्षें घालवून मॅट्रिक झाल्यावर पहावें तों विद्यार्थ्याच्या पदरांत कांहीं फारसें पडलेलें नसतें. स्वभाषेचें अध्ययन थांबलेलें, संस्कृत फारसें नाहीं म्हणण्यासारखेंच व सात वर्षें माराकुटी करूनही इंग्रजीच्या नांवानें जवळ जवळ शून्यच ! सात वर्षांच्या उरस्फोडीचें व खर्चाचें हें फळ.

तसेंच पुढेंही. युनिव्हर्सिटींत ४।५ वर्षें घालवून जीवनकलहांत पडण्याला ज्ञानानुभवानें पात्रता यावी, ती कोणांत येतेशी दिसत नाहीं. आमचे ग्राज्वेट नोकरीसाठीं हापापलेले, त्यांस ज्ञानाची चाड नाहीं, वगैरे त्यांच्या नांवानें जी जबाबदार व बेजबाबदार लोकांकडून सारखीच ओरड होत असते, तींत कदाचित् थोडेंसें तथ्य असेल; पण जें ज्ञान आयुष्यक्रमांत पडल्यावर त्यांतील टक्केटोणपे सोसण्याची पात्रता आंगीं आणून देत नाहीं, तें ज्ञान काय कामाचें ? आमच्या युनिव्हर्सिटींत जें ज्ञान मिळतें तें धड कारकुनी बाण्यासही फारसें उपयोगीं पडण्यासारखें नसतें. आमची युनिव्हर्सिटी ‘ सामान्य संस्कृति ’ मिळवून देते, यापेक्षां अधिक तें तिनें काय करावें, असेंही म्हणण्यांत येतें. पण ज्या शिक्षणांत मातृभाषा व इंग्रजी इतिहासासारखा विषय वगळला जातो, तें कोणची मोठीशी सामान्य-संस्कृति देणार ! बरें, विशिष्टीकरणाचें तत्त्व आमच्या युनिव्हर्सिटीनें अंगीकारलें आहे, तेव्हां सामान्य संस्कृति मागेंच राहून अगर होऊन गेली असें म्हणावें, तर दुय्यम शिक्षणांत ती देण्याची धमक आजवर तरी नाहीं. व विशिष्टीकरण तरी आमच्या येथें कोणच्या स्वरूपाचें रडतें आहे ? शेवटल्या १।२ वर्षांच्या विशिष्टीकरणानें म्हणजे ‘ स्पेशलिस्ट्स् ’ अगर आपापल्या विषयांत तज्ज्ञ लोक उत्पन्न होतील अशांतला थोडाच भाग आहे ?

## मातृभाषा.

आमच्या दुय्यम व श्रेष्ठ प्रतीच्या शिक्षणांतील अगदीं पठाडी गोम म्हणजे सर्व विषय परकी भाषेच्या द्वारें शिकविले जातात ही होय. प्राथमिक

शाळेचीं चार व दुय्यम शाळेचीं जेमतेम दोन वर्षें मातृभाषेच्या द्वारानें शिक्षण दिलें जातें. पुढें सर्व विषय इंग्रजीच्या द्वारें शिकविले जातात. फार काय सांगावें, संस्कृत, गणित व हिंदी इतिहास हे विषय, इतकेंच नव्हे तर मातृभाषा सुद्धां इंग्रजींतूनच शिकविली जाते! मातृभाषेचे कागद सुद्धां इंग्रजींत काढले जातात व इंग्रजींत त्यांचीं उत्तरें द्यावीं लागतात, हें शिक्षणासंबंधीं कळकळ असणाऱ्या परदेशीयांस खरें सुद्धां वाटणार नाहीं! यामुळें या विषयांचे पाठ म्हणजे मुख्यतः इंग्रजीचे पाठ होऊन बसतात व नंतर पर्यायानें त्या विषयांवर येऊन ठेपतात. संस्कृत पहिल्या पुस्तकांतले संधिनियम, पण ते सुद्धां जाडया इंग्रजी शब्दांमुळें दुर्बोध होतात. प्रथम 'पेनल्टिमेट, ॲन्टिपेनल्टिमेट्, कोएलेस्' सारखे शब्द अर्थासह घोकावे, व मग नियमांच्या खऱ्या कार्याकडे वळावें अशी हास्यास्पद स्थिति प्राप्त झाली आहे. उदाहरण शिकवितांना प्रथम इंग्रजी शब्दांचे व वाक्यांचे अर्थ सांगत बसण्याचा प्रसंग आजवर कोणत्या मास्तरावर आलेला नसेल? तेंच इतिहासाचें. चौथ्या इयत्तेंत 'सिंक्लेअर्' चा इतिहास व पांचवींत 'एम्पायर हिस्टरी' शिकत असतांना, प्रथम भाषाविषयांचे ग्रंथांप्रमाणें या पुस्तकांचें अध्ययन करावें लागल्याचें आह्मांस अझून स्मरतें. व पुस्तकें बदललीं असलीं, तरी ती चमत्कारिक रीत अझून बदलली नाहीं असें दुःखानें कबूल करावें लागतें. यामुळें या विषयांस जितका वेळ मिळावयास पाहिजे त्यापेक्षां दुप्पट द्यावा लागून लभ्यांश निम्म्यानेंही होत नाहीं, असाच आपला अनुभव असल्याचें सर्व शिक्षक व परीक्षक एकमतानें सांगतील यांत शंका नाहीं. बरें, त्या मानानें इंग्रजी तरी जास्त चांगलें होत असेल म्हणावें तर तेंही नाहीं. खुद्द इंग्रजी भाषेला सतत सात वर्षें आठवड्यांतून १०।११ वर तास मिळूनही मॅट्रिकपर्यंत शिकलेल्या सामान्य प्रतीच्या विद्यार्थ्यांस दोन इंग्रजी वाक्यें धड बोलतां अगर लिहितां येत नाहींत.

इंग्रजीखेरीज इतर सर्व विषय मातृभाषेच्या द्वारें व्हावयास पाहिजेत, हें तत्त्व आतां पांच वर्षांच्या पोरास देखील समजतें, तेव्हां थोरांची

गोष्टच नको. इतकें असूनही हा प्रश्न वरिष्ठ कायदे कौन्सिलांत निघाला असतां कांहीं अनुभविक व वयोवृद्ध हिंदी नामदारांनींच त्याविरुद्ध आक्षेप घेतला, ही गोष्ट आम्हांस अत्यंत लाजिरवाणी आहे; यापेक्षां दुसरें काय म्हणावें ? तसेंच नुक्त्याच झालेल्या राष्ट्रीय सामाजिक परिषदेंत 'मातृभाषेच्या द्वारें सर्व शिक्षण देण्याची वेळ आतां प्राप्त झाली आहे' असा केवळ निर्देशात्मक ठराव पुढें आणण्यासही मुंबईतील कांहीं कट्टया सुधारकांनीं जोराचा विरोध केला याबद्दल हंसावें कीं रडावें! इतकें असूनही मुंबई–कलकत्त्यासारखीं अर्धवट बिन-हिंदी (कॉस्मॉपॉलिटन) शहरें व तेथील कांहीं विश्वबंधुत्ववादी शहाणे लोक वगळले, तर मातृभाषेच्या द्वारें शिक्षण देऊं नये, असें म्हणणारा इतर कोणी माईचा पूत सांपडेल कीं नाहीं याची शंकाच वाटते. आश्चर्याची गोष्ट ही कीं, सरकारास सुद्धा या हास्यास्पद प्रकारची जाणीव पटून, त्यांनीं आपल्या अधिकारांतल्या म्हणजे स्कूलफायनल परीक्षेंत इंग्रजीशिवाय इतर पेपर वाटेल तर मातृभाषेंत लिहावे, अशी अनुमति दिली आहे. दुय्यम शाळांतूनही इतर विषय मातृभाषेंत शिकविल्यास आमची हरकत नाहीं असेंही सरकारनें म्हटलें आहे. (ता. २६ एप्रिल १९११ चा सरकारी ठराव पहा. ग्याझेट). पण धड सरकारी नाहीं व धड खासगी नाहीं अशी युनिव्हर्सिटी निदान मॅट्रिकपुरतें तरी इतर विषयांचे कागद मातृभाषेंतून लिहिण्याची परवानगी देत नाहीं. त्यामुळें सरकारची देशी भाषांच्या द्वारां शिक्षण देण्याला अनुमति मिळून न मिळाल्यासारखीच झाली आहे. कारण, सहा इयत्ता अखेर जरी मातृभाषेचा स्वैर उपयोग शिकविण्यांत होत असला, तरी सातव्या इयत्तेंत सर्व विषय फिरून इंग्रजींतून घ्यावेच लागतात. यामुळें मुलांच्या श्रमाची व वेळेची काटकसर व्हायची ती होत नाहींच. तेव्हां आतां तरी आपला हट्ट सोडून देऊन निदान मॅट्रिकचे तरी इंग्रजीवर्ज कागद मातृभाषेच्या द्वारें लिहिण्याची परवानगी आमची युनिव्हर्सिटी देईल अशी प्रबळ आशा आहे.

मातृभाषेच्या द्वारें शिक्षण दिल्यानें इंग्रजीला गोता बसेल, असें कित्येक लोकांचें अझून प्रामाणिक मत आहे. राजकीय दृष्टीनें केवळ पाहिलें तरी, आम्हांस इंग्रजी चांगलें बोलतां लिहितां येणें अवश्य आहे, हें त्यांचें म्हणणें सर्वांसच मान्य आहे. पण मातृभाषा याच्या आड कशी येते हें आम्हांस समजत नाहीं. इंग्लंडचा व हिंदी इतिहास, गणित आदि विषय इंग्रजींतून शिकविल्यानें इंग्रजी अधिक चांगलें होतें, या म्हणण्यांत कांहीं अर्थ नाहीं. मॅट्रिकचे कोणत्याही विषयाचे कागद तपासणें ज्याच्या कपाळीं आलें असेल तो असेंच सांगेल. आज दोन चार वर्षें मॅट्रिकचे इंग्रजीचे परीक्षक कंठरवानें हीच ओरड करीत आले आहेत कीं, कांहीं अपवाद खेरीज करून साधारण सर्व विद्यार्थ्यांचें इंग्रजी अगदीं भिकार असतें. ( १९१४ डिसेंबर व १९१५ जूनचे इंग्रजी परीक्षकांचे युनिव्हर्सिटीकडे गेलेले रिपोर्ट पहा). सर्वच विषय आज इंग्रजीचे द्वारां होत असतां अशी ओरड कां असावी ? तेव्हां हा दोष शिकविण्याचे पद्धतीचा आहे; बिचारी मातृभाषा इंग्रजीच्या आड येत नाहीं. निदान तसें प्रत्यक्ष प्रयोग करून पाहिल्याशिवाय आधींच ओरड करून भागायचें नाहीं. जेथें असे प्रयोग झाले आहेत, तेथें ते पूर्णपणें यशस्वी झाल्याचे दाखले आहेत. ( उ. न्यू. इं. स्कूल, पुणें ). तेथें अडचणी निराळ्याच आहेत व त्या दूर करण्याचा प्रयत्न केला पाहिजे. योग्य शिक्षक व योग्य क्रमिक पुस्तकें या त्या अडचणी होत. पण योग्य दिशेनें प्रयत्न केला असतां कालांतरानें दूर होण्यासारख्या या अडचणी आहेत, हें कोणीही समंजस मनुष्य नाकबूल करणार नाहीं.

मातृभाषेच्या द्वारें शिक्षण सुरू झालें म्हणजे आजचा मॅट्रिकचा अभ्यासक्रम सात वर्षांचा आहे त्याचीं वर्षें कमी न करतां, आहेत ते जास्त चांगले व पूर्ण, व कांहीं नवे आवश्यक असे विषय याच अभ्यासक्रमांत घालतां येतील. धुळाक्षरापासून इंटरमीजिएटपर्यंत सामान्य संस्कृति देणारें शिक्षण व पुढें चार अगर पांच वर्षें विशिष्टीकरणाच्या तत्त्वावर विशिष्ट विषयाचें शिक्षण, असें हल्लींचाच अभ्यासक्रम कायम ठेवून

दोन ठळक विभाग पाडतां येतील. विशेष घडामोडी करणें पडूं नये व आहे त्याच स्थितींत इष्ट सुधारणा व्हावी, या हेतूनेंच आम्ही विचार करीत आहों.

## प्राथमिक शिक्षण.

पहिलीं चार वर्षें प्राथमिक शिक्षण. यांत शिक्षणाच्या नव्या तत्त्वांचा विशेष चांगल्या तऱ्हेनें शिरकाव होण्यापलीकडे आज कांहीं जास्त सुधारणा नको आहे. शक्य असल्यास या चार वर्षांच्या अभ्यासक्रमांत जास्त साधेपणा यावयास पाहिजे. किंडरगार्टन् व वस्तुपाठाचें थोतांड त्यांतून निघालेलें फार बरें. कारण त्याचें मर्म जोंवर कोणास कळलें नाहीं—व तें अझूनही खुद्द ट्रेनिंग कॉलेजाच्या चालकांस म्हणजे भावी क्षिक्षकांच्या शिक्षकांसही कळलें आहे कीं नाहीं याची शंकाच आहे—तोंवर तें शिकवूं जाणें वेडेपणाचें आहे. वस्तुपाठ-किंडरगार्टन ह्या शिक्षणाच्या प्रेमळ व लवचिक रीती आहेत, गणित—इतिहासासारखे विषय नाहींत. आमचे इकडे त्यांस विषयांचें स्वरूप आलें आहे. अमुक देणग्या अमुक वर्षांत शिकवून झाल्याच पाहिजेत हा निर्बंध केवळ हास्यास्पद आहे. ज्यास किंडरगार्टनचें खरें मर्म कळलें आहे, तो विशिष्ट प्रकारच्या मातीवरच—अगर विशिष्ट प्रकारच्या इतर साधनांवरच अवलंबून राहणार नाहीं, त्यावांचून अडून बसणार नाहीं. त्याच्या भोंवतींच्या साध्या गोष्टींत त्यास साधनें दिसतील, रोजच्या व्यवहारांत त्यास नित्य नव्या 'देणग्या' सांपडतील. आपल्या रीतींतलें मर्म लोपून जाऊन तिचा असा अढळ कित्ता होऊन बसेल, ती इतकी कृत्रिम बनेल, असें बिचाऱ्या फ्रॉबेलच्या स्वप्नींही आलें नसेल !

प्राथमिक शिक्षणाचीं चार वर्षें सर्व शिक्षण कोंडलेल्या हवेंत न देतां, आठवड्यांतून तीन चार तास तरी मुलांस सृष्टिनिरीक्षण अगर ऐतिहासिक स्थलावलोकनांत काढतां यावे, अशी व्यवस्था होणें जरूर आहे. निरनिराळ्या वर्गांच्या निरनिराळ्या वेळीं सहली काढून, त्यांचे द्वारां भूगोल-

इतिहास व वनस्पतिशास्त्र यांच्या पूर्व तयारीचें ज्ञान देणें अवश्य आहे. शाळेसभोंवतीं अगर वेगळ्या खेळाच्या ठिकाणीं मुलांस फुलझाडें-फळ-झाडें लावण्यास उत्तेजन दिल्यानें त्यांस खेळ, करमणूक व सृष्टिनिरीक्षण हीं तिन्हीं अल्पायासानें साधतील. शक्य असल्यास पोपट-मैनांसारखे पक्षी, मांजर, कुत्रे, ससा यांसारखे पशु पाळून त्यांची जोपासना मुलां-कडून करवून घ्यावी. त्यामुळेंही त्यांस या प्राण्यांची सामान्य माहिती सहज मिळून, दोन्ही प्रकारांनीं त्यांची जिज्ञासा व हौस वाढेल. दिवसें-दिवस शिकणारी प्रजा निस्तेज होत आहे ही तक्रार बळावत चालली आहे, तिच्यांत तथ्य आहे. म्हणूनच प्राथमिक अभ्यासक्रमांत ज्ञान तितकेंच पण कमी प्रयासानें खेळत खेळत देऊन मुलांचा उल्हास, आनं-दी वृत्ति वाढेल, निदान आहे ती कायम तरी राहील याविषयीं योग्य ती व्यवस्था केली पाहिजे. ही व्यवस्था म्हणजे प्राथमिक शिक्षणाच्या रीतींत वरील बदल करणें ही होय.

प्राथमिक शिक्षणांतून दुय्यम शिक्षणाकडे जाण्यापूर्वी प्राथमिक शिक्ष-णांत आणखी एक उणीव आहे, ती सांगितली पाहिजे. इंग्रजीचें दुय्यम शिक्षण ज्यांस शक्य नाहीं अगर नको आहे, त्यांस आमचेकडे सामान्य शिक्षणाची नीटशी सोय नाहीं. मराठी सात इयत्ता व व्हॅर्नाक्युलर फाय-नल हाच काय तो एक मार्ग अशांस खुला आहे व तोही अपुरा आहे. तेराव्या वर्षाअखेर सात इयत्ता पुऱ्या होतात, पण १८ व्यापर्यंत फाय-नलला बसतां येत नाहीं, अशी तऱ्हा या शिक्षणांत आहे. त्यांत विष-यांची भर घालून व सुधारणा करून तो पुरा केला पाहिजे. सातांचीं नऊ वर्षे केलेलीं चालतील, पण शिक्षणांत एकजिनसीपणा व पूर्णता आली पाहिजे. हा ऐन मराठी अगर इतर देशी भाषेचा अभ्यासक्रम स्वीकार-णारास तो पुरा केल्यावर आपल्या मातृभाषेचें चांगलें ज्ञान झालें असलें पाहिजे; तींतील नव्या जुन्या काव्य व ऐतिहासिक वाङ्मयाचा चांगला परिचय झाला पाहिजे. संस्कृत इच्छा असल्यास व हिंदी ही दुसरी भाषा पांचव्या अगर सहाव्या वर्षांत सुरू करून तींत बऱ्या रीतीनें बोलणें व

लिहिण आलें पाहिजे. तींतील वाङ्मयाचें परिशीलन व्हावयास हवें. हिंदुस्थानचा व्यापारी, राजकीय, भूपृष्ठ इ. प्रकारचा भूगोल झाला पाहिजे. जगाच्या भूगोलाचें अगदीं सामान्य ज्ञान पुरें होईल. इंग्लंड व कॉलनी यांविषयीं माहिती असणें इष्ट आहे. हिंदुस्थानच्या इतिहासाचें विशेषतः मोंगल रियासतीपासून आजपर्यंतचें ज्ञान असावें; हल्लींच्या राज्यपद्धतीची सामान्य माहिती हवी.

गणित साधारणतः सध्यां व्ह. फायनलला आहे तें पुरेसें आहे. यूरोपीय संस्कृतीच्या व विदेशीय राज्यकर्त्यांच्या संसर्गामुळें टेलिग्राफ्, टेलिफोन, स्टीम् एंजिन्, नित्य व्यवहारांतील रासायनिक द्रव्यें, गॅस वगैरे ज्या ज्या गोष्टींचा आपल्या रहाटींत शिरकाव झाला आहे त्यांच्या मुख्य मूलतत्त्वाचें म्हणजे प्राणिशास्त्र–वनस्पतिशास्त्र, रसायन व यंत्र शास्त्र यांचें सोपें सामान्य ज्ञान हवें. हें अर्थात प्रत्यक्ष निरीक्षण व प्रयोग यांचे द्वारां दिलें पाहिजे. यांशिवाय ड्रॉइंग, ड्रिल व व्यायाम हेही विषय अवश्य पाहिजेत. पुढें शिक्षकाचा धंदा करणारांस ट्रेनिंग कॉलेज आहेच. त्यांतून तयार होणाऱ्या शिक्षकांस इंग्रजीचें धांवतें ज्ञान तरी असल्याशिवाय त्यांच्या विचारांचा व दृष्टीचा कोतेपणा जाणार नाहीं. पण ज्यांस इतर धंद्यांत पडायचें त्यांचेकरितां ड्रॉइंग विशेष झालें पाहिजे व मॅन्युअल ट्रेनिंग-हस्तकौशल्याची कल्पना सोप्या रूपांत हवी. यानंतर त्यांस आपापल्या धंद्यांची माहिती व्हावी म्हणून **औद्योगिक शाळांचें जाळें देशभर पसरावयास हवें.** सरकार या बाबतींत उदासीन राहील, तर लोकांनीं या गोष्टींत लक्ष्य घातलें पाहिजे. उदाहरणार्थ, प्रत्येक म्युनिसिपालिटीनें आपल्या कुंवतीप्रमाणें ‘ कलाभुवन ’ काढण्यास काय हरकत आहे ? यांत नित्य व्यवहारांतील मुख्य हुन्नरांचें तरी शिक्षण पद्धशीर मिळावयास हवें.

खेड्यांतील लोकांस शिक्षणाची चव नाहीं, ती उत्पन्न करून देणें जसें सरकारचें, तसेंच हिंदी लोकांचेंही कर्तव्य आहे. सरकार कदाचित् आपल्या कर्तव्यास पराङ्मुख झालें तर ती नाइलाजाची गोष्ट आहे; पण विद्वान्

लोकांनीं—सुशिक्षितांनीं तरी जागें होऊन हा प्रश्न हातीं घेतला पाहिजे. लोकांमध्यें गोडी उत्पन्न होईपर्यंत ( तिला फार वेळ लागणार नाहीं असें अनुभवावरून खात्रीनें सांगतां येतें ) शिक्षणाची पद्धति, विषय, साधनें इकडे फारसें लक्ष्य देतां कामा नये. **आधीं प्रसार व मग कार्यक्षमता—शास्त्रशुद्धता**, हाच क्रम निसर्गशुद्ध व इतिहासशुद्ध आहे. चांगले शिक्षक नाहींत म्हणून शाळा वाढवितां येत नाहींत, इमारती उभारण्यांला पैसा नाहीं म्हणून शिक्षण फैलावणें बरें नव्हे, इत्यादि विचारसरणी न कर्त्याचा वार शनिवार या न्यायासारखी आहे. जर्मनी, फ्रान्स, इंग्लंड, अमेरिका वगैरे सर्व देशांतील शिक्षणाचा इतिहास हेंच शिकवितो कीं, प्रथम प्रसार व नंतर शास्त्रविचार. योग्य शिक्षकांचे अभावीं सैन्यांतील निकामी साक्षर शिपायांस तें काम प्रशियांत एकाकाळीं दिलें गेलें होतें, हें वर सांगितलेंच आहे. त्या व आपल्या परिस्थितींत अंतर एवढेंच कीं तेथें लोक व सरकार यांचे हितसंबंध एक व येथें ते आजवर तरी साहजिकपणेंच तसे नाहींत ! सरकार जोंवर उदासीन आहे, तोंवर आपणच लोक साक्षर करून सोडण्यासाठीं कंबर बांधली पाहिजे. रीती वगैरेंत सुधारणा आपोआप होतीलच. खेड्यापाड्यांतील लोकांसाठीं आज शिक्षणक्रम साधारण अशा तऱ्हेचा असला तरी चालेल व तोच शक्य आहे असें आम्हांस वाटतें. शेतकरी वगैरे लोकांचीं मुलें किंचित् सजाण होऊं लागल्याबरोबर त्यांस गुरें राखण्यासारखें काम करावें लागतें; त्यापासून त्यांस परावृत्त करणें आजच्या त्यांच्या आर्थिक स्थितींत शक्य नाहीं. म्हणून या लोकांच्या शिक्षणाविषयीं विचार करतां ही गोष्ट जमेस धरल्याखेरीज भागावयाचें नाहीं. तेव्हां या लोकांस प्रथम फक्त शिक्षणाची गोडी लागेल व क्रमाक्रमानें त्याचें महत्त्व कळेल अशी तजवीज केली पाहिजे. यासाठीं आरंभीं १—२ वर्षें त्यांचा अभ्यासक्रम दोन तीन तासांचा असला तरी चालेल. सकाळीं ७ ते ९, अगर सकाळीं एक तास व सायंकाळीं ५ ते ६, अगर अशाच सुमारास एक तास अशी वेळेची व्यवस्था त्या लोकांस सोइस्कर होईल. एकंदर शिक्षण तूर्त नऊ वर्षांचें न ठेवतां चारपांचच वर्षांचें ठेवावें व तेवढ्या

अवधींत त्यांस लिहिणें वाचणें–मोडीसुद्धां, चांगले हिशेब करण्यापुरतें सरळव्याजापर्यंत गणित, आपल्या तालुक्याचा व पुढें जिल्ह्याचा भूगोल, व कचेऱ्या, कोर्टें, लवाद यांची अगदीं साधी कल्पना-एवढेच विषय शिकवावे. मुख्य कटाक्ष, हें शिक्षण त्यांच्या व्यवसायाचे आड येऊं नये, त्याचा त्यांस बाऊ वाटूं नये व त्याचा आपल्या व्यवहारास कसा उपयोग आहे याची त्यांस कल्पना येईल या गोष्टीवर असावा. इतकें करून एक पिढी साक्षर करून सोडली कीं पुढच्या पिढीच्या जास्त शिक्षणाची आपोआप व्यवस्था झालीच म्हणून समजावें. होतां होईल तों फी न घेण्याची व्यवस्था ठेवावी. सरकारास इतर गोष्टी शक्य नसतील तर निदान त्यांनीं डिपार्टमेंट्ल्–वरवंटा या अल्प प्रयत्नांवरून फिरवूं नये, व कोरडी सहानुभूति तरी द्यावी, हेंच त्यांजवळ आज सर्व सुशिक्षितांनीं व त्यांच्या इच्छेनें कौन्सिलचें स्थान लाभलेल्या नामदारांनीं पराकाष्ठेच्या आग्रहानें मागावें. शिक्षणाचे बाबतींत जर्मनी-इंग्लंडसारख्या सुधारलेल्या देशांत सुद्धां प्रथम खासगी प्रयत्न व मग हळूंहळूं सरकारची मदत, अशीच स्थिति होती. मग हें तर आमचें हिंदुस्थान आहे !

## दुय्यम शिक्षण.

मध्यम स्थितीच्या लोकांच्या मुलांसाठीं प्राथमिक, दुय्यम, वरिष्ठ असें जें शिक्षणसोपान आहे, त्यापैकीं चार वर्षांच्या प्राथमिक शिक्षणाविषयीं आमचे विचार वर प्रदर्शित केलेच आहेत. त्यांतूनच दुय्यम शिक्षण उत्क्रान्त झालें पाहिजे. मातृभाषा मुख्य धरून इंग्रजी, संस्कृत व हिंदी या दुय्यम भाषा समजल्या पाहिजेत. मातृभाषेला पहिलीं तीन वर्षें पांच व पुढें तीन पर्यंत तास आठवड्यांतून ठेवावे. उत्तम लिहितां व बोलतां येणें, मुख्य मुख्य आधुनिक ग्रंथकार, नाट्यकार व कवि, मुख्य मुख्य प्राचीन कवि यांच्या बऱ्याचशा ग्रंथांशीं चांगला परिचय–एवढें ज्ञान मातृभाषेचें अवश्य असावयाला पाहिजे. वेंच्यांची हकालपट्टी व्हायला हवी. इंग्रजी पहिल्या अगर दुसऱ्या वर्षापासून सुरू करावें व त्यास चारपासून

सहा तास ठेवावे. इंग्रजीला सहा तासांपेक्षां जास्त तास कधींही असूं नयेत व तें कॉन्व्हर्सेशनल् अगर संभाषणपद्धतीनें शिकवावें. व्याकरणशुद्ध लिहितां व मुख्यतः बोलतां येऊन इंग्लिश वाङ्मयांतील गेल्या शतकांत होऊन गेलेल्या कांहीं प्रसिद्ध कवि व ग्रंथकारांचे सोपे सोपे ग्रंथ वाचून झालेले असावे. टाइम्स्सारखीं दैनिकें फारसें न अडतां वाचतां यावीं. पहिलीं दोन वर्षें श्रेष्ठ प्रतीचें अंकगणित, पुढें बीजगणित व नंतर भूमिति अशीं आठवड्यांतून पांच तासपर्यंत असावीं. हल्लींच्या प्रीव्हियसइतकें गणित मॅट्रिकअखेर करतां येण्यास कांहींच हरकत नाहीं. कारण इंग्रजी-वर्ज्य इतर विषय मातृभाषेंतून शिकवायचे असल्यामुळें ते समजणें सुलभ जाईल. भूगोल व इतिहास यांची सांगड तुटतां कामा नये. दोन्हींस मिळन सरसकट तीन चार तासांच्यावर वेळ केव्हांही मिळूं नये. भूगोलाचा प्रथम मुंबई इलाखा, मग हिंदुस्थान, नंतर इंग्लंड व कॉलनीज् व शेवटीं जग—असा साधारण क्रम असावा. इतिहास प्रथम व मुख्यत्वेंकरून हिंदुस्थानचा व्हावा. त्यांत हल्लींच्या राज्यपद्धतीची अगदीं सामान्य माहिती मिळावी. हल्लीं प्राथमिक शाळांत व दुय्यम शाळांतील खालेंचे वर्गांत जीं इतिहासाचीं पुस्तकें चालतात तीं कुचकामाचीं आहेत. कारण ज्यांना इतिहासाची उत्क्रान्ति कळली नाहीं व कळणें शक्य नाहीं, अशा शिक्षकांनीं तीं लिहिलेलीं आहेत. हें काम एखाद्या कॉलेजांतील हिंदी इतिहासाच्या हिंदी प्रोफेसरानेंच केलें पाहिजे, म्हणजे योग्य तेंच पुस्तक मुलांच्या हातीं पडेल. या पुस्तकांत विशेष कटाक्ष हल्लींची राज्यपद्धति सोप्या रूपानें मॅट्रिकपर्यंतच्या मुलांस कळेल या गोष्टीकडे असावा. म्हणजे ज्यांस मॅट्रिकच्या पुढें धांव मारतां येत नांहीं, अशांस हिंदुस्थानच्या राज्यपद्धतीच्या माहितीस हल्लींप्रमाणें मुकावें लागणार नाहीं. इतिहास व भूगोल यांवरील पुस्तकें लिहितांना व तीं शिकवितांना मुलांचें स्वदेशावरील प्रेम वाढेल, त्यांस आपल्या कर्तबगारीची साक्ष पटेल, आत्मविश्वास उत्पन्न होईल या गोष्टींकडे विशेष लक्ष पुरविलें पाहिजे. हल्लींच्या इतिहासावरील पुस्तकांनीं स्वाभिमानाचा अंकुर पार करपून जातो हें स्पष्टपणें बोलल्यावांचून इलाज

नाहीं. आपण मनुष्य आहों—श्रेष्ठ आहों, आपलें कर्तव्य उच्चतम आहे अशा तऱ्हेच्या भावना इतिहासाच्याच योग्य परिशीलानानें पोसल्या जातात.

इंग्लंडचा इतिहास हल्लीं आहे तितकाच पाहिजे. तरी त्यांत टयूडर घराण्याच्या पूर्वींचा भाग अनवश्यक म्हणून वगळला, अगर संगतीसाठीं अगदीं त्रोटक स्वरूपानें सांगितला तरी पुरे आहे. मुख्य कटाक्ष इंग्लिश राज्यपद्धतीची उत्क्रान्ति कशी होत गेली या गोष्टीकडे पाहिजे. पूर्वींचीं तीन वर्षें टयूडरपासून आजपावेतों ठोकळ इतिहास व शेवटल्या वर्षीं राज्यपद्धतीविषयीं सामान्य माहिती असा क्रम ठेवला तरी चालेल. मॅट्रिकचे वर्गांतील सामान्य मुलांची साधारण वयोमर्यादा लक्षांत घेतां हें त्यांच्या धारणाशक्तीच्या आटोक्याचे बाहेर मुळींच होणार नाहीं. कांहीं सरकारी अधिकाऱ्यांनीं आपल्या सद्दीचे जोरावर इंग्लिश इतिहासाला युनिव्हर्सिटी-शिक्षणाच्या आवश्यक विषयांतून उच्चाटन दिलें यास इलाज नाहीं. निदान दुय्यम शिक्षणांत तरी तो वरील स्वरूपांत सांगण्यांत येईल अशी सर्व सुशिक्षितांनीं खबरदारी घ्यावी.

संस्कृत हल्लीं चौथ्या वर्षापासून सुरूं होतें तें तसेंच राहण्यास हरकत नाहीं. यूरोपीय देशांच्या अनुभवावरून संस्कृतचा अभ्यास आणखी तीन वर्षें अलीकडे ओढतां येईल; तो तसा ओढून इंग्रजी दोन वर्षें पुढें ढकलतां येईल. इंग्रजी व संस्कृत शिकविण्याची पद्धति बदलण्याची असलेमुळें या फरकानें कोणत्याही तऱ्हेचा अनिष्ट परिणाम होण्याचें कारण नाहीं. आजच तसें घडून येणें शक्य नसलें, तरी पण तें शिकविण्याची दिशा पूर्णपणें बदलली पाहिजे. ‘प्रथम भाषा, मग तींतून व्याकरण’ हें तत्त्व संस्कृत शिकवितांनाही अमलांत आलें पाहिजे. चौथ्या वर्गांत हितोपदेशांतलि सोप्या गोष्टींचे वेंचे—कविता वगळून—काढून लहानसें पुस्तक मुलांचे हातीं द्यावयास हवें. त्यांतून सोपें व्याकरण शिक्षकानें हळूं हळूं मुलांस शिकवावें. दुसऱ्या वर्षीं अध्यात्मरामायणांतलि व महाभारतांतील आख्यानांचे सोपे भाग, कादम्बरीचे सोपे वेंचे (लांब समास व अवघड

रचना वगळून ), व व्याकरणास मदत म्हणून भांडारकरांचें मराठी पहिलें पुस्तक अगर ओकांचें संस्कृतप्रवेश, एवढें व्हावें. सहाव्या इयत्तेंत कादम्बरीसार, रघु व कुमार यांतील सोपे अनुष्टुब् छंदांतले सर्ग व भांडारकरांचें दुसरें पुस्तक पाऊण एवढा अभ्यास करवून घ्यावा. भासाचीं मध्यमव्यायोग, कर्णभार वगैरेसारखीं सोपीं एक दोन नाटकें वाचवावीं. शेवटल्या वर्षी महाभारतांतील कोणताही भाग समजावा, दशकुमारचरित्र ( अश्लील व अवघड वगळून ) वाचतां यावें, व मालाविकाग्निमित्रासारखें नाटक, रघूसारखें काव्य लावतां यावें. देशी भाषेंतून संस्कृतमध्यें भाषांतर करण्याचें मुळींच सोडून द्यावें. त्यांत मुलांचा बराच वेळ व मेहनत वांचेल. **कारण आम्हांस शास्त्री-पंडित तयार करणें नसून संस्कृतांतील श्रेष्ठ संस्कृति हवी आहे.** संस्कृतला सरसकट **चार** तास पुरत.

हिंदी दुसऱ्या, तिसऱ्या व चौथ्या वर्षापुरतेंच ठेवलें तरी चालेल. तें शिकविण्याचा मुख्य हेतु ती भाषा साधारण सहजपणें बोलतां यावी हा असावा. तींतील सोपें पण प्रसिद्ध वाङ्मय थोडेंसें या तीन वर्षांत वाचून व्हावें. भिन्न मातृभाषेच्या हिंदी माणसाशीं बोलण्याचा प्रसंग आला असतां परकी भाषेचा उपयोग करणें पडूं नये. सुशिक्षिताशीं गाठ पडली तर इंग्रजीवर भागेल, पण इतरांशीं बोलण्याची वेळ आली असतां दोन विरुद्ध ध्रुवावरील माणसें समोरासमोर उभीं आहेत, असा देखावा होण्याची पाळी येऊं नये. एकराष्ट्रीयत्वाचे दृष्टीनेंही हिंदीचें अध्ययन अवश्य आहे. हिंदीला आठवड्यांतून तीनपासून चार तास पुरतील.

याशिवाय दुय्यम शिक्षणांत आधुनिक शास्त्रांचीं मूलतत्त्वें व यन्त्र-रसायनशास्त्रांचे कांहीं प्रयोग अवश्य झाले पाहिजेत. या विषयास प्रथम-पासून अखेरपर्यंत दोन तास पुरतील. प्रथम वनस्पतींची माहिती—बी, वाढ, फुलें, फळें, साधारण रचना, जाती, उपयोग, नंतर प्राण्यांच्या शरीररचनेची माहिती व पुढें रसायनशास्त्र व यन्त्रशास्त्र असा क्रम असावा. वनस्पतींचें ज्ञान देणें तें येथील परि-

स्थितींत वाढलेल्या व वाढणाऱ्या वनस्पतींचेंच दिलें पाहिजे. जीं झाडें इकडे फार तर एखाद्या बोटानिकल गार्डन्‌मध्यें बळेंच लावून तयार केलीं असलेलीं दिसतील त्यांचें ज्ञान गौण आहे. प्राणिशास्त्रांतही हेंच तत्त्व पाळिलें पाहिजे. मुलांच्या नेहमींच्या पाहण्यांतले—दुर्मिळ नव्हेत असे, पशुपक्षी यांवरूनच आरंभ व्हावा. मनुष्याच्या शरीराचें ज्ञान अवश्यमेव हवें; त्याबरोबर थोडीशी ‘ फर्स्ट्‌एड्‌ ’ शिकवावी. या विषयांचे अभ्यासक्रम तज्ज्ञांच्या पसंतीनें ठरवावे. तरी पण त्यांत स्थळपरत्वें लवचिकपणा असणें अत्यंत अवश्य आहे. मला अमुक क्रम पसंत आहे, तोच सर्वांनीं घेतला पाहिजे अशी हडेलहप्पी शिक्षणांत कधींही श्रेयस्कर होणार नाहीं. या रीतीनें शिक्षण दिल्यास प्रीव्हियसचें फिजिक्स आधींच उरकून जाऊन, त्या वेळीं दुसरा एखादा अधिक उपयुक्त व महत्त्वाचा विषय घेतां येईल.

वरील सूचनांपैकीं कांहीं आजमित्तीला नव्या नसतील. उदाहरणार्थ, यांपैकीं कांहींप्रमाणें काम आजमित्तीला येथील न्यू इंग्लिश स्कूलमध्यें चालत आहे. मातृभाषेच्या द्वारां शिकविण्याचा प्रयत्न याच शाळेनें यशस्वी करून दाखविला व सायन्सचा अभ्यासक्रम येथें बराच समाधानकारक आहे. पण ही गोष्ट फक्त एकाच, अगर कांहीं शाळांची झाली. इतरांनीं त्या गोष्टीकडे लक्ष पुरवावें म्हणून वरील विचार मांडले आहेत. कांहीं नवे मुद्दे सुचविले आहेत ते तसेच सर्वांस मान्य होतील अशांतला भाग नांहीं. पण त्यांमुळें शिक्षणाविषयीं आस्था बाळगणारांच्या मनाला चालना मिळेल; व जें काम एकाच्या विचाराच्या आटोक्याच्या बाहेरचें आहे, तें अनेक डोकीं त्यांत पडलीं असतां किती तरी सुलभ होऊन जाईल.

ड्रॉइंग हल्लीं सर्व शाळांत अवश्य आहेच. कांहीं ठिकाणीं ‘मॅन्युअल ट्रेनिंग् ’ दिलें जातें ही आनंदाची गोष्ट आहे. तें सर्व शाळांनीं अवश्य द्यावें अशी आमची सूचना आहे. व्यायामाबद्दल कांहीं विशेष लिहावयाचें नाहीं. खुल्या मर्दानी खेळांना आज जें महत्त्व आलें आहे, तें यथायोग्य

आहे. पण चांगले देशी मर्दानी खेळ आहेत, त्यांची निष्कारण नापत होणें बरें नाहीं. त्यांत सुधारणा करणें असेल तर करा; पण ते विनाकारण टाकून देऊं नका.

गायनशिक्षण पहिलीं तीन वर्षे तरी आवश्यक असावें व पुढें ऐच्छिक ठेवावें.

याप्रमाणें दुय्यम शिक्षण हें सर्व दृष्टींनीं परिपूर्ण असावें. **तें ज्यास मिळालें त्यास सर्वांगसुंदर सामान्य संस्कृति मिळाली**, असें म्हणतां आलें तरच तें खरें दुय्यम शिक्षण, युनिव्हर्सिटीची खरी तयारी. ज्यांस युनिव्हर्सिटी शिक्षण घेणें शक्य नाहीं, दुय्यम शिक्षण कडेला पोंचविलें म्हणजे शिकस्त, अशांस वरप्रमाणें सामान्य संस्कृति मिळाली असतां ते पुढें व्यवहारांत पडण्यास चांगले तयार होतील यांत शंका नाहीं. त्यांचा पाया भक्कम झाला, मग वरील इमारतीचें कसेंही असो. असा दुहेरी हेतु ठेवल्याखेरीज आतां चालायचें नाहीं.

## शिक्षकांस स्वातंत्र्य.

दुय्यम शिक्षणावरील आमचे विचार संपवितांना एक गोष्ट येथें मुद्दाम सांगावयाची आहे. ज्यांच्या हातीं लोकशिक्षणाचीं सूत्रें आहेत—मग तें सरकार असो वा लोक असोत—त्यांनीं शिक्षण वरप्रमाणें योग्य दिशेनें चाललें आहे, कीं नाहीं, एवढें अगदीं डोळ्यांत तेल घालून पहावें. याच्या पलीकडे आपला अधिकार गाजवण्याचें त्यांनीं मनांत आणल्यास शिक्षणाचे धिंडवडे निघतील. पुस्तकें कोणतीं नेमायचीं, तीं किती वाचून झालीं पाहिजेत, अमुक एक ठराविक नमुन्याप्रमाणें अमुक विषय शिकविला गेला पाहिजे, अशा नियमांनीं शाळांच्या चालकांस व शिक्षकांस असें जखडणें शहाणपणाचें नाहीं. या सर्व बाबतींत जितकें स्वातंत्र्य व वैचित्र्य अधिक असेल तितकें फार चांगलें; कारण त्या योगें निरनिराळे मार्ग व साधनें प्रत्यक्ष अनुभवाचे भट्टींतून तावून सुलाखून निघून त्यांची खरी योग्यता ठरते. कालपरत्वें व परिस्थितिपरत्त्वें शिक्ष-

णाच्या वरील अंगांत फरक हा झालाच पाहिजे व तो करण्यास जर कोणी लायक असतील तर ते त्या त्या शाळांचे चालक व शिक्षकच होत.

पण दुर्दैवाची गोष्ट अशी आहे कीं, आमचें डिपार्ट्मेंट् पुस्तकें, त्यांचीं पानें, शिकविण्याची रीत या गोष्टी ठरविण्याचें आपल्या हातीं ठेवूनही स्वस्थ बसत नाहीं. या बाबतींत तर त्याचा खासगी शाळांच्या पालकांवर विश्वास नाहींच; पण आतां मुलगा कोणत्या इयत्तेला योग्य आहे हें ठरवणें, त्याची परीक्षा घेणें इत्यादि गोष्टींही स्वतःचे ताब्यांत घेण्यापर्यंत त्याची मजल गेली आहे. हजार बाराशें मुलांची योग्यता ज्यास ठरवतां येते, त्यास इतर शाळेंतून अगर खासगी शिकून आलेल्या मुलाची योग्यता कळणें अशक्य व्हावें, हा विसाव्या शतकांतील अद्भुत चमत्कार होय.* दुय्यम शाळांची 'शेंपटी पिळण्याचें' डिपार्ट्मेंट्चें काम असें दुहेरी चालू आहे. एकीकडून शाळांच्या चालकांस बांधून टाकणार व दुसरीकडून मुलांच्या पालकांस सतावून सोडणार. ही परिस्थिति फारच असमाधानकारक आहे. तिच्या मुळाशीं डिपार्ट्मेंट्चे जे वेळोवेळीं अधिपति व उपाधिपति होतात त्यांच्या वेळोवेळच्या लहरी होत, असें म्हणावें लागतें; यामुळें डिपार्ट्मेंट्च्या शिक्षणविषयक धोरणांत जर कांहीं शिस्त असेल, तर ती सर्वांच्या शेंड्या स्वतःचे हातीं कशा राहतील या एका मुद्यापुरतीच आहे असें कष्टानें म्हणावें लागतें. सरकार आमच्यावर विश्वास टाकून डिपार्ट्मेंट्चीं सूत्रें आमच्या स्वाधीन करीपर्यंत ही स्थिति अशीच राहणार. तीं सूत्रें आतां आमच्या स्वाधीन करण्याची वेळ आली आहे असें सर्व सुशिक्षितांनीं, लोकप्रतिनिधींनीं व धुरीणांनीं वेळीं अवेळीं सरकारला सांगावयास हवें. आपलें सामान्य धोरण नमूद करून ठेवावें व अखेरचीं सूत्रें विद्यामन्त्र्या (Minister of Education)चे स्वाधीन ठेवावीं, म्हणजे शिक्षणाचे कामांत कांहीं मोठी अनिष्टकारक क्रान्ति होण्याची सरकारास भीति राहणार नाहीं. सरकारनें आतां सुशिक्षितांवर जास्त विश्वास टाकायला शिकलें पाहिजे; म्हणजे त्यांच्या निम्याच्या वर

* हें नवेंच पिल्लूं डिपार्ट्मेंट्नें आंवरून घेतलें हें कळविण्यास आम्हांस आनंद वाटतो.

अडचणी दूर होतील. विश्वास टाकल्यावर त्याला आम्ही पात्र आहों कीं नाहीं हें सरकारला आतां कळायचें राहिलें आहे असें नाहीं. शिक्षणप्रसार व सुधारणा करायला आपण लागयचें नाहीं, दुसरे करीत असतां त्यास करूं द्यायचें नाहीं असें आतां दिवसेंदिवस चालायचें नाहीं.

## श्रेष्ठ प्रतीचें शिक्षण.

वरिष्ठप्रतीचें शिक्षण म्हणजे खरोखरी विशिष्टीकरणाच्या तत्त्वावर व्हायला पाहिजे. म्हणजे युनिव्हार्सिटींत शिरतांच वाटेल त्याला वाटेल तो विषय घेऊन त्यांत परिपूर्णता मिळविण्याची मुभा व व्यवस्था असावी. पण हल्लींच्या परिस्थितींत आहेत त्या गोष्टी एकदम नाहींशा न करतां, त्यांतूनच हळुहळू सुधारणा केल्या पाहिजेत, हें जाणूनच विचार करायचा आहे. शिवाय १६ वर्षें पुरीं झाल्याबरोबर विद्यार्थी युनिव्हर्सिटींत येऊन एकदम विशिष्टीकरणाला लायक होईल कीं नाहीं, हा एक प्रश्नच आहे; म्हणून विशिष्टीकरण युनिव्हार्सिटींत दोन वर्षें घालविल्यावर सुरूं व्हावें, हेंच सध्यांच्या परिस्थितींत उचित दिसतें.

प्रीव्हियसला इंग्रजी, संस्कृत, गणित व फिजिक्स हे विषय हल्लीं आहेत. पैकीं फिजिक्स व गणित दुय्यम शिक्षणक्रमांतच होऊन जाणार आहेत. तेव्हां वरीलप्रमाणें दुय्यम शिक्षणांत फरक केल्यास युनिव्हर्सिटीच्या पहिल्या वर्षीं इंग्रजी व संस्कृतच्या जोडीला मातृभाषा व हिंदुस्थानचा राजकीय इतिहास हे विषय असावे. प्रीव्हियसमध्यें फिजिक्स् चार वर्षांपूर्वी शिरलें, तें म्हणजे शिक्षणविषयक गोष्टींचा साधकबाधक विचार होऊन शिरलें अशांतला मुळींच भाग नाहीं; एवढेंच खरें कीं, इतिहासाला—मग तो स्वाभिमानाचें व स्वावलंबनाचें वारें भरविणारा ग्रीस् रोमचा इतिहास असो, अगर स्वराज्याची हांव उत्पन्न करणारा इंग्लंडचा इतिहास असो—वरिष्ठ शिक्षणक्रमांतून काढून लावण्याचा मुख्य उद्देश लपविण्यासाठीं त्या वेळीं हें फिजिक्स्चें खूळ पिकविलें गेलें व सरकारी यंत्ररूप होऊन गेलेल्या युनिव्हर्सिटीवर लादलें गेलें, असाच स्वतंत्र विचार करणाऱ्या माणसांस व इतर निःस्पृह

शिक्षविषयपटु लोकांस वाटत होतें व हल्लींही वाटत आहे. तेव्हां तें काढून टाकण्यास कोणाची आडकाठी येईल असें वाटत नाहीं. हें फिजिक्स इंटरमीजिएट्मधून ढकलून प्रीव्हियसमध्यें आणलें गेलें, त्यावर आणखी एक धक्का मिळून तें दुय्यम शिक्षणक्रमांत घालणें मुळींच अशक्य नाहीं. इतकेंच नव्हे तर आमच्या शाळेंत तें व त्याच्या जोडीला रसायनशास्त्रही जसें पद्धतशीर होतें, तसें इतरत्र होईल तर त्याबद्दल एवढा बाऊ वाटणार नाहीं.

तेव्हां वरीलप्रमाणें दुय्यम शिक्षणांत फरक केल्यास युनिव्हर्सिटीच्या पहिल्या वर्षीं इंग्रजी व संस्कृतच्या जोडीला मातृभाषा व हिंदुस्थानचा राजकीय इतिहास हे विषय असावे. इंग्रजीमध्यें हल्लींप्रमाणें दोन पुस्तकें जरा अवघड असल्यास हरकत नाहीं, व इंग्रजी वाङ्मयाच्या इतिहासापैकीं अर्वाचीन भागाची ठोकळ माहिती असावी. संस्कृत कालिदास–भास यांचीं नाटकें व काव्याचे वेंचे असावे. हल्लींपेक्षां बरेंच जास्त संस्कृत वाचून व्हावें. मातृभाषेपैकीं एक प्राचीन कवि ( त्याचें कठीणसें एक अगर अधिक काव्य ) व त्याचें चरित्र, आणि आगरकरांसारख्यांच्या निबंधांचा भाग असावा. हिंदुस्थानचा इतिहास आज जो इंटरमीजिएट् परीक्षेला आहे तो खालीं घ्यावा व इंटरमीजिएट्ला इंग्लंडचा राजकीय इतिहास ठेवावा. इंटर्ला इंग्रजी शेक्स्पीअर व वर्ड्स्वर्थ, शेले, बायरन सारखे कवि व ॲडिसन पासून पुढें १२५ वर्षांच्या वाङ्मयाचा इतिहास नेमावा. संस्कृत अवघड नाटकें, व ब्राह्मण, सूत्रें, उपनिषदें यांतील वेच्यांचें पुस्तक आणि तर्क असावा. इंटरचा चौथा विषय सध्यांप्रमाणेंच लॉजिक रहावें, मात्र दोन्ही तर्कशास्त्रांची तुलना होत असावी. इंटरमीजिएट्ला मातृभाषा असली पाहिजे. दोन प्राचीन कवि व त्यांचा काळ, आणि निबंधमालेसारखा गद्यग्रंथ ठेवून, या दोन्हीही वर्षीं स्वतंत्र निबंधाचा पेपर आवश्यक करावा. याशिवाय प्रीव्हियस् व इंटरमीजिएट् मिळन इंडियन एकॉनॉमिक्स–हिंदी अर्थशास्त्राचा अभ्यास करावा. त्याचा पेपर मात्र इंटरमीजिएटलाच असावा.

## विशिष्टीकरण.

यानंतर पुढें विशिष्टीकरण सुरू व्हावें, पण तें हल्लींप्रमाणें लेचेंपेचें असूं नये. कोणतीही एकच भाषा, इतिहास ( हा मात्र नेहमीं हिंदुस्थान व इंग्लंड अगर कॉलनीज असाच सांगडीचा असला पाहिजे ), आधुनिक शास्त्रांपैकीं प्रत्येक वेगळें, गणित, न्याय, तत्त्वज्ञान ( हें यूरोपियन व हिंदी ), राजनीति, अर्थशास्त्र इत्यादि यांपैकीं एकच विषय अवश्य असावा. त्यांतील निरनिराळे भाग नेमून त्यांपैकीं अमुक घेतलेच पाहिजेत असा निर्बंध असण्यास हरकत नाहीं. दोन वर्षांनंतर परीक्षा झाल्यावर पुढें म्हणजे एम्. ए. साठीं आपापल्या विषयांत ' रिसर्चवर्क् ' करतां येईल अशी तजवीज करून, तें तसें येऊं लागलें आहे अशी खात्री झाल्या-खेरीज डिग्री देऊं नये. उदाहणार्थ संस्कृतपैकीं एक शास्त्र कोणीं घेतल्यास त्यांत चार अगर सहा पेपर्स असावे. पण एक स्वतंत्र निबंधासारखा असावा; तूर्तच इतर देशांप्रमाणें थीसिसूवर अडून बसणें व्यवहार्य होणार नाहीं. ही गोष्ट अत्यंत खर्चाची व कष्टाची आहे, हें आम्ही जाणून आहों. पण त्या दोन्ही गोष्टींसाठीं अडून बसल्यास केव्हांच प्रगति होणें शक्य नाहीं हें लक्षांत ठेवलें पाहिजे. युनिव्हर्सिटीला व प्रत्येक कॉलेजलाही चांगली लायब्ररी असली पाहिजे. तींत निरनिराळ्या विषयांवरील मासिकें भरपूर पाहिजेत. प्रत्येक कॉलेजांत प्रत्येक विषयासाठीं वेगवेगळें इन्स्टिट्यूट् अगर छोटीशी लायब्ररी असली पाहिजे, कीं जेथें जमून विद्यार्थी आपल्या विष-यावरील पुस्तकें वाचतील व माहिती गोळा करून लिहितील. या छोट्या लायब्ऱ्यांत शिक्षक व विद्यार्थी हमेष एकमेकांस भेटतील, बसतील, बोलतील अशी व्यवस्था व्हावयास पाहिजे.

## शिक्षण देणारी युनिव्हर्सिटी.

आमची युनिव्हर्सिटी आज फक्त परीक्षा घेणारी संस्था आहे. तिचें इतक्या उशिरां शिक्षणसंस्थेंत रूपांतर होणें कठिण आहे. असे प्रयत्न मात्र ती मनापासून करीत आहे ही आनंदाची गोष्ट आहे. हा हेतु

चांगल्या तऱ्हेनें साध्य होण्यासाठीं प्रथम एक उत्तम लायब्ररी युनिव्हर्सिटीनें तयार करायला हवी. सध्यांची लायब्ररी भिकार आहे; तिजवर पैसे खर्च करून लायब्रेरियन नेमला, पण त्याला दिडकीचें पुस्तक विकत घेण्याचा स्वतंत्र अधिकार ठेवला नाहीं हें गर्हणीय आहे. कमिटीनें पाहिजे तर कोणतीं पुस्तकें घ्यावीं हें वारंवार सुचवावें, लायब्रेरियनवर कांहीं ताबाही असूं द्यावा; पण त्याचे हातपाय अगदींच जखडून चालायचें नाहीं. बजेट करून दिल्यावर त्याच्याबरहुकूम खर्च होत आहे, गैरवाजवी होत नाहीं एवढें कमिटीनें पाहिलें म्हणजे झालें. उत्तम व भरपूर पुस्तकसंग्रह व सर्व विषयांवरील भारदस्त मासिकें—त्रैमासिकें हीं कोणत्याही युनिव्हर्सिटीजवळ विपुल असल्याशिवाय तिनें शिक्षणाचें काम हातीं घेऊं नये. दुसरी सूचना अशी कीं, मुंबईच्या सर्व कॉलेजांतील एम. ए. चीं लेक्चरें युनिव्हर्सिटीनें आपल्या लायब्ररींत भरवावीं व योग्य माणसेंच लेक्चरें देतील अशी व्यवस्था करावी. यासाठीं तेथील निरनिराळ्या कॉलेजांत प्रोफेसरांच्या लायब्ररीसाठीं थोडथोडी ग्रांट् दिल्यास हरकत नाहीं. युनिव्हर्सिटीची अशीच एक जंगी लॅबोरेटरी असायला पाहिजे. तींत एम. एस् सी. ची व्यवस्था असावी. या विषयासाठीं नांवाजलेलीं एक दोन माणसें परदेशांहून तूर्त आणवावीं व त्यांनीं आमचेकडील माणसें चांगलीं तरबेज करून देऊन मग परत जावें. एकॉनॉमिक्सच्या प्रोफेसरच्या जागेचा खर्च सरकारनें युनिव्हर्सिटीला देऊं केला आहे ही आनंदाची गोष्ट आहे; पण ती जागा युरोपांत पाठवून उत्तम आर्थिक शिक्षण देऊन आणलेल्या हिंदी माणसासच देणें अधिक श्रेयस्कर आहे असें आह्मांस वाटतें. अर्ध्या शतकाचेवर इंग्रजी शिक्षण मिळूनही आह्मी दुसऱ्याच्याच ओंजळीनें पाणी पिण्यास पात्र आहों, अझूनही असले विषय जबाबदारीनें शिकविण्याची धमक आमच्यांत आली नाहीं, असें म्हणण्याचें आज तरी कोणी धाडस करील असें वाटत नाहीं. असें असतां हिंदी अर्थशास्त्र सांगण्याला इंग्लिश प्रोफेसरच कां पाहिजे हें कळत नाहीं. आरंभीं तज्ज्ञ माणसें बाहेरून आणावयास

आमची हरकत नाहीं; पण आमचेकडील २।४ तरुण होतकरू माणसें परदेशीं पाठवून तयार करून आणल्यावर व त्यांस प्रत्यक्ष कामाचा २।३ वर्षें अनुभव आल्यावर मात्र वरील काम त्यांजवर सोंपविण्यांत यावें. आमची बुद्धि व कर्तबगारी दाखविण्यास जोंवर वाव दिला जात नाहीं, तोंवर आमच्यांत दोन्हीही कमी आहेत असें कोणी सांगू लागल्यास त्यास आह्मी हंसूं मात्र !

अशा रीतीनें आमच्या युनिव्हर्सिटीला अंशतः शिक्षण देणारी युनिव्हर्सिटी होतां येईल. पण जोंवर युनिव्हर्सिटीनें मान्य केलेलीं कॉलेजें सर्व इलाखाभर पसरलीं आहेत तोंवर आमची युनिव्हर्सिटी सर्वस्वी शिक्षणसंस्था होणें शक्य नाहीं; ज्या ज्या ठिकाणीं हल्लीं कॉलेजें आहेत, तेथें तेथें तीं जमेस धरून बेताबाताच्या युनिव्हर्सिटयांची स्थापना कधीं काळीं झाली तर हें शक्य आहे; तें घडवून आणण्याचे प्रयत्न हळुहळू होऊं लागतील अशी आशा आहे.

## पुणें येथें युनिव्हर्सिटी.

आजच पुणें येथें अशा एका युनिव्हर्सिटीची जवळ जवळ तयारी आहे. येथें दोन पूर्ण आर्ट्स् कॉलेजें आहेत व तिसरें निघत आहे. एक एंजिनियरिंग व ॲग्रिकलचरचें अशीं दोन व्यावहारिक शिक्षण देणारीं आहेत. सासून हॉस्पिट्लला जोडून मेडिकल् कॉलेज काढणें फारसें अशक्य नाहीं. यास लॉ कॉलेजची जोड दिली कीं, मुंबई युनिव्हर्सिटीची बरोबरी झाली. शिवाय येथें एक ओरिएंट्ल रिसर्च् इन्स्टिट्यूट् निघूं पाहत आहे. दोन तीन चांगल्या लायब्र्याही येथें आहेत. आतां प्रश्न मुख्य पैशाचा आहे. पैसा पैसा करून एक कांचशाळा जेथें चालते, अगर जेथें हिंदुस्थानांत इतरत्र नसणाऱ्या व म्हणूनच अपूर्व अशा एक दोन सोसायट्या आहेत, अशा महाराष्ट्रास ही गोष्ट फारशी कठीण नाहीं. परिश्रमानें व स्वार्थत्यागानें काय होईल हें येथें नुकतीच निघालेली स्त्रियांची युनिव्हर्सिटी दाखवीत आहे.

## वसतिगृहें.

युनिव्हर्सिटीच्या अगर तिच्या कॉलेजांच्या वसतिगृहांत राहणें विद्यार्थ्यांस सरसहा आवश्यक करावें, कीं नाहीं हा प्रश्न आहे. तसें केल्यानें विद्यार्थ्यांच्या वर्तणुकीवर दाब राहील, त्यांचें चारित्र्य सुधारेल, एकप्रकारच्या ' सारस्वत ' वातावरणांत ते राहिल्यामुळें त्यांच्यावर सुपरिणाम घडतील, या गोष्टी महत्त्वाच्या आहेत. त्यामुळें शक्य तितकें वसतिगृहांत मुलांनीं रहावें अशी शिफारस करण्यास आमची मुळींच हरकत नाहीं. पण असा सक्त निर्बंध करणें मात्र गैरवाजवी होईल. यामुळें गरीब स्थितींतल्या—परंतु वरिष्ठ शिक्षण घेण्यास सर्वस्वीं योग्य, अशा कित्येक विद्यार्थ्यांस युनिव्हर्सिटीच्या दरवाज्यांत विनाकारण मज्जाव होईल; व तसें होणें आमच्या देशाच्या हल्लींच्या सामाजिक, राजकीय व आर्थिक स्थितींत अगदीं अनिष्टकारक आहे. आधींच शिक्षण महाग झालें आहे, इतर जीवनक्रम पराकाष्ठेचा कष्टाचा होऊन बसला आहे; पण प्राप्ति मात्र त्या मानानें मुळींच वाढलेली नाहीं. अशा स्थितींत वसतिगृहांत हरएक विद्यार्थ्यानें राहिलेंच पाहिजे असा हट्ट धरणें उपयोगाचें नाहीं. या बाबतींत आपण अमेरिकेचेंच अनुकरण केलें पाहिजे. तेथें असा कोणताही निर्बंध नाहीं. असें आहे तरी अमेरिकन विद्यार्थ्यांचें चारित्र्य म्हणजे इंग्लिश अगर इतर विद्यार्थ्यांच्या चारित्र्याहून हीन आहे अशांतला भाग मुळींच नाहीं.

तथापि विद्यार्थ्यांच्या सोईसाठीं, व त्यांचें आरोग्य वगैरे ठीक राहील या दृष्टीनें केंब्रिजच्या धर्तीवर ' लायसेन्स्ड् हौसेस् ' विद्यार्थ्यांसाठीं असणें जरूर आहे. एवढ्या जागेंत अमुक माणसांच्या वर माणसें राहतां कामा नये, उजेड व हवा भरपूर असावी, ओल व घाण घरांत व घराबाहेर असूं नये, इत्यादि गोष्टींकडे घरांस लायसेन्स् देतांना युनिव्हर्सिटी अगर कॉलेजांनीं लक्ष्य पुरवावें. पण त्याबरोबरच भाडेंही अमुक मर्यादेच्या बाहेर आकारूं नसे असा सक्त निर्बंध पाहिजे. असें झाल्यास पुण्यामुंबईच्या बऱ्याचशा विद्यार्थ्यांचे हाल वांचतील.

## आणखी कॉलेजांची आवश्यकता.

गेल्या पंचवीस वर्षांचा आढावा काढला तर वरिष्ठ शिक्षणाची जरूर दिवसेंदिवस जास्त भासत आहे असें दिसून येईल. ज्या कॉलेजांत विद्यार्थ्यांची संख्या एकदांच नियमित करून टाकली आहे अशीं थोडीं वगळलीं, तर इतरांमध्यें गेल्या दहा वर्षांतच विद्याविद्यार्थ्यांची संख्या दुपटीनें—नव्हे अधिकच वाढली आहे. कॉलेजांची संख्या मात्र मुळींच वाढली नाहीं हें इष्ट नाहीं. अशा वेळीं स्वतःस कॉलेजें काढणें इष्ट नसलें, तर लोकांस तरी तीं काढण्याचें उत्तेजन देणें सरकारचें कर्तव्य आहे. सिंधला आणखी एक गुजराथेला आणखी एक, महाराष्ट्राला आणखी दोनतीन व दक्षिण महाराष्ट्राला एक, इतकीं तरी कॉलेजें लवकरच निघणें अत्यंत जरूर आहे. या युद्धाचे दिवसांत सरकारास काटकसर करणें प्राप्त आहे, तरी सरकारनें प्रोत्साहन व सवलती दिल्यास धनिक लोक पैसे देण्यास तयार होतील यांत शंका नाहीं. याशिवाय आणखी एकदोन मेडिकल कॉलेजें, अमदाबाद, कराची सुरत अशा ठिकाणीं व्यापारी व धंदेशिक्षणाचीं कॉलेजें हीं हवीं आहेत. स्त्रियांसाठीं वेगळ्या मेडिकल कॉलेजांची अत्यंत जरूरी आहे. त्यांच्या अभावीं हिंदी स्त्रियांचे व अर्भकांचे हाल होऊन त्यांचें बरेंच मोठें प्रमाण अकालीं मृत्युमुखीं पडतें, याचें खापर जितकें लोकांच्या त्याहीपेक्षां अधिक जोरानें सरकारच्या माथीं फुटतें. दिल्लीस 'लेडी हार्डिंज मेमोरियल् कॉलेज' स्त्रियांसाठीं निघत आहे, पण त्याचा महाराष्ट्रास तादृश उपयोग होणार नाहीं. पुण्यासारख्या ठिकाणींच तें निघालें पाहिजे; व धनिकांचे मनांत आल्यास ही गोष्ट म्हणजे अगदींच अशक्य कोटींतली आहे असें नाहीं.

## युनिव्हर्सिटीची अंतर्व्यवस्था.

शेवटीं वरील प्रतीचें शिक्षण जिच्या हातीं आहे त्या संस्थेच्या अंतर्रचनेविषयीं दोन शब्द सांगणें जरूर आहे. आपल्या युनिव्हर्सिटीचीं सेनेट व सिंडिकेट् अशीं मंडळें दोन आहेत. पैकीं एक कायदेकानू करणारें व दुसरें कामकाज पाहणारें आहे. हें सर्व ठीक असावें तसें आहे. पण सेनेटची

घटना जितकी असावी तितकी पसंत व स्वतंत्र नाहीं. हींत निवडलेले व नियुक्त मिळून शंभर व एक्सऑफिशियो सात असे १०७ फेलोज् आहेत. एक्सऑफिशिओ सोडले, तर बाकीच्या शंभरांपैकीं ऐशीं ८० सरकारनियुक्त आहेत, व फक्त वीसच निवडलेले आहेत. ही स्थिति फारशी उत्साहजनक नाहीं. कारण बरेच सरकारनियुक्त सभासद साधारणतः मिंधे असतात, व बऱ्याच आणीबाणीच्या वेळीं त्यांस आपली सदसद्विवेक बुद्धि दडवून ठेवून सरकार म्हणेल तसें मत द्यावें लागतें. याचीं उदाहरणें देत बसण्यास नको. चार वर्षांपूर्वी वरिष्ठ अभ्यासक्रमांत ज्या विलक्षण घडामोडी झाल्या, त्या वरील विधानाची सत्यता पटवतात. त्या बाबतींत सुधारणा होणें इष्ट आहे व त्यासाठीं सुशिक्षितांनीं खटपट केली पाहिजे. निदान निम्मे तरी फेलोज् रेजिस्टर्ड् ग्रॅज्युएटांनीं निवडून दिलेले असावेत. शिवाय रेजिस्टर करण्याच्या अटी जड आहेत कीं काय हेंही पाहिलें पाहिजे. ग्रॅज्वेटांना दहा वर्षांची अट फार अन्यायाची आहे; ती कमी केली पाहिजे. अशासाठीं आज चळवळ सुरू केली पाहिजे. मात्र अशी निवडणूक होतांना योग्य माणसें—शिक्षणविषयाला ज्यांनीं आपलें आयुष्य वाहिलें आहे अशीं माणसें, जास्त निवडलीं जातील याबद्दल खबरदारी घेतली पाहिजे. खरें म्हटलें असतां जे प्रत्यक्ष शिक्षण देणार त्यांसच या सर्व बाबतींत अधिकार असावा; सर्व दिवस उदरंभरणाच्या धंद्यांत घालवून मग शिळोप्याच्या वेळांत शिक्षणाविषयीं विचार करणाऱ्यांचें निदान मताधिक्य तरी असूं नये. सिंडिकेट्मध्यें आहेत तेवढेच सभासद पुरत, परंतु तिच्या कामांपैकीं दोन फॅकल्टीज्कडे दिलीं पाहिजेत. तीं दोन परीक्षक नेमणें व लेक्चरर्स वगैरे नेमणें हीं होत. निदान प्रथम एवढी तरी सुधारणा करणें इष्ट आहे, कीं फॅकल्टींनीं हे लोक नेमावे व विशिष्ट कारण नसतांना सिंडिकेटनें त्यांत ढवळाढवळ करतां कामा नये. म्हणजे परीक्षक निवडण्यांत हल्लीं जे निरनिराळे प्रकार होतात ते होणार नाहींत. शिवाय अशी निवडणूक करतांना डिग्री वगैरे तर लक्ष्यांत घेतली पाहिजेच, पण त्याशिवाय विषेश कटाक्ष

नेमल्या जाणाऱ्या माणसांनीं आपल्या विषयांत कांहीं विशेष प्रवीणता दाखविली आहे कीं नाहीं या गोष्टीवर असावा. या विषयासंबंधानें जितकें लिहावें तितकें थोडेंच आहे. सुधारणा करायला वाटेल तेवढी जागा आहे. अशा किती तरी किरकोळ बाबती दाखवितां येतील, कीं ज्यांत सुधारणा इष्ट आहे. पण आज फक्त मुख्य मुद्याच्या गोष्टींवर आमचा कटाक्ष होता. त्यांत सुधारणा होत गेली कीं, किरकोळ बाबीही आपोआप सुधारत जातील.

## स्त्रीशिक्षण.

शेवटीं स्त्रीशिक्षणाविषयीं विचार करावयाचा आहे. तो शेवटावर टाकण्याचें कारण तो एक स्वतंत्र विषय आहे; व पुरुषांचे शिक्षणाइतकाच किंबहुना जास्त महत्त्वाचा तो आहे असें आमचें मत आहे. शिवाय स्त्रियांची स्वतंत्र युनिव्हर्सिटी काढण्यासाठीं प्रो. कर्वे हे अश्रांत श्रम करून राहिले आहेत. त्यांच्या या उद्योगावर अनुकूल–प्रतिकूल टीकांचा सारखा भडिमार चालला आहे. या सर्व वादविवादांतून एक गोष्ट स्पष्टपणें नजरेस येते, ती ही कीं, स्त्रीशिक्षणाविषयीं आतां अनास्था–उदासीनतेची प्रवृत्ति जाऊन या विषयासंबंधानें तीव्र विचारजागृति झालेली आहे.

पुरुषांचे इतकाच किंबहुना जास्त महत्त्वाचा समाजाचा घटकावय स्त्रिया होत. जास्त महत्त्व त्यांस त्यांच्या नैसर्गिक कर्तव्यानेंच प्राप्त झालें आहे. संसार दोघांवर सारखाच अवलंबून असल्यामुळें दोघांचा दर्जा सारखाच होय हें तत्त्व जसें अबाधित आहे, तसेंच भावी पिढी निपजवून बरी वाईट बनविण्याचें सर्वस्वी त्यांच्या हातांत असल्यामुळें, त्यांचें महत्त्व अधिक आहे हें निर्विवाद आहे. एवढ्याचसाठीं, पुरुषांच्या शिक्षणाचें उपांग म्हणून त्याच्या आनुषंगानें स्त्रीशिक्षणाचा विचार करण्याची पद्धति पडली होती, ती आतां सोडून देण्याची वेळ आली आहे. ज्यावेळीं पुरुषांच्या शिक्षणालाच ठिकाण नव्हता त्यावेळीं स्त्रीशिक्षणाकडे लक्षही न जाणें साहजिक होतें. पुढें पुरुषांचे

समग्र शिक्षणाची सोय झाली, तेव्हां ज्यांस थोडा तरी पुढला विचार होता त्यांनीं स्त्रियांसही शिक्षण मिळावें म्हणून खटपट केली व प्रथम पुरुषां-सारखेंच शिक्षण त्यांसही देण्यांत येऊं लागलें. पहिला काळ स्त्रियांस मुळीं शिक्षणच असावें कीं नसावें या भांडणांत गेला. हें भांडण आतां जरी शुष्क वाटतें तरी तें ओघानेंच प्राप्त झालें होतें. याच ओघाला पुढें निरनि-राळीं वळणें मिळत गेलीं. तरीपण स्त्रीशिक्षणाचा स्त्रियांच्याच दृष्टीनें सांगोपांग विचार हिंदुस्थानांत आजवर खास झालेला नाहीं.

आज स्त्रीशिक्षणासंबंधीं विचार करतांना एक प्रश्न कोणीही सहज विचारतें कीं, मुलांसाठीं इतक्या शाळा—कॉलेजें आहेत त्यांतच मुलींना शिक्षण देण्यास काय हरकत आहे? अनायासें सोय असतां मुद्दाम गैरसोयींत पडण्यांत काय फायदा? त्यास पहिलें उत्तर असें कीं मुलांच्या शाळा मुलांसच पुरेनाशा झाल्या आहेत; कितीएकांना दुय्यम शिक्षणाला विमुख व्हावें लागत आहे. अशा स्थितींत मुलींना मुलांच्या शाळांत ढकलण्याची सोय नाहीं. जेथें पूर्वी मुलांबरोबर मुलीही घेण्याची व्यवस्था असे, तेथें आतां पुनः मुलींस मज्जाव झाल्याचीं उदाहरणें आहेत. सोय नसेल तर मुळींच शिक्षण न मिळण्यापेक्षां मुलींना खुशाल मुलांचे शाळेंत जाऊं द्यावें; कारण अशी कांहीं कोणाजवळ जादूची कांडी नाहीं कीं, जिच्यायोगें एकदम देशभर मुलींसाठीं मुलींच्या शाळांचें जाळें पसरेल! असो. पण हें कांहीं सगळें व खरें उत्तर नव्हे. खरें उत्तर निराळ्याच तत्त्वावर अवलंबून आहे.

पुरुष व स्त्री यांचा समाजांत दर्जा सारखा आहे यांत वाद नाहीं. संसाराचा गाडा सुरळित चालणें जितकें पुरुषाच्या तितकेंच स्त्रीच्याही कार्यक्षमतेवर अवलंबून आहे. या कार्यक्षमतेचें क्षेत्र मात्र दोन्ही-पक्षीं भिन्न आहे. दुसरीं अनेक कर्तव्यें स्त्रियांचीं पुरुषांस व पुरुषांचीं स्त्रियांस करतां येतील. सर्व तऱ्हेचा कारकुनी पेशा, शिक्षकाचा धंदा, व्यापार उदीम सुद्धां स्त्रिया तितक्याच हुषारीनें करूं शकतात, हें जगाच्या

रोजच्या घडामोडी जो चौकशीनें पाहील त्यास कळून येईल; आश्चर्य हें कीं, एका शतकापूर्वीं हीं कामें स्त्रियांच्या आवांक्याबाहेरचीं गणिलीं जात. उलट गायन, नाच, स्वयंपाक वगैरे पूर्वीं खास स्त्रियांच्या समजल्या गेलेल्या गोष्टी हल्लीं पुरुष तितक्याच चपलतेनें करीत असतांना आपण पाहतों. पुरुष म्हणजे धैर्याचा स्तम्भ व स्त्री म्हणजे भीरुपणाची मूर्ति हा अगदीं कालपर्यंतचा समज आतां शिक्षण वगैरे अन्य गोष्टींनीं अन्यथा झाला आहे. पण इतकें करूनही पुरुष व स्त्री यांमध्यें केवळ लिंगभेदाशिवाय निसर्गसिद्ध असे कांहीं भेद आहेत. ते अर्थात् एकमेकांचे परिपूरक आहेत. स्त्री पुरुषाचें व पुरुष स्त्रीचें व्यंग भरून काढून संसारांत एकमेकांस साहाय्य करतात. बुद्धीची एकतानता स्त्रींत नाहीं व हृदयाचा जिव्हाळा पुरुषांत नाहीं. याचा अर्थ स्त्रिया निर्बुद्ध अगर पुरुष पाषाण हृदयाचे असतात असा मुळींच नाहीं. पण बुद्धीचें साम्राज्य जसें पुरुषांत तसें हृदयाचें स्त्रीत आहे, हें निर्विवाद आहे. हल्लींसारखें महायुद्ध, अगर बिकट प्रसंगीं एखादें राज्य स्त्रियांस चालवणें जितकें अशक्य तितकेंच निःस्वार्थी भूतदयेचें—मातृवत्सलतेचें काम पुरुषांचे हातून तितक्या सफाईनें स्वतःस पार विसरून होण्याचें कठीण. हे त्यांच्या स्वभावांतील निर्सगसिद्ध विशेष होत. आतां शिक्षण म्हणजे निसर्गसिद्ध शक्तींचा स्वाभाविकपणें विकास करणें हें असेल तर सहजच स्त्रियांस व पुरुषांस शिक्षण कांहीं बाबतींत तरी भिन्न असलें पाहिजे हें प्राप्त होतें. व याच तत्त्वाला अनुलक्षून आमचें असें म्हणणें आहे कीं, स्त्रीशिक्षण हा स्वतंत्र विषय आहे व त्याचा विचारही स्वतंत्रपणेंच झाला पाहिजे.

हिंदुस्थानांतील स्त्रीशिक्षणाचा प्रश्न सोडवितांना हल्लींच्या परिस्थितीकडे लक्ष पुरविलें पाहिजे. आपल्या येथें आज तरी स्त्रियांचें आयुष्यांतील ध्येय संसार हेंच आहे. अविवाहित स्थिति आमचेकडे स्त्रियांपुरती तरी आज फार चमत्कारिक वाटते. पुढें—फार पुढील भविष्यत्काळीं, काय होईल हा प्रश्न वेगळा आहे. म्हणूनच स्त्रियांस जें शिक्षण द्यावयाचें तें पुढें पत्नी व आई या नात्यानें त्यांच्यावर ज्या कांहीं जबाबदाऱ्या

येणार आहेत, त्यांचा पूर्ण विचार करून दिलें पाहिजे. स्त्रियांची संख्या पुरुषांपेक्षां जास्त असल्यामुळें यूरोपांतील बऱ्याच देशांत जे आर्थिक प्रश्न उद्भवतात, ते आमचेकडे तशी परिस्थिति नसल्यामुळें उत्पन्न होत नाहींत. त्यामुळें स्त्रियांस व्यावहारिक शिक्षण हवें, कीं नको वगैरेसारखे प्रश्न आज निरर्थक आहेत. स्त्रीपुरुषांच्या संख्येंतील या वैषम्यामुळें अगर केवळ चैनीखातर अविवाहित राहण्याची प्रवृत्ति यूरोपांतील कांहीं देशांप्रमाणें सुदैवानें आमच्या तरुणींची नाहीं. त्यामुळें आमचेकडील स्त्रीशिक्षाणाचा प्रश्न अनायासेंच जरा सोपा होतो.

याशिवाय आमच्या सामाजिक परिस्थितीनें स्त्रीशिक्षणाला अस्थिर अशीच, पण कांहीं एक मर्यादा घालून ठेविली आहे. स्वत:स कट्टे सुधारक म्हणविणारे व त्याप्रमाणें वागणारे कांहीं मोजके लोक आज वगळले, तर साधारण मध्यमस्थितींतील लोकांच्या मुलींची लग्नमर्यादा तेरा फार तर चौदापर्यंत चढली आहे. ही आणखीही वाढेल अशीं चिन्हें सुदैवानें दिसत आहेत. याचें एक कारण आमचे तरुण आपलें शिक्षण पूर्ण झाल्याशिवाय लग्नासारखी जबाबदारी अंगावर घेण्यास हळू हळू नाखुष होऊं लागले आहेत. यामुळें त्यांच्या लग्नाच्या वयोमानाबरोबर मुलींचेंही वयोमान न कळत थोडथोडें वाढणारच. दुसरें, आपलें इतकें शिक्षण होऊन शेवटीं आपला संसारांतील वांटेकरी अक्षरशत्रु असल्यास सर्व विरस होईल, हीही जाणीव आमच्या तरुणांत उत्पन्न झाली आहे. यामुळें अलीकडे अगदीं जुन्या पद्धतीच्या कुटुंबांतही स्त्रीशिक्षणानें थोडथोडा शिरकाव केला आहे. या सर्व कारणांचा व परिस्थितीचा न कळत परिणाम असा होईल कीं, लवकरच आमचेकडील मुलींच्या लग्नाची वयोमर्यादा सोळाच्या पुढें जाईल.

आपण आज स्त्रीशिक्षणाचा विचार करायचा तो वर वर्णिलेल्या मध्यमस्थितींतल्या वर्गाच्या दृष्टीनें करावयाचा आहे. एखाद्या अगदीं पुढें गेलेल्या स्वतंत्र विचाराच्या सुधारकी कुटुंबाकडे पाहून सामान्य स्त्रीशिक्ष-

णाचा क्रम ठरविणें यासारखी दुसरी मोठी चूक होणें शक्य नाहीं. अशा व ज्यांस संसारांत पडण्याची इच्छा व जरूरी नाहीं त्यांस कोणत्याही तऱ्हेचें शिक्षण इच्छेप्रमाणें घेण्यास कोणाची आडकाठी नाहीं. त्यांनीं पाहिजे तर मुलांसारखेंच शिक्षण घ्यावें व तेंही एम्. ए., एम्. डी. आदि कडेपर्यंत पोंचवावें. आम्हांस त्यांचा विचार करणें नसून फार विस्तृत असा जो साधारण पुराणप्रिय प्रवृत्तीचा मध्यम वर्ग त्यांतील सामान्य मुलींचा करावयाचा आहे.

आपलेकडील मुलींच्या शिक्षणाचा क्रम दहा वर्षांचा असण्यास आतां मुळींच हरकत नाहीं. सहाव्या वर्षापासून सोळाव्या अखेर हा अभ्यासक्रम पुरा व्हावा. प्रथम कांहीं थोडे दिवस बऱ्याच मुलींस तेराव्या किंवा चौदाव्या वर्षाच्या अखेर आपला अभ्यास अर्धाच सोडून संसारांत शिरावें लागेल. पण त्यांच्याचकडे पाहून अभ्यासक्रम सहासात वर्षांचा संकुचित करून उपयोग नाहीं. दहावीस वर्षांत संसारांत पडण्याची मर्यादा सोळा वर्षेपर्यंत वाढेल असें खास वाटतें; असो. या दहा वर्षांच्या अभ्यासक्रमाचा मुख्य उद्देश असा असावा कीं, तो संपविलेल्या मुलींस सर्वांगसुंदर संस्कृति देणारें शिक्षण मिळालेलें असून त्यांच्या **निसर्गप्राप्त गुणांस व कर्तव्यांस पोषक** असें ज्ञान त्यांस प्राप्त झालेलें असावें.

## प्राथमिक.

या दहा वर्षांच्या अभ्यासक्रमाचे प्राथमिक व दुय्यम असे भाग स्वाभाविक पडतात. पैकीं प्राथमिक भागांत मुलांचे व मुलींचे सर्व विषय सारखेच असल्यास हरकत नाहीं. मुलांच्या इतकेंच मातृभाषेचें ज्ञान, इतिहास, भूगोल, गणित, सृष्टिज्ञान वगैरे विषय व्हावे. सहली, मुलांचे बाग वगैरे सर्व कांहीं सारखें असावें. योग्य भावनेचा परिपोष होण्यासाठीं सोपें गाणें, बाहुल्या वगैरे करणें, घरखेळणें, पाळलेल्या पशुपक्ष्यांची जोपासना करणें इत्यादि गोष्टींकडे विशेष लक्ष असावें. तूर्त मुलांबरोबरच मुलींचीही शिक्षणाची सोय झाली तरी हरकत नाहीं. इतकेंच नव्हे तर

हल्लींच्या परिस्थितींत त्याशिवाय तरणोपाय नाहीं. आजच एकदम म्युनिसिपालिट्या अगर लोकलबोर्डें अगर सरकार पुरेशा मुलींच्या शाळा घालूं शकतील अशांतला भाग मुळींच नाहीं. म्हणून मुलांच्या प्राथमिक शाळांतच मुलींच्याही शिक्षणाची सोय होणें अपरिहार्य आहे. पण वेगळ्या शाळा काढून शिक्षकिणी ठेवणें हा पक्ष चांगला. कारण शिक्षकिणींना लहान मुलांचें अंतःकरण जसें समजेल व त्या मुलांचा त्रास जितका सोसूं शकतील तितका (पुरुष) शिक्षक स्वभावतःच सोसण्याला समर्थ होणार नाहींत. हें अर्थात् ध्येय आहे. यासाठीं शिक्षकिणी मात्र उत्तम शिक्षण मिळालेल्या व उत्साही अशा पाहिजेत. सध्यांच्या शिक्षकिणींच्या हांतून हें काम होणें नाहीं.

## दुय्यम स्त्रीशिक्षण.

स्त्रियांचें दुय्यम शिक्षण सहा वर्षांचें सध्यां धरलें आहे. या सहा वर्षांत मातृभाषा चांगली आली पाहिजे. मराठी क्रमिक पुस्तकें पहिलीं दोन वर्षें संपवून, पुढल्या चार वर्षांत मराठी गद्य व पद्य वाङ्मयाचें अध्ययन चांगलें झालें पाहिजे. मोरोपंत वामन यांचीं सोपीं काव्यें समजावीं, केसरीसारख्या वृत्तपत्राचें गद्य समजावें, चांगलें बोलतां व लिहितां यावें, एखाद्या विषयावर आयत्या वेळेस दिलेला निबंध भाषाशुद्ध व विचारपरिप्लुत असा लिहितां यावा. मराठी ४।५ व इंग्रजी १।२ इयत्ता होऊन संसारांत पडलेल्या आमच्या तरुण मुलींस केसरीसारखें पत्र व एखादें अलीकडे लिहिलेलें प्रवासवृत्त समजण्याची शक्ति नसते ही अनुभवाची गोष्ट आहे. चांगलें अक्षर लिहितां येणें व मोडी निदान वाचतां तरी येणें या गोष्टीवर विषेश कटाक्ष असावा. मातृभाषेला सरसकट पांच तास आठवड्याचे पुरत. याशिवाय पहिलीं दोन वर्षें संस्कृत व हिंदी आणि शेवटचीं पांच वर्षें संस्कृत व इंग्रजी या आणखी भाषा झाल्या पाहिजेत. हिंदीला दोन्ही वर्षें आठवड्यांत तीन तास, संकृतला पांची वर्षें आठवड्यांतून चार तास व इंग्रजीला पहिलीं दोन वर्षें चार व पुढें सहापर्यंत तास असावे.

इंग्रजी अर्थात् कॉन्व्हर्सेशनल् पद्धतीनें व्हावयाचें आहे. रॉयल, नेल्सन, लॉंगमन्स्, वगैरे रीडर्स होतील तितकीं वाचून घेऊन नंतर व्हिकार् ऑफ वेकफील्ड, रॉबिन्सन् क्रूसोसारखीं संपूर्ण पुस्तकें वाचवावीं. सोपें व संप्रदाय-शुद्ध इंग्रजीच मुलींच्या हातीं पडेल अशी व्यवस्था व्हावी. एकीकडे चॉसर्–स्पेन्सरसारखीं जुनीं व दुसरीकडे मेकॉले–बर्कसारखीं नवीं असूनही अवघड पुस्तकें टाकाऊ म्हणून सोडून द्यावीं. सोपें पण व्याकरणशुद्ध भाषांतर करणें, नीट वाचणें व शुद्ध लिहिणें या गोष्टी विशेष काळजीनें करून घेतल्या पाहिजेत. एकेक वर्ष मुलांच्या दुय्यम अभ्यासक्रमापेक्षां इकडे कमी असल्यामुळें थोडी तफावत पडेल हें खरें. पण दोन्ही भाषांच्या सामान्य ज्ञानांत मुलांमुलींमध्यें फरक पडण्यास फारसें कारण दिसत नाहीं. संस्कृत प्रथम हितोपदेश, पंचतंत्र, नंतर रामायणमहाभारतांतलि सोपे वेंचे, तिसऱ्या वर्षी रघु, कुमार यांतील सोपे सर्ग, चौथ्या वर्षी कादंबरीसार व एखादें दुसरें सोपें नाटक, भासाचें सोपें नाटक, व शेवटीं दुसरी कुसुममाला, अगर दशकुमार कादंबरी यांतील वेंचे अशा धर्तीवर व्हावें. प्रथमच व्याकरणाची घाई उपयोगी नाहीं. हितोपदेशावरून तें सहज शिकवितां येईल. पुढील चार वर्षांत भाण्डारकरांच्या दोन पुस्तकांइतकें व्याकरण सहज करतां येईल. संस्कृतांतील संस्कृति मुलींतून तरी नाहींशी होतां कामा नये.

इतिहास व भूगोल हे विषय मुलांप्रमाणेंच व्हावे. परंतु इतिहासापैकीं इंग्लिश इतिहास–निदान इंग्रजी राज्यपद्धतीचा इतिहास तरी गाळलेला चालेल. हा पुढें कॉलेजमध्यें व्हावा. या विषयास प्रथमपासून अखेरपर्यंत चार तास ठेवावे. भूगोलसुद्धां, हिंदुस्थान इंग्लंडवर्ज्य–फारसा भानगडीचा व बारीकसारीक नसलेला चालेल. भूगोलांतच खगोलाचें ठोकळ ज्ञान–ग्रह, तारे, ग्रहणें, गति, त्यांचा सृष्टीवर परिणाम, दिवस, रात्र, महिने यांची सोपात्तिक माहिती–आली पाहिजे.

गणित मुलींस कमी ठेवण्यास हरकत नाहीं. अंकगणित त्रैराशिक, सरळव्याजपर्यंत. बीजगणित फॅक्टर्स अखेर व भूमिति मूलतत्त्वें समजण्या-

पुरती-एखादेंच पुस्तक-असावी. पैकीं अंकगणित प्राथमिक शिक्षणांत बरेंचसें होऊन जाईलच. या विषयाला आठवड्यांतून तीन तास पुरतील. गणित हा विशेषतः बौद्धिक विषय आहे. तेव्हां तो मुलींस बेतापुरता म्हणजे संसारापुरताच कळणें इष्ट आहे. महत्त्वमापन, आयडेन्टिटी, ईक्वेशन् व भूमितीचे भानगडीचे सिद्धांत त्यांस नको आहेत. त्यांच्या नित्यक्रमांत या गोष्टींची काडीइतकीही जरूरी नाहीं, म्हणून त्या वर लिहिल्याप्रमाणें थोडक्यांत आटपल्या पाहिजेत.

सृष्टशास्त्रांचीं जितकी मुलांस तितकीच मुलींसही जरूरी आहे. गवतें, झाडें, फुलें कशीं उगवतात, त्यांचे उपयोग काय इत्यादि साध्याच गोष्टी आईस ठाऊक नसल्यामुळें लहान मुलांची स्वाभाविक जिज्ञासा कशी दाबली जाते हें लक्ष्यांत घेतां, सृष्टींतील अशा पदार्थांची व नित्य व्यवहारांतल्या प्राण्यांची वगैरे माहिती अगदीं अवश्य आहे, हें उघड आहे. मनुष्याच्या शरीराची पूर्ण माहिती होणें जरूर आहे. हें ज्ञान दुय्यम शिक्षणाच्या अगदीं आरंभापासून अखेरपर्यंत आठवड्यांतून दोन तास दिलेलें पुरेल. ही माहिती प्रत्यक्ष प्रयोगद्वाराच झाली पाहिजे.

गृहव्यवस्था हा स्वतंत्र विषय ठेवावा. यास प्राथमिक शिक्षणाच्या शेवटल्या वर्षापासूनच आरंभ केल्यास हरकत नाहीं. घरांतील सर्व टापटीप व व्यवस्था, नीटनेटकेपणा, स्वच्छता इत्यादीपासून स्वयपाकापर्यंत सर्व कामें क्रमाक्रमानें शिकविलीं गेलीं पाहिजेत. खरें म्हटलें असतां या विषयाच्या शिक्षणाचें खरें ठिकाण म्हणजे घरच होय. पण आज तरी शाळेंतही या विषयाकडे लक्ष पुरविल्याशिवाय निरुपयोगी गोष्टी केवळ जुन्या म्हणून पुढें चालविण्याची पद्धति मोडली जाणार नाहीं. या शिक्षणासाठीं शक्य तर 'बोर्डिंग् स्कूल्स्' काढावीं लागतील. तीं तशीं काढलीं म्हणजे बायकांचीं जबाबदारीचीं कामें पाळीपाळीनें मुलींकडून करवून घेतां येतील. यांतच संसारास लागणाऱ्या पदार्थांविषयीं उपयुक्त माहिती देण्याची व्यवस्था असावी. यामुळ आज

जें चाकरमाणसांवर सर्वस्वीं अवलंबून रहावें लागतें व त्यांचा मिंधेपणा पत्करावा लागतो, तसें होणें कमी होत जाईल. यास सरसकट एक–फार तर दोन तास ठेवलेले पुष्कळ होतील.

आरोग्यशास्त्र:—यासारखा आणखी महत्त्वाचा विषय आजच्या हिंदुस्थानच्या संसारांत दुसरा असेल असें वाटत नाहीं. मुलांचें भयंकर मृत्युप्रमाण, बायकांची अशक्तता व अकालीं मरण इत्यादि सर्व गोष्टींला अगदीं साध्या व सोप्या आरोग्यविषयक गोष्टींचें अज्ञान हेंच एक कारण आहे. केर काढून कोंपऱ्याकोंपऱ्यांनीं अगर दाराचे सांदीला दिवसभर पडूं देणें, मोऱ्या वगैरेंत नेहमीं ओल व घाण, सुंदर स्वर्गीय हवेच्या या हिंदुस्थानांतही खिडक्या–कवाडें पार बंद करून निजणें–तोंडावरून पांघरूण घेऊन निजणें, मलशुद्धि रोजचे रोज होते कीं नाहीं, याकडे दुर्लक्ष, कोणत्याही घाणीची चालढकल, इ. इ. बारीकसारीकच गोष्टी खऱ्या; पण त्यांची उपेक्षा केल्यामुळें अनेक तोटे होतात. हें प्रत्यक्ष उदाहरणानें सोपपत्तिक मुलींस समजावून सांगितलें पाहिजे. आरोग्यविषयांतच दुखापत वगैरे झाली असतां पहिल्यानें करण्याचे उपचार, आजाऱ्यांची शुश्रूषा व मुलांचें संगोपन या गोष्टींचा अवश्य अंतर्भाव झाला पाहिजे. कारण साधारण स्थितींतल्या कुटुंबाला उठल्या सुटल्या डॉक्टरकडे पळणें अगर नर्स ठेवणें शक्य नसतें. साध्या गोष्टींत तरी नवराबायकोस स्वत:-वरच अवलंबून राहण्याची पाळी येते; अशा वेळीं एकासही वरीलप्रकारचें ज्ञान नसेल तर त्यांच्या फजीतीला पारावारच नाहीं! या विषयाला साही वर्षें आठवड्यांतून दोन तास पाहिजेत. शिवणकाम वगैरेंचा अंतर्भाव गृहशिक्षणांतच केला पाहिजे. ड्रॉइंग् सरसकट एक तास पाहिजे.

संगीत आठवड्यांतून दोन वेळ झालें पाहिजे. यापैकीं गायन, वादन, नर्तन जसें ज्यास हवें असेल तसें त्यास शिकविण्याची व्यवस्था केली पाहिजे. या ललितकलेला हिंदु कुटुंबांत अलीकडे कित्येक शतकें

स्थळ नाहींसें झालें आहे. मुलास निजवतांना आई जी कांहीं थोडी 'अंगाई मंगाई' करील व लहानपणीं चौपाळयावर बसून ज्या कांहीं ओंव्या तिनें म्हटल्या असतील तेंच तिचें गाणें! यामुळें आमचा संसार किती रुक्ष होऊन बसला आहे याचा अनुभव घरोघरीं आहेच. करमणुकीला गप्पांशिवाय दुसरें साधन राहिलें नाहीं. फार झालें तर नाटकाला व जलशाला जावें; तेंही सर्व कुटुंबाला नेणें अशक्यच. संगीत पूर्वीं आमचेकडे स्त्रियांस लग्नापूर्वीं शिकविलें जात असे, असे थोडथोडे दाखले सांपडतात. नर्तन या विषयाचा उल्लेख केलेला पाहून कित्येकांस आश्चर्य वाटेल. पण खरोखरी या विषयांत गर्हणीय असें कांहींच नाहीं! तो ज्यांचे हातीं पडला तो विशिष्ट वर्ग दोषी आहे. आमचेकडे आजही मुली फुगड्या, जिमा, फेर वगैरे धरतात, तो नृत्याचाच एक साधा व अगदीं कमी संस्कृत प्रकार नव्हे काय? त्यालाच धरून पण सुधारून नर्तन शिकविल्यास अंग व गति यांचें जें सौष्ठव स्त्रियांस प्राप्त होईल तें नको, असें नंतर कोणी शुक्राचार्यानें म्हटल्यास पाहतां येईल.

हा शिक्षणक्रम अगदीं मध्यमस्थितींतल्या मुलींसही सहज साध्य करतां येईल, अशा तऱ्हेनें त्याची फी वगैरेची योजना व्हावी. आज पुरेशा शिक्षकिणी मिळणें शक्य नाहीं; पण होतां होईल तों अशा शाळांत दोन तृतीयांश इतक्या तरी शिक्षकिणी असाव्या, व बोर्डिंग असलें तर सर्व कारभार त्यांच्या नेतृत्वाखालीं व्हावा—हें ध्येय पुढें ठेवून काय योजना करणें असतील त्या कराव्या. कारण मुलींच्या हृदयांची, त्यांच्या गरजा व अडचणी यांची जाणीव जशी शिक्षकिणींस लवकर होईल तशी शिक्षकांस होणें नाहीं; व शिक्षणांत दोन्ही पक्षीं जी खुली उल्हासवृत्ति अवश्य पाहिजे असते, ती शिक्षक व कमीजास्त प्रमाणानें वाढलेल्या मुली यांमध्यें असणें शक्य नाहीं.

## वरिष्ठप्रतीचें शिक्षण.

स्त्रियांसाठीं श्रेष्ठप्रतीचे शिक्षणाची सुद्धां व्यवस्था वेगळी होणें अवश्य आहे. एकदां म्हटल्याप्रमाणें ज्यांस सध्यांच्या कॉलेजांत शिकून युनि-

व्हर्सिटीच्या पदव्या मिळविण्याची हौस व ऐपत असेल त्यांस तें शिक्षण व पदव्या मिळविण्यास मुळींच प्रत्यवाय असूं नये. इतकेंच नव्हे तर वर आंखून दिलेल्या स्त्रियांचे दुय्यम शिक्षणांतून ज्यांची हल्लींच्या युनिव्हर्सिटीकडे जाण्याची इच्छा व ऐपत असेल, त्यांस शेवटचीं एकदोन वर्षें त्या दृष्टीनें शिक्षण देतां येईल; म्हणजे त्यांच्या ठरलेल्या क्रमांतच थोडेसें जास्त गणित वगैरे विषय त्यांजकडून करवून घेतां येतील. शिवाय पाहिजे तर एखादें वर्ष अधिक घालवूनही त्यांस अभ्यासाची बरोबरी करून युनिव्हर्सिटीमध्यें प्रवेश मिळवितां येईल. पण ही कांहीं थोड्यांची गोष्ट झाली. सामान्य स्त्रीजनांस श्रेष्ठप्रतीचें शिक्षण कांहीं वेगळ्या दिशेचें व वेगळ्या शिक्षणसंस्थांतूनच मिळणें अवश्य आहे. कारण ज्या वयापासून स्त्रीपुरुषादि भिन्नत्वाची भावना विशिष्टरूपानें जागृत होते, त्या वयापासून स्त्रीपुरुषांचें शिक्षण अलग रीतीनें झालेलच श्रेयस्कर आहे. याच दृष्टीचा विचार करून केंम्ब्रिजसारख्या ठिकाणीं स्त्रियांचें कॉलेज स्वतंत्र काढलेलें आहे; व लाइप्झिक् येथें स्त्रियांचीच युनिव्हर्सिटी स्थापली गेली आहे. स्त्रीपुरुषांच्या मिळून शिक्षणाचा (Co-education) प्रश्न फार भानगडीचा आहे. त्यावर सुधारणेंत अगदीं आघाडी मारलेल्या देशांतही रणें माजून राहिलीं आहेत. तो प्रश्न कांहीं थोड्या ठिकाणीं आज प्रयोगास्थितींत आहे. आपली आज असल्या विषाचे प्रयोग पाहण्याची स्थिति नाहीं. शिवाय आमची संस्कृति, आमच्या रीतीभाती, आमची एकंदर राहाटी आज दोन चार हजार वर्षे एका विशिष्ट वळणावर गेली आहे. तिच्या तत्त्वाच्या अगदीं विरुद्ध अशा गोष्टी आवीं आमच्या येथें रुजणार नाहींत, व रुजवण्याचा प्रयत्न केला तर त्या सुपरिणामी होणार नाहींत यांत संशय नाहीं.

स्त्रियांसही वरिष्ठप्रतीचें शिक्षण चार वर्षें असण्यास हरकत नाहीं. हीं चारही वर्षें मातृभाषा, इंग्रजी, हिंदी अगर संस्कृत हे विषय अवश्य असून, हिंदुस्थानची राज्यपद्धति व गृहव्यवस्था, इंग्रजी राज्यपपद्धति व शारीर, समाजशास्त्र व बालमानसशास्त्र, नीतिशास्त्र व तत्त्वज्ञान हे जोडविषय

अनुक्रमें चार वर्षांत व्हावे. म्हणजे चारही वर्षें पांच पेपर आवश्यक होतील. सहावा ऐच्छिक म्हणून शेवटल्या दोन वर्षांत ठेवावा. संस्कृत, शिक्षणशास्त्र, शारीर, अर्थशास्त्र, नितिशास्त्र, इतिहास, तत्त्वज्ञान, आधुनिक शास्त्रें-गाणित इ. यापैकीं वाटेल तो एक घेऊन त्यांत पूर्णता संपादण्याची सोय व्हावी. असें झालें म्हणजे ज्यांची इच्छा असेल त्यांस शिक्षकिणी, नर्सेस्, गार्डियन्स्, कम्पॅनियन्स् या निरनिराळ्या उद्योगांचें ज्ञान कॉलेजांतच वाटेल तो ऐच्छिक विषय घेतल्यावर मिळेल. असो. याच विषयावर सध्यां प्रो. कर्वे व त्यांच्या युनिव्हर्सिटीची सिंडिकेट विचार करीत आहे. विचारा-अंतीं योग्य ठरेल तो अभ्यासक्रम सुशिक्षितांच्या पंसतीसाठीं व सूचनां-साठीं पुढें येत आहे हें चांगलें आहे. म्हणून आमच्या सूचना वरील-प्रमाणें अगदीं थोडक्यांत देण्याचें केलें आहे.

लहान व तरुण मुलींस शिक्षण देतांना त्यांची बुद्धि व हृदय यांच्या जोपासनेबरोबरच शरीराचीही योग्य जोपासना होईल या गोष्टी-कडे फार लक्ष पुरविलें पाहिजे. केवळ बौद्धिक शिक्षण मिळून संसारांत पडल्यावर ज्यांचें सर्व आयुष्य अशक्ततेंत–आजारांत गेलें आहे अशीं अनेक उदाहरणें आहेत. तेव्हां मुलींच्या शारीरिक वाढीवर यत्किंचित्‌ही अनिष्ट परिणाम होईल अशा गोष्टी टाळल्या पाहिजेत; व ती वाढ जोमाची, सर्वांगीण होईल अशा धर्तीचें शारीरिक शिक्षण त्यांस अगदीं मूळपासून तों अखेरपर्यंत दिलें पाहिजे. या बाबतींत उघडच्या हवेवरील खेळांचें महत्त्व कांहीं अपूर्व आहे. धांवणें, उड्या मारणें, डम्बेल्स् व जोडच्या बेताबातानें पेलणें, चेंडूचे देशी विदेशी पण बिनखर्चाचे खेळ खेळणें, यांनीं आतिशय हितकारक परिणाम होतील. चौदा एक वर्षांपर्यंतच व तींही बेताबाताचीच वाढ व पुढें उतरती कळा अशी स्थिति आमच्या स्त्रीवर्गाची आज आहे. उलटपक्षीं पश्चिमेकडे पहावें तों वीस वर्षेपर्यंत तिकडील मुलींची वाढ होत असते. त्यांच्या चेहऱ्यावरील तजेला, वागण्यांत अल्लडपणा हीं आमचेकडे दिसून येत नाहींत. याचें कारण त्यांजवर संसाराचा व आईपणाचा अकालीं भार

पडतो हें होय. सोळा वर्षेपर्यंत अविवाहित राहून शिक्षण संपादणाऱ्या आपल्या इकडील मुली देखील बऱ्याच वाढलेल्या व तजेलदार दिसतात. मग त्यांस योग्य शारीरिक शिक्षणाचें वळण मिळाल्यावर काय न होईल?

याप्रमाणें आम्हांस जें कांहीं सांगावयाचें होतें तें सांगितलें. लोकांकडे कांहीं एखादी गोष्ट पाहिल्यावर, तशी आपणांकडे आहे कीं नाहीं, असल्यास काय तफावत आहे व कां—वगैरे तुलनात्मक विचार सुचणें अपरिहार्य होतें. त्यामुळेंच हा उपसंहार लिहिण्याची स्फूर्ति झाली. आतां शेवटीं सर्व सुशिक्षितांस एक विनंति करावयाची आहे. शिक्षणाशिवाय—सार्वजनिक शिक्षणाशिवाय—आपल्या देशाची खरी उन्नति होणार नाहीं, हें आतां सर्वांस समजून चुकलें आहे. तेव्हां तें मिळविण्यासाठीं सर्वांनीं आपापल्या परीनें अश्रांत श्रम केले पाहिजेत. त्याशिवाय तरणोपाय नाहीं. स्वदेशी सरकारें सुद्धां लोकांनीं मागितल्याशिवाय, चळवळ केल्याखेरीज कांहीं स्वयंस्फूर्तीनें देण्यास तयार होत नाहींत, हें आपणांस इतिहास कंठरवानें सांगत आहे. तेव्हां आपण मेहनत—चळवळ केल्याशिवाय आपोआप अमृत आपल्या घशांत पडेल अशी कोणीं कल्पना करूं नये. जे लोकनियुक्त नामदार असतील त्यांनीं प्रश्न विचारून, बिलें आणून सरकारास सतावून सोडावें; लोकाग्रणींनीं व्याख्यानें देऊन व लेख लिहून लोकमत तयार करावें व तें सरकारपुढें वारंवार व जोरानें मांडावें. म्हणजे लंडन येथें हिंदी स्त्रीशिक्षणाविषयीं जें डेप्युटेशन् स्टेटसेक्रेटरी साहेबांकडे गेलें होतें, त्याची गति झाली तशी पुनः होणार नाहीं. खाजगी शिक्षणसंस्था आहेत, त्यांनीं आपल्या हक्कांस डोळ्यांत तेल घालून जपावें व डिपार्ट्मेंट्च्या आक्रमणास जुमानूं नये. डिपार्ट्मेंट् त्यांच्या सोईसाठीं आहे, त्या संस्था डिपार्ट्मेंट्च्या सोईसाठीं नाहींत हें त्यांनीं न भेजतां डिपार्ट्मेंट्च्या नजरेस आणावें. या कामीं अर्थात् खाजगी शिक्षणसंस्थांमध्यें एकोपा पाहिजे. कोणाचा पायपोस कोणाच्या पायांत नाहीं अशी स्थिति झाली, तर पंचतंत्रांतील बैलांप्रमाणें त्यांची गति होईल. सर्वांनीं एकोपा करून डिपार्ट्मेंट्वर वजन पाडलें पाहिजे व त्याला मार्ग दाख-

विला पाहिजे. धनिकांनीं पुढें होऊन शिक्षणास हर तऱ्हेची मदत केली पाहिजे. ज्या त्या जातींतल्या धनिकांनीं फक्त जात्यभिमान जागा ठेवून जातीसाठीं शाळा, कॉलेजें, धंदेशिक्षणाच्या संस्था काढल्या तरी हरकत नाहीं. कारण समाजांतील प्रत्येक संघ आपल्या शिक्षणास जपला म्हणजे सर्व समाजाची त्या बाबतींत अनायासेंच प्रगति होते. आम्हीं इतकें केलें आहे, आतां अमुक अमुक तरी निदान सरकारानें केलेंच पाहिजे, असें त्यांनीं दाखवून दिलें, म्हणजे मात्र सरकारास नाइलाजाची स्थिति प्राप्त होईल. आपण आपलें कर्तव्य करून सरकारास आपल्या कर्तव्यास जागवावें. आपल्या आंगास घस व पदरास खार न लागतां लोकांनीं तेवढें अमुक करावें, तमुक करावें अशी पोकळ ओरड कधींही कामास येत नाहीं.

समाप्त.

पा. १२७ ओ. २ येथें 'ओकांचें' च्या ऐवजीं 'देसायांचें' असें वाचावें.

# संग्राह्य पुस्तकें.

| | रु. आ. पै. |
|---|---|
| राष्ट्रीय सभा—तिची उत्पत्ती व वाढ. लेखक–ग. र. अभ्यंकर, वकील, सांगली ( यांत आजपर्यंतच्या राष्ट्रीय सभेच्या अध्यक्षांचे सुंदर फोटो दिले आहेत. ) | ०–८–० |
| गोपाळ कृष्ण गोखले—चरित्र व कामगिरी. लेखकः–ग. र. अभ्यंकर, वकील, सांगली. | ०–४–० |
| सद्यःस्थिती—(लेखकः–सौ० लक्ष्मीतनया) यांत ८ सुंदर गोष्टी व २५ विषयांवर कविता यांचा संग्रह केलेला आहे. त्यावरून संसारांतील आजकालच्या कांहीं चित्रांचा चांगला बोध होतो. | १-१२-० |
| गांवगाडा—( लेखकः–त्र्यं. ना. अत्रे. ) या पुस्तकावरून पूर्वीची व हल्लींची ग्रामव्यवस्था कशी आहे याची उपयुक्त माहिती मिळेल. | १–४–० |
| दक्षिणेंतील शेतीची सांपत्तिक स्थिति–श्रीमंत नारायणराव बाबासाहेब घोरपडे यांनीं तयार केलेलें. | १–८–० |
| मराठी रेल्वे टाईम टेबल— जी. आय. पी., एस. एम्. एस., बी. बी. सी. आय., बार्शी लाईट रेल्वे, आणि निजामस्टेट वगैरे रेल्वेवरील गाड्यांचे वेळाची बिनचूक माहिती. | ०–०–६ |
| वधूवर पत्रिका–संमेलन आणि कोंकणस्थ व कऱ्हाडे ब्राम्हणांची गोत्रावळी. यांत गुणमेलनाचें कोष्टक दिलें आहे. | ०–४–० |

ज्ञानेश्वर, आर्यभूषण प्रेस, पुणें.

## रा. रा. हरि नारायण आपटे यांनीं लिहिलेले ग्रंथ.

### कादंबऱ्या.

**ऐतिहासिक.** कि॰ रु॰ आ॰

१. उष:काल ( अडीचशें वर्षांपूर्वीचें महाराष्ट्र. ) २—०—०
२. गड आला पण सिंह गेला ! ... ...०—८—०
३. रूपनगरची राजकन्या. ... ... ...१—१२—०
४. चंद्रगुप्त (पंचवीसशें वर्षांपूर्वीचें हिंदुस्थान.) ...१—०—०
५. वज्राघात ! ... ... ... ... ...१—८—०

**सामाजिक.**

१. आजकालच्या गोष्टी ( मधली स्थिति. ) ...२—०—०
२. पण लक्षांत कोण घेतो ! ... ... ...३—०—०
३. भयंकर दिव्य ! ... ... ... ...२—४—०
४. जग हें असें आहे ! ... ... ... ...२—०—०
५. मायेचा बाजार. ... ... ... ...२—०—०
६. मी. ... ... ... ... ... ...२—०—०
७. यशवंतराव खरे. ... ... ... ...१—८—०
८. चाणाक्षपणाचा कळस. ... ... ...०—१२—०

### व्याख्यानें.

१. मराठी वाङ्मयाचा अभ्यास. ... ....०—४—०
२. विदग्ध वाङ्मय. ... ... .... ...०—३—०
३. मुलांस उपदेश. .... ... .... ...०—८—०
४. अकोलें येथील व्याख्यान. ... ...०—२—०

### नाटकें व प्रहसनें.

१. संगीत संत सखूबाई. ... ... ...०—१२—०
२. तीन नाटकें व तीन प्रहसनें. ... ...१—८—०
[ १ जयध्वज. २ श्रुतकीर्तिचरित. ३ सुमतिविजय. ४ धूर्तविलसित. ५ मारून मुटकून वैष्णवा. ६ जबरीचा विवाह. ]

### गोष्टी.

१. स्फुट गोष्टी, भाग १, २, ३, ४. प्रत्येकीं ०—८—०

म्यानेजर, आर्यभूषण प्रेस, पुणें सिटी.